नगरपालिका व निवडणुका

कायद्यांतील तरतूद आणि कायद्याचा वापर
यांचे विश्लेषण.
म्यु. कौन्सिलर होऊं इच्छिणाऱ्या नागरीकांना उपयुक्त.

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. 3039



REFBK-0024184

– ना. धों. उपाध्ये

गो. य. राणे प्रकाशन, पुणे

संदर्भ विभाग

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

3 MAY 1984

(क्र. मा. प.)
५०००–१२–८२



संदर्भ निबंध
3039
२४९८४
१७।४।८४

नगरपालिका
आणि
निवडणुका



नगरपालिका
आणि
निवडणुका

यांशी संबंधित कायद्यातील तरतूद आणि कायद्याचा वापर यांचे विश्लेषण
म्युनिसिपल कौन्सिलर असणाऱ्या अथवा होऊ इच्छिणाऱ्या नागरिकांना उपयुक्त

लेखक
नारायण धोंडोपंत उपाध्ये

गो. य. राणे प्रकाशन
टिळक रोड, पुणे ४११ ०३०

© लेखकाकडे
प्रथमावृत्ती १९८४

प्रकाशक :
नरेन्द्र गो. राणे
गो. य. राणे प्रकाशन
टिळक रोड, पुणे ४११०३०

किंमत रु. ३०–००

मुद्रक :
प्रकाश लक्ष्मण सातपुते
प्रकाश प्रिंटर्स
३५७ कसबा पेठ, पुणे ४११ ०११

आजच्या पिढीतील सार्वजनिक काका
श्री. पंडित दत्तात्रय इनामदार (सातारा)
नम्रभावे अर्पण

ना. धों. उपाध्ये

आणखी थोडे अधिक

कायद्यातील संबंधित कलमांचे भाषांतर आणि त्यावरील भाष्य दिल्याने, या पुस्तकाचा हेतू मर्यादित असला तरी तो पूर्णतः साध्य होत नाही. मर्यादित हेतूतील व्यापकता विशद करण्यासाठी, कलमांचे भाषांतर व भाष्य यापेक्षा अधिक काही विवरण करणे आवश्यक वाटते. मतदारांचे यादीत (कलम ११ प्रमाणे) ज्याचे नाव मतदार म्हणून आहे त्या प्रत्येक मतदारास म्युनिसिपालिटीची निवडणूक लढविण्याचा अधिकार आहे अशा मतदार उमेदवाराचे निवडणूक लढविण्यापूर्वीचे हक्क, त्याचे कर्तव्य, त्याने घ्यावयाची दक्षता, तसेच उमेदवारी लढवीत असतानाचे त्याचे हक्क, त्याचे कर्तव्य व त्याने घ्यावयाची दक्षता आणि उमेदवारी लढविल्यानंतर पुढे त्याचे हक्क, कर्तव्य याबाबतची अधिक माहिती कलमाखालील भाष्यात जी आलेली नाही, देता आली नाही ती येथे देत आहे. "**हक्क**" ही देणगी अशी आहे, की ती देणगी देणे विधिमंडळाला परिस्थितीने भाग पाडलेले असते. कायद्यातील विषयाशी सुसंगतता राखण्यासाठी हक्काची देणगी द्यावीच लागते. कायद्यातील आशयपूर्तीसाठी अशा हक्कांचा स्वीकार करणाराने त्या हक्काची जपणूक आणि निर्वाहन, त्या हक्कांची प्रतिष्ठा सांभाळून केले पाहिजे. कायद्याच्या कलमातील आशय मर्यादित असतो, तेवढचा मर्यादेतच त्यावरील भाष्याचा पसारा पसरावा लागतो. पण विषयाला अनुरोधून असणाऱ्या तदनुषंगिक विषयाचे अधिक विश्लेषण केल्यास त्यातील खरा रस, वर्म आणि मर्म बुद्धिगम्य होण्यास मदत होते. ही प्रत्ययकारिता आकांक्षित कार्यान्विततेस सहाय्यकारी ठरते.

म्युनिसिपालिटीचे कार्य, कार्यप्रवणता आणि कार्यपूर्तता यांची प्रेरक शक्ती म्युनिसिपालिटीच्या मीटिंगमध्ये आहे. मीटिंग – कौन्सिलरांची मीटिंग, हा म्युनिसिपालिटीचा प्राण आहे. जे मीटिंगमध्ये ठरत नाही असे कोणतेही कार्य म्युनिसिपलिटीला करता येत नाही. सुरू झालेल्या कार्याची कार्यप्रवणता निर्वाहित करता येत नाही आणि निर्वाहांकित असणाऱ्या कार्याची कार्यपूर्तताही होऊ शकत नाही इतकी प्रेरक शक्ती म्युनिसिपालिटीच्या मीटिंगमध्ये आहे.

मीटिंगसंबंधी केलेल्या नियमांतील तरतुदींच्या अधीन, मीटिंगमध्ये चर्चिल्या जाणाऱ्या विषयाची तरतूद, विहित पद्धतीने ठरलेल्या मुदतीपूर्वी –

त्याची आधी नोटीस काढणे,

सर्व कौन्सिलरांना ती पोहोचविणे

अत्यंत आवश्यक असते. यांतील कोणतीही चूक, ती मीटिंग बेकायदेशीर ठरविण्यास कारण होते. या कायद्यातील कलम ८१ (४)मध्ये, नोटीससंबंधीची तरतूद आहे.

मीटिंगसाठी जो दिवस ठरविलेला असेल त्या दिवसापूर्वी आधी अमूक इतके

दिवस नोटीस काढली पाहिजे अशी भाषा कलमात असली तरी नोटीस काढली पाहिजे याचा अर्थ मीटिंगला हजर राहणे आवश्यक आहे अशावर ती बजावली गेली पाहिजे इतकी व्यापकता त्या अर्थात आहे. असा निष्कर्ष सुप्रीम कोर्टाचा आहे– (के. नरसिंहन् वि. एच. सी. सिंग्री गौडा, ए. आय. आर. १९६६ सु. को. ३३०.)

महाराष्ट्र म्युनिसिपालिटीज् (कॉण्डक्ट ऑफ बिझिनेस) रूल्स १९६६ च्या नियम १६ (अ) खाली, नोटीससंबंधी असलेल्या सर्व अटींची पूर्तता करून, स्पष्ट, निःसंदिग्ध आणि एकच एक नियामक मुद्दा – अविश्वासाचा – असल्याशिवाय नोटीस नियमान्वित असल्याचे मानले जात नाही.

या १९६६ च्या नियमांतील नियम २४ (१) प्रमाणे,

(अ) अविश्वासाची किंवा सुधारित नोटीस, अनुमोदन दिलेली, अध्यक्षीय अधिकाऱ्याने मीटिंगमध्ये वाचली पाहिजे किंवा वाचण्यास उद्युक्त झाले पाहिजे.

(ब) नंतर मीटिंगमध्ये चर्चेसाठी तिचा विचार झाला पाहिजे.

(क) नंतर, मुद्दा मांडणाराने/सूचकाने मुद्द्याच्या समर्थनाचे भाषण केले पाहिजे. त्यानंतर अनुमोदकाने पुष्टी देणारे भाषण करावे अथवा नंतर करण्याचा हक्क राखून ठेवावा.

(ड) इतर कौन्सिलरांनी अन्यथा रक्षित करून, अध्यक्षीय अधिकारी जसा आदेश देतील त्याप्रमाणे भाषण करावे.

जर अध्यक्षीय अधिकाऱ्याने विरोध दर्शविला नाही तर सर्वसाधारण विशेष सभेला जनतेला हजर राहता येते. मात्र जनतेने उपस्थित राहिलेच पाहिजे अथवा उपस्थित राहण्यासाठी जनतेला आवाहन केलेच पाहिजे अशी बंधनकारक तरतूद कायद्यात नाही. अशा मीटिंगला कौन्सिलर हजर किंवा गैरहजर राहिला तरी मीटिंगला हजर राहण्यासंबंधीचे नियम पाळले अथवा पाळले नाहीत म्हणून त्याचे संबंधात कोणताही चांगला वा वाईट परिणाम घडत नाही,– घडवून आणला जात नाही. [शहाबुद्दीन मोहीउद्दीन लि. गदग बेट्टीगिरी म्युनिसिपालिटी (१९५५) सुप्रीम कोर्ट रिपोर्टर १२६८.]

म्युनिसिपालिटीने मंजूर केलेला ठराव राज्य सरकारला लेखी आदेशाने निलंबित अथवा रद्द करता येतो. कृती करण्यास प्रतिबंध करता येतो. मात्र असा ठराव, म्युनिसिपालिटीचा आदेश, परवाना, नियमान्वये मंजूर झाला नसेल, प्राधिकृत झाला नसेल तरच. कायद्याने ज्या मर्यादा आखून दिलेल्या आहेत त्या मर्यादांचे उल्लंघन झाले असेल तरच. त्याचप्रमाणे –

अशा आदेशाची कार्यवाही चालू करणे मानवी हिताला बाधक असेल, बाधक होणे संभवनीय असेल, दंगल होणार असेल, शांतताभंग होणार असेल तर.

सर्वसाधारणपणे प्रत्येक म्युनिसिपालिटीने पुढील कामे केलीच पाहिजेत;

त्यासाठी त्या त्या विषयाचे खाते वा विभाग असलाच पाहिजे असे बंधन नाही. काम केले पाहिजे हे महत्त्वाचे.

कर-आकारणी आणि कर-वसुली (कायद्यांतील तरतुदीच्या चौकटीत)

अग्निशामक साधने, सुविधा, त्यांचे निर्वाहन आणि आवश्यकतेनुसार कार्यप्रवणता.

प्रकाश-योजना.

पाणी पुरविणे व सांडपाणी वाहून जाईल असे करणे. (हे आरोग्यवर्धक असले पाहिजे अथवा निदान आरोग्यघातक असता कामा नये.)

अभियंत्रण

अतिक्रमणाचे प्रतिबंधन

मैला-वाहन

आरोग्य-संवर्धन व आरोग्य निर्वाहन

जन्म-मृत्यू नोंद

बाजार, भेसळ-प्रतिबंधन

सार्वजनिक बाग, रमणा इत्यादी.

जनन-गणन

जिंदगी निर्वाहन

शिक्षण, वाचनालये, संग्रहालये, कलादालन इ.

इमारती

मुद्रण

सर्वसामान्य प्रशासन

भटक्या आणि उपद्रवी जनावरांपासून नागरिकांचे संरक्षण इत्यादी इत्यादी.

केव्हाही, कोणत्याही परिस्थितीत कोणालाही कोणाचेही पाणी तोडता येत नाही आणि संडास बंद करता येत नाही.

उमेदवाराच्या बाबतीत निवडणूक कार्याची सुरुवात नामांकन पत्र भरणे व दाखल करणे येथपासून होते. (आशुतोष बानर्जी वि. देवज्योती बर्मन, ए. आय. आर. १९५३ कलकत्ता २२) नामांकन पत्राची पूर्तता करणेस चुकू नये, त्यात उणीव राहू देऊ नये. निवडणुकीच्या खुणेची नोंद नामांकन पत्रात करण्याचे राहून गेले तर ती उणीव राहिली असे समजले जात नसले तरी अशी चूक, अगदी क्षुल्लक चूकसुद्धा राहता कामा नये. नामांकन पत्रात जेथे जेथे सूचक, अनुमोदक उल्लेख असेल तेथे तेथे त्याची पूर्तता करावी. पक्षाच्या आदेशानुसार खूण निवडावयाची असेल तर तसे नमूद करून तो हक्क राखून ठेवता येतो (के. एस. अब्दुल अझीज वि. रामनाथन चेट्टीयार, ए. आय. आर. १९६७ सु. को. ८५). उमेदवारास ज्या वॉर्डात निवडणूक लढवायची असेल त्याच वॉर्ड मतदार यादीत नाव असलेल्या मतदारांचे नाव नामांकन पत्रात सूचक, अनुमोदक म्हणून असले पाहिजे. नामांकन

पत्रात आवश्यक तेथे आवश्यक त्यांच्या स्वाक्षऱ्या (सह्या) असल्या पाहिजेत. लोकप्रतिनिधित्व कायद्यातील कलम २ (i) यात " सही " या शब्दाचा अर्थ / शब्दाची व्याख्या दिली आहे. व्यक्तीचे आलेखन; अमुकच व्यक्ती असे आलेखन ज्यामुळे होते ती सही. सहीसाठी पद्धत विहित असली पाहिजे. साक्षर व्यक्तीने स्वतःच्या हस्ताक्षरात, विशिष्ट लकब असल्यास विशिष्ट लकबीत नाव / नावाचे आद्याक्षर, पित्याचे नाव / पित्याचे आद्याक्षर, आडनाव लिहिणे याला सही म्हणतात. निरक्षर व्यक्तीच्या डाव्या हाताचा अंगठा उठवतात व त्याखाली दस्तुर खुद्द करतात. नामांकन पत्रावर उमेदवाराची, सूचकाची, अनुमोदकाची, जसे असेल तसे, सही असणे कायद्याने बंधनकारक आहे. (राम दयाळ वि. ब्रजराजसिंग, ए. आय. आर. १९७० सु. को. ११०.)

त्यानंतर नामांकन पत्राची छाननी केली जाते. त्यासाठी दिवस ठरविला जातो त्याला ON THE DATE FIXED FOR SCRUTINY – छाननीसाठी निश्चित केलेला दिवस असे म्हणण्याची प्रथा आहे. हा निश्चित केलेला दिवस ज्या तारखेचा असेल त्या तारखेचा चोवीस तासांचा दिवस. इंग्रजी पद्धतीप्रमाणे तारीख सुरू होते रात्री १२–०१ पासून व तारीख संपते रात्री १२–०० वाजता. हा चोवीस तासांचा कालावधी म्हणजे तो निश्चित केलेला दिवस (पशुपतीनाथ सिंग वि. हरिहर प्रसाद सिंग. ए. आय. आर. १९६८ सु. को. १०६४), नामांकन पत्रातील सर्व तरतुदींची आवश्यकतेप्रमाणे पूर्तता केली आहे किंवा नाही हे कसून, कटाक्षाने पाहणे, तपासणे म्हणजेच केवळ छाननी करणे नव्हे; तर संबंधित नामांकन पत्राबाबत ज्या ज्या हरकती/आक्षेप उपस्थित होतील, उपस्थित केल्या जातील, उपस्थित होऊ शकतील अथवा होणे संभवनीय असेल अशा सर्व आक्षेप हरकतींचे योग्य व कायद्यातील तरतुदींना धरून निराकरण करणे हाही छाननीचाच भाग आहे. अशी सर्वांगीण छाननी झाल्यावर जेव्हा रिटर्निंग ऑफिसर ती नामांकन पत्रिका योग्य असल्याच्या निर्णयाला येतो तेव्हा ती स्वीकारण्यावाचून त्याचेपुढे अन्य पर्याय नसतो. (एन. पी. पूव्वास्वामी वि. रिटर्निंग ऑफिसर, १९५२ सुप्रीम कोर्ट रिपोर्टर २१८; दुर्गा शंकर मेथा वि. ठाकूर रघूजी सिंग, ए. आय. आर. १९५४ सु. को. ५२०.) नामांकन पत्र फेटाळण्याची कारणे अथवा पार्श्वभूमी खालीलप्रमाणे –

(१) नामांकन पत्राच्या छाननीचे दिवशी, उमेदवार निवडणूक लढविणेस अर्हत नसेल किंवा अनर्हत झाला/ठरला असेल तर,

(२) नामांकन पत्र भरणे व दाखल करणे यासंबंधीची कायद्याने विहित केलेल्या तरतुदींची तंतोतंत पूर्तता झालेली/केलेली नसेल तर,

(३) नामांकन पत्रात आवश्यक ठिकाणी उमेदवाराची, सूचकाची, अनुमोदकाची सही विश्वसनीय नाही असे वाटेल तर,

यानंतर उमेदवारी मागे घेणेची संधी कायद्याने उपलब्ध करून दिली आहे

तिचा उपयोग, ज्याला त्याची आवश्यकता वाटेल त्याने करून घ्यावा. मात्र तसे करण्याचा उद्देश असल्याची लेखी नोटीस उमेदवाराने रिटर्निंग ऑफिसरला दिली पाहिजे. त्यात –

विहित केलेला तपशील नमूद केलेला असला पाहिजे. उमेदवारानेच ती भरली पाहिजे.

परत घेण्याच्या ठरविलेल्या तारखेदिवशी दुपारी ३–०० पूर्वी रिटर्निंग ऑफिसरला उमेदवाराने स्वत: किंवा त्याच्या सूचकानें किंवा निवडणूक कार्यासाठी त्याने विहित पद्धतीने प्राधिकृत केले असेल अशा त्याच्या निवडणूक एजंटाने पोहोचती केली पाहिजे. एकदा अशी नोटीस रिटर्निंग ऑफिसरला मिळाल्यावर ती परत घेण्यास अथवा रद्द करण्यास उमेदवाराला मुभा मिळत नाही, दिली जात नाही.

ज्याची नामांकन-पत्रिका स्वीकारली आहे, म्हणजेच मंजूर झाली आहे तो त्या वेळेपासून उमेदवार या संज्ञेला पात्र होतो. म्हणजेच निवडणुकीच्या रिंगणात त्या वेळेपासून तो उतरतो. निवडणुकीच्या संबंधात निवडणूक जिंकणे हेच त्याचे ध्येय होते. त्यासाठी त्याचा प्रचार सुरू होतो.

निवडणुकीचा नंतरचा टप्पा मतदानाचा.

त्यानंतरचा मतमोजणीचा.

उमेदवाराची निवडणूक खूण, मतपत्रिका, मतदान-केंद्र आणि मतदान यासंबंधीची जरुरीपुरती माहिती त्या त्या संबंधित कलमाखालील भाष्यांत दिलेली आहे.

मतदान सुरू होण्यापूर्वी, मतदानाच्या कार्यात उपयोगात आणावयाच्या वस्तू, साधने, सुविधा यांची तपासणी करण्याचा उमेदवाराचा हक्क आहे. त्यास, त्याच्या एजंटामार्फतही या हक्काचा उपभोग घेता येतो. (बिहारीलाल वि. बिंदेश्वरी प्रसाद, ए. आय. आर. १९६५ पाटणा १०७; डॉ. अनुपसिंग वि. अब्दुल गनी, ए. आय. आर. १९६५ सु. को. ८१५).

मतदानानंतर वर नमूद केलेल्या पण उर्वरित वस्तूंची, साधनांची, सुविधांची तपासणी करण्याचा उमेदवाराचा, कायद्यातील तरतुदीनुसार हक्क आहे. मतमोजणीस सुरुवात करण्यापूर्वी पुन्हा हे सर्व त्या ज्या पद्धतीत ठेवल्या होत्या/आहेत त्या त्यानुसार, तपासण्याचा उमेदवारास हक्क आहे.

या कायद्यात निरनिराळ्या कारणास्तव निर्णय घेणारे निरनिराळे अधिकारी आहेत. त्यांच्या निर्णयामुळे व्यथित होणारांचे प्रकारही तसेच निरनिराळे आहेत व व्यथितानें ज्यांचेकडे अशा निर्णयाविरुद्ध दाद मागावयाची म्हणजेच अपील करावयाचे, ते ते अधिकारी–अपीलेट अधिकारीही निरनिराळे आहेत. काही प्रकरणे अशीही असू शकतात की हायकोर्टाकडेही दाद मागण्यासाठी धाव घ्यावी लागते.

या पुस्तकाचा विषय मर्यादित आहे, ही मर्यादा ओळखून मी संबंधित विषयाची माहिती दिली आहे. माहिती कितपत परिपूर्ण आहे हे टीकाकारांनी ठरवावयाचे

आहे. ती कितपत उपयुक्त आहे या प्रश्नाचे उत्तर मी स्वतः, म्युनिसिपालिटीचे कार्य जाणून घेऊ इच्छिणारे नागरिक आणि म्युनिसिपालिटीचे कार्य करू इच्छिणारे नागरिक यांनी द्यावयाचे आहे. माझे उत्तर माझ्यापुरते पूर्ण समाधानकारक आहे. उपयुक्त माहिती जरूर त्या विस्ताराने आणि विश्लेषणाने मी सादर केली आहे याबद्दल मी स्वतः समाधानी आहे. असो.

व्यावसायिक कुटीलतेचा कोणी अंगीकार करू नये, त्यातून कटुता निर्माण होऊ नये म्हणून कॉपीराईट कायद्यातील संबंधित तरतुदींचा मी आश्रय घेतला आहे.

ज्यांनी साहाय्य केले व ज्यांनी केले नाही अशाही संबंधितांचे, पुढे साहाय्य लाभेल ही अपेक्षा बाळगून सर्वांचे आभार मानतो व माझ्या ज्ञात-अज्ञात सर्व उमेदवारांचे त्यांच्या उमेदवारीत यश चिंतितो.

जयहिंद !

६० सोमवार पेठ,
पुणे ४११ ०११

ना. धों. उपाध्ये

अनुक्रमणिका

		पृष्ठ
१. मतदारांची यादी	...	१
२. खोट्या प्रकटीकरणासाठी शिक्षा	...	१०
३. मत देण्याचा अधिकार	...	११
४. मतदानाची पद्धत	...	१३
५. मतदानावरील इतर बंधने	...	१५
६. उमेदवारासाठी अर्हता	...	१५
७. नगरसदस्य होता येणार नाही अशी अनर्हता	...	१७
८. निवडणुकीचे रीति-नियम करण्याची शक्ती	...	२७
९. निवडून देणेस चुकणे	...	२८
१०. निवडणुकीच्या निर्णयाचे प्रकटीकरण	...	२९
११. कौन्सिलरची आपसांतून निवड	...	३०
१२. कार्यालयीन राजपत्रांत को-ऑप्टेड आणि नॉमिनेटेड कौन्सिलरांच्या नावाचे प्रसिद्धीकरण	...	३०
१३. को-ऑप्शन किंवा नॉमिनेशन कौन्सिलरांच्या-अध्यक्ष समाविष्ट-निवडणुकीसंबंधी विवाद	...	३०
१४. भ्रष्टाचारी कृत्ये	...	४२
१५. निवडणुकीचे दिवशी सार्वजनिक सभेस प्रतिबंध	...	६४
१६. मतदानकेंद्रात किंवा जवळ प्रचार करण्यास प्रतिबंध	...	६४
१७. मतदानकेंद्रात किंवा जवळ शिस्तहीन वर्तनाबद्दल दंडन	...	६५
१८. मतदानकेंद्रावरील गैरवर्तनाबद्दल दंडन	...	६६
१९. निवडणुकीत बेकायदेशीर वाहने उपलब्ध करणे व भाड्याने देणे याबद्दल दंडन	...	६७
२०. मतांच्या गोपनीयतेचे निर्वाहन	...	६७
२१. निवडणुकीत अधिकारी वगैरे यांनी उमेदवारासाठी काही कृती करता कामा नये अथवा मतासाठी दबाव आणू नये	...	६८
२२. निवडणुकीशी संबंधित असणाऱ्या कार्यालयीन कर्तव्याचे उल्लंघन	...	६८
२३. मतदानकेंद्रातून मतपत्रिका हलविणे हा गुन्हा होय	...	६९
२४. निवडणुकीचे इतर गुन्हे व त्यासाठी दंडन	...	७०
२५. विशिष्ट गुन्ह्यासाठी फिर्याद	...	७१

		पृष्ठ
२६. निवडणुकीसाठी जागा, गाडचा मागविणे	...	७१
२७. भरपाईबद्दल देणे	...	७२
२८. माहिती मिळविण्याची शक्ती	...	७३
२९. ताब्यात घेणेची जागा, ताब्यातून मुक्त करणे	...	७४
३०. जागेचा ताबा परत करणे	...	७४
३१. नगर-सदस्यांच्या पदाचा सत्रकाल	...	७५
३२. नगर-सदस्यांचा राजीनामा	...	७८
३३. पदावरून काढून टाकण्यातील नगर-सदस्यांचे दायित्व	...	७९
३४. नगर-सदस्याच्या नंतरच्या अनर्हतेवर राजीनामा आघात करीत नाही	...	८०
३५. पदधारणेच्या सत्रकालात नगर-सदस्याची अनर्हता	...	८२
३६. नगरपालिकेस देय असलेले कर भरण्यास चुकल्यास अनर्हताचे बाबतीत विशेष तरतूद	...	८७
३७. करवसुलीच्या नगरपालिकांच्या इतर शक्तीवर कलम ४५ चा आघात	...	८८
३८. नैमित्तिक रिक्तता कशी भरावी	...	९१
३९. अध्यक्षाची निवडणूक आणि उपाध्यक्षाची नेमणूक	...	९९
४०. अध्यक्षाच्या पदाचा सत्रकाल	...	१००
४१. अध्यक्षाचा राजीनामा	...	१०२
४२. उपाध्यक्षाचा राजीनामा	...	१०२
४३. अध्यक्षाला काढून टाकणे	...	१०२
४४. परवानगीशिवाय अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांच्या गैरहजेरीचे परिणाम	...	११०
४५. अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांनी त्यांच्या पदाचे हस्तांतरण करणे	..	१११
४६. अध्यक्षाची कामे	...	११२
४७. उपाध्यक्षाची कामे	...	११३
४८. अध्यक्षास मानधन किंवा व्यय-भत्ता आणि नगर-सदस्यांना सभा-भत्ता	...	११३
४९. महाराष्ट्र नगरपालिका (पालिका-सदस्य स्वीकृत करणे) नियम १९६७	...	११५
५०. महाराष्ट्र नगरपालिका (अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या निवडणुका) नियम १९६७	...	१३०
५१. महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६	...	१३६

पृष्ठ

५२. महाराष्ट्र नगरपालिका (कौन्सिलरांसाठी कराची विशेष नोटीस) नियम १९६७ ...
५३. महाराष्ट्र नगरपालिका (अध्यक्षास मानधन व व्यय-भत्ता) ...
५४. हेही लक्षात असू द्या ... २३९

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३०३१
ग्रं. क्र. २४१८४
निबंध १७१४८
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

नगरपालिका आणि निवडणुका

मतदारांची यादी

११. [१] लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५० चे तरतुदीखाली तयार केलेली, तिचा जो भाग म्युनिसिपल क्षेत्रात समाविष्ट असेल अशा मतदारसंघाची, संचालकाने सामान्य किंवा विशेष सूचना-पत्रकाने अमलात आल्याची तारीख सूचित केली असेल अशा तारखेची – अशी तारीख सूचना–पत्रकापूर्वीची; पण सूचना-पत्रकापूर्वी लगतपूर्व एक महिन्यापेक्षा आधीची नसेल अशी – महाराष्ट्र विधि-मंडळाच्या मतदारांची यादी, मुख्याधिकारी यांनी म्युनिसिपल क्षेत्रातील निर-निराळ्या वॉर्डांशी संबंधित असेल अशा प्रत्येक वॉर्डची निरनिराळी विभागणी केली पाहिजे. आणि अशी केलेली विभागणी प्रत्येक विभागाची छापील प्रत, मुख्या-धिकारी यांनी सत्यत्व प्रमाणित केली असेल ती प्रत्येक वॉर्डची यादी मसुदा यादी असली पाहिजे. वॉर्डची मसुदा-यादी अशा पद्धतीने प्रसिद्ध केली पाहिजे की, संचालकाचे मनाप्रमाणे ज्यांचेवर परिणाम घडून येणे संभवनीय असेल अशा व्यक्तींचे नजरेस ती आणली गेली पाहिजे. तसेच संचालकाने प्राधिकारांकित केलेल्या शासकीय अधिकाऱ्याकडे, नाव समाविष्ट करणे किंवा यादीतील नोंदीत दुरुस्ती करणे यांसाठी अर्ज सादर करण्यासाठी हा किंवा तत्पूर्वीचा दिनांक स्पष्ट केलेले सूचनापत्रकही प्रसिद्ध केले पाहिजे.

[२] जर प्राधिकारांकित अधिकारी, त्याचेकडे अर्ज केल्यावरून अथवा त्याने होऊन, त्याला योग्य वाटेल ती चौकशी केल्यावरून समाधान पावल्यावर, जर मसुदा-यादीत नोंदणीसाठी अर्हताप्राप्त व्यक्तीचे नाव वगळले आहे किंवा वॉर्डच्या मसुदा-यादीतील कोणतीही नोंद

(अ) चुकीची किंवा कोणत्याही तपशिलात उणीव आहे.

(ब) इतरत्र कोठे त्या यादीत संबंधित त्या वॉर्डातील निवासातील झालेल्या बदलाच्या कारणावरून काही बदल झाला आहे, किंवा

(क) संबंधित व्यक्तीच्या मृत्यूमुळे गाळण्याचे राहिले आहे किंवा वॉर्डातील त्याचा निवास संपुष्टात आला आहे किंवा अन्यथा वॉर्डयादीत नोंद होणेस पात्र नाही;

तर अशा अधिकाऱ्याने या संबंधात संचालकाने जसे हुकूम दिले असतील अशा हुकमाचे अधीन, समाविष्ट करणे, सुधारित करणे, बदल करणे, अथवा वॉर्ड-यादीतील नोंद काढून टाकणे, हे केले पाहिजे.

परंतु असे की संबंधित व्यक्तीचा वॉर्डातील सामान्य निवास संपुष्टात आल्याची

किंवा अन्यथा वॉर्डयादीत नोंदणी होणेस पात्र नाही अशा कारणास्तव, वर नमूद केलेली कोणतीही कृती करण्यापूर्वी अशा अधिकाऱ्याने त्याचेशी संबंधित असणारी नियोजित कृतीचे संबंधाने सुनावणीची रास्त संधी संबंधित इसमास दिली पाहिजे.

[३] पोट कलम (१) खाली सूचित केलेल्या दिनांकास वय एकवीस वर्षांपेक्षा कमी नाही आणि सामान्यपणे वॉर्डात निवास आहे अशा इसमाचे नाव वॉर्डाच्या मतदार मसुदा यादीत समाविष्ट नसेल अशा कोणत्याही व्यक्तीने प्राधिकारांकित अधिकाऱ्याकडे वॉर्डाच्या यादीत नावाचा समावेश करण्यासाठी अर्ज करावा. अर्जदार पोट कलम (१) खाली सूचित केलेल्या दिनांकाचे दिवशी वय एकवीस वर्षांपेक्षा कमी नाही आणि अन्यथा प्रस्तुत विधिमंडळाचे यादीत नोंदणी होणेस पात्र आहे, अशी खात्री झाली तर अशा अधिकाऱ्याने वॉर्डाच्या मतदारयादीत त्याच्या नावाची नोंदणी करणेचा आदेश द्यावा.

परंतु असे की दुसऱ्या कोणत्याही वॉर्डाच्या यादीत जर अर्जदाराची नोंदणी झाली असेल तर अशा अधिकाऱ्याने त्या वॉर्डाच्या यादीतून त्याचे नाव काढून टाकावे.

परंतु पुढे असे की, दुसऱ्या कोणत्याही म्युनिसिपल क्षेत्रातील कोणत्याही वॉर्डाच्या यादीत जर अर्जदाराची नोंदणी झालेली असेल तर अशा अधिकाऱ्याने त्या म्युनिसिपल क्षेत्राच्या प्राधिकारांकित अधिकाऱ्यास कळविले पाहिजे आणि त्या अधिकाऱ्याने अशी माहिती मिळाल्यावर त्या वॉर्डाच्या यादीतून त्या अर्जदाराचे नाव काढून टाकले पाहिजे.

[४] पोट कलम (२) खाली कोणत्याही वॉर्डाचे यादीत समाविष्ट करणे, सुधारणा करणे, फेरफार करणे, वगळणे आणि पोट कलम (३) खाली कोणत्याही वॉर्डाचे यादीत नावाचा समावेश करणे याबद्दलचा आदेश, वॉर्डाची यादी पोटकलम (१) खाली प्रसिद्ध केल्याचे तारखेपासून पंचेचाळीस दिवसांचा कालावधी संपल्यानंतर, दिला जाता कामा नये.

[५] पोट कलम (२) किंवा पोट कलम (३) खाली प्राधिकारांकित अधिकारी यांनी दिलेल्या आदेशाविरुद्ध कलेक्टर किंवा कलेक्टरांनी नियुक्त केलेला अधिकारी यांचेकडे आवाहन केले पाहिजे. आदेश दिलेल्या तारखेपासून पंधरा दिवसांचे कालावधीत आवाहन दाखल केले पाहिजे किंवा त्या कालावधीत पोहोचेल असे रजिस्टर पोस्टाने पाठविले पाहिजे. वॉर्डाची अंतिम यादी प्रसिद्ध होईपर्यंत ती स्थगित करणे किंवा पुढे ढकलणे असा परिणाम या दाखल केलेल्या आवाहनावरील करावयाच्या कारवाईतून दिला जाता कामा नये. आवाहनीय अधिकाऱ्याचा प्रत्येक निर्णय अंतिम राहील. परंतु प्राधिकारांकित अधिकाऱ्याचा निर्णय मागे घेणे किंवा सुधारित करणे असेल असा निर्णय, आवाहनाच्या निर्णयाच्या तारखेपासून अमलात राहील. आवाहनीय अधिकाऱ्याचे निर्णयाला परिणाम देणे आवश्यक असेल अशी सुधारणा करणेस प्राधिकारांकित अधिकारी यांनी उद्युक्त झाले पाहिजे.

[६] पोट कलम (१) खाली वॉर्डाची मसुदा यादी प्रसिद्ध झाल्या तारखेपासून पंचेचाळीस दिवस संपल्यावर पोट कलम (२) आणि पोट कलम (३) खाली प्राधिकारांकित अधिकारी यांनी सर्व आधिक्य, सुधारणा आणि इतर बदल केल्यावर आणि पोट कलम (५) खाली आवाहनीय अधिकारी यांचे आदेश (काही असल्यास) ते अमलात आणल्यावर आणि काही लिपिक किंवा मुद्रित चुका किंवा यादीत आढळलेल्या काही त्रुटी दुरुस्त केल्यावर, दुरुस्त केलेली अद्यावत दुरुस्तीची आणि सत्यत्व प्रमाणित प्रत मुख्याधिकारी यांना उपलब्ध केली पाहिजे की संचालक नियम करतील त्या पद्धतीने प्रसिद्ध केली पाहिजे आणि म्युनिसिपल कार्यालयात तपासणी-साठी उपलब्ध केली पाहिजे. अशी प्रसिद्ध यादी, प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून, वॉर्डातील मतदारांची अंतिम यादी राहील. वॉर्डाच्या प्रसिद्ध झालेल्या समुच्चयित याद्या, म्युनिसिपालिटीच्या मतदारांची यादी म्हणून समजण्यात आली पाहिजे.

[७] एकदा वॉर्डाची मतदारांची यादी तयार केल्यावर, ती प्रसिद्ध केलेल्या तारखे-पासून एक वर्षपर्यंतच्या कालावधीत होणाऱ्या सर्व निवडणुकींसाठी सर्वसाधारणपणे कार्यवाहीत राहिली पाहिजे. हा एक वर्षाचा कालावधी संपल्यानंतर जर निवडून आलेल्या सदस्याच्या पदाची पोट निवडणूक होणे असेल तर या कलमाच्या तरतुदीस अनुसरून संचालकाने त्या वॉर्डाच्या मतदारांची नवी यादी तयार करण्याचा आदेश द्यावा. अशा कोणत्याही आदेशांचे अभावी अखेरची तयार केलेली मतदारांची अंतिम यादी कार्यवाहीत पुढे चालू राहिली पाहिजे आणि त्या पोट-निवडणुकीचे कारणासाठी कार्यवाहीत राहिली पाहिजे. सदस्यांच्या किंवा अध्यक्षपदाच्या प्रत्येक निवडणुकीपूर्वी या कलमाच्या तरतुदीस अनुसरून म्युनिसिपल मतदारांची यादी तयार केली पाहिजे. जर अशी यादी आधीच प्रसिद्ध झालेली, अशा निवडणुकीच्या पूर्वी एक वर्ष आधी कार्यवाहीत असेल तरीही संचालकाने अध्यक्षाच्या किंवा एक अथवा अधिक सदस्यांच्या निवडणुकीसाठी, या कलमाच्या तरतुदीस अनुसरून नवी यादी तयार करणेचा आदेश, जरी अशी आधीच कार्यवाहीत असलेली यादी अशा निवडणुकीपूर्वी आधी एक वर्षात प्रसिद्ध झालेली नसेल तरीही, द्यावा.

[८] या कलमाखाली तयार केलेली मतदारांची यादी मुख्याधिकारी यांनी निर्वाहित केली पाहिजे आणि अशी निर्वाहित केलेली यादी या अधिनियमाखाली सत्यप्रमाणित यादी समजली गेली पाहिजे.

[९] प्रत्येक सर्वसामान्य निवडणुकीसाठी नियुक्त करावयाच्या उमेदवारासाठी नयम केलेल्या अखेरच्या दिवसापूर्वी निदान पंधरा दिवस आधी, या आधीच्या अखेरच्या पोट कलमाखाली निर्वाहित केलेली प्रत्येक वॉर्डाच्या मतदारांच्या यादीच्या प्रती, म्युनिसिपालिटीचे कार्यालयात आणि इतर ठिकाणी जनतेच्या तपासणीसाठी मुख्याधिकारी यांनी खुल्या ठेवल्या पाहिजेत.

[१०] जेव्हा कोणत्याही निवडणुकीसाठी ..... कोणत्याही म्युनिसिपल

क्षेत्रासाठी म्युनिसिपल मतदारांची किंवा कोणत्याही वॉर्डाच्या मतदारांची नवी यादी तयार करणे असेल तेव्हा आणि लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५० चे तरतुदी खाली तयार केलेल्या अर्हता दिनांकाच्या महाराष्ट्र विधिमंडळाच्या मतदारयादीचे आणि पोट कलम (१) खाली सूचित केल्याप्रमाणे अमलात असलेल्या मतदार-यादीचे संबंधात वॉर्डाच्या अस्तित्वात असणाऱ्या मतदारयादीचे आणि म्युनिसिपल मतदारयादीचे कारणास्तव पोट कलम (१) खाली सूचित केलेल्या तारखेपेक्षा आधी, नवी यादी तयार करण्यासाठी किंवा म्युनिसिपल मतदारयादी तयार करण्या-साठी किंवा त्या म्युनिसिपल क्षेत्रातील अस्तित्वात असणाऱ्या मतदारयादीसाठी, जसे असेल तसे, यापूर्वीच्या तरतुदीत काहीही नमूद केले असले तरी, पोट कलम (१) खाली प्रसिद्ध करावयाची ती मतदारांची मसुदा यादी राहील.

भाष्य

या संदर्भात संयुक्त समितीची टिप्पणी उपलब्ध आहे. त्या टिप्पणीचा गोषवारा असा– "सदर" या सदरात हे सिद्ध झाले आहे की लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५० च्या तरतुदीखाली महाराष्ट्र विधानसभेच्या मतदारांची यादी तयार केली जाते. आणि हीच यादी, अमलात असलेल्या सांप्रत काळी संचालक सर्वसाधारण किंवा विशेष सूचनापत्राने यासंबंधात ठरवील त्या तारखेची मतदारांची यादी राहील. समितीने विचारपूर्वक जनतेला यादीत नाव नोंदणी करून घेणे, दुरुस्ती करून घेणे, अचूकता आणणे सोयीचे व्हावे म्हणून, यासंबंधात संचालकाने सूचना-पत्रात प्रकटीकरण केलेल्या तारखेपासून एक महिन्याची मुदतीची परवानगी असावी हे योग्य असल्याचे ठरविले आहे. समिती पुढे असेही विचारपूर्वक ठरवीत आहे की बॉम्बे म्युनिसिपल कॉर्पोरेशन (अॅडॉप्टेशन ऑफ असेंब्ली रोल्स अॅण्ड सिंगल मेंबर कॉन्स्टिटचुअन्सीज्) अॅक्ट १९६४ चे कलम ६ चे अनुसरणार्थ नगरपालिका क्षेत्रातील निरनिराळ्या विभागांची, निरनिराळ्या वॉर्डांशी संलग्नता साधणारी, विधानसभेची यादी विभागण्याची समान तरतूद असावी. अशा प्रकारे विभागलेली, अधिकृत केलेली मतदारांची छापील यादी प्रत्येक वॉर्डाची मतदारांची यादी असल्याचे ठरविले जावे. सर्व वॉर्डांची मतदारांची यादी एकत्र करून ती नगरपालिकेच्या मतदारांची यादी होय आणि मुख्य अधिकारी यांनी ती निर्वाहित केली पाहिजे.

डिसेंबर १९७२ मध्ये एका, स्टेट लेव्हल कमिटीची नेमणूक केली असून तिने अशी शिफारस केली आहे, की या कायद्यात अशी तरतूद केली जावी, की नगर-पालिकेची मतदारांची यादी, विस्तृत नगरपालिका क्षेत्रात राहणाऱ्या बहुसंख्य नागरिकांची अद्यावत असावी आणि म्हणून नगरपालिका मतदारांची यादी नव्या पद्धतीने तयार करण्यासाठी कलम ११ यातील तरतूद आहे. या कलमात नवीन तरतुदींचा समावेश केला आहे, तो असा :–

१. नगरपालिका क्षेत्रातील प्रत्येक वॉर्डाच्या मतदारांच्या मसुदा यादीचे प्रसिद्धीकरण,

२. यादीत नाव घालणे अथवा यादीतून नाव काढणे,

३. यादीत नाव घालणे अथवा यादीतून नाव काढणे या आदेशाविरुद्ध (अपील) आवाहन, आणि

४. प्रत्येक वॉर्डाच्या मतदारांच्या अंतिम यादीचे प्रसिद्धीकरण.

लोकप्रतिनिधित्व कायद्याचे तरतुदीप्रमाणे, विधानसभेच्या निवडणुकीसाठी मतदारांच्या ज्या याद्या तयार केल्या आहेत त्यांचा वापर नगरपालिकांच्या निवडणुकीसाठी ज्या याद्या तयार करावयाच्या त्यासाठी करावा असे एकदा ठरविल्यावर त्या कायद्यातील यासंबंधीची तरतूद कोणती ते पाहणे उपयुक्त ठरेल. त्या कायद्यातील कलम १९ मध्ये या तरतुदीचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे :– " अर्हता प्राप्तीसाठी जो दिवस मुक्रर केला असेल त्या दिवशी ज्याचे वय वर्षे २१ पेक्षा कमी नाही; जो त्या मतदारसंघाच्या क्षेत्रीय मर्यादेत राहतो; तो मतदारांचे यादीत नावनोंदणीस त्या मतदारसंघाच्या मतदारयादीत पात्र ठरतो; असे भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे मत विजेंद्रालाल वि. ज्वालाप्रसाद; ए. आय. आर. १९६० सु. को. १०९९ यात व्यक्त झाले आहे व ते कायद्यातील तरतुदीस धरून आहे. विधानसभेच्या निवडणुकीस पात्र असणाऱ्या मतदारांची यादी ज्या वेळी तयार केली असेल व तिला अंतिम स्वरूप देण्यात आले असेल त्या वेळी ज्या काहींचे वय वर्षे २१ पूर्ण झाले नसेल त्या काहींची वये नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी मतदारांची यादी तयार करताना तिला अंतिम स्वरूप देण्याचे तारखेदिवशी वर्षे २१ पूर्ण झाली असणे शक्य आहे. अशा नावांचा समावेश मतदारात केला पाहिजे. तसेच त्या यादीत त्या वेळी ज्यांची नावे होती त्यापैकी काही निवासस्थान सोडून गेले असण्याची शक्यता आहे. निवासस्थान सोडून जाण्याची कारणे अनेक असू शकतात. कारणे काहीही असोत; सोडून गेल्याचा विचार प्रामुख्याने करावा लागतो व अशांचे नाव यादीतून कमी करावे लागते. हे करणे सोयीचे व्हावे म्हणून नगरपालिकेच्या क्षेत्रातील रहिवाशांची यादी, विधानसभेच्या मतदारांच्या यादीतून निवडून बाजूस काढावी लागते; त्यातून वॉर्डक्रमानुसार वॉर्डाची यादी स्वतंत्र तयार करून मसुदा यादी म्हणून प्रत्येक वॉर्डाची स्वतंत्र यादी निराळी प्रसिद्ध करावयाची असते. सर्व वॉर्डांच्या सर्व याद्यांचे प्रसिद्धीकरण एकदमच करावयाचे असून, दुरुस्तीसाठी काही कालावधी नागरिकांना द्यावा लागतो; तशी तरतूद या कलमात आहे. मसुदा-यादीच्या प्रसिद्धीकरणानंतर, त्यात काही नावांचा समावेश करावा, तसेच त्यातून काही नावे काढून टाकावीत, यापैकी दोन्ही किंवा एक, जे काही करावे असे वाटेल ते तसे करावे असे वाटणाराने त्या मुदतीत अर्ज करावा व तसे करणे कसे योग्य आहे हे पटवून द्यावे व तसे करवून घ्यावे. जे इसम मतदानास पात्र आहेत, पण त्यांची नावे मतदारयादीत नाहीत

अशांची मते आपणास नक्की मिळतील किंवा आपण नक्की मिळवू अशी खात्री बाळगून असणाऱ्या उमेदवाराने, या नावांचा समावेश मतदारयादीत अवश्य करवून घ्यावा. जे इसम मतदारयादीत आहेत अशांपैकी जे मतदारसंघातून निवास सोडून गेले आहेत–बिऱ्हाड बदलल्याने वा मृत्यूने वा कोणत्याही कारणाने–अशांची नावे निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या उमेदवाराने जागरूकतेने व कटाक्षाने, अशा नावाने खोटी मतनोंदणी होऊ नये म्हणून कमी करवून घेणे हिताचे ठरते. मसुदा-यादीत नावांचा समावेश करणे वा त्यातून नाव काढून टाकणे यासाठी करावयाच्या अर्जासाठी पंचेचाळीस दिवसांची मुदत या कलमात आहे. मुदतीत केलेल्या अर्जाचा विचार करण्याचा अधिकार यासाठी नेमलेल्या पदांकित (डेसिग्नेटेड) अधिकाऱ्याचा आहे. मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार या अधिकाऱ्याने करावा किंवा केला पाहिजे अशी तरतूद या कायद्यात नाही. जर अर्जाचा विचार, मुदतीत अर्ज करूनही झाला नाही तर व्यथित इसमाने कलेक्टरकडे अपील करावे. अर्ज मुदतबाह्य होता म्हणून अर्जाचा विचार झाला नाही हे कारण अपीलासाठी चालू शकत नाही. कारण या अशा कारणासाठी केलेल्या अपीलाचा विचार करावा अशी तरतूद कायद्यात नाही. तसेच अपीलाचा विचार होईपर्यंत होणारी निवडणूक पुढे ढकलण्याची मागणीही अपीलात करता येत नाही, ती मंजूर होत नाही. अपीलाला मुदत फक्त पंधरा दिवसांची आहे. मसुदा-यादी प्रसिद्ध झाल्या तारखेपासून पंचेचाळीस दिवस व हे पंचेचाळीस दिवस संपल्यावर तेथून पधरा दिवस अपीलासाठी. या साठ दिवसांत जे ईप्सित साध्य होईल ते यश, जे ईप्सित साध्य होणार नाही ते अपयश.

नावाचा समावेश होण्यासाठी आवश्यक असणारी पात्रता/अर्हता जशी या कायद्याने निश्चित केली तशी अपात्रता/अनर्हताही निश्चित केली आहे.

१. तो भारताचा नागरिक नसेल, तर

२. सक्षम कोर्टाने तो अस्थिर मनाचा (वेडा/मनोरुग्ण) असल्याचे जाहीर केले असेल, तर

३. भ्रष्टाचारी कृत्याशी संबंधित अशा सांप्रत काळी अमलात असणाऱ्या कोणत्याही कायद्याने मतदानास अपात्र / अनर्हत ठरविला असेल, तर

असा इसम मतदारयादीत समाविष्ट होणेस पात्र नाही. आधीच समावेश झाला असेल, तर काढून टाकणे न्यायोचित.

भारतातील नगरपालिकेच्या कारभाराशी संबंधित असणाऱ्या कायद्यात निवडणुकीची कार्यपद्धती, नियम समाविष्ट आहेत. जनतेने, जनतेसाठी, जनतेच्या प्रतिनिधींचे प्रशासन म्हणजे लोकशाही. आपला कारभार आपणच आपल्या प्रतिनिधीमार्फत करणे ही लोकशाहीची प्रारंभीची आणि महत्तम प्रक्रिया. आपले प्रतिनिधी कारभार करण्यायोग्य असतील त्यांना निवडून देणे हे निवडून देणाऱ्या जनतेचे आद्य कर्तव्य; म्हणून निवडणुकीशी संबंधित असणाऱ्या कायद्यातील

आवश्यक तरतुदींचे पालन कटाक्षाने झालेच पाहिजे अशी न्यायालयाची रास्त अपेक्षा आहे. श्री. बारू राम वि. श्रीमती प्रसन्नी, ए. आय. आर. १९५९ सु. को. ९३.

नगरपालिकेत कोणीही निवडून आलेला नगरसदस्य, जोपर्यंत निवडून येणाऱ्या नगरसदस्यांची संख्या निश्चित केलेली नाही, तोपर्यंत असू शकत नाही. म्हणजेच आधी निवडून येणाऱ्या नगरसदस्यांची संख्या किती असली पाहिजे हे निश्चित करावे लागते. या कायद्यातील कलम ९ मध्ये ही तरतूद आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात ही संख्या निश्चित करावयाचे तत्त्व अंगीकारल्याने लोकसंख्येत जशी वाढ अथवा उणीव होत जाईल त्या प्रमाणात नगरसदस्यांची संख्या कमीजास्त होत राहील. तसेच जेव्हा नगरपालिका क्षेत्रात जशी वाढ अथवा उणीव होईल तेव्हा अशा वाढीमुळे वा कमतरतेमुळे लोकसंख्येत जसा बदल होत जाईल त्यानुसार सदस्यसंख्याही बदलत राहील.

अशा लोकसंख्येच्या – मतदानास पात्र असणाऱ्या नगरपालिकेच्या क्षेत्रातील निरनिराळ्या भागांत राहणाऱ्या मतदारांच्या संख्येवर त्या त्या वॉर्डाची रचना करण्याची कायद्यातील तरतूद आज्ञार्थी आहे. ही आज्ञार्थी पाळण्यात होणाऱ्या भंगाचा परिणाम, नगरपालिकेची निवडणूक निरर्थक ठरेल असा होतो. भाईचंद-भाई मगनलाल शाह वि. गुजरात राज्य, ए. आय. आर. गुजरात १०५.

मतदारसंघातील मतदार म्हणजे त्या मतदारसंघाच्या यादीत ज्याच्या नावाचा समावेश आहे असा इसम. पहिली, महत्त्वाची, आवश्यक कटाक्षित तरतूद म्हणजे असा इसम वयाने एकवीस वर्षांपेक्षा कमी असता कामा नये. तो अन्यथा अनर्हत असता कामा नये. भगवानदास सिंग वि. हरचंद सिंग ए. आय. आर. १९७१ पंजाब ६५. मतदाराची अर्हता लोकप्रतिनिधित्वाच्या कायद्यातील कलम १९ मध्ये पुढील-प्रमाणे नमूद आहे.

(अ) अर्हतेच्या दिवशी त्याचे वय एकवीस वर्षांपेक्षा कमी असता कामा नये.

(ब) सर्वसाधारणपणे तो त्या मतदारसंघातील रहिवासी असला पाहिजे.

मतदाराची अर्हता जशी ठरविली आहे तशीच त्याची अनर्हताही निश्चित केली आहे. ती अशी :–

(अ) जो भारताचा नागरिक नाही.

(ब) सक्षम कोर्टाने अस्थिर मनाचा (वेडा/मनोरुग्ण) म्हणून जाहीर केलेला.

(क) भ्रष्टाचारी कृत्याशी संबंधित असलेल्या कोणत्याही कायद्यातील मतदानाच्या तरतुदीखाली जो अनर्हत ठरला असेल.

(ड) ज्याने स्वेच्छेने परराष्ट्राचे नागरिकत्व स्वीकारले आहे, म्हणजेच परराष्ट्रावर ज्याची निष्ठा आहे. परराष्ट्रावर अनन्यनिष्ठा आहे असा इसम नगरपालिका निवडणुकीच्या मतदारसंघात मतदानास पात्र नाही. अनर्हत शब्दाचा अर्थच असा आहे की अर्हतेपासून वंचित आहे तो अनर्हत.

विधानसभेसाठी तयार केलेली मतदारांची यादी म्हणजे कायद्याच्या निर्मितीचा तो एक भाग आहे; लोकप्रतिनिधित्व कायद्याच्या अमलाची सुरुवात तेथून होते. तर्कशुद्ध पद्धतीने तयार करण्यावर कायद्याचा कटाक्ष आहे.

मतदारांची यादी, त्यातील नोंदी आणि दुरुस्ती या मुद्यांवर आव्हान देता येत नाही. म्हणजेच मतदारांचे यादीतील कोणाही इसमाची मतदार म्हणून झालेल्या नोंदीस व अशा संबंधात झालेल्या दुरुस्तीस आव्हान दिल्यास, त्यात हस्तक्षेप करण्याचा अधिकार न्यायाधीकरणास नाही. निवडणूक न्यायाधिकरण, मतदारांच्या यादीत नोंदणी झालेला इसम अनर्हत आहे किंवा नाही एवढेच फक्त विचारात घेऊ शकेल. मतदाराच्या यादीत ज्याच्या नावाचा समावेश झालेला आहे त्याला मत देण्याचा अधिकार आहे. त्याच्या अधिकारास कोणत्याही परिस्थितीत आव्हान देण्याची तरतूद कायद्याने ग्राह्य मानलेली नाही. (गुलाम मोहिउद्दीन वि. निवडणूक न्यायाधीकरण ए. आय. आर. १९५९, अलाहाबाद ३५७.) मतदारयादीत नावाची नोंद असणे म्हणजेच मतदार होणेस आवश्यक असणाऱ्या बाबींची पूर्तता झाली असल्याचे ते निदर्शक होय. (महादेव वि. किसन लघुजी ए. आय. आर. १९५३ नागपूर १६६) निवडणुकीत मत देण्यास इसम अर्हताप्राप्त आहे किंवा कसे याचा निर्णय घेण्यासाठी मतदाराच्या यादीतील नाव हा निर्णायक पुरावा होय; असे याच कायद्याच्या कलम १२ (२) मध्ये स्पष्ट केले आहे. (मोहमद हुसेन वि. ओनाली फिदाअली ए. आय. आंर. १९६९ गुजरात ३३४) कोणत्याही न्यायाधीकरणास, मतदारयादीतील कोणाही इसमाच्या नावाची नोंद बरोबर झाली आहे किंवा नाही हे तपासणेचा अधिकार नाही; तो अधिकार फक्त यादी तयार करणाऱ्या व ती अंतिम झाल्याचे ठरविणाऱ्या अधिकाऱ्याचा आहे. (किसन जानुजी वि. अनिलकुमार मणिलाल ए. आय. आर. १९६९ बॉम्बे २१३) मतदारांच्या यादीतील नावाची नोंदणी म्हणजे तो इसम मत देण्यास पात्र असल्याचा निर्णायक पुरावा असल्याचे मत खालील न्यायालयीन निकालपत्रांतून व्यक्त झाले आहे.

१. विठ्ठलदास कुंवरजी वि. सदानंद ए आय आर १९५७ नागपूर ६३.
२. कांतीलाल मथुरादास पारीख वि. व्हिलेज पंचायत शिवराजपूर १९६३–४ गुजरात एल. आर. ९२९.
३. लुंगा शंकर मेथा वि. ठाकूर रघुराज राजसिंग ए. आय. आर. १९५४ सु. को. ५२०.

महाराष्ट्र म्युनिसिपालिटीज ॲक्ट १९६५ च्या कलम ११ यांतील तरतूद आणि गुजरात म्युनिसिपालिटीज ॲक्ट १९६३ कलम ९ यांतील तरतूद सारखी आहे.

मतदारांची यादी तयार करताना, ती प्राधिकृत करताना आणि ती प्रसिद्ध करताना त्यांत काही उणीवा, काही त्रुटी राहणे शक्य आहे. या उणीवांचे आणि त्रुटींचे स्वरूप लक्षात घेऊन मतदारांची यादी कायदेशीर ठरवायची किंवा नाही

याचा निर्णय घ्यावा लागतो. मतदारांची यादीच कायदेशीर ठरली नाही तर त्यावरून होणारी निवडणूकही कायदेशीर ठरत नाही. (महादेव वि. किसन ए. आय. आर. १९५३ नागपूर १६६.)

१. काही मतदारांची नावे यादीत चुकीची असणे.

२. यादी अमलात आलीच असे गृहीत धरून, मसुदा यादी व अंतिम यादी एकदमच तयार करून प्रसिद्ध करणे. (देव प्रकाश वि. बाबू राम ए. आय. आर. १९६१ पंजाब ४२९)

३. हक्क आणि हरकती उपस्थित करण्यास नियमाने विहित केलेला कालावधी कमी केला तर त्यामुळे झालेला विपर्यस्त आघात दाखविणे व कायद्यातील उपलब्ध तरतुदींचे अवलंबन केलेले असणे (रामचंद्र वि. आसाम राज्य ए. आय. आर. १९६३ आसाम १६८)

४. मतदारयादीत मतदारांची नावे घातली आहेत ती चुकीची आहेत या कारणावरून निवडणुकीला आव्हान देणे (कांतिलाल वि. व्हिलेज पंचायत (१९३६) ४ गुजरात एफ. आर. ९२९.

५. प्रचलित कायद्याने दिलेल्या परवानगीनुसार, नगरपालिकेच्या निवडणुकीचे मतदान होण्यापूर्वी दोन दिवस आधी, विधानसभेच्या मतदारयादीत दुरुस्त्या केल्या आणि अशी हरकत घेण्यात आली की, मतदारयादीत सर्व अर्हताप्राप्त इसमांची नावे समाविष्ट केली नाहीत. (सुदर्शन रेड्डी – वि. डिस्ट्रिक्ट कलेक्टर ए. आय. आर. १९६४ आंध्र प्रदेश ४२१)

वर नमूद केलेल्या आंध्र प्रदेशाच्या हायकोर्टाच्या निकालपत्रातील याचिका-अर्जदार करदाते आणि नगरपालिका क्षेत्रात राहणारे रहिवासी होते. त्यांनी याचिका अर्ज (रिट-पिटिशन) दाखल करून निवडणुकीला आव्हान दिले होते. निवडणुकीच्या आव्हानार्थ जी अनेक कारणे पुढे केली होती त्यात मतदारयादीत अनेक इसमांची नावे नाहीत हेही कारण होते. हायकोर्टाने त्या हरकती फेटाळून लावताना असे भाष्य केले की–

"ज्या अनेक इसमांची नावे वगळली आहेत असे याचिका अर्जदारांचे म्हणणे आहे, त्याबाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार निवडणूक न्यायाधीकरणाला आणि हायकोर्टाला नाही. हा अधिकार कायदा आणि नियम याखाली निवडणूक मतदार-यादी तयार करणाऱ्या अधिकाऱ्यांना आहे आणि त्यांनी घेतलेला निर्णय कायदा आणि नियम यांतील तरतुदींनुसार अंतिम आहे. म्हणजेच मतदारयादीत काही व्यक्तींच्या नावांचा समावेश नाही या मुद्यावर घेतलेली हरकत निरर्थक आहे. मतदारयादीत नेहमीच असे होते, की काही नावे त्यांत आढळत नाहीत अथवा काही नावे चुकीची छापलेली आढळतात. त्यात योग्य त्या दुरुस्त्या होण्यासाठीच मसुदा यादी आणि अंतिम यादी यांमध्ये काही कालावधी ठेवलेला असतो. त्या

कालावधीत संबंधितांनी अथवा अपेक्षितांनी या उणीवा आणि चुका नजरेस आणून दुरुस्त करून घ्याव्यात. तसे त्या कालावधीत केले नाही तर या कारणावरून निवडणुकीला नंतर आव्हान देता येत नाही आणि ही बाब घटनात्मक वैधतेची की अवैधतेची असाही प्रश्न उपस्थित करता येत नाही. मात्र मतदारयादीचे अवैधत्व निवडणूक रद्द ठरण्यास कारणीभूत होते. हे अवैधत्व अर्थात निराळ्या मुद्यांवर असावे लागते. वरील प्रकारचे कारण अवैधत्वास योग्य नाही. निवडणूक ज्या मतदारांच्या यादीवर आधारून घेतली जाते ती यादीच जर बेकायदेशीर असेल तर त्यावर आधारून घेतलेली निवडणूक बेकायदेशीर ठरते. याची चिकित्सा चीफ कमिशनर अजमेर वि. राधेय श्याम वाणी, ए. आय. आर. १९५७ सु. को. ३०४, या खटल्यात सुप्रीम कोर्टाने केली आहे. निवडणुकीची महत्तमता, त्या निवडणुकीसाठी निर्वाहित केलेल्या मतदारयादीवर अवलंबून असते आणि म्हणून योग्य प्रकारे याचे निर्वाहन होण्यासाठी –

मतदारयादी तयार केल्यावर, त्या यादीची छाननी करण्याची संधी संबंधित मतदारांना उपलब्ध केलेली असली पाहिजे. तसेच त्यांनी उपलब्ध केलेल्या हरकती, आक्षेप, सूचना यांचा विचार करणारी कार्यक्षम यंत्रणा उपलब्ध असली पाहिजे. हे जेथे होत नाही अथवा विहित पद्धतीच्या पालनाअभावी जेव्हा उणीवा आणि त्रुटी राहतात तेव्हा निवडणुकीला आव्हान देण्यास नागरिकांना वाव मिळतो. मतदारयादी तयार करणे, अधिकृत करणे आणि प्रसिद्ध करणे हे अधिकार ज्यांना कायद्याने दिले आहेत त्यांनी हे राहू नये याकडे कटाक्षाने लक्ष पुरवावे.

खोट्या प्रकटीकरणासाठी शिक्षा

११ अ. जर कोणी इसम–

(अ) कोणत्या वॉर्डाच्या मतदाराची यादी तयार करण्याच्या किंवा सुधारित करण्याच्या किंवा दुरुस्त करण्याच्या किंवा

(ब) त्यात कोणतीही नोंद समाविष्ट करणे अथवा त्यातून काढून टाकणे किंवा खोटे असेल असे लेखी प्रकटीकरण करणे आणि जे त्यास माहीत आहे अथवा खोटे असल्याचा त्याचा विश्वास आहे किंवा ते खरे नाही असा विश्वास आहे, अशा संबंधात

प्रकटीकरण करील तर दोषसिद्धीनंतर, त्यास एक वर्षापर्यंत वाढविता येईल इतकी तुरुंगाची किंवा दंडाची किंवा दोन्हीही, शिक्षा केली पाहिजे.

भाष्य

तयार केलेल्या मसुदा यादीत नसलेल्या नावाचा समावेश व्हावा आणि नाव आहे ते काढून टाकावे अशा कारणासाठी अर्जदार अर्ज करतो त्या अर्जदारावर, माहिती

निखालस खरी दिली पाहिजे, ती खोटी असता कामा नये हे बंधन आहे. कोर्टात साक्षीदाराने खोटी साक्ष देणे हा जसा गुन्हा आहे तसेच या प्रकरणी खोटी माहिती पुरवणे हा गुन्हा आहे आणि हा गुन्हा दंडनीय ठरविला आहे.

इंडियन पीनल कोडमध्ये खोटी साक्ष देण्याच्या गुन्ह्याचे कलम १९१ आहे. त्यातील आशय असा, साक्ष देणारा इसम –

(१) साक्ष देणेस कायद्याने तो बांधलेला असला पाहिजे. खरे सांगण्याची शपथ घेतलेली असली पाहिजे अथवा कायद्यातील तरतुदीनुसार प्रतिज्ञा घेतलेली असली पाहिजे.

संबंधित विषयाचे प्रतिपादनार्थ निवेदन असले पाहिजे.

त्याने केलेले निवेदन, साक्ष, खोटे असले पाहिजे. ते खोटे आहे अथवा ते खरे नाही याची त्याला माहिती असली पाहिजे; म्हणजेच त्याने जाणीवपूर्वक ते केले असले पाहिजे,

तरच तो दोषी ठरतो आणि दोषसिद्धीनंतर शिक्षेस पात्र ठरतो.

या कायद्यातील कलम ११अ ची तरतूद इंडियन पीनल कोडच्या कलम १९१ सारखीच आहे.

मत देण्याचा अधिकार

१२. [१] प्रत्येक इसम, ज्याचे नाव सदस्य म्हणून निवडणुकीत वॉर्डाशी संबंधित असलेल्या कलम ११ खाली निर्वाहित केलेल्या मतदाराचे यादीत आहे, मत देण्यास अर्हताप्राप्त आहे. आणि ज्याचे नाव अशा यादीत नाही असा प्रत्येक इसम मत देण्यास अर्हताप्राप्त नाही.

] २] निवडणुकीत, इसम मत देण्यास अर्हताप्राप्त आहे किंवा अर्हताप्राप्त नाही असे नियतीकरणाचे कारणास्तव कलम ११खाली निर्वाहित केलेली मतदारांची यादी, हा निर्णायक पुरावा राहील.

भाष्य

नगरपालिकेच्या दुरुस्त केलेल्या मतदारयादीत ज्याचे नाव आहे असा प्रत्येक इसम निवडणुकीस मत देण्यास पात्र आहे आणि ज्याचे नाव नाही तो इसम मतदानास अपात्र आहे. अशा पात्र इसमाचे नाव ज्या वॉर्डाच्या मतदारसंघाच्या यादीत असेल त्याच वॉर्डाच्या निवडणुकीत त्याला मत देता येईल.

मतदानाचा हक्क, निवडणुकीच्या कायद्याने नागरिकांना दिलेला हक्क आहे. तो त्याच कायद्याच्या चौकटीतला आहे. हा हक्क निवडणुकीशी संबंध नसलेल्या इतर कायद्यात आढळणार नाही. (किसन जानूजी वि. अनिल कुंभार मणिलाल, ए. आय. आर. १९६९ बॉम्बे २१२)

मत देण्याचा अधिकार कोणाला नाही यासंबंधीची तरतूद लोकप्रतिनिधित्वाचा कायदा कलम ६२ मध्ये केलेली आहे. आणि लोकप्रतिनिधित्वाच्या कायद्याच्या तरतुदी या कायद्यात अंतर्भूत केल्या असल्याने, कलम ६२ ची तरतूदही येथे तंतोतंत लागू आहे. ती तरतूद पुढीलप्रमाणे :–

१. ज्याचे नाव मतदारयादीत नाही.

२. जो अनर्हततेच्या अधीन आहे.

३. एकाच निवडणुकीत एकापेक्षा अधिक मतदारसंघात ज्याचे नाव आहे.

४. एकाच मतदारसंघाच्या मतदारयादीत एकापेक्षा अधिक ठिकाणी नावांची नोंद असेल, तर

५. जो तुरुंगात तुरुंगवासाची शिक्षा भोगत असेल,

मतदानाचा हक्क नैसर्गिक हक्क नाही, तो परीपूर्णही नाही आणि स्वाधीन हक्कही नाही. तो कायदानिर्मित आणि कायदाप्रदानीत आहे. निवडणूक ही एक राजकारणातील राजकीय प्रक्रिया आहे म्हणून मतदानाचा हक्क हा राजकीय हक्क आहे. तो इतर नागरी हक्कांपेक्षा निराळ्या स्वरूपाचा आहे; मालमत्तेचा हक्क वगैरे हक्कांपेक्षा याचे स्वरूप भिन्न आहे. या हक्कपालनात प्राप्ती काही नाही आणि जी आहे ती अमाप आहे. अदृश्य आहे आणि तरीही दृश्य स्वरूप विशाल आहे. हा घटनेने दिलेला घटनात्मक हक्क आहे. घटनेने विहित केलेली पात्रता धारण करीत असेल त्याला या हक्कापासून कोणत्याही निर्मित कायद्याच्या तरतुदीने वंचित करता येणार नाही. म्हणून मतदानाचा हक्क हा नैसर्गिक मूलभूत हक्क नाही; तर कायद्याने दिलेला विधियुक्त हक्क आहे. तो नागरिकांनी काही मर्यादेच्या चौकटीत उपभोगावयाचा आहे. भारताच्या प्रत्येक नागरिकाला या हक्काचा उपभोग घेता येईल अशी मुक्त तरतूद घटनेत नाही. पण तत्संबंधीच्या कायद्याच्या मर्यादेत नागरिकांनी उपभोगावा म्हणून कायद्याने दिलेला कायदांतर्गत असा हा हक्क आहे. (बजल बसाप्पा वि. केशवाप्पा, ए. आय. आर. १९६८ म्हैसूर १९८) निवडणुकीत मतदारांनी मताचा हक्क उपभोगावयाचा तो राज्य विधिमंडळांनी अर्हता अन् अनर्हता विहित केली असेल त्या चौकटीत उपभोगावयाचा; ही चौकट फक्त घटनेने केली आहे त्या चौकटीत अर्हता व अनर्हता बसविली आहे.

मद्रास डिस्ट्रिक्ट म्युनिसिपालिटीज ॲक्ट १९२०च्या कलम ४७च्या तरतुदीनुसार कुष्ठरोगी इसमाला या हक्कापासून वंचित केले आहे. पण घटनेच्या आर्टिकल १४च्या तरतुदीचा भंग असल्याचा निर्णय म्हैसूर हायकोर्टाने दिला आहे. (बजल बसाप्पा वि. केशवाप्पा ए. आय. आर. १९६८, म्हैसूर १९८) यावरून हे लक्षात येईल की, शारीरिक अपंगता, शारीरिक रुग्णता मतदानाच्या हक्कापासून मतदारास वंचित केले जात नाही. वेड ही एक मानसिक रुग्णता आहे. मनोरुग्णांना मतदानापासून वंचित केले आहे ते योग्य आहे.

ज्याला मतदानाचा हक्क आहे, त्याला उमेदवार म्हणून निवडणूक लढविण्याचा हक्क आहे.

महाराष्ट्र म्युनिसिपालिटीज ॲक्ट १९६५ कलम १२ (१)
आंध्र प्रदेश म्युनिसिपालिटीज ॲक्ट १९६५ कलम ११ (६)
गुजरात म्युनिसिपालिटीज ॲक्ट १९६३ कलम १० (१)
यांतील तरतुदी सारख्या आहेत.

" निर्णायक पुरावा " याचे विवेचन मागे केले आहे.

मतदानाची पद्धत

१३. [१] निवडणुकीतील मतदान गुप्त मतदान पत्रिकेने केले पाहिजे आणि प्रतिनिधीमार्फत मतदान घेतले जाता कामा नये.

[२] मतदार एका मतास पात्र राहील, कोणाही एका उमेदवारास ते द्यावे.

भाष्य

बॅलट-मतपत्रिका याचा अर्थ असा की, मतदाराने उमेदवाराची निवड केल्याच्या प्रत्ययार्थ ठसा उमटविलेला कागदाचा कपटा. महाराष्ट्र म्युनिसिपालिटीज रूल्स् १९६६च्या नियम ३७ प्रमाणे, ही मतपत्रिका मिळताच मतदाराने मतदानासाठी केलेल्या भागात जावयाचे असते. तेथे ठेवलेल्या फुलीच्या रबरी शिक्क्याने ज्या उमेदवाराला मत द्यावयाची इच्छा असेल त्याच्या खुणेपुढे तो उठवावयाचा असतो अशी मतपत्रिका. जर मतदाराने मतदाराची ओळख पटेल अशी खूण, लेखन काहीही मतपत्रिकेवर केल्यास ती मतपत्रिका बाद ठरते. आपले मत कारणी लागावे, ते मतमोजणीत मोजले जावे असे वाटत असल्यास पत्रिकेवर आपणास हवे असलेल्या उमेदवाराच्या खुणेपुढे फुलीचा शिक्का उठविण्याशिवाय इतर काही करू नये. एकापेक्षा अधिक उमेदवारास म्हणजे एकापेक्षा अधिक खुणांपुढे शिक्का उठविल्यास मतपत्रिका बाद ठरते. संशय किंवा संभ्रम निर्माण होईल असा अस्पष्ट शिक्का उठविल्यास तीवरील मत मोजले जात नाही. मतपत्रिका फाडणे, चुरगाळणे, त्यावर शाईचे डाग पाडणे ही कृत्ये कटाक्षाने टाळावीत. (पी. आर. फ्रॅन्सीस वि. ए. व्ही. आर्यन ए. आय. आर. १९६८ केरळ २५२) फुलीचा शिक्का जो तेथे मतदानासाठी दिलेला असतो / ठेवलेला असतो त्यानेच खुणेपुढे शिक्का उमटविला नाही म्हणून निर्वाचन अधिकाऱ्याने मतपत्रिका बाद केल्या. ते प्रकरण सुप्रीम कोर्टापुढे–मन्नीलाल वि. पर्वतलाल ए. आय. आर. १९७१ सु. को. ३३०–आले. ज्या अर्जदाराने निर्वाचन अधिकाऱ्याचे निर्णयाविरुद्ध अपील करून त्याच्या निर्णयास आव्हान दिले त्याचेवर शाबीत करण्याची जबाबदारी आहे. मतपत्रिका चुकीने निर्वाचन अधिकाऱ्याने बाद ठरविल्या हे त्याने कोर्टाला पटवून दिले पाहिजे. मतदानासाठी केंद्रावर ठेवलेल्या/दिलेल्या शिक्क्यानेच मतपत्रिकेवर शिक्का मारल्याचे त्याने पटविले म्हणजे त्याने

त्याची बाजू शाबीत केली असे म्हणता आले असते. पण या प्रकरणात कोर्टाला असे आढळून आले की मतदानासाठी केंद्रावर ठेवलेल्या शिक्क्याने मतपत्रिकेवर शिक्के उमटविले नव्हते; ते शिक्के दुसऱ्याच शिक्क्याने उमटविले होते. साहजिकच निर्वाचन अधिकाऱ्याने त्या मतपत्रिका बाद ठरविल्याचा घेतलेला निर्णय कोर्टाने ग्राह्य धरला. मतदाराने दिलेले मत एक तर बाद ठरविले पाहिजे नाहीतर मतमोजणीस ग्राह्य धरले पाहिजे. अन्य पर्याय नाही. जी मतपत्रिका बाद ठरविली नाही ती प्रत्येक मतपत्रिका मतमोजणीस ग्राह्य आहे. विशिष्ट उमेदवाराला मत देण्याचा मतदाराचा हेतू स्पष्ट व्यक्त होईल अशी मतपत्रिका बाद ठरविता येत नाही. (स्वरूपसिंग वि. इलेक्शन ट्रिब्युनल ए. आय. आर. १९६० अलाहाबाद ६६) याउलट मतदाराच्या मतदानाच्या हेतूबद्दल संभ्रम होणारी मतपत्रिका बाद ठरविली पाहिजे. (किसन जानूजी वि. अनिलकुमार मणीलाल ए. आय. आर. १९६९ बॉम्बे २१३).

मतपत्रिकेद्वारा मतदान करण्याच्या पद्धतीत गोपनीयता राखण्याच्या हेतूचा अंतर्भाव आहे. ज्याने मतदान केले असेल ते त्याने कोणाला केले हे इतरांना अथवा ज्याला केले असेल त्यालासुद्धा कळता कामा नये अशी ही गुप्त मतदान पद्धत आहे. परिस्फुटिते विरुद्धतेची गुप्तता राखण्याच्या या हमी पद्धतीत भीतिविरहित आणि मुक्त मनाने मतदानहक्काचा वापर मतदारास करता येतो. त्यामुळे कटुता उद्भवण्याचा आणि त्यातून स्वस्थ परिस्थितीत चलबिचल होण्याच्या संभवनीयतेचा धोका टळतो अथवा टाळता येतो. सुस्थिर नागरी प्रशासनाच्या प्रस्थापनेसाठी आणि जोपासनेसाठी निवडणूक मुक्त आणि रास्त वातावरणात पार पडावी ही अपेक्षा समाजशास्त्रज्ञांनी स्वीकारून मतदानाची ही अशी गुप्त पद्धत अंगीकारली आहे आणि आता ती रूढ झाली आहे. नगरपालिकांच्या निवडणुकीत अग्रक्रमी मताची पद्धत स्वीकारलेली आहे. एका मतदाराने एकच मत द्यावयाचे आहे. ते कोणा उमेदवाराला द्यायचे हे ठरविण्याचे स्वातंत्र्य मतदाराला आहे. या पद्धतीला इंग्रजीत "DROOP QUOTA" पद्धत म्हणतात. या पद्धतीचा सविस्तर तपशील कॉन्डक्ट ऑफ इलेक्शन रूल्स् १९६१च्या नियम ७६ ते ८३ मध्ये दिला आहे.

निवडणूक चालू असताना मतदानकेंद्रावर काम करणाऱ्या कोणा सरकारी नोकराचे नाव दुसऱ्या वॉर्डाच्या मतदारयादीत त्याच दिवशी चालू असणाऱ्या निवडणुकीत असेल तर त्याने निर्वाचन अधिकाऱ्यास अर्ज करून मतदान समक्ष जाऊन करणे शक्य नसल्याने पोस्टामार्फत करण्याची परवानगी मागावी. असा अर्ज मिळाल्यावर निर्वाचन अधिकाऱ्याने मतदानाची इच्छा प्रकट करणारा सरकारी नोकर ज्या यादीत मतदार म्हणून नाव असल्याचे प्रतिपादितो त्या यादीत त्याचे नाव असल्याची खात्री करून घ्यावी; नंतर त्यास लेखी परवानगी द्यावी व त्याची एक प्रत ज्या वॉर्डयादीत त्याचे नाव असेल त्या वॉर्डाच्या निर्वाचन अधिकाऱ्याकडे

पाठवावी. सरकारी नोकर असणाऱ्या मतदारास अशा प्रकरणी एक पाकीट मत-पत्रिकेबरोबर दिले जाते. त्याच पाकिटात मतदान केलेली मतपत्रिका घालून पाकीट रजिस्टर पोस्टाने संबंधित वॉर्ड निर्वाचन अधिकाऱ्याकडे पाठवावयाचे असते. लोकप्रतिनिधित्व कायदा १९५१च्या कलम ४६ मध्ये ही तरतूद आहे.

मतदानावरील इतर बंधने

१४. [१] सर्वसामान्य निवडणुकीत एकापेक्षा अधिक वॉर्डाच्या मतदारयादीत नावाची नोंद असली तरीही एकापेक्षा अधिक वॉर्डात मतदान करण्यास इसम पात्र नाही आणि एकापेक्षा अधिक वॉर्डात जर इसम मतदान करील तर त्याने सर्व वॉर्डात दिलेली मते बाद ठरविली जातील.

[२] निवडणुकीत त्याच वॉर्डात एकापेक्षा अधिक मत देण्यास जरी त्या वॉर्डातील मतदारयादीत एकापेक्षा अधिक नावाच्या नोंदी असतील तरीही इसम पात्र नाही आणि जर तो असे करील तर त्या वॉर्डातील त्याने दिलेली सर्व मते बाद ठरविली जातील.

उमेदवारासाठी अर्हता

१५. [१] कलम ११ खाली निर्वाहित केलेल्या मतदाराचे यादीत ज्याचे नाव समाविष्ट आहे आणि जो या अधिनियमाखाली प्रचलित वेळी अमलात असणाऱ्या इतर कोणत्याही अधिनियमाखाली सदस्याच्या निवडणुकीसाठी अनर्हताप्राप्त नाही असा कोणताही इसम अर्हताप्राप्त राहील. आणि ज्याचे नाव यादीत समाविष्ट नाही किंवा सदस्यत्वासाठी जो अनर्हताप्राप्त आहे असा कोणताही इसम, कोणत्याही निवडणुकीत सदस्य म्हणून निवडून येण्यास अर्हताप्राप्त नाही.

[२] पोटकलम (१)चे तरतुदीचे अधीन या कलमाखाली, इसम कोणत्याही निवडणुकीस अर्हताप्राप्त आहे किंवा अर्हताप्राप्त नाही, जसे असेल तसे, याचे नियतीकरणाचे कारणास्तव, कलम ११ खाली निर्वाहित केलेली मतदारांची यादी हा निर्णायक पुरावा राहील.

भाष्य

मतदारयादीत मतदार म्हणून नाव असेल अशाच इसमास उमेदवार म्हणून निवडणूक लढविता येईल. नामांकनपत्र सादर केल्याशिवाय 'उमेदवार' हे विशेषण प्राप्त होत नाही. ज्याने नामांकनपत्र सादर केले आहे त्याने उमेदवारी मागे घेतली तरीही निवडणुकीच्या अंतिम निकालापर्यंत तो उमेदवार म्हणूनच समजला जातो. (मोहन राज वि. सुरेंद्र कुमार तपारिया ए. आय. आर. १९६९ सु. को. ६७७). जो मतदार नाही तो उमेदवार होऊ शकत नाही. नामांकनपत्र फेटाळले गेले तरच, ते फेटाळले गेल्याक्षणी त्याची उमेदवारी संपुष्टात येते व तेव्हापासून तो फक्त मतदार

राहतो. जर त्याचे नामांकनपत्र बेकायदेशीरपणे, अयोग्यतेने फेटाळले गेले असेल तर, निवडणुकीला आव्हान देण्याचा हक्क आहे. निवडून आलेल्या उमेदवाराविरुद्ध निवडणूक-याचिका सादर करून निवडणूक बेकायदेशीर ठरवून घेण्याचा त्याचा हक्क त्याला बजावता येतो. (मोहनलाल वि. हिरासिंग पॉल ए. आय. आर. १९६८ दिल्ली ११०).

उमेदवार म्हणून निवडणुकीसाठी उभे राहणे आणि निवडणूक लढविणे हा हक्क सर्वसामान्य विधियुक्त हक्क नव्हे, कायदानिर्मित आणि विधिप्रदानित असा हा विशेष हक्क आहे. आणि त्याचा वापरही त्या अधिनियमाने लादलेल्या अटींचे पालन करून केला पाहिजे. भारतीय राज्यघटनेतील "मूलभूत हक्क" आणि "कायदानिर्मित हक्क" यांचा एकमेकाशी संबंध नाही. मत देण्याचा हक्क आणि निवडणूक लढविण्यासाठी उमेदवार म्हणून उभे राहण्याचा हक्क हा नागरी हक्क नाही तर विशेष अधिनियमाने प्रदानित केलेला विशेष हक्क आहे व तो त्या विशेष अधिनियमाने लादलेल्या अटींच्या चौकटीतच वापरला पाहिजे. (जमुना प्रसाद मुखारिया वि. लच्छीराम १९५५ (१) एस. सी. आर. ६०८; एन. पी. पोन्नुस्वामी वि. रिटर्निंग ऑफिसर ए. आय. आर. १९५२ सु. को. ६४). निवडणूक लढविणे म्हणजे कोणत्याही कायद्यानुसार खटला लढविणे नव्हे. सर्वसामान्य कायद्यापासून अलिप्त असणारे पण पूर्णपणे कायदेशीर असणारे हे कामकाज आहे, म्हणून सर्वसामान्य कायद्याच्या शक्ती न्यायालयांना नाहीत. (के. कामराज नाडर वि. कुंजू तेहवर ए. आय. आर. १९५८ सु. को. ६८७).

निवडणुकीत मतदार म्हणून मत देणे.

मतदार म्हणून उमेदवारी करणे.

उमेदवार म्हणून निवडणूक लढविणे.

हे हक्क निवडणुकीशी संबंधित असणाऱ्या कायद्यातून नागरिकांना दिलेले आहेत आणि नागरिकांनी त्या कायद्यातील चौकटीतून वापरावयाचे असतात. या दृष्टिकोनातूनच नगरपालिकांच्या रचना आणि कार्ये याशी संबंधित असणाऱ्या कायद्यातील तरतुदी केल्या आहेत व त्याचे तितक्याच काटेकोरपणे पालन व्हावे हा कटाक्ष कलकत्ता हायकोर्टाने बेंगाल म्युनिसिपल ॲक्ट खालील दाव्यात रिटपिटिशनमध्ये व्यक्तविला आहे. (प्रोव्हनचंद्र सीरीअर वि. आर. सी. सेन, ॲडमिनिस्ट्रेटर बग् बग् म्युनिसिपालिटी ए. आय. आर. १९५५ कलकत्ता ८३).

ज्या वॉर्ड मतदारसंघाचे यादीत नाव आहे, त्याच वार्ड मतदारसंघातून निवडणूक लढविली पाहिजे असेच काही नाही. अशा मतदारास, आरक्षित वॉर्ड मतदारसंघ सोडून, त्याच नगरपालिकेच्या दुसऱ्या कोणत्याही मतदारसंघातून निवडणूक लढविता येते. (वीराप्पा सिद्धलिंगप्पा विरुपथी वि. म्हैसूर राज्य ए. आय. आर. १९६५ म्हैसूर २२७).

नगरसदस्य होता येणार नाही अशी अनर्हता

१६. [१] निवडणुकीने सामावून घेण्यास किंवा नियुक्तीने सदस्य होण्यासाठी इसम अर्हत नाही, जो

(अ) भारतातील न्यायालयाने कोणत्याही गुन्ह्यासाठी दोषी ठरविले असेल आणि दोन वर्षांपेक्षा कमी नाही इतकी तुरुंगवासाची शिक्षा ठोठावली असेल तर तो मुक्त झाल्यापासून पाच वर्षांचा कालावधी किंवा विशिष्ट प्रकरणी राज्य शासनाने माफी केलेला यापेक्षा कमी कालावधी संपला नाही तोपर्यंत, किंवा

(अ-अ) महाराष्ट्र नगरपालिका आणि इतर तरतुदी (सुधारित) अधिनियम १९७४ च्या प्रारंभानंतर कोणत्याही वेळी कलम १५३ अ किंवा इंडियन पीनल कोड कलम ५०५ च्या पोट कलम (२) किंवा (३) खाली दंडनीय असलेल्या कोणत्याही गुन्ह्याबद्दल दोषी ठरविले असेल व अशा दोषी ठरविलेल्या तारखेपासून पाच वर्षांचा कालावधी संपला नाही तोपर्यंत, किंवा

(अब) अस्पृश्यता (गुन्हे) अधिनियम १९५५ खालील दंडनीय गुन्ह्याबद्दल दोषी ठरविले नसेल आणि कोणत्याही सत्रासाठी तुरुंगवासाची शिक्षा ठोठावली नसेल तर, मुक्ततेनंतर पाच वर्षांचा कालावधी संपला नाही तोपर्यंत–

(अक) नैतिक दुराचारात गुंतलेल्या कोणत्याही गुन्ह्याबद्दल भारतातील न्यायालयाने दोषी ठरविले असल्यास, अशा दोषी ठरविलेल्या तारखेपासून पाच वर्षांचा कालावधी संपला नाही तोपर्यंत, किंवा

(ब) कलम ४२ खाली पदभ्रष्ट केले असेल आणि अशा पदभ्रष्टतेच्या तारखेपासून पाच वर्षांचा कालावधी संपला नाही तोपर्यंत, जर अशा भ्रष्टतेच्या कारणावरून उद्‌भवलेल्या अनर्हतेपासून राज्य शासनाने त्यास या संबंधातील आदेशावरून लवकर मुक्त केले नाही तर, किंवा

(क) अमुक्त दिवाळखोरीत असेल, किंवा

(ड) विचलित मनोरुग्ण असेल आणि तसा असल्याचे सक्षम न्यायालयाने जाहीर केले असेल, किंवा

(ई) परदेशीय शासनाचे नागरिकत्व स्वेच्छेने स्वीकारले असेल किंवा कोणत्याही जाणिवेने परराष्ट्राशी निष्ठा असणारा किंवा परराष्ट्रनिष्ठेशी एकनिष्ठ असणारा किंवा

(फ) तो न्यायाधीश असेल, किंवा

(ग) कनिष्ठ अधिकारी किंवा सरकारी नोकर किंवा कोणत्याही स्थानिक संस्थेचा नोकर किंवा सरकारी किंवा कोणत्याही स्थानिक संस्थेच्या नफ्याखालील कार्यालयीन पद धारण करीत असेल; किंवा

(ग अ) जर महाराष्ट्र नगरपालिका आणि इतर तरतुदी (सुधारित) अधिनियम १९७४च्या प्रारंभापूर्वी किंवा नंतर शासनातील किंवा स्थानिक संस्थेतील कोणतेही

पद धारण करीत असताना गैरवर्तनाचे कारणावरून बडतर्फ झाला असल्यास, बडतर्फीपासून पाच वर्षांचा कालावधी संपला नाही तोपर्यंत, किंवा

(ह) विश्वस्त असेल त्याशिवाय इतरत्र, नगरपालिकेस त्याने देय असलेल्या कोणत्याही रकमेची, त्यास कलम १५० कलमाखाली आकारणी सादर केल्यानंतर, थकबाकीदार असेल, किंवा

(आय) यापुढील तरतुदी रक्षित, प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष तो स्वत: किंवा त्याचा भागीदार, नगरपालिकेच्या आदेशावरून केलेल्या कामातील किंवा नगरपालिकेसह, किंवा वतीने केलेल्या कंत्राटी कामात वाटा अथवा हितसंबंधित असेल, किंवा

(ज) यापुढील तरतुदी रक्षित, प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष, स्वत: किंवा त्याचा भागीदार नगरपालिकेच्या कोणत्याही अधिकाऱ्याकडून किंवा नोकराकडून कर्ज घेतले किंवा अधिकाऱ्याला किंवा नोकराला कर्ज दिले असेल तर,

[२] पोट कलम (१) चे सदर (ग) यात असे काही नाही, की जे, सूची १ च्या भाग २ किंवा ३ यात स्पष्ट केलेल्या म्युनिसिपल क्षेत्रातील नगरपालिकेचा सदस्य म्हणून सरकारी नोकर नियुक्त झाला असेल, त्यास हे लागू असेल.

[२ अ] कोणत्याही सहकारी संस्थेचा – जी नोंदणीप्राप्त आहे किंवा प्रचलित काळी अमलात असणाऱ्या, सहकारी संस्थांच्या नोंदणीशी संबंध असणाऱ्या कोणत्याही कायद्याखाली नोंदणीप्राप्त असे समजले जाईल अशा संस्थेचा की, सरकारने जिच्या समितीचा अध्यक्ष किंवा सदस्य किंवा समापन अधिकारी किंवा संयुक्त समापन अधिकारी म्हणून सहकारी संस्था प्रबंधकाने किंवा प्रबंधकाचा नियोजन अधिकारी म्हणून व्यक्तिश: किंवा नियोजन मंडळावर नेमला असेल अशा केवळ कारणावरून व्यक्तीला अनर्हता प्राप्त झाली असे समजले जाणार नाही.

[३] पोट कलम (१)चे सदर (आय) खाली व्यक्तीला अनर्हता प्राप्त झाली आहे असे समजले जाणार नाही, जरी त्याची कारणे–

(अ) जमिनीच्या खंडात / भाडेपट्यात स्थावर जिंदगीची किंवा खरेदी किंवा तत्सम करारात हितसंबंध किंवा भाग आहे, किंवा

(ब) कोणतीही कंपनी किंवा सहकारी संस्था की कौन्सिल किंवा तिचेतर्फे जिचेशी कंत्राटी संबंध किंवा नियुक्ती हितसंबंध, भाग आहे, किंवा

(क) कौन्सिलच्या व्यवहाराशी संबंधित असलेल्या जाहिराती ज्या वृत्तपत्रात छापल्या जात असतील त्या वृत्तपत्रात भाग किंवा हितसंबंध आहे, किंवा

(ड) कौन्सिलने किंवा कौन्सिलतर्फे काढलेल्या कोणत्याही कर्जाचे कर्जरोखे धारण करीत असल्यास किंवा अन्यथा हितसंबंधी असल्यास, किंवा

(ई) कौन्सिलच्या कोणत्याही वस्तूच्या नैमित्तिक विक्रीमध्ये, की ज्यात नियमितपणे व्यवहार होत असेल असा भाग किंवा हितसंबंध आहे किंवा कौन्सिलकडून विक्री होत असलेल्या वस्तूची खरेदी होत असेल की जिची किंमत खरेदी किंवा

विक्री प्रकरणी कोणत्याही कार्यालयीन वर्षात रुपये दोन हजार किंवा अशीच मोठी रक्कम, ज्यास कौन्सिलसह यासंबंधी राज्यसरकारची मंजुरी नियत केली आहे अशी मोठी रक्कम, रुपये दहा हजारांपेक्षा अधिक होणार नाही त्यात भाग किंवा हितसंबंध असेल, किंवा

(फ) कौन्सिलने प्रसंगोपात भाडचाने देणे किंवा कौन्सिलकडून भाडचाने घेणे असलेल्या कोणत्याही वस्तूसाठी रक्कम कोणत्याही कार्यालयीन आर्थिक वर्षात रुपये दोनशे किंवा कौन्सिलसह कलेक्टरची मंजुरी नियत केली असेल अशी मोठी रक्कम रुपये एक हजारपेक्षा जास्त होणार नाही, त्यात भाग किंवा हितसंबंध असेल, किंवा

(ग) निश्चित आकारणीच्या कौन्सिलच्या कोणत्याही करारनाम्यात एक पक्षकार म्हणून असेल किंवा कोणत्याही कराचे बदल्यात एक नक्त रक्कम किंवा कोणत्याही गटाराचे बांधणीत किंवा त्याचे घराचे जागेत जल-जोडणीत भाग असेल, तरीही

[४] जी व्यक्ती कौन्सिलचे अधिकारी किंवा नोकर यांना व यांचेकडून कर्ज देते–घेते किंवा उधार उसनवार देते–करते अशा सहकारी संस्थेचा अधिकारी किंवा सदस्य आहे या कारणावरून पोट कलम (१) सदर (ज) खाली अनर्हता प्राप्त आहे असे समजले जाणार नाही.

भाष्य

लोकप्रतिनिधित्व कायद्यांतील कलम ८(२) ची तरतूद आणि या कायद्यातील कलम १६(१)(अ) ची तरतूद यात साम्य आहे. एका खटल्यात आरोपीला तीन वर्षे तुरुंगवासाची शिक्षा झाली, पण तो तीन वर्षे पूर्ण होण्यापूर्वीच फक्त १६ महिने शिक्षा भोगून तुरुंगातून सुटला. याचा अर्थ कोर्टाने दिलेल्या तुरुंगवासाच्या आज्ञेवर काही परिणाम झाला असे होत नाही. दोषसिद्धीची कोर्टाची आज्ञा होती तशीच राहिली. त्यामुळे सुप्रीम कोर्टाने कायद्यातील आशय लक्षात घेऊन सदर इसम तुरुंगातून लवकर बाहेर आला किंवा पूर्ण शिक्षा भोगून बाहेर आला हे पाहण्याचे कोर्टाच्या कक्षेत येत नाही. तो दोषी ठरला / कोर्टाने ठरविला एवढा एकच मुद्दा विचारात घेऊन त्याला उमेदवार म्हणून निवडणूक लढविता येत नाही. तो अनर्हत आहे असे ठरविले (शरदचंद्र राभा वि. खागेंद्रनाथ ए. आय. आर. १९६१ सु. को. ३३४).

कनिष्ठ कोर्टाने दोषी ठरविलेल्या इसमास हायकोर्टाने निर्दोष ठरविले. निर्दोष ठरविल्याची हायकोर्टाची आज्ञा, पूर्वगामी परिणामी होती, म्हणजे कनिष्ठ कोर्टाची दोषी ठरविल्याची जी तारीख होती त्या तारखेपासून तो निर्दोषी ठरविल्याची हायकोर्टाची आज्ञा होती. याचाच अर्थ असा की, निर्दोषत्वाच्या आज्ञेने दोषसिद्धी

धुऊन निघाली/संपली. अस्तित्वात आलेल्या दोषसिद्धीचे अस्तित्वच नष्ट झाले; ते धुऊन निघाले. तरीही निवडणुकीच्या कामकाजात नामांकनपत्राच्या छाननीचे दिवशी दोषसिद्धीचे अस्तित्व टिकून होते त्या दिवशी नामांकनपत्र फेटाळणेच योग्य व न्यायाचे होय. निवडणूकविषयक न्यायालयीन कामकाजात, अशा प्रकारची पूर्वगामी परिणामी आज्ञा विचारात घेता येत नाही. मात्र निवडणूकविषयक याचिका अर्जाच्या निकालपत्रात हायकोर्टाने हे नमूद करावे असे मत सुप्रीम कोर्टाने– मुन्नीलाल वि. परमतलाल ए. आय. आर. १९७१ सु. को. ३३० या प्रकरणी व्यक्त केले आहे.

या कलमात "INVOLVING MORAL TURPITUDE" "अनैतिक कृत्ये केल्यामुळे" असे शब्द नाहीत. साहजिकच दोषसिद्धी कोणत्याही गुन्ह्याच्या कृत्यामुळे ठरो, दोषसिद्धी ठरली, की तो निवडणूक लढविण्यास अपात्र ठरतो असा या कायद्यातील या कलमाचा स्पष्ट अर्थ आहे.

कलम १६ चा पोट कलम (१)चा सदर (अ) यातील शब्दरचनेवरून भारतातील कोर्टाने दोषी ठरविले तर तो अपात्र ठरतो असा बोध होतो आणि तुरुंगवासाची शिक्षा दोन वर्षांपेक्षा कमी असू नये असाही बोध होतो.

१. दोषीही ठरला पाहिजे, आणि

२. दोन वर्षांपेक्षा तुरुंगवासाची शिक्षा जास्त पाहिजे. या दोन्ही बाबींचे अस्तित्व एकसमयावच्छेदेकरून व्यक्त झाले पाहिजे. हे अस्तित्व ज्या प्रकरणात प्रकट होईल अशा प्रकरणातील इसमाचा उमेदवार म्हणून निवडणूक लढविण्यासाठीचा अपात्रतेचा/अनर्हतेचा काल तुरुंगातून ज्या तारखेला सुटेल त्या तारखेपासून पुढे मोजावयाचा, असा आशय या कलमात आहे. अनर्हतेचा काल तुरुंगवासातून ज्या तारखेस सुटला तेथून पुढे पाच वर्षांपर्यंत किंवा राज्य सरकारने हा कालावधी कमी केल्यास जेवढा कमी केला तेवढा पाच वर्षांतून वजा करून उरेल तितका राहील.

कलम (अ अ) यातील तरतुदीप्रमाणे अपात्रतेचा/अनर्हतेचा कालावधी पाच वर्षांचाच आहे. इंडियन पीनल कोड कलम १५३ अ किंवा कलम ५०५(२), (३) यात नमूद असलेल्या दंडनीय गुन्ह्याबद्दल दोषी ठरला–शिक्षा होवो अथवा न होवो, तरी निवडणूक लढविण्यास उमेदवार अनर्हत ठरतो. अनर्हतेच्या कालावधीचा प्रारंभ दोषी ठरविलेल्या तारखेपासून मोजावयाचा असे यात नमूद आहे. वरील कलमात "SINCE HIS RELEASE" म्हणजे "सुटका झाल्यापासून" असे शब्द आहेत तर या कलमात "SINCE THE DATE OF SUCH CONVICTION" म्हणजे "दोषसिद्धी ठरल्या तारखेपासून" असे शब्द आहेत.

इंडियन पीनल कोडमधील कलम १५३ अ चा आशय पुढीलप्रमाणे आहे.

"समाजात वर्ग-विद्रोह निर्माण करणे." जाती-जमातींच्या, राष्ट्रा-राष्ट्रांच्या, वांशिक, प्रांतिक, भाषिक अशा कारणांवरून समाजा-समाजामध्ये शत्रुत्व निर्माण

करणे हा या कलमान्वये दंडनीय गुन्हा ठरविला आहे.

कलम ५०५ (२), (३) चे स्वरूप अशाच प्रकारचे आहे.

पुढील कलम (अ ब) यात "SINCE HIS RELEASE" असे शब्द आहेत; म्हणजे सुटका झाल्यानंतर पाच वर्षे अनर्हत. यातील गुन्हा अस्पृश्यतेच्या कायद्या-संबंधी आहे.

पुढील कलम (अ क) यातील अनर्हता, अनैतिक, दुराचाराची कृत्ये केल्याच्या कारणावरून आहे. यातील अनर्हतेचा कालावधी दोषी ठरल्याच्या तारखेपासून सुरू होतो. बालेश्वर सिंग वि. डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट बनारस ए. आय. आर. १९५९ अलाहाबाद ७१ या खटल्यात अलाहाबाद हायकोर्टाने, इंडियन पीनल कोडच्या कलम १८२ अन्वये अनैतिक गुन्ह्यासाठी दोषी ठरलेल्या इसमाला अनर्हत ठरविले आहे. इंडियन पीनल कोड कलम १८२ चा आशय असा आहे की कोणाही सरकारी नोकरास, दुसऱ्या कोणा इसमास दुखापत करण्यासाठी, व्यथित करण्यासाठी सरकारी अधिसत्ता-शक्ती वापरावी म्हणून खोटी माहिती देणे. थोडक्यात, दुसऱ्या कोणा इसमास संकटात आणण्याच्या कुटील हेतूने, खोटी माहिती सरकारी नोकराला पुरवून त्या दुसऱ्या इसमाला संकटात आणण्यास प्रवृत्त करणे. हा गुन्हा अनैतिक, दुराचाराच्या स्वरूपाचा असल्याचे मत अलाहाबाद हायकोर्टाने व्यक्तविले आहे. जे न्यायोचित नाही, प्रामाणिक नाही, सद्हेतूचे नाही असे कोणतेही कृत्य अनैतिक दुराचारात येते असे हायकोर्टाने म्हटले आहे. हा निकष अनैतिक दुराचाराच्या कृत्यासाठी लावला तर असा कोणताही गुन्हा नाही, की तो अनैतिक दुराचाराच्या व्याख्येतून बाजूला काढता येईल, असे मत मंगली वि. छक्कीलाल ए. आय. आर. १९६३ अलाहाबाद ५२७ या दाव्यात याच अलाहाबाद हायकोर्टाने व्यक्तविले आहे. प्रत्येक दंडनीय कृत्य अनैतिक दुराचाराचे असते हे म्हणणे योग्य नाही. ते ज्या परिस्थितीत घडलेले असेल त्या परिस्थितीवर ते अवलंबून असते. अनैतिक दुराचारात गणना करावयाच्या कृत्यासाठी पुढील निकष लावावा असे हायकोर्टाचे मत आहे.

१. दोषी ठरणारे कोणतेही कृत्य सर्वसाधारण सद्सद्विवेक समाजबुद्धीला नीतीचा धक्का देणारे असेल, तर

२. नीति-नियमांची पायमल्ली करण्याचा हेतू असल्याचे दृष्टोत्पत्तीस आले, तर

३. कृत्य करणाराचे ते कृत्य समाजाची मान खाली व्हावी असे असेल, तर

अन्नधान्य भेसळ प्रतिबंधक कायद्याच्या कलम ७/१६ खाली नियम ५० चा भंग केल्याबद्दल न्यायालयाने एका इसमास दोषी ठरविले. नियम ५० खाली विहित केलेला परवाना मिळविल्याशिवाय धान्याच्या विक्रीच्या वस्तू प्रदशनार्थ मांडल्या. अशा प्रकारे विक्रीच्या धान्य वस्तूंचे प्रदर्शन करण्यापूर्वी, नियम ५० खाली मिळालेल्या परवान्याच्या नूतनीकरणासाठी अर्ज केल्याचे व त्यासाठी आवश्यक शुल्क रक्कम अनामत भरल्याचे न्यायालयास आढळले, पण त्यास तोपर्यंत परवाना मिळालेला

नव्हता आणि नूतनीकरणाचे अर्जावर काही कारवाई झालेली नव्हती. गुन्हा घडल्याचे मत न्यायालयाने व्यक्तविले पण हा गुन्हा अनैतिक दुराचाराचा नाही साहजिकच तो निवडणूक लढविण्यास अनर्हत ठरला नाही. (इंदरलाल वि. लच्छू राम, ए. आय. आर. १९६६ राजस्थान ४२)

विधानसभेच्या निवडणुकीत निवडून आलेल्या यशस्वी उमेदवाराविरुद्ध तो भारतीय नागरिक नसल्याच्या अरोपावरून त्याच्या निवडीस आव्हान देण्यात आले. ज्या वेळी मतदारयादी तयार केली जात होती त्या वेळीच ही हरकत उपस्थित करावयास पाहिजे होती. आता निवडीस आव्हान दिल्याच्या न्यायालयीन कामकाजात ही हरकत उपस्थित करता येत नाही असे निवडून आलेल्या उमेदवारातर्फे प्रतिपादन करण्यात आले, पण हे प्रतिपादन फेटाळण्यात आले. निवडणूक न्यायाधीकरण भारतीय राज्यघटनेच्या आर्टिकल १७३ चा हा भंग झाल्याने, याची दखल घेऊ शकते. निवडणुकीचे दिवशी तो परराष्ट्रावर निष्ठा ठेवणारा परराष्ट्रीय नागरिक होता हे कारण त्याला अनर्हत ठरविण्यास पुरेसे आहे असे मत न्यायालयाने व्यक्तविले. (नारायण बिकाराम शहा वि. केदार पांडे, ए. आय. आर. १९६४ पाटणा ४१७).

नफ्याचे म्हणजेच नफा देणारे कोणतेही पद धारण करणारा इसम नगरसदस्य होणेस पात्र नाही, तो या कलमातील तरतुदीने अनर्हत ठरविला आहे. हे नफ्याचे पद, सरकारच्या तिजोरीतून मिळणाऱ्या नफ्याचे असावे. यातील शब्दरचना वर्तमानकालदर्शक आहे, म्हणजे नामांकन-पत्रिका सादर करणेचे दिवशी/छाननी करणेचे दिवशी जर उमेदवार प्रत्यक्षतः असे एखादे नफ्याचे पद धारण करीत असेल तर उमेदवार म्हणून निवडणूक लढविण्यास अपात्र ठरतो. अशा नफ्याचे पदावर नेमल्याबद्दलच्या नेमणुकीचे पत्र, अपात्रतेची हरकत घेण्यास पुरेसे होत नाही तर त्या पत्रानुसार ते पद स्वीकारले असल्याचे व स्वीकारून प्रत्यक्षतः त्या पदाचे कार्य सुरू केले असल्याचा पुरावा हरकतीच्या समर्थनार्थ आवश्यक असतो. इतकेच नव्हे असे कार्य सुरू केल्यामुळे नफा अर्जित झाला असल्याचेही सिद्ध करावे लागते. एखाद्या इसमाने असे नफ्याचे पदावरील नेमणूकपत्र स्वीकारले असेलही, त्या पदावर तो रुजू झाला असेलही व प्रत्यक्षतः काम सुरू केले असेलही; पण त्याचे नावावर रक्कम अर्जित होण्याइतके ते काम झाले नसेल व नफा रक्कम अर्जित होण्यापूर्वीच त्याने राजीनामा देऊन इकडे उमेदवारीची नामांकनपत्रिका भरली असेल तर तो इसम, त्या दिवशी किंवा तत्पूर्वी त्याचा राजीनामा मंजूर झाला नसला तरीही त्यास, केवळ तो त्या पदावर आहे म्हणून, ते पद तो धारण करीत आहे म्हणून अनर्हत ठरविले जात नाही. (रामदास वि. चंदूलाल, ए. आय. आर. १९६९ जम्मू-काश्मीर १२).

"नफ्याचे पद" म्हणजे जे पद नफा देणारे आहे, ज्यापासून नफा मिळतो ते पद किंवा त्या पदापासून नफा मिळणेची रास्त अपेक्षा जेव्हा इसमाला असते तेव्हा ते

पद " नफ्याचे पद " असे ओळखले जाते किंवा तसे ओळखले जावे अशी न्यायालयाची अपेक्षा आहे. (देवराव वि. केशवराव, ए. आय. आर. १९५८ बॉम्बे ३१४).

सरकारी निधीतून जिचा व्यवहार चालतो अशा सरकारी नियंत्रणाखाली व्यक्ति-समूही संस्थेत (BODY CORPORATE) एखाद्या पदावर असणाऱ्या इसमास–

जर त्याचा पगार अथवा त्याच्या पदधारणेतील कामाचा मोबदला, सरकारी तिजोरीतून खर्ची पडत असल्याची हिशोबातील नोंद होत असेल,

त्याची नेमणूक सरकारी कार्यालयाने केली असेल,

त्याला पदावरून काढणेसाठी सरकार सक्षम असेल, तरच तो अनर्हत ठरेल. मात्र

त्याचा पगार व्यक्तिसमूही संस्थेच्या तिजोरीतून दिला जात असेल,

त्याची नेमणूक व्यक्तिसमूही संस्थेने केली असेल,

त्याला पदावरून काढणेसाठी व्यक्तिसमूही संस्था सक्षम असेल तर तो अनर्हत ठरविला जात नाही. (वासुदेव गणू वर्तक वि. रिटर्निंग ऑफिसर, ए. आय. आर. १९६८ बॉम्बे २५९).

ललिताबाई वि. रिटर्निंग ऑफिसर ए. आय. आर. १९७१ म्हैसूर ३५ या प्रकरणातील हकीकत अशी की, सोसायटीज् रजिस्ट्रेशन ॲक्टखाली नोंदणी झालेल्या शैक्षणिक संस्थेत शिक्षक म्हणून काम करीत असलेल्या इसमाची नेमणूक सरकारने केलेली नव्हती. पण सरकारकडून त्या संस्थेत काम करणाऱ्या नोकरांच्या पगाराची रक्कम अनुदान म्हणून दिली जात असे. सरकारी तिजोरीतून खर्ची होणाऱ्या रकमेची हिशेबी नोंद या नोकरांच्या पगारासाठी होत नव्हती तर शैक्षणिक संस्थेला अनुदान अशी नोंद होत होती. अशा मार्गाने ज्या पदधारणेप्रीत्यर्थ वेतन मिळत असल्याने हे पद सरकारी नफ्याचे पद नव्हे असा निर्णय म्हैसूर हायकोर्टाने, याचसारखी तरतूद असलेल्या म्हैसूर म्युनिसिपालिटीज् ॲक्ट १९६४ च्या कलम १६ खालील याचिका अर्जात दिला आहे.

सरकारी कंपन्यांच्या अकौंट्सचे ऑडिट करणाऱ्या ऑडिट कंपनीतील ऑडिटर ऑडिट कंपनीचा भागीदार आहे. तसेच तो त्या सरकारी कंपनीचा संचालकही आहे. त्याची संचालक या पदावरील नेमणूक सरकारने केलेली आहे. साहजिकच ते पद भारतीय राज्यघटनेच्या आर्टिकल १०२ (१) (अ) च्या अर्थानुसार सरकारी नफ्याचे पद असल्याचा निर्णय सुप्रीम कोर्टाने दिला. (गोविंदा बसू वि. संकरिया प्रसाद, ए. आय. आर. १९६४ सु. को. २५४).

एक्स्ट्रा डिपार्टमेंट ब्रँचचा पोस्टमास्तर हा सिव्हिल सर्व्हंटही नाही किंवा तो धारण करीत असलेले पद सिव्हिल पद नाही व तो सरकारी नोकर नाही. (खेड्या-पाड्यांतून असे पद धारण करणारे शाळामास्तर किंवा तत्सम नोकर आहेत.) तरीही हे पद सरकारी कार्यालयातील नफ्याचे पद असल्याचे अलाहाबाद हायकोर्टाने ठरविले. (चेड्डुसिंग वि. मनोहरसिंग, ए. आय. आर. १९६४ अलाहाबाद १७९)

त्याची नेमणूक केंद्र सरकारने मासिक वेतनावर नव्हे पण मासिक भत्त्यावर केली असल्याने हे पद केंद्र सरकारच्या कार्यालयातील नफ्याचे पद होय.

अनर्हत ठरविण्यासाठी, या कलमातील आशयानुसार दोन बाबी स्पष्टपणे दृग्गोचर झाल्या पाहिजेत.

१. धारण करीत असलेले पद सरकारी खर्चातून मिळणाऱ्या प्राप्तीचे पद असले पाहिजे.

२. कार्यालय केंद्र वा राज्य सरकारचे असले पाहिजे. (उमरावसिंग वि. दरबारासिंग, ए. आय. आर. १९६८ पंजाब ४५०) या दाव्यातील हकीकत अशी की, पंजाब पंचायत समिती आणि जिल्हा परिषद ॲक्ट १९६१ प्रमाणे प्ररचित पंचायत समिती चेअरमनचे पद धारण करणारा इसम दरमहा वर खर्चासाठी एकूण वट्ट रक्कम भत्ता रु. १००–०० पंचायत समिती आणि जिल्हा परिषद नॉन-ऑफिशियल मेंबर्स (पेमेंट ऑफ अलौवन्स) रूल्स १९६१ प्रमाणे घेत असे. हा भत्ता, प्राप्तीचा नसून खर्चाच्या भरपाईचा असल्याने हे पद नफ्याचे पद नव्हे असे न्यायालयाने व्यक्तविले. तसेच पंचायत समितीचे कार्यालय हे स्थानिक प्राधीकरण कार्यालय आहे ते सरकारी कार्यालय नव्हे असाही निर्णय दिला.

नोकरी आणि नोकरीव्यतिरिक्त इतर आर्थिक हितसंबंध यांच्यात द्वैत उत्पन्न होऊ नये आणि स्थानिक संस्थेचा कारभार स्वच्छ, भ्रष्टाचारापासून अलिप्त असावा हा उद्देश यात आहे. स्थानिक संस्थांशी केलेल्या कोणत्याही कंत्राटात सहभाग असणे अथवा हितसंबंध गुंतून असणे ही बाब अनर्हतेस कारणीभूत ठरते. सर्वसाधारणपणे अशा कंत्राटाचे प्रकार तीन आहेत.

१. वस्तूंचा, मालाचा पुरवठा करण्याचे कंत्राट,

२. कोणतीही कामे करून देण्याचे कंत्राट,

३. कोणतीही सेवा-कृती करण्याचे कंत्राट.

मालाचा किंवा वस्तूंचा पुरवठा स्थानिक संस्थांना करण्याचे कंत्राट कोणत्याही वेळी, विशेषतः संबंधित कालावधीत, की जेव्हा इसम निवडणूक लढविण्यासाठी उमेदवार म्हणून रिंगणात उतरतो तेव्हा. चतुर्भुज विठ्ठलदास जसानी वि. मोरेश्वर परशराम, ए. आय. आर. १९५४ सु. को. २३६, या दाव्यात सुप्रीम कोर्टाने असा निर्णय दिला की, मालाचा पुरवठा करण्याचे कंत्राट, जेव्हा मालाचा पुरवठा केला जातो तेव्हा ते संतुष्टात आले होते असे म्हणता येत नाही. केलेल्या कामाचा मोबदला पूर्ण चुकता होईपर्यंत अथवा त्याची आकारणी (बिल) पूर्ण होईपर्यंत कंत्राट अस्तित्वात असते आणि उभयपक्षांनी दिलेले व घेतलेले काम पूर्ण केल्यावरच त्याचे अस्तित्व संपते. असे अस्तित्व उमेदवारीच्या काळात असेल तर तो उमेदवार अनर्हत ठरतो. असा आशय लोकप्रतिनिधित्व कायदा १९५१चे कलम ७(अ) मध्येही आहे व हाच आशय या कायद्यातही आहे.

गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट १९३५ किंवा भारतीय राज्यघटना आर्टिकल २९९च्या तरतुदीचा भंग होईल असे कंत्राट सरकारबरोबर केले म्हणून ते अमलात आणण्याजोगे नसून नियमबाह्य असल्याचे समर्थन वर नमूद केलेल्या 'चतुर्भुज' दाव्यात केले; पण सुप्रीम कोर्टाने स्टेट ऑफ वेस्ट बंगाल वि. बी. के. मंडळ या दाव्यात निराळा दृष्टिकोन स्वीकारला. असा वेगळा दृष्टिकोन स्वीकारल्याचे कारण नमूद करताना सुप्रीम कोर्टाने असे म्हटले आहे की, या दाव्यात कोर्टापुढील प्रश्न त्यापेक्षा निराळ्या स्वरूपाचा होता. भारतीय राज्यघटनेच्या आर्टिकल २९९ (१)च्या तरतुदींची परिपूर्तता झालेली नसल्याने लोकप्रतिनिधित्व कायदा १९५१च्या तरतुदी येथे लागू करता येत नाही. कारण वादविषय ठरलेले मालाचा पुरवठा करण्याचे ठरलेले कंत्राट संपुष्टात आले होते. असे असले तरी हे कंत्राट अमलात आणण्यायोग्य नव्हते ही वस्तुस्थिती असली तरी लोकप्रतिनिधित्व कायदा १९५१चे कलम ७ (ड)चे कक्षेत येते.

जे कंत्राट सरकारने मंजूर केलेले नाही तेही या कक्षेत आणले जावे इतकी व्याप्ती (चतुर्भुज ए. आय. आर. १९५४ सु. को. २३६) या प्रकरणातील निर्णयात वाढविलेली नाही. म्हणून जे कंत्राट राज्यघटनेच्या आर्टिकल २९९ च्या तरतुदीचे उल्लंघन करणारे आहे असे करारबद्ध झाले पण मंजूर झाले नाही ते कंत्राट कलम ७(अ)च्या तरतुदीप्रमाणे आव्हान देण्यायोग्य नव्हे. (ललितेश्वर प्रसाद साबी वि. बटेश्वर प्रसाद, ए. आय. आर. १९६६ सु. को. ५८०).

चतुर्भुज बिठ्ठलदास जासानी या दाव्याच्या निर्णयात असे मत व्यक्त झाले आहे की, कार्यवाही पूर्ण झालेले व कार्यवाही करण्यायोग्य अशी दोन्ही प्रकारची कंत्राटे लोकप्रतिनिधित्व कायद्याचे कलम ७ (ड)मध्ये अंतर्भूत होतात. मालाचा पुरवठा करण्याचे कंत्राट किंवा काम करून देण्याचे अथवा सेवा बजावण्याचे कंत्राट हे केवळ मालाचा पुरवठा केल्याबरोबर किंवा काम करून दिल्याबरोबर किंवा अंगीकृत सेवा बजावल्याबरोबर संपुष्टात येत नाही. त्याचा मोबदला चुकता होईपर्यंत व ते पूर्णपणे निकाली निघेपर्यंत असे कंत्राट अस्तित्वात राहते.

एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर आणि कंपनी यामध्ये काम करून देण्याचा करार झाला असल्याचे पत्रव्यवहारांवरून दिसून आले. दिलेले काम राज्यघटनेच्या आर्टिकल २९९ च्या तरतुदी पूर्तीचे आहे. ललितेश्वर प्रसादच्या दाव्याची ही हकीकत असून कोर्टाने पुढे असा अभिप्राय व्यक्तविला की (ललितेश्वर प्रसाद वि. बटेश्वर प्रसाद ए. आय. आर. १९६६ सु. को. ५८०) पत्रव्यवहारांतून राज्यसरकार आणि खासगी इसम यांचेमध्ये काम करून देणे संबंधीचा करार झाला आणि राज्य सरकारने तो करार मंजूर केल्यामुळे करारातील पक्षकारांमध्ये कंत्राट देणारा व कंत्राट घेणारा असे नाते निर्माण झाले व करारोद्भव दायित्वें स्वीकारली गेली, त्यामुळे लोकप्रतिनिधित्वाच्या कायद्यातील संबंधित तरतुदींनुसार अनर्हतेला कारणीभूत ठरणारी ही बाब ठरते.

राज्यघटनेच्या आर्टिकल २९९ (१)मध्ये विहित केलेल्या पद्धतीने काम न केल्यामुळे कंत्राटातील शर्तीचा भंग झाला तर सिव्हिल कोर्टात परिहारासाठी दावा लावता येत नाही. पण या कारणास्तव इसमाने अंगीकृत केलेले काम पुरे करून देण्याचे कंत्राट जरी राज्यघटनेच्या आर्टिकल २९९च्या विहित पद्धतीने झालेले नसले तरी उभयपक्षांना बंधनकारक असल्याचे उभयपक्षांनी मानले होते. म्हणून यातून अनर्हतेचा उद्‌गम होत नाही असे मत सुप्रीम कोर्टाने अब्दुल रहिमान खान वि. सदाशिव त्रिपाठी, ए. आय. आर. १९६९ सु. को. ३०२ यात व्यक्तविले आहे.

या कलमातील आशय, पूर्वी अमलात असलेल्या सेंट्रल प्रॉव्हिन्सेस ॲण्ड बेरार म्युनिसिपालिटीज् ॲक्ट १९२२च्या कलम १५ (१)चा आशय सारखा आहे. अनर्हतेच्या उद्‌गमतेसाठी "सहभाग किंवा हितसंबंध" अशा करारात/कंत्राटात असणे आवश्यक आहे.

INTEREST IN CONTRACT – कंत्राटातील हितसंबंध प्रत्यक्षही असू शकतो वा अप्रत्यक्षही असू शकतो. पण या कलमात नमूद असणारा हितसंबंध हा मैत्रीखातर किंवा मामुली भावनात्मक नव्हे. हा हितसंबंध आर्थिक आहे. उपादान विशेष आहे आणि म्हणून तो अनर्हतेच्या उद्‌गमतेला कारण आहे–जरी असा हितसंबंध अप्रत्यक्ष असला तरी.

केवळ भाडचाची वसुली म्हणजे कंत्राटातील हितभाग नव्हे. भाडे मालकाचे वतीने कोणीही वसूल करावे. एखाद्या नगरसदस्याने म्युनिसिपालिटीकडून भाडे वसूल केले म्हणजे त्या रकमेत त्याचा हितभाग होता असा गर्भितार्थही व्यक्त होत नाही. (भगवानदास रामचंद्रदास वि. प्रेसिडेंट म्युनिसिपल कमिटी, ए. आय. आर. १९६७ बॉम्बे १४३).

इमारतीच्या एखाद्या भागात भाडेकरू म्हणून राहणे किंवा मालमत्तेत हितभाग असणे या वस्तुस्थितीवरून असा तर्क करणे योग्य नव्हे की असा इसम, म्युनिसिपल कमिटीला इमारतीचा जो भाग भाडचाने दिला असेल त्या भागापुरते, नियमांकित परवानगीनुसार कर कमी करून घेण्याबाबतचा अर्ज करणेस पात्र ठरतो. जोपर्यंत नगरसदस्य आणि नगरपालिका यांच्यामध्ये कंत्राट प्रस्थापित होत नाही तोपर्यंत नगरपालिकेचे नगरसदस्यत्व संपुष्टात येत नाही.

कोणतेही कार्य/कामकाज पूर्ण करून देण्याचे सरकारने अंगीकारलेल्या कंत्राटात जर एखाद्या इसमाचा हितभाग असेल तर तो इसम नगरसदस्य होणेस अनर्हत ठरतो. जेव्हा कोणी एखादा वैयक्तिकपणे नव्हे पण स्थानिक प्राधीकरणाचा प्रमुख म्हणून एखादे कंत्राट स्वीकारतो/देतो तेव्हा त्यात त्याचा व्यक्तिशः हितसंबंध नसेल तर तो अनर्हत ठरत नाही (भगवानसिंग वि. रामेश्वर प्रसाद, ए. आय. आर. १९५९ सु. को. ८७६) या दाव्याचे निर्णयपत्रात असे नमूद आहे को, कंत्राटातील मजकुराशी संबंधित असा जेव्हा प्रश्न उपस्थित होतो तेव्हा तो मजकूर पक्षकाराने

अधिक स्पष्ट केल्यामुळे तो कंत्राटदाराचा दस्तऐवज प्रत्याकारी परिणामी न ठरता लेखी कैफियतीचे निवेदनात असंदिग्ध असे स्थानिक प्राधीकरणासाठी व स्थानिक प्राधिकरणाचे वतीने कंत्राटाची कार्यवाही झाल्याचे नमूद करावे.

सरकारने अंगीकृत केलेल्या सेवा बजावणीचे कंत्राटात हितसंबंध असणे, जर

त्याने स्वतः, किंवा

त्याचेसाठी किंवा त्याचे वतीने, त्याच्या कारणी कोणा व्यक्तीने किंवा व्यक्ति-समूहाने, विश्वासाने.

सरकारने अंगीकृत केलेल्या सेवा-बजावणी कंत्राटात काही सहभाग, हितसंबंध राखल्यास.

नगरसदस्य होण्यास तो अनर्हत ठरतो.

या कलमातील ही तरतूद लोकप्रतिनिधित्व कायदा कलम ७ (ड) व जम्मू-काश्मिर लोकप्रतिनिधित्व कायदा कलम २४ (ड) यातील तरतूद सारखी आहे.

सेवा बजावणीचे कार्य अंगीकारण्याचे कंत्राट जर कोणी इसम समुचित सरकारबरोबर अथवा कॉर्पोरेशनबरोबर करील तर तो नगरसदस्य होणेस अनर्हत ठरतो.

शासनाने किंवा कॉर्पोरेशनने अंगीकृत केलेल्या सेवा कोणत्या ?

अशा सेवा बजावणीसाठीच्या कंत्राटी करारात असा इसम आहे का ?

" कोणतीही सेवा " या शब्दाचे आशयात सरकारने अंगीकृत केलेली, दुसऱ्या इसमास किंवा संस्थेस दिलेली कोणत्याही प्रकारची सेवा इतका व्यापक अर्थ येतो. यात सरकारी नियंत्रणाखालील कोणत्याही खात्याला व्यक्तीने वैयक्तिक सेवा देण्याच्या कराराचा समावेश होत नाही. (रामदास वि. चंदूलाल, ए. आय. आर. १९६९ जम्मू काश्मिर १२). व्यावसायिक आशय स्पष्ट व्हावा म्हणून " कोणतीही सेवा " हे शब्द उपयोजिले आहेत. शासनाने कोणा इसमाला अथवा कोणा संस्थेला कोणतीही सेवा देण्याचे अंगीकारलेले असते अशा प्रकरणी आणि अशी अंगीकृत सेवा बजावणीचे करारात कोणी इसम असेल तर असा इसम अनर्हत ठरत नाही.

निवडणुकीचे रीति-नियम करण्याची शक्ती

१७. [१] या अधिनियमाखाली घ्यावयाच्या निवडणुकीसाठी सर्वसाधारण रीति-नियम यांची तरतूद असणारे नियम राज्य सरकारने करावेत.

[२] मागील तरतुदीच्या महत्तमतेस बाधा न आणता, खालील सर्व किंवा कोणत्याही बाबीसाठी राज्य सरकारने नियम करावेत, जसे

(अ) मतदारांची यादी तयार करणे, प्रसिद्ध करणे आणि निर्वाहित करणे.

(ब) निवडणुकीच्या निरनिराळ्या टप्यासाठी तारीख, वेळ आणि स्थळ निश्चित करणे.

(क) निर्वाचन अधिकारी, अध्यक्षीय अधिकारी आणि निवडणुकीसाठी इतर नोकरवर्ग यांची नेमणूक आणि त्यांची कर्तव्ये.

(ड) उमेदवारांचे सूचनांकन, सूचनांकनाचा नमुना, सूचनांकनास हरकती, सूचनांकनाची छाननी आणि सूचनांकन-पत्रकाची स्वीकृती अथवा अस्वीकृतीचे आवाहन.

(ई) उमेदवारांनी भरावयाची अनामत आणि ज्या परिस्थितीत अनामत उमेदवारास परत करणे अथवा कौन्सिलकडे जप्त करणे.

(फ) उमेदवारांना खुणांचे वाटप करणे.

(ग) उमेदवारी मागे घेणे.

(ह) उमेदवारांचे एजंटांची नियुक्ती.

(आय) मतपत्रिकेचा नमुना.

(ज) निवडणूक लढविणे अथवा न लढविणेची पद्धत.

(के) बनावट मतदानास प्रतिबंध करण्याचे टप्पे.

(ल) मते नोंदणीची पद्धत.

(म) दिलेली मते व आव्हानित मते यासंबंधात अनुसरावयाची पद्धत.

(न) मतांची नोंदणी, मोजणी आणि फेरमोजणी, निर्णय जाहीर करणे, आणि समसमान मतांचे प्रकरणी पद्धत किंवा एकापेक्षा अधिक वार्डांचा प्रतिनिधी म्हणून सदस्यांची निवडणूक झाल्याचे घटनेसंबंधीची पद्धत.

(ओ) निवडणुकीशी संबंधित अशा कागदांचा ताबा व विल्हेवाट.

(प) मतदानाचे निलंबन किंवा फेरमतदान ज्या परिस्थितीत करावयाचे ती.

(क्यू) या अधिनियमाखाली निवडणुकीशी संबंधित अशा इतर बाबी, विहित केल्या असतील किंवा करावयाच्या असतील त्या.

भाष्य

वरील बाबींवर राज्य सरकारने नियम केले आहेत व या पुस्तकात ते दिले आहेत. **" महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ " पहा.**

निवडून देणेस चुकणे

१८. [१] जर, सर्वसाधारण निवडणुकीत किंवा पोटनिवडणुकीत, कोणत्याही वॉर्डातून सदस्य निवडला गेला नाही, तर त्या वॉर्डातून सदस्य निवडीसाठी नवी निवडणूक घेतली पाहिजे आणि जर नवीन निवडणुकीत सदस्याची निवड करणे राहून गेले तर अशा रिक्त जागी, या अधिनियमात काहीही नमूद असले तरी, राज्य शासनाने, अर्हताप्राप्त इसमाची नियुक्ती करावी.

[२] पोटकलम (१) खाली राज्य शासनाने नियुक्त केलेला कोणताही इसम,

या अधिनियमाखाली निवडणुकीत निवडून आलेला इसम असल्याचे समजले पाहिजे.

निवडणुकीच्या निर्णयाचे प्रकटीकरण

१९. [१] वॉर्डातील मतांची मोजणी संपल्यावर लवकरात लवकर – जर ती पोटनिवडणूक असेल आणि जर सर्वसाधारण निवडणूक असेल तर नगरपालिका क्षेत्रातील सर्व वॉर्डातील – सोयिस्करपणे कलेक्टरने कार्यालयीन राजपत्रात निवडणुकीचा निर्णय प्रसिद्ध केला पाहिजे.

जर सर्वसाधारण निवडणुकीत प्रारंभी निश्चित केलेल्या तारखेस कोणत्याही कारणामुळे कोणत्याही वॉर्डाचे किंवा वॉर्डांचे मतदान होऊ शकले नाही परंतु त्या तारखेस एकूण वॉर्डांच्या दोन तृतीयांश वॉर्डांचे झाले तर अशा वॉर्डांची मतमोजणी संपल्यावर लवकरात लवकर कार्यालयीन राजपत्रात उपलब्ध असलेला निर्णय कलेक्टरने प्रसिद्ध केला पाहिजे. आणि उर्वरित वॉर्ड किंवा वॉर्डांचे निर्णय त्यानंतर जेव्हा व जसे मतदान होईल आणि त्यातील मतमोजणी संपेल तेव्हा कार्यालयीन राजपत्रात प्रसिद्ध केले पाहिजेत. वॉर्डांची दोन तृतीयांश संख्या नियत करताना, अपूर्णांक वगळला पाहिजे. प्रत्येक सर्वसाधारण निवडणुकीनंतर निवडणुकीचे निर्णय प्रसिद्ध झाल्यावर, किंवा जसे असेल तसे, कार्यालयीन राजपत्रात निर्णय प्रथमतः प्रसिद्ध झाल्यानंतर, या पोटकलमाखाली, कौन्सिलची रचना झाली असे समजले पाहिजे.

[२] एकापेक्षा अधिक वॉर्डांत जर इसम निवडून आला, तर त्याने स्वाक्षरी केलेली लेखी नोटीस देऊन आणि कलेक्टरकडे ती पोहोच करून, निवडणुकीचा निर्णय पोट-कलम (१) खाली प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून किंवा जसे असेल तसे, त्याचे नाव ज्यात असेल असा नंतर निर्णय प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून सात दिवसांचे कालावधीत, कोणत्याही वॉर्डाची ज्याची तो सेवा करू इच्छील, निवड केली पाहिजे. अशी निवड अंतिम राहील.

[३] जेव्हा अशी निवड केली जाईल, तेव्हा उर्वरित वॉर्डची किंवा वॉर्डांची नव्याने निवडणूक घेण्याचा आदेश दिला पाहिजे.

[४] पोटकलम (२) मध्ये स्पष्ट केलेल्या कालावधीत व्यक्तीने आपली निवड सूचित केली अशा प्रकरणी कलेक्टरने, अशी व्यक्ती सेवा करील अशा वॉर्डाचा चिठ्ठ्या टाकून निर्णय करावा आणि त्याचा निर्णय अंतिम राहील. उर्वरित वॉर्डाच्या किंवा वॉर्डांच्या नव्या निवडणुकीचा आदेश द्यावा.

[५] एक किंवा अधिक वॉर्डांत जर इसम निवडून आला आणि अध्यक्ष म्हणूनही निवडून आला, तर त्याची कौन्सिलर म्हणून निवडून आलेली सर्व पदे बाद ठरविली जातील आणि त्याची नवी निवडणूक ज्या वॉर्डातून तो कौन्सिलर म्हणून निवडून आला होता त्या वॉर्डाची घेण्याचा आदेश दिला पाहिजे.

भाष्य

लोकप्रतिनिधित्वाचा कायदा १९५१ यातील कलम ६६ चे मजकुरात "निवडणुकीचा आशय" याचा आशय स्पष्ट झाला आहे. नियमान्वित वैध मतदानाचा परीपाक म्हणजे निवडणुकीचा निर्णय. (ह. वि. कामथ वि. अहमद इसाक (१९५५) १ एस. सी. आर. ११०४)

कौन्सिलरची आपसातून निवड

१९ – अ. [१] निवडून आलेल्या कौन्सिलरची नावे प्रसिद्ध झाल्यापासून, पंचवीस दिवसांचे आत, किंवा जसे असेल तसे, कलम १९ चे पोटकलम (१) खाली कार्यालयीन राजपत्रात प्रथम प्रसिद्ध झाल्यावर किंवा कलम ५१ चे पोटकलम (३) खाली कार्यालयीन राजपत्रात अध्यक्षाच्या निवडणुकीचा निर्णय जाहीर झाल्यापासून, जे उशीराचे असेल ते, नवीन कौन्सिलच्या अध्यक्षाने कौन्सिलरांची विशेष सभा, को-ऑप्शनसाठी बोलाविली पाहिजे. अध्यक्षाने, त्याचे मताने पुरेसे कारण असल्यास, कौन्सिलरांचे को–ऑप्शन होईपर्यंत अशी सभा स्थगित करण्याचे नाकारले पाहिजे. जर असे करणे आवश्यक आहे अशी अध्यक्षाची खात्री पटली तर, पंधरा दिवसांपेक्षा अधिक नाही अशा पुढील दिवसापर्यंत स्थगित करावी. पण अशा स्थगितीनंतरच्या सभेत, कोणतीही स्थगिती केल्याशिवाय कौन्सिलरांचे को-ऑप्शन केले पाहिजे.

[२] पोटकलम (१) मध्ये काहीही नमूद असले तरी कलम ४० खाली नियत केल्याप्रमाणे मावळत्या कौन्सिलरांच्या पदाचा सत्रकाल संपेपर्यंत अशी विशेष सभा भरविली जाता कामा नये.

[३] एका हस्तांतरित मताच्या प्रमाणित प्रतिनिधित्वाचे विहित पद्धतीने को-ऑप्शन झाले पाहिजे.

कार्यालयीन राजपत्रात को-ऑपटेड आणि नॉमिनेटेड कौन्सिलरांच्या नावाचे प्रसिद्धीकरण.

२०. [१] अध्यक्षाने कळविल्यानंतर लागलीच कलेक्टरने कार्यालयीन राजपत्रात को–ऑपटेड कौन्सिलरांची नावे प्रसिद्ध केली पाहिजेत.

[२] राज्य शासनाने कार्यालयीन राजपत्रात नॉमिनेटेड कौन्सिलरांची नावेसुद्धा प्रसिद्ध केली पाहिजेत.

को-ऑप्शन किंवा नॉमिनेशन कौन्सिलरांच्या – अध्यक्ष समाविष्ट – निवडणुकीसंबंधी विवाद

२१. [१] कलम १९, २० किंवा ५१ याखाली जसे असेल तसे, कौन्सिलरांची नावे कार्यालयीन राजपत्रात प्रसिद्ध झाल्यानंतर दहा दिवसांत निवडणुकीतील

उमेदवाराने किंवा निवडणुकीत मतदानास पात्र असणाऱ्या कोणीही इसमाने जिल्हा न्यायालयात याचिका दाखल करण्याशिवाय, कौन्सिलरांच्या को-ऑप्शन, नामिनेशन अध्यक्ष समाविष्ट–निवडणुकीस आव्हान देता येणार नाही.

[२] अशी कोणतीही याचिका –

(अ) अर्जदार ज्यावर अवलंबून असेल अशा वास्तव सामग्रीचे सारांशित निवेदनाची असली पाहिजे.

(ब) को-ऑप्शन, नॉमिनेशन, इलेक्शन ज्या मुद्यावर किंवा मुद्यांवर आव्हान द्यावयाचे असेल त्याच्या पुरेशा तपशिलासह असावी.

(क) निवेदनाच्या रुजुवातीसाठी सिव्हिल प्रोसीजर कोड १९०८ मध्ये नमूद केलेल्या पद्धतीने याचिका अर्जदाराने स्वाक्षरित करून रुजुवात करावी.

[३] खाली नमूद केलेल्या सर्व किंवा कोणत्याही एका प्रकटनावर अर्जदाराने दावा सांगावा –

(अ) सर्व किंवा कोणत्याही यशस्वी उमेदवाराची निवडणूक बाद ठरविणे, किंवा

(ब) सर्व किंवा कोणत्याही यशस्वी उमेदवाराची निवडणूक बाद ठरवावी आणि तो स्वतः किंवा इतर कोणी निवडून आले आहेत, किंवा

(क) सर्व किंवा कोणत्याही को-ऑप्टेड किंवा नॉमिनेटेड कौन्सिलराचे को-ऑप्शन किंवा नॉमिनेशन बाद ठरवावे.

[४] अर्जदाराने त्याचे याचिकाला प्रतिवादी म्हणून जोडले पाहिजेत –

(अ) जेव्हा अर्जदार पोट कलम (३)चे सदर (अ)खाली दावा सांगतो, तेव्हा त्याने यशस्वी उमेदवार किंवा ज्यांचे संबंधात असा दावा असेल ते उमेदवार,

(ब) जेव्हा अर्जदार पोट कलम (३)चे सदर (ब)खाली दावा सांगतो, तेव्हा अर्जदाराव्यतिरिक्त सर्व प्रतिस्पर्धी उमेदवार,

(क) अर्जात ज्यांच्याविरुद्ध भ्रष्टाचार किंवा बेकायदेशीर कृत्यांबद्दल आरोप केला असेल ते इतर कोणतेही उमेदवार,

(ड) जेव्हा अर्जदार पोट कलम (३)चे सदर (क)खाली दावा सांगतो तेव्हा सर्व किंवा इतर कोणताही को-ऑप्टेड किंवा नॉमिनेटेड कौन्सिलर, ज्यांचे संबंधात असा दावा असेल आणि ज्या कौन्सिलने कौन्सिलरला कॉ-ऑप्ट करून घेतले असेल ते कौन्सिल आणि ज्याने कौन्सिलरला नॉमिनेट केले असेल त्या राज्य सरकारला, जसे असेल तसे.

स्पष्टीकरण – " यशस्वी उमेदवार " यातील आशयांकित अर्थ असा, की ज्याचे नाव ' उमेदवार ' म्हणून कार्यालयीन राजपत्रात प्रसिद्ध झाले आहे असा.

[५] अशा अर्जाची चौकशी आणि निर्णय, जिल्हा न्यायाधीश किंवा ज्याच्याकडे अर्जाचे प्रकरण सर्वसाधारणपणे सोपवील, अशा सहायक न्यायाधीशापेक्षा कमी

श्रेणी नसलेला कोणीही न्यायाधीश, यांनी दिला पाहिजे.

[६] पोट कलम (१) खालील सर्व याचिका अर्ज –

(अ) एका समान वॉर्डाचे प्रतिनिधित्व करावे अशा निवडून आलेल्या कौन्सिलरांच्या निवडणुकीच्या वैधतेचा प्रश्न ज्यात असेल, ते त्याच न्यायाधीशाने ऐकावेत.

(ब) एका समान वॉर्डाचे प्रतिनिधित्व करावे अशा निवडून आलेल्या समान कौन्सिलरच्या निवडणुकीच्या वैधतेचा प्रश्न ज्यात असेल ते एकत्रित ऐकावेत.

[७] अशा अर्जाच्या सुनावणीसाठी न्यायाधीशास सिव्हिल प्रोसीजर कोडच्या खालील बाबींसंबंधीच्या सर्व शक्ती राहतील –

(अ) शोध घेणे आणि तपासणे.

(ब) साक्षीदारांच्या उपस्थितीबद्दल कटाक्षित असणे आणि इतर खर्च अनामत ठेवणेस भाग पाडणे.

(क) दस्तऐवज दाखल करणेची सक्ती करणे.

(ड) साक्षीदारांची तपासणी शपथेवर करणे.

(ई) तहकुबीस मंजुरी देणे.

(फ) प्रतिज्ञालेखी पुरावा घेणे, आणि

(ग) साक्षीदारांच्या तपासणीसाठी प्राधिकारी नेमणे, आणि न्यायाधीशाने, ज्याचा पुरावा विशेष असल्याचे त्यास वाटेल त्याला बोलावणे व तपासणे. क्रिमिनल प्रोसीजर कोड १८९८ च्या कलम ४८० व ४८२ च्या अर्थाप्रमाणे, न्यायाधीश सिव्हिल कोर्ट असल्याचे समजले गेले पाहिजे.

[८] सिव्हिल प्रोसीजर कोड १९०८ यात काहीही नमूद असले तरी, न्यायाधीशाने –

(अ) कोणताही अर्ज, तडजोड किंवा मागे घेणे, किंवा

(ब) कोणत्याही व्यक्तीस कोणतेही प्रतिपादन फेरबदल किंवा सुधारित करणे.

असा अर्ज तडजोडीसाठी किंवा काढून घेण्यासाठी किंवा त्यात फेरबदल करण्यासाठी किंवा सुधारणा करण्यासाठी सद्हेतू असल्याची खात्री करून घेतल्याशिवाय, परवानगी देऊ नये.

[९] आवश्यक ती चौकशी केल्यावर न्यायाधीशाने योग्य तो आदेश द्यावा, त्याचा आदेश निर्णायक राहील.

[१०] जर अर्जदाराने यशस्वी उमेदवाराच्या निवडणुकीचा प्रश्न उपस्थित करण्याबरोबरच अधिक स्वत: आणि दुसरा उमेदवार निवडून आल्याचे जाहीर करावे असा दावा केला असेल आणि न्यायाधीश –

(अ) अर्जदार किंवा असा दुसरा उमेदवार यांनी निवडून येण्याइतकी पुरेशा संख्येची वैध मते मिळविली आहेत, किंवा

(ब) परंतु यशस्वी उमेदवाराने भ्रष्टाचारी कृतीने मते मिळविली आहेत, तो अर्जदाराने किंवा अशा उमेदवाराने निवडून येण्याइतक्या पुरेशा संख्येइतकी वैध मते मिळविली असती –

अशी खात्री करून घेतल्यावर यशस्वी उमेदवाराची निवड बाद केल्याचे जाहीर केल्यावर अर्जदार आणि असा दुसरा उमेदवार निवडून आल्याचे जाहीर करावे.

परंतु असे, की

(i) अशा गणन कारणास्तव, जर न्यायाधीशास, कोणतीही भ्रष्टाचारी कृती केल्यावरून परिचित किंवा अपरिचित इसमाचे मत दिले वा मिळवले आहे असे आढळले तर मत वैध असल्याचे गणनेत घेता कामा नये.

(ii) अशा गणनेनंतर, कोणत्याही उमेदवारांमध्ये समान मते असल्यास एक अधिक मत, निवडून येण्यास जाहीर करण्यासाठी कोणत्याही उमेदवारासाठी पात्र राहील, उमेदवार किंवा उमेदवारांच्या, जसे असेल तसे, बाजूने एक मत, एकूण वैध मतात मिळविले पाहिजे. ते एक मत न्यायाधीशाचे समक्ष ते ठरवतील त्या पद्धतीने चिठ्ठ्या टाकून, निवडले पाहिजे.

[११] कोणत्याही भ्रष्टाचारी कृत्याचा अर्जात आरोप केला असेल तेव्हा न्यायाधीशाने, कोणत्याही भ्रष्टाचारी कृत्याबद्दल सुनावणीत गुन्हा सिद्ध झाला असल्याची नोंद करून सर्व इसमांच्या नावाने, उमेदवार कोणी असतील त्यासह आणि त्या कृत्यांचे स्वरूपावरून, असा कोणी इसम कौन्सिलर किंवा दुसऱ्या कोणत्याही स्थानिक प्राधीकरणाचा कौन्सिलर किंवा सदस्य होणेस आदेश दिल्याच्या तारखेपासून सहा वर्षांपेक्षा जास्त नाही पण दोन वर्षांपेक्षा कमी नाही, जसे न्यायाधीश स्पष्ट करतील तसे, अनर्हत झाल्याचा आदेश द्यावा.

परंतु असे, की इसमाचे नाव अशा आदेशात असता कामा नये, जर असे नसेल तर–

(अ) असे नामांकन का करू नये याची न्यायाधीशासमोर उपस्थित राहून कारणे दाखवा अशी नोटीस दिलेली असली पाहिजे, आणि

(ब) नोटीसीच्या अनुसरणार्थ तो उपस्थित झाला असला पाहिजे, आणि ज्या साक्षीदाराची तपासणी आधीच न्यायाधीशाने घेतली असेल आणि त्याचे विरुद्ध पुरावा दिलेला असेल त्याची उलट तपासणी घेण्याची आणि त्याच्या बचावाचा पुरावा देण्याची व तो ऐकण्याची संधी त्यास दिलेली असली पाहिजे.

[११अ] कलम ९ चे पोट कलम (२) चे सदर (ब) किंवा (क) च्या किंवा कलम १७ खाली केलेले नियम किंवा भ्रष्टाचारी कृत्याची कारणे नाहीत अशी अनियमान्वितता आणि त्रुटिता यांच्या तरतुदींचे पालन करण्यासाठी

नेमलेल्या अधिकाऱ्याने चूक केलेल्या मुद्यांसाठीच केवळ निवडणुकीच्या वैधतेचा प्रश्न उपस्थित केला असेल, तर न्यायाधीशाने निवडणूक बाद ठरविता कामा नये.

[१२] यशस्वी उमेदवाराने किंवा त्याच्या निवडणूक एजंटाने किंवा त्याचे संमतीने दुसऱ्या कोणीही इसमाने भ्रष्टाचारी कृत्य केल्याचे कारणावरून यशस्वी उमेदवाराची निवडणूक बाद ठरवून न्यायाधीशाने बाजूस सारली असेल आणि पोट कलम (११) खालील कोणत्याही आदेशात अशा उमेदवाराच्या नावाचा समावेश केलेला नसेल, तर न्यायाधीशाने उमेदवार, कौन्सिलर होणेस किंवा दुसऱ्या कोणत्याही स्थानिक प्राधीकरणाचा कौन्सिलर किंवा सदस्य होणेस सहा वर्षांपेक्षा जास्त नाही पण दोन वर्षांपेक्षा कमी नाही अशा कालावधीसाठी, जसे न्यायाधीश आदेशात स्पष्ट करतील तसे, अनर्हत असल्याचे जाहीर केले पाहिजे.

[१३] न्यायाधीशाने दाव्याच्या खर्चाची देय असणारी एकूण रक्कम निश्चित करून आदेशात ती कोणी इसमाने कोणा इसमास द्यावी हे सुद्धा स्पष्ट केले पाहिजे. असा खर्च जसे काही, सिव्हिल प्रोसीजर कोड १९०८ खालील दाव्याने वसूल करण्यालायक आदेशांकित असला पाहिजे.

भाष्य

निवडणुकीचे वाद विषय कोणते, वादाचे स्वरूप कोणते हे स्पष्ट करणारे हे कलम असावे असे या कलमाच्या मथळ्यावरून वाटते; पण प्रत्यक्षात तसे हे कलम असल्याचे दिसत नाही. निवडणुकीच्या संदर्भात वादाचा उद्‌भव झाल्यानंतर तत्संबंधीची याचिका कशी असावी, विरुद्ध पक्षकार कोण व किती असावेत, निवडणूक न्यायाधीकरणाचे अधिकार या कायद्यानुसार कोणाला दिले आहेत इत्यादी माहिती या कलमात आहे. अर्थात जे आहे त्याचाच विचार करणे क्रमप्राप्त आहे.

याचिका-अर्ज कोणाला करता येतो हे पोट कलम (१) मध्ये प्रारंभीच सांगितले आहे. त्याच्या मुदतीची मर्यादाही त्यात सांगितली आहे. निवडणुकीचा निकाल जाहीर होणे म्हणजेच यशस्वी उमेदवारांची नावे जाहीर होणे. ही नावे राजपत्रात जाहीर होतील ती तारीख वगळून, तेथून पुढे दहा दिवसांचे आत अर्ज दाखल केला पाहिजे ही प्रमुख अट आहे. निवडणुकीतील मतदानाचे यादीत ज्याचे नाव असेल अशा कोणत्याही मतदारास अर्ज करता येतो. प्रत्यक्षात अशा मतदाराने मतदान केलेले असो वा नसो; मतदाराचे यादीत मतदार म्हणून नाव असणे हीच अर्ज करण्याची पात्रता असल्याचे या कायद्याने मान्य केले आहे. ज्या उमेदवाराला असा अर्ज करावयाचा असेल तो उमेदवार मतदार असतोच, मतदार असल्याशिवाय उमेदवार होऊच शकत नाही. ज्या वॉर्डाच्या निवडणुकीबद्दल अर्ज करावयाचा त्याच वॉर्डाच्या निवडणूक मतदारयादीत मतदार म्हणून नाव असले पाहिजे असे

मात्र बंधन नाही. त्या निवडणुकीतील, त्या नगरपालिकेच्या कोणत्याही वॉर्डयादीत त्याचे नाव असले पाहिजे म्हणजे हरकत घेतली जात नाही अथवा घेतल्यास टिकत नाही.

'निवड करणे' या अर्थाचे वापरात असलेले इंग्रजी भाषेत दोन शब्द आहेत. ELECTION आणि SELECTION. पैकी इलेक्शन शब्दाचा अर्थ साधा व सुटसुटीत आहे, पण सिलेक्शन शब्दात अधिक व्यापक अर्थ आहे. जे निवडावयाचे आहे त्यातून अचूकतेची निवड करणे हा सिलेक्शन शब्दातील व्यापक अर्थ आहे. ही अचूकता निवड करणाऱ्याची सापेक्षता दर्शविणारी आहे. अचूकतेत अचूकता असेलच असे नाही पण निवड करणाऱ्या व्यक्तीच्या दृष्टीने ती अचूकता असते म्हणून या अचूकतेला सापेक्षिता सहाय्यकारी असते. मद्रास हायकोर्टाने श्रीवास्तव वि. कुप्पुस्वामी, ए. आय. आर. १९६८ मद्रास २५३, या प्रकरणी इलेक्शनचा आशय व्यक्तविला आहे.

निवडणूक घेण्याचे जाहीर केल्यापासून ते निवडणूक निकाल जाहीर होईपर्यंतच्या निवडणुकीच्या क्रिया-प्रक्रिया, टप्पे हे सर्व निवडणूक शब्दाच्या आशयात येतात. एखादा उमेदवार बिनविरोध निवडून आला. त्याची निवडणूक प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेने झाली नसली तरीही बिनविरोध निवड हीही एक निवडणुकीतील प्रक्रिया आहे. हाच आशय लाहोर हायकोर्टाने, सत्यनरेन वि. हनुमान प्रसाद, ए. आय. आर १९४५ लाहोर ८५, या प्रकरणी व्यक्तविला आहे.

निवडणुकीचे मतदान मतपत्रिकेने होते तसेच ते हात वर करूनही होते. या कायद्याने निवडणुकीचे मतदान मतपत्रिकेने व तेही गोपनीय पद्धतीने व्हावे ही पद्धत स्वीकारली आहे.

मतपत्रिका म्हणजे मतदाराने त्याची निवड व्यक्त करण्याचे एक कागदाचे माध्यम. या माध्यमातून मतदाराने, ज्याला निवडून द्यावे असे मतदाराला वाटत असेल, त्याला मत दिले म्हणजेच आपल्या मतानुसार त्याची निवड व्हावी अशी इच्छा व्यक्त करणे. प्रत्यक्ष मतदानाचे वेळी कोणत्याही प्रकारचे दडपण – आर्थिक– शारीरिक – मानसिक – मनावर येऊ नये व मतदाराने मुक्त मनाने मतदान करावे म्हणून ही मतपत्रिका. त्यावरील मतदान गोपनीय असावे ही अपेक्षा.

भारतातील सर्व राज्यांमध्ये स्थानिक प्राधीकरणाच्या, ग्रामपंचायत असो, जिल्हा परिषद असो, म्युनिसिपालिटी असो अथवा म्युनिसिपल कॉर्पोरेशन असो, निवडणूक-विषयक कायद्यानुसार कोणत्याही कोर्टात निवडणुकीला अथवा निवडून आलेल्या उमेदवाराच्या निवडीला आव्हान देण्याची तरतूद नाही. असे आव्हान निवडणूक-विषयक कायद्यातील तरतुदीनुसार, ज्या निवडणूक न्यायाधीकरणाची प्रस्थापना केली असेल त्या निवडणूक न्यायाधीकरणास निवडणूक-याचिका अर्ज सादर करूनच निवडणुकीला किंवा उमेदवार निवडीला आव्हान देता येते, अशी या कायद्यातील

तरतूद असून अशीच तरतूद, यू. पी. म्युनिसिपालिटिज् ॲक्ट १९१३ कलम १३ के (२), लोकप्रतिनिधित्व कायदा १९५१ कलम ८०, उत्तर प्रदेश नगरपालिका अधिनियम १९५९ कलम ६० यात आहे. इतर राज्यातील म्युनिसिपल इलेक्शन-संबंधीच्या कायद्यात व नियमात अशीच तरतूद आहे. सध्या कार्यरत असणाऱ्या सर्व कोर्टांना निवडणूक विषयापासून अलिप्त ठेवणे, त्यांचेपुढे असणाऱ्या कामात व्यग्रता निर्माण न करणे व निवडणूक-तंटे चालविणे व सोडविण्याची स्वतंत्र यंत्रणा निर्माण करणे हा सर्व राज्यशासनाचा अगदी प्राथमिक पण मूलभूत हेतू आहे. तरतूद आज्ञार्थी (MANDATORY) आहे, पण वापराला मर्यादा आहेत. तशीच वापराची पद्धतही निश्चित केली आहे. (हिरा वि. नेहरू, १९६७ अलाहाबाद लॉ जर्नल ५४).

सर्वोत्तम राव वि. चेअरमन, म्युनिसिपल कौन्सिल, सैदा पेठ, आय. एल. आर. (१९२४) ४७, मद्रास ५८५, या दाव्यातील न्यायाधीशांचा अभिप्राय असा, की]

कोणत्याही पदाच्या निवडणुकीची उपाययोजना ही पूर्णपणे अपुरी, निदान याचिका-अर्जदार मागतो त्या परिहारासाठी तरी ! की, आता जो निकाल झाला आहे, तो थांबवावा, निदान तो स्वतः उमेदवार आहे हे जाहीर करून. निवडणूक चालू ठेवा वा अर्ज तूर्त बाजूला ठेवून. नवीन निवडणूक घ्या हे सांगणे हा उपाय होत नाही. नवीन निवडणूक पूर्णपणे भिन्न आहे. त्यातून पुन्हा कदाचित नवीन उमेदवारांची फौज निर्माण व्हायची. अर्जदाराला पाहिजे असतो तो योग्य आणि समुचित परिहार व तो म्हणजे नियोजित निवडणूक, त्याचे नामांकन पुनर्मंजूर होऊन तो उमेदवार ठरेपर्यंत थांबविणे. म्हणून निवडणूक थांबविणेचा स्थगिती आदेश आवश्यक, निदान त्याने मागितलेला परिहार नामंजूर केला आहे हे त्यास कळेपर्यंत तरी. अशा प्रकारच्या बऱ्याच प्रकरणी व्यथित पक्षाला धमकीपूर्वी वेळेत अर्ज दाखल करणे काहीसे अडचणीचे असते; पण कोर्ट याबाबत काही करू शकत नाही. म्हणजे ज्याचा प्रतिबंध व्हावा असे त्याला वाटते ते कोर्टात खटला चालू असतानाही होतच असते."

हा अभिप्राय फक्त एकतर्फी आहे म्हणून याच सन्माननीय न्यायाधीशांनी याची दुसरी बाजू, देसी चेट्टीयार वि. चिन्नास्वामी चेट्टीयार, ए. आय. आर. १९२८ मद्रास १२७१ या दाव्यात दाखविली आहे.

ज्यामुळे निवडणूक रद्द ठरविता येईल अशी कोणतीही बाब न्यायाधीकरणा-पुढील कामकाजात योग्य वेळीच पुढे आणली पाहिजे, ती मध्येच, केव्हातरी पुढे आणणे योग्य नसते. (एन. पी. पुन्नुस्वामी वि. रिटर्निंग ऑफिसर, नमक्कल मतदार-संघ, १९५२ एस. सी. आर. २१८).

निवडणुकीला अथवा उमेदवाराच्या निवडीला आव्हान देण्याचा अर्थ कसा असावा हे पोट कलम (२)मध्ये अगदी थोडक्यात सांगितले आहे. हेच, समजून घेण्यासाठी थोड्या विस्ताराने सांगायचे झाले तर पुढीलप्रमाणे :–

फिर्यादी पक्ष म्हणजे निवडणूक न्यायाधीकरणात याचिका-अर्जदार. सिव्हिल कोर्टात ज्याला "PLAINT" म्हणतात त्याचेच निराळे स्वरूप, पण त्याच जागेवर असणारे या कामकाजात याचिका–अर्जाला आहे. "PLAINT" म्हणजे मागणीचे निवेदन STATEMENT OF CLAIM. सिव्हिल कोर्टाचे कामातील DEFENDANT म्हणजे या ठिकाणी RESPONDANT जाब देणार. कोर्टापुढे करावयाच्या अर्जात, मग त्याला PLAINT म्हणा, APPLICATION म्हणा, COMPLAINT म्हणा वा काहीही म्हणा, अर्ज करणाराने अर्ज करण्याचा हेतू स्पष्ट करावा तो असा, की उभयपक्षांना वादातील निश्चित मुद्यावर लक्ष केंद्रित करणे सुलभ व्हावे. त्यामुळे वेळ वाचतो, श्रम वाचतात आणि पक्षकारांना आपापली बाजू मांडणे सोयीचे होते. पाल्हाळाने फापटपसारा मांडल्यास त्यातून निश्चित वादविषयक मुद्दे निवडणे कोर्टाला जिकिरीचे होते. वादविषयाशी संबंधित असणारा कोणताही मुद्दा अचानक उपस्थित करू नये. तसेच कोणताही मुद्दा निवेदनातून वगळू नये अथवा घालण्याचे राहून जाता कामा नये. अर्जात शक्य तितके वस्तुस्थितीचेच–वास्तवाचेच निवेदन असावे. कायद्यातील तरतुदीचे विवेचन त्यात करू नये. अर्जाच्या प्रारंभी कोणत्या कलमाखाली निवेदनाची व्याप्ती येते तेवढे कलम नमूद करावे.

निवेदनाचा दुसरा मूलभूत नियम असा की निवेदन महत्तम मुद्यावर/वास्तवावर भर देणारे असले पाहिजे. (महत्तम वास्तव MATERIAL FACTS) महत्तम वास्तवातील प्रत्येक घटना स्पष्टपणे निवेदिली पाहिजे. मात्र अशा वास्तवाच्या निवेदनात पुराव्याचा उल्लेख करू नये.

निवडणूक न्यायाधीकरणाकडे निवडणुकीला किंवा उमेदवाराच्या निवडीला आव्हान देणारा अर्ज, त्या निवडणुकीच्या मतदारयादीत नाव असणाऱ्या मतदाराने अथवा मतदार उमेदवाराने सादर करावयाचा असा कटाक्ष या कलमात आहे. निवडणुकीत निवडून येण्याची अपेक्षा करणारा व अशी अपेक्षा बाळगून निवडणूक लढविणारा मतदार इसम म्हणजे उमेदवार विशेषणानुसार अशा उमेदवाराचे काही प्रकार आहेत.

CANDIDATE – उमेदवार

PROSPECTIVE CANDIDATE – रिंगणातील उमेदवार

CONTESTING CANDIDATE – निवडणूक लढविणारा उमेदवार

RETURNED CANDIDATE – यशस्वी उमेदवार

DEVIATED CANDIDATE – निवडणुकीतून माघार घेणारा उमेदवार

रिंगणातील उमेदवार म्हणजे निवडणुकीतून उमेदवारी मागे घेतलेली नाही आणि निवडून येण्यासाठी जो स्वतःच्या प्रचारात गुंतलेला आहे तो.

निवडणूक लढविणारा उमेदवार म्हणजे ज्याने नामांकनपत्र भरलेले आहे, ते स्वीकारलेले आहे, उमेदवारी अधिकृत झाली आहे व इतर उमेदवारांबरोबर स्पर्धा

करून निवडून येण्याच्या इच्छेने जो कार्यरत आहे, तो निवडणूक लढविणारा उमेदवार.

यशस्वी उमेदवार म्हणजे निवडणूक लढवून जो निवडून आला आहे तो यशस्वी उमेदवार.

उमेदवारी माघारी घेतलेला उमेदवार म्हणजे उमेदवारी मागे घेण्यासाठी जो कालावधी विहित केला असेल त्या कालावधीत ज्याने उमेदवारी मागे घेतली आहे व मंजूर करून उमेदवारांच्या यादीतून त्याचे नाव काढून टाकले आहे तो उमेदवार.

कोणत्या मागण्यांच्या अपेक्षापूर्तीसाठी कोर्टाकडे अर्ज करावयाचा असतो त्या मागण्यांचे स्वरूप पोट कलम (३)मध्ये स्पष्ट केलेले आहे. त्या परिहाराबरोबर दाव्याच्या खर्चाचीही मागणी अर्जदार करू शकतो.

या पोट कलम (३)च्या सदर (अ)प्रमाणे, निवडणूक रद्द ठरविली जावी अशा प्रकटनाची मागणी करता येते. निवडणूक रद्द ठरवून मिळण्यासाठी उपस्थित करावयाची वैध कारणे अनेक असू शकतात. त्यांपैकी काही पुढीलप्रमाणे :–

१. मतदारयादीतील उणीवा, त्रुटीते इत्यादी.

जर मतदारयादीच चुकीची, बेकायदेशीर असेल तर अशा चुकीच्या व बेकायदेशीर यादीवर आधारून निवडणूक घेता येत नाही, घेतल्यास निवडणूक बेकायदेशीर ठरते. (देव प्रकाश वि. बाबू राम, ए. आय. आर. १९६१ पंजाब ४२९) या दाव्यात पंजाब हायकोर्टाने असे व्यक्तविले की, 'मतदारयादी म्हणजे निवडणूक प्रक्रियेचा पाया. तीच जर चुकीची, बेकायदेशीर असेल तर निवडणूकही चुकीची बेकायदेशीर ठरते. मात्र अशा निर्णयाप्रत येण्यासाठी यादीतील सर्वच चुका, उणीवा, त्रुटीते कारणीभूत ठरतीलच असे नाही. काही चुका, उणीवा तांत्रिक स्वरूपाच्या असू शकतील. अशा तांत्रिक स्वरूपाच्या किरकोळ चुका, उणीवांमुळे कोणाही उमेदवाराच्या निवडीवर घणाघात होत नसेल तर अशा चुका, उणीवा दुर्लक्षणीय आहेत. चीफ कमिशनर, अजमेर वि. राधेय श्याम वाणी, ए. आय. आर. १९५७ सु. को. ३०४, या प्रकरणी सुप्रीम कोर्टाने असे मत व्यक्तविले आहे की,

" निवडणुकीतील महत्त्वाची बाब अशी, की मतदारयादीचे अचूक निर्वाहन आणि अशा अचूक निर्वाहनासाठी यादी तयार करताना पूर्ण दक्षता घेतली पाहिजे."

ती तयार केल्यावर, यादीतील नामधारक इसम निवडणुकीत मतदान करण्यास विहित केलेली अर्हता धारण करीत आहेत किंवा कसे याची छाननी करण्यासाठी संबंधित मतदारांना संधी देणे व त्यासाठी पुरेसा कालावधी देणे.

मतदारयादीचे परिशीलन, पुनरावलोकन यासाठी पुरेशी संधी आणि न्याय-प्रविष्ठनासाठी उपस्थित केलेल्या हरकतीची, आक्षेपांची नोंदणी व त्यांच्या निर्णयार्थ न्यायसदृश कार्यवाही.

हे जर उपलब्ध केले नाही तर निवडणूक घेणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यावर

निवडणूक कायदेशीरपणाने घेतली नाही व असे करण्यात त्यांचेवर असलेले वैध दायित्व त्यांनी सांभाळले नाही, त्यामुळे झालेली निवडणूक नियमान्वित झाली नाही या मुद्यांवर तिला आव्हान देता येते व निवडणूक रद्द ठरते. (कंगलू बऊला वि. चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर जानपद सभा, ए. आय. आर. १९५५ नागपूर ९).

तयार केलेली मतदारांची यादी, योग्य अधिकाऱ्याच्या स्वाक्षरीने प्राधिकृत केली नसेल व विहित कालात विहित पद्धतीने प्रसिद्ध केली नसेल तर अशी मतदारांची यादी निवडणुकीत उपयोग केल्यास निवडणूक बेकायदेशीर ठरते. (हाफीज मोहमद अन्वर खान वि. मध्यप्रदेश राज्य, ए. आय. आर. १९६७ एम. पी. २५७).

२. यशस्वी उमेदवाराची / उमेदवारांची निवड रद्द व्हावी व अर्जदार स्वतः किंवा इतर उमेदवार यांची निवड झाल्याचे जाहीर करावे.

यशस्वी उमेदवाराची झालेली निवड पुढील कारणावरून रद्द ठरू शकते :—

(अ) उमेदवार निवडून येण्यास अनर्हत आहे. (अनर्हत ठरविण्याची कारणे कलम १६ मध्ये विशद केली आहेत.)

(ब) मतपत्रिकांची चुकीची मोजणी. (कायदेशीर मते व बेकायदेशीर मते, मतपत्रिकांची छाननी, बाद ठरणारी व बाद ठरविलेली मते यांचा विचार होऊ शकतो.) तसेच कलम २२ च्या तरतुदीशी यशस्वी उमेदवाराची निवड रद्द करण्यास कारणीभूत होतात.

निवडणूक याचिका-अर्जातील वैध-पक्षकार कोण व कोणाला पक्षकार म्हणून सामावून घ्यावे हे पोट कलम (४) मध्ये सांगितले आहे.

१. ज्यांचेविरुद्ध किंवा ज्यांचे संदर्भात याचिका अर्ज असेल असा यशस्वी उमेदवार किंवा असे सर्व यशस्वी उमेदवार.

२. निवडणुकीच्या रिंगणात उतरलेले सर्व उमेदवार.

३. ज्यांचेविरुद्ध भ्रष्टाचारी कृत्यांचा आरोप असेल असे इतर उमेदवार.

४. आपसांतून नियुक्त करून घेतलेल्या को-ऑप्टेड सदस्याविरुद्धच्या याचिका अर्जात राज्य सरकारला, त्या को-ऑप्टेड सदस्यांबरोबर पक्षकार केले पाहिजे.

या संदर्भात लोकप्रतिनिधित्वाचा कायदा १९५१ च्या कलम ८२ मध्ये पुढील-प्रमाणे तरतूद आहे :—

अर्जदाराने त्याचे अर्जात जाब देणार म्हणून समावेश केला पाहिजे—

(अ) सर्व किंवा एखाद्या यशस्वी उमेदवाराची निवड रद्द ठरवल्याचे जाहीर करावे. या मागणीबरोबरच अर्जदार स्वतः किंवा इतर कोणी उमेदवार निवडून आल्याचे जाहीर करावे अशी मागणी करीत असलेल्या अर्जात अर्जदाराशिवाय इतर सर्व निवडणूक लढविलेले, रिंगणात उतरलेले उमेदवार, आणि अर्जात नमूद असलेले वा नमूद न केलेले सर्व यशस्वी उमेदवार, आणि

(ब) अर्जात ज्या कोणा उमेदवाराविरुद्ध, भ्रष्टाचारी कृत्ये केल्याचा आरोप केला असेल असे इतर सर्व उमेदवार.

लोकप्रतिनिधित्व कायदा १९५१ च्या कलम ८२ चे तरतुदीप्रमाणे निवडणूक याचिका अर्जाला प्रतिस्पर्धींची जणू रांगच लावावी लागते, आणि तीच तरतूद या कायद्यातील या कलमात आहे व अशीच तरतूद उत्तरप्रदेश नगरपालिका अधिनियम १९५९ या कायद्यातील कलम ६३ (३) (ब) यात आहे. ज्या उमेदवाराविरुद्ध भ्रष्टाचारी कृत्याचा आरोप केला असेल त्या उमेदवाराला प्रतिवादी केलेच पाहिजे ही तर कलम ८२ ची प्रमुख अट आहे. आणि ज्याची नामांकन-पत्रिका स्वीकारली आहे अशा इसमाने त्याची उमेदवारी मागे घेतली आणि निवडणूक लढविली नसली तरीही अशा इसमास निवडणुकीतील उमेदवार म्हणून निवडणूक याचिका-अर्जात प्रतिवादी केले पाहिजे (मोहनराय वि. सुरेंद्रकुमार तपारीया, ए. आय. आर. १९६९ सु. को. ६७७; आर. सत्यनारायण वि. सैद्य्या, ए. आय. आर. १९६९ ए पी. १५१).

ज्याच्या निवडीला आव्हान दिले आहे आणि याचिका अर्जदार जेव्हा इतर कोणी उमेदवार निवडून आल्याचे जाहीर करावे अशी मागणी करतो, तेव्हा सर्व अयशस्वी उमेदवारांना त्या याचिका-अर्जात प्रतिवादी केले पाहिजे. भ्रष्टाचारी कृत्याचा आरोप म्हणजे उमेदवाराने निवडणुकीच्या संदर्भात भ्रष्टाचारी कृत्य केल्याचा आरोप (एस. बी. आदित्यन वि. एस. कंदारस्वामी, ए. आय. आर. १९५८ सु. को. ८५७).

यशस्वी उमेदवारात आपणही यशस्वी उमेदवार असल्याचे जाहीर करावे अशी जेव्हा याचिका अर्जदार निवडणूक न्यायाधीकरणास प्रार्थना करतो, तेव्हा त्याने प्रत्येक सर्व अयशस्वी उमेदवाराला त्याच्या याचिका अर्जाचे प्रकरणी प्रतिवादी केले पाहिजे. जर असे केले नाही तर त्याचा याचिका अर्ज निवडणूक न्यायाधीकरणाकडून फेटाळला जाण्याची शक्यता असते. (फैझान अली खान वि. मेंबर इलेक्शन ट्रिब्यूनल १९६८ अलाहाबाद लॉ जर्नल ७०).

याचिका-अर्जाला जोडलेले प्रतिवादी हे योग्य आहेत किंवा कसे हे पाहण्याचे व त्याचा निर्णय घेण्याचे काम न्यायाधीकरणाचे आहे. याचिका-अर्जाला प्रतिवादी करण्यासंबंधी कायद्यातील तरतूद कटाक्षित नाही, लवचिक आहे. ती उणीव भरून काढता येण्यासारखी असते. यासंबंधीचा निर्णय, जेव्हा असे प्रश्न उद्भवतात तेव्हा, न्यायाधीकरणाने सिव्हिल प्रोसीजर कोडच्या तरतुदींच्या आधारे घ्यावा असे सुप्रीम कोर्टाचे मत आहे. (जगन्ननाथ वि. जसवंतसिंग, १९५४ एस. सी. आर.८९२).

लोकप्रतिनिधित्व कायदा १९५१ चे कलम ८२ (अ) प्रमाणे (१) यशस्वी उमेदवार आणि (२) निवडणूक लढविणारे उमेदवार यांना प्रतिवादी करावे लागते आणि यापेक्षा इतर कोणा अधिकांना करावयाचे ते याचिका अर्जात त्या प्रकारचे

प्रकटन मिळवावयाचे त्यावर अवलंबून असते. जेव्हा एखाद्या अर्जात इतर कोणता परिहार अपेक्षित नसेल तेव्हा फक्त यशस्वी उमेदवाराला प्रतिवादी केले तरी चालते, पण जेव्हा भ्रष्टाचारी कृत्ये केल्याचा आरोप करावयाचा असेल तेव्हा यशस्वी उमेदवारांबरोबरच इतरही जे असतील त्या साऱ्यांना प्रतिवादी केले पाहिजे अशी तरतूद कलम २८ (ब) मध्ये आहे. कलम २८ (ब) चे मजकुरात "ANY OTHER CANDIDATE" "दुसरा कोणी उमेदवार" असे शब्द आहेत. जेव्हा अर्जदार, विशिष्ट उमेदवार निवडून आला असे शब्द अर्जात वापरतो तेव्हा त्या अर्जात निवडून आलेले व निवडणूक लढवीत होते ते, अशा सर्व उमेदवारांना प्रतिवादी करावे असा आशय लोकप्रतिनिधित्व कायदा १९५१च्या कलम ८२ (अ) यात आहे. (अमीन लाल वि. हुद्दामल, ए. आय. आर. १९६५ सु. को. १२४३).

सर्व आवश्यक असलेले प्रतिवादी निवडणूक अर्जात गोवले तर परिस्थिती अशीही असू शकते, की आवश्यक नसलेल्या एखाद्यास प्रतिवादी म्हणून गुंतविले जाण्याची शक्यता असते. पण असे केल्याने कायद्यातील तरतुदीचा भंग केला असे ठरत नाही आणि या कारणास्तव याचिका अर्ज फेटाळला जात नाही. लोकप्रतिनिधित्वाचा कायदा १९५१ च्या कलम ९५ च्या तरतुदीप्रमाणे ज्या इसमाला दोषी ठरविणे हायकोर्टाला वाटले त्या इसमाला जर प्रतिवादी केले नाही तर त्याचे म्हणणे मांडण्याची रास्त संधी त्यास दिली गेली नाही असे होण्याची शक्यता असते. तसे होऊ नये म्हणून सर्वांना प्रतिवादी करावे असा कोर्टाचा कटाक्ष आहे. (मोहनसिंग वि. भनवरलाल, ए. आय. आर. १९६४ सु. को. १३६६). निवडणुकीच्या कामकाजात उमेदवाराच्या संमतीने उमेदवाराच्या एजंटाला भ्रष्टाचारी कृत्य केल्याबद्दल दोषी ठरविले, अशा एजंटाला निवडणूक याचिका अर्जाला प्रतिवादी पक्षकार करणे आवश्यक नसले तरी त्याला त्याचे म्हणणे मांडण्याची संधी, जेव्हा त्याचेविरुद्ध भ्रष्टाचारी कृत्याबद्दल तो दोषी असल्याचे हायकोर्ट ठरविते तेव्हा, दिल्याशिवाय व ते ऐकून घेतल्याशिवाय हायकोर्ट तसे करीतच नाही, म्हणून अशा एजंटाला प्रतिवादी पक्षकार करावेच लागते. (मुरारका राधेश्याम रामकुमार वि. रूपसिंग राठोर, ए. आय. आर. १९६४ सु. को. १५४५).

निवडणुकीचा कायदा आणि निवडणूक कायद्याचे कामकाज यातून जेव्हा –

निर्वाचन अधिकाऱ्याविरुद्ध, बेकायदेशीर, अनियान्वित आणि अयोग्यता हे आरोप याचिका अर्जात करावयाचे असतात तेव्हा निर्वाचन अधिकाऱ्यास प्रतिवादी पक्षकार करणे आवश्यक असते का ? किंवा

अर्जाचा पक्षकार म्हणून अर्जात घ्यावे का ? किंवा

जर त्याचे नाव याचिका अर्जात पक्षकार म्हणून घातले असेलच तर ते वगळावे का ?

असे प्रश्न उद्‌भवतात. हे प्रश्न यासंबंधी कटाक्षित असलेल्या विशिष्ट कायद्याच्या

तरतुदीनेच सोडविले पाहिजेत. असे प्रश्न प्रस्थापित सिव्हिल किंवा अन्य कोर्टाचे अधिसत्तेत येत नाहीत.

उत्तरी लेखी कैफियतीत उपस्थित झालेल्या/केल्या गेलेल्या मुद्यांचा परामर्श घेतल्याशिवाय अनिर्णित अवस्थेत अर्ज फेटाळण्याचा अधिकार न्यायाधीकरणाला नाही. सुनावणीचे वेळी पक्षकार हजर असो वा नसो, त्याने पुरावा सादर केलेला असो वा नसो, उपस्थित केलेल्या मुद्यांच्या प्रस्थापनेसाठी युक्तिवाद केला जावो अथवा न जावो पण न्यायाधीकरणाने कोणताही मुद्दा अनिर्णित ठेवून अर्ज फेटाळता कामा नये असा कटाक्ष आहे. म्हणजेच याचिका-अर्जात अर्जदाराने अथवा प्रतिवादीने जे जे मुद्दे उपस्थित केले असतील त्यांचा निर्णय, आपण गैरहजर राहिल्यास, आपण त्यासंबंधीची आपली बाजू न मांडल्यास आपल्याविरुद्ध लागणार हे गृहीत धरून उभयपक्षांनी सुनावणीत हजर राहून जागरूकपणे कामकाज चालविणे इष्ट आहे.

भ्रष्टाचारी कृत्ये

२२. या अधिनियमाच्या कारणास्तव खालील कृत्ये भ्रष्टाचारी कृत्ये असल्याचे समजले पाहिजे –

[१] लाचलुचपत, जसे की,

(अ) उमेदवाराने किंवा त्याच्या एजंटाने किंवा उमेदवाराच्या किंवा त्याच्या एजंटाच्या संमतीने कोणाही इसमाने, कोणाही इसमास, मग तो कोणीही असो संतोषास्तव कोणतीही देणगी दिली किंवा देऊ केली किंवा वचन दिले, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष हेतू असणे, किंवा प्रवृत्त करणे, यासह

(अ) इसमाने निवडणुकीत उमेदवार म्हणून उभा राहणे किंवा उभे न राहणे किंवा त्यातून माघार घेणे, किंवा

(ब) निवडणुकीत मतदाराने मत देणे किंवा मत देण्यापासून परावृत्त करणे किंवा बक्षीस म्हणून

(i) इसमास उभे राहणे किंवा न उभे राहणे किंवा उमेदवारी मागे घेणे, किंवा

(ii) मतदाराने मत देणे किंवा मत देण्यापासून परावृत्त होणे,

(ब) हेतुतः किंवा बक्षीस म्हणून कोणतीही देणगी मिळविणे, मिळविण्यासाठी कबूलायतीत राहणे –

(अ) उभे राहणे किंवा उभे न राहणे म्हणून, किंवा उमेदवारी मागे घ्यावी म्हणून इसमाकडून, किंवा

(ब) कोणत्याही इसमाकडून, तो कोणीही असो, स्वतःसाठी किंवा इतर कोणाकडूनही मत देण्यासाठी किंवा मत देण्यापासून परावृत्त होण्यासाठी किंवा प्रवृत्त होणेसाठी किंवा कोणाही मतदाराला मतासाठी प्रवृत्त करणे किंवा

मत देण्यापासून परावृत्त होणेसाठी प्रवृत्त करणे किंवा उमेदवारी मागे घेण्यासाठी प्रवृत्त करणे.

स्पष्टीकरण – या सदराचे कारणास्तव, 'देणगी' यातील आशय 'आर्थिक देणगी' किंवा पैशातून मोजली जाणारी देणगी इतकाच मर्यादित नाही, तर यात सर्व प्रकारची करमणूक आणि कामासाठी सर्व प्रकारची बक्षिसी, यांचा समावेश होतो. पण यात खर्चासाठी दिलेली रक्कम, सद्हेतूने कोणत्याही निवडणुकीसाठी दिली तर तिचा समावेश नाही.

[२] अवाजवी दबाव, ते असे की, उमेदवाराने किंवा त्याच्या एजंटाने किंवा उमेदवाराच्या किंवा त्याच्या एजंटाच्या संमतीने दुसऱ्या कोणीही इसमाने, मतदानाच्या हक्काच्या मुक्त वापरावर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष हस्तक्षेप करणे किंवा हस्तक्षेपास प्रवृत्त होणे.

परंतु असे की –

(अ) या सदरातील सर्वसाधारण तरतुदींना बाधा न आणता, जो यात निर्देशित आहे असा कोणीही इसम, जो –

(i) उमेदवाराला किंवा मतदाराला धमक्या देईल, किंवा उमेदवारीत किंवा मतदानात रस आहे अशा कोणाही इसमाला, कोणत्याही प्रकारे विव्हळ करणे, समाज आणि जात यात घेणे, बहिष्कृत करणे, वाळीत टाकणे यांचा समावेश आहे.

(ii) उमेदवारास किंवा मतदारास तो स्वतः किंवा ज्याचेबद्दल हितसंबंध अशा कोणीही इसमास, त्याने विश्वास ठेवावा किंवा ठेवला जावा अशा हेतूने अपशकुनाचे भाकीत करणेस किंवा बौद्धिक निर्भर्त्सना करणेस उद्युक्त होणे अथवा उद्युक्त होणेस प्रवृत्त करणे,

हे, या सदराचे अर्थाप्रमाणे अशा उमेदवाराच्या किंवा मतदाराच्या मुक्त वापराच्या हक्कात हस्तक्षेप करणे होय असे समजले जाईल.

(ब) सार्वजनिक धोरणाचे प्रकाशन, किंवा सार्वजनिक कृतीचे वचन किंवा मतदानाच्या हक्कात, हेतुविरहित कायद्याचे मामुली हक्काचे वापराने, हस्तक्षेप करणे हे या सदराचे अर्थाप्रमाणे हस्तक्षेप असल्याचे समजले जाता कामा नये.

[३] उमेदवाराने किंवा त्याच्या एजंटाने किंवा उमेदवाराच्या किंवा त्याच्या एजंटाच्या संमतीने कोणीही इसमाने, निवडणुकीत उमेदवाराची प्रगती साधण्यासाठी किंवा त्या उमेदरावास कलुषित करून निवडणुकीत घात व्हावा म्हणून, धर्म, वंश, जात, समाज, भाषा या मुद्यांवरून किंवा धार्मिक खुणांचा, राष्ट्रीय खुणांचा जसे राष्ट्रध्वज, राष्ट्राचे बोधचिन्ह यांचा वापर करून, मत देणेस किंवा मत देण्यापासून परावृत्त करणेस आवाहन करता कामा नये.

[४] उमेदवाराने किंवा त्याच्या निवडणूक एजंटाने किंवा उमेदवाराच्या किंवा त्याच्या एजंटाच्या संमतीने कोणीही इसमाने, कोणत्याही उमेदवाराचा स्वभाव, वर्तणूक, चारित्र्य यासंबंधात किंवा कोणत्याही उमेदवाराने त्याच्या निवडणुकीवर आघात व्हावा म्हणून उमेदवारी मागे घेतल्याच्या संबंधात काही खोटे निवेदन किंवा जे खरे नाही असा विश्वास असेल असे निवेदन प्रसिद्ध करणे.

[५] उमेदवाराने किंवा त्याच्या एजंटाने किंवा उमेदवाराच्या किंवा त्याच्या एजंटाच्या संमतीने कोणीही इसमाने मतदारांच्या तो स्वत:, त्याच्या कुटुंबातील सदस्य आणि त्याचा एजंट यांचेशिवाय इतर सोयीसाठी मतदानकेंद्रावर जाणे व येणे यासाठी कोणतेही वाहन, गाडी भाड्याच्या रकमेवर असो वा कसेही, भाड्याने किंवा अन्य मिळविणे.

परंतु असे, की मतदाराने किंवा मतदारांनी संयुक्त खर्चाने मतदानासाठी जी जागा निश्चित केली त्या जागेकडे/मतदान केंद्राकडे येणे व तेथून जाणे यासाठी वाहन/गाडी भाड्याने घेतली असेल तर, वाहन किंवा गाडी यांत्रिक शक्तीवर चालणारी नसली पाहिजे, ते कृत्य भ्रष्टाचारी कृत्य असल्याचे समजले जाणार नाही.

परंतु पुढे असे, की मतदान केंद्रावर जाणे-येणेसाठी कोणत्याही मतदाराने त्याच्या स्वखर्चाने कोणतीही गाडी, वाहन, ट्राम, कार, रेल्वेबोगी वापरली असेल तर ते 'कृत्य' या सदराखाली भ्रष्टाचारी कृत्य असल्याचे समजले जाणार नाही.

स्पष्टीकरण – या सदरात 'गाडी' याचा आशय असा की, रस्त्यावरून वाहतूक करण्याच्या कारणास्तव वापरण्याजोगी किंवा वापरली जाणारी गाडी, ती यांत्रिक शक्तीवर चालणारी असो वा कसेही, दुसऱ्या गाडीनें ओढणारी असो वा कसेही –

[६] उमेदवाराने किंवा त्याच्या एजंटाने किंवा उमेदवाराच्या व त्याच्या एजंटाच्या संमतीने कोणीही इसमाने, उमेदवाराची निवडणूक यशस्वी करण्यासाठी, सरकारच्या किंवा कौन्सिलच्या नोकरीतील कोणाही इसमाची मदत मत देणे व्यतिरिक्त मिळविली, साध्य केली किंवा अपहृत केली किंवा मिळविण्यास, साध्य करण्यास किंवा अपहृत करण्यास प्रवृत्त करणे.

भाष्य

भ्रष्टाचारी कृत्यांशी संबंधित असणाऱ्या तरतुदी या कायद्याच्या कलम २२ ते ३४ पर्यंत समाविष्ट केल्या आहेत. या कलमात इतर निवडणूकविषयक आणि निवडणुकीशी संबंधित असणारे गुन्हेही नमूद आहेत. या तरतुदींचे लोकप्रतिनिधित्वाचा कायदा १९५१ यांतील कलम १२३ ते १३७ यांतील तरतुदींशी बरेचसे साम्य आहे.

निवडणूक शुद्ध वातावरणात आणि पूर्ण निःपक्ष-निर्लेप वृत्तीने पार पडणे हे लोकशाहीचे आद्य आणि पवित्र कर्तव्य आहे. हे जतन करण्यासाठीच निवडणुकीतील

प्रत्येक टप्पा भ्रष्टाचारी कृत्यापासून अलिप्त राहावा म्हणूनच या कलमांची योजना या कायद्यात केलेली आहे. भ्रष्टाचारी कृत्यात निवडणूक लढविणारे उमेदवारच केवळ गुंतलेले असतात असे नाही, तर त्यांचे समर्थक एजंट, निवडणुकीच्या कामासाठी नियुक्त केलेले सरकारी नोकर आणि खुद्द मतदार यांचाही त्यात वाटा असू शकतो.

'भ्रष्टाचारी कृत्ये' याची कायद्यात केलेल्या व्याख्येच्या व्याप्तीत बसणारी कृत्ये, निवडून आलेल्या किंवा निवडून येऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीने, त्याच्या वतीने कोणीही–त्यात त्याची संमती असलीच पाहिजे किंवा तसे सिद्ध झालेच पाहिजे असे नाही–केल्यास त्याची झालेली किंवा होणारी निवड अवैध ठरविली जाते. या कलमातील तरतुदींशी साम्य असणाऱ्या तरतुदी भारतातील इतर राज्यातील नगरपालिकासंबंधीच्या निवडणूक कायद्यात आहेत. लोकप्रतिनिधित्वाचा कायदा १९५१ चा असून त्यातील कलम १०० (१) (ब) व कलम १२३ यात ही तरतूद आहे, तीच ही तरतूद त्याही पूर्वीच्या १९१६ च्या नगरपालिकांच्या कायद्यातील निवडणूकविषयक 'कलमा'त आहे आणि भारतीय दंड विधान कायद्यातील प्रकरण ९ अ, यातील निवडणूकविषयक कलमे १७१ यातही आहेत. या तरतुदीच्या आशयातील सारांशित उद्देश म्हणजे निवडणूक प्रक्रियेची शुद्धता जोपासणे (हरस्वरूप वि. ब्रिजभूषण, ए. आय. आर. १९६७ सु. को. ८३६) निवडणुकीच्या संबंधात घडणारी अमूक अमूक कृत्ये ही भ्रष्टाचारी कृत्ये आहेत असे भ्रष्टाचारी कृत्यांचे वर्णन समुच्चयित शब्दांकनाने करता येणे शक्य असले तरी प्रत्येक कृत्य ते कोणी केले यावर त्याची गंभीरता अवलंबून असते. (जगन्नाथ वि. जसवंतसिंग ए. आय. आर. १९५४ सु. को. २१०) भ्रष्टाचारी कृत्यांपैकी काही कृत्ये अशी आहेत, ती फक्त उमेदवार किंवा निवडणुकीतील त्याचा एजंट यापैकी कोणी केली तरच ती भ्रष्टाचारी कृत्ये असल्याचे मानले जाते व त्यातून परिणामी निवडणूक अवैध ठरून रद्द होते. तसेच काही भ्रष्टाचारी कृत्ये निवडणूक एजंटाशिवाय इतर एजंटाकडूनही केली जातात. मात्र ती कृत्ये निवडणुकीवर विपरीत परिणाम घडविणारी असल्याचे सिद्ध व्हावे लागते, तरच ती कृत्ये भ्रष्टाचारी कृत्ये होत. (एच. ही. महंती वि. सुरेंद्र, ए. आय. आर. १९७४ सु. को. ४७) अशा भ्रष्टाचारी कृत्यात, ती कृत्ये करणाराचा, अशी कृत्ये करण्याचा हेतू शोधलाच पाहिजे अशी आवश्यकता नसते; मात्र केवळ भ्रष्टाचारी कृत्याबद्दलची साशंकता भ्रष्टाचारी कृत्यांच्या सिद्धतेसाठी पुरेशी होत नाही. (डॉ. व्ही. एस. परमार वि. हिरासिंग ए. आय. आर. १९५९ सु.को. २४४; आर. नरसिंह रेड्डी वि. भूमाजी, ए. आय. आर. १९५९ आंध्र प्रदेश १११) ज्याच्यावर भ्रष्टाचारी कृत्यांचा आरोप केलेला असतो, त्याचेवरील तो आरोप संशयातीत सिद्ध व्हावा लागतो. अन्यथा संशयाचा फायदा आरोपीला दिला जातो (गोपाळ कुरूप वि. सॅम्युल असच्यन, ए. आय. आर. १९६१

केरळ २४२) भ्रष्टाचारी कृत्यांचा आरोप ज्याने उपस्थित केलेला असतो, त्याचेवर आरोप सिद्ध करण्याची जबाबदारी असते. प्रत्येक भ्रष्टाचारी कृत्यासाठी स्वतंत्र आरोप करावा लागतो. भ्रष्टाचारी कृत्यात सर्वसाधारणपणे लाचलुचपत, गैर-वाजवी दडपण यांचा समावेश होतो. भारतीय दंडविधान संहितेत यासंबंधीची तरतूद पुढीलप्रमाणे आहे.

लाचलुचपत

१७१-ब – (१) जो कोणी इसम–

(i) निवडून देण्याच्या हक्काचा वापर करण्यासाठी कोणा इसमास प्रवृत्त करण्याचे हेतूने किंवा अशा हक्काचा वापर करण्यासाठी देणगी देईल किंवा

(ii) स्वतःसाठी किंवा दुसऱ्या कोणा इसमासाठी, अशा हक्काचा वापर करण्याच्या हेतूने देणगी किंवा बक्षीस स्वीकारील किंवा अशा कोणत्याही हक्काचा वापर करण्यासाठी कोणा इसमास प्रवृत्त करील अथवा प्रवृत्त करण्याचा प्रयत्न करील तर लाचलुचपतीच्या गुन्ह्याचे कृत्य करील. परंतु असे की सार्वजनिक धोरणाचे प्रकटीकरण किंवा सार्वजनिक कृतीचे आश्वासन हे या कायद्याखाली गुन्ह्याचे कृत्य नाही.

(२) जो कोणी इसम देणगी देऊ करील किंवा देणगी देण्याचे कबूल करील किंवा देणगी देऊ करण्यास प्रवृत्त होईल किंवा तसा प्रयत्न करील तर देणगी दिल्याचे कृत्य समजले जाईल.

(३) जो कोणी इसम देणगी किंवा बक्षीस मिळवील किंवा मिळविण्यास राजी होईल किंवा मिळविण्यास प्रवृत्त होईल तर ते कृत्य देणगी, बक्षीस घेतल्याचे समजले जाईल आणि जो इसम, जे कृत्य करू नये असे कृत्य करण्याचा हेतू बाळगील, जे कृत्य करू नये ते कृत्य केले असे समजले जाऊन त्यासाठी त्याने देणगी किंवा बक्षीस स्वीकारले असे समजले जाईल.

वरील कलमात, निवडणुकीच्या संबंधांतील लाचलुचपतीच्या गुन्ह्याची व्याख्या स्पष्ट केली आहे.

सर्वसाधारणपणे लाचलुचपत म्हणजे कोणा इसमाला, देणगी किंवा बक्षीस हेतूतः देणे किंवा स्वीकारणे ते असे की, त्याने निवडणुकीस उमेदवार म्हणून उभे तरी राहावे किंवा उमेदवारी मागे घ्यावी किंवा मतदार म्हणून मत द्यावे किंवा मत देऊ नये म्हणून. यात देऊ करणे, देण्याचे आश्वासन देणे, देण्याचा प्रयत्न करणे यांचा समावेश होतो. भारतीय दंडविधानाच्या कलम १६१ मध्ये 'देणगी' याचा खुलासा आहे. त्यानुसार 'देणगी' यात आर्थिक लाभ किंवा पैशाच्या अंदाजातील परावर्तित्व वस्तू अशी मर्यादा नाही, त्याहीपेक्षा अधिक गैरकृत्याच्या आशयाची व्यापकता त्यात आहे.

OFFER देऊ करणे, या कृत्यात कृतिपूर्ततेच्या अर्थाची समानता आहे.

अल्पोपाहार दिला किंवा घेतला हे कृत्यही लाचलुचपतीच्या सदरात, जर त्याचा गैरकृत्याशी संबंध पोहोचत असेल तर, गणले जाते. मतदारास मत देण्यासाठी प्रवृत्त करण्याचा किंवा मत न देण्यासाठी परावृत्त करण्याचा प्रयत्न हे कृत्यही या संदर्भात गुन्ह्याचे कृत्य होय. मात्र यासाठी निवडणुकीच्या संबंधात हे केले हे प्रमुख कारण स्पष्ट व्हावे लागते.

निवडणुकीत गैरवाजवी दबाव

१७१. क (१) जो कोणी इसम–

स्वेच्छेने हस्तक्षेप करील किंवा निवडणूक हक्काचा मुक्त वापर करण्याच्या हस्तक्षेपाचा प्रयत्न करील तर ते कृत्य निवडणुकीत गैरवाजवी दबावाचा गुन्हा केला असे होईल.

(२) पोट कलम (१) च्या तरतुदींना बाधा आणल्याविना जो कोणी,

(अ) कोणाही उमेदवारास अथवा मतदारास किंवा कोणा इसमास, की जो उमेदवाराच्या किंवा मतदाराच्या हितसंबंधात असेल, कोणत्याही प्रकारे इजा पोहोचण्यासह धमक्या देईल, किंवा

(ब) कोणत्याही उमेदवाराची किंवा मतदाराची, की तो किंवा कोणीही इसम हितसंबंधात असल्याचा विश्वास असेल त्याची हेतूतः अप्रतिष्ठा करील किंवा चारित्र्यहनन करील,

तर अशा उमेदवाराच्या किंवा मतदाराच्या मतासंबंधीच्या मुक्त हक्काच्या वापरात पोट कलम (१) चे अर्थानुसार, हस्तक्षेप केल्याचे समजले जाईल.

(३) सार्वजनिक धोरणाचे प्रसिद्धीकरण किंवा सार्वजनिक कृतीचे आश्वासन किंवा मतदानाच्या हक्कात हस्तक्षेप न करण्याचे हेतूने वैध हक्काचा मामुली वापर हे या कलमाचे अर्थानुसार हस्तक्षेप केल्याचे कृत्य समजले जाणार नाही.

इंडियन पीनल कोडच्या वरील कलमात "निवडणुकीत गैरवाजवी दबाव" म्हणजे काय हे स्पष्ट केले आहे.

निवडणुकीत 'गैरवाजवी दबाव', निवडणूक लढविण्यासाठी उमेदवार म्हणून उभे राहणे किंवा उमेदवार म्हणून उभे न राहणे, उमेदवारी जाहीर करणे किंवा मागे घेणे, किंवा मत देणे किंवा मत देण्यापासून परावृत्त करणे अशा कृत्यांसाठी केला जातो. या प्रकारात निवडणुकीशी संबंधित असणाऱ्या व्यक्तीचा घातपात, अप्रतिष्ठा, मानहानी अशा प्रकारच्या धमक्या, धमकावण्या यांचा समावेश होतो आणि अशाच कृतीतून निवडणुकीत गैरवाजवी हस्तक्षेप केला जातो. येथे हस्तक्षेप या शब्दाचा उपहासात्मक अर्थ 'ढवळाढवळ,' 'नाक खुपसणे,' 'चमचा ढवळणे' असा घ्यावा. मात्र यात सद्हेतूने केलेली ढवळाढवळ 'गुन्ह्याची कृती' गणली जात नाही.

जेव्हा मत देण्यापासून परावृत्त करण्यासाठी अथवा मत देण्यास उद्युक्त करण्यासाठी धमकी दिली जाते अथवा तसा प्रयत्न केला जातो हे सिद्ध होते, तेव्हा गुन्हा घडला – भूतकाळ – असे मानले जाते.

निवडणुकीत तोतयेगिरी

१७१ ड– जो कोणी इसम निवडणुकीत–

मतपत्रिकेवर जिवंत वा मृत इसमाचे नाव अथवा अनामिक नाव मत-प्रदानाचे आवाहनास्तव लिहील अथवा निवडणुकीत एकदा मतदान केल्यावर पुन्हा त्याच निवडणुकीत मतपत्रिकेवर त्याचे स्वतःचे नाव लिहील,

आणि जो कोणी अशा गुन्ह्यास मदत करील, चिथावणी देईल किंवा चिथावणी देण्याचा प्रयत्न करील किंवा अशा गैरमार्गाने मतदानास कोणा व्यक्तीस प्रवृत्त करील तर निवडणुकीत तोतयेगिरीचा गुन्हा त्याने केला असे होईल.

'निवडणुकीतील तोतयेगिरी' वरील कलमात स्पष्ट केली आहे. जो कोणी इसम, दुसऱ्या ज्ञात वा अज्ञात इसमाच्या नावाने अथवा अनामिक नावाने मतदान करील किंवा एकाच निवडणुकीत दोन वेळा एका वा भिन्न भिन्न नावाने मतदान करील, असे करण्यास चिथावणी देईल, उत्तेजित करील वा तसे करण्याचा प्रयत्न करील तर हे कृत्य वा अशी कृत्ये मतदानाच्या संदर्भात तोतयेगिरीच्या गुन्ह्याची कृत्ये मानली आहेत.

लाचलुचपतीसाठी शिक्षा

१७१ ई– जो कोणी इसम,

लाचलुचपतीचे कृत्य करील तर दोषसिद्धीनंतर तो एक वर्षापर्यंत वाढविता येईल अशा तुरुंगवासाच्या किंवा दंड किंवा दोन्ही शिक्षेस पात्र राहील.

परंतु असे की, लाचलुचपतीच्या विनिमयाचे कृत्य हे फक्त दंडाच्या शिक्षेस पात्र राहील.

स्पष्टीकरण – विनिमयात लाचलुचपतीस्तव दिली/घेतलेली देणगी, खाणे-पिणे, करमणूक आणि यासाठीची तरतूद यांचा समावेश होतो.

निवडणुकीत गैरवाजवी दबाव किंवा तोतयेगिरी यासाठी शिक्षा

१७१ फ– जो कोणी इसम,

निवडणुकीत गैरवाजवी दबावाचे कृत्य करील किंवा तोतयेगिरीच्या गुन्ह्याचे कृत्य करील तर त्या कृत्यासाठी तो इसम, एक वर्षापर्यंत वाढविता येईल अशा तुरुंगवासाच्या किंवा दंडाच्या किंवा दोन्हीही शिक्षेस पात्र राहील.

निवडणुकीचे संबंधात खोटे निवेदन

१७१ ग– जो कोणी इसम, उमेदवाराच्या चारित्र्याविषयीचे किंवा वर्तनाविषयीचे,

निवडणुकीच्या निर्णयावर विपरीत परिणाम घडवून आणण्याचे हेतूने कोणतेही निवेदन खरे असल्याचे भासविण्यासाठी खोटे करील किंवा प्रसिद्ध करील की, जे खोटे असल्याचे त्याला माहीत असेल व तसा त्याचा विश्वास असेल, तर ते त्याचे कृत्य दंडनीय होय.

वरील कलमानुसार निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराबद्दलची लोकप्रियता, तो निवडून येऊ नये म्हणून कमी करण्याचे हेतूने त्याच्या चारित्र्याबद्दल, त्याच्या वर्तनाबद्दल खोट्या अफवा पसरविणे, खोटी निवेदने प्रसिद्ध करणे हे कृत्य गुन्ह्याचे मानले आहे. अशा खोट्या निवेदनात उमेदवाराची बदनामी, त्याचे चारित्र्यहनन यांचा समावेश असल्याचे कायदा मानतो. हा गुन्हा सिद्ध होण्यासाठी,

ते निवेदन खोटे आहे,

खोटे आहे हे निवेदन करणाराला माहीत आहे

व

उमेदवार निवडून येऊ नये म्हणून केले आहे,

हे सिद्ध व्हावे लागते.

निवडणुकीचे संबंधात बेकायदेशीर बटवडा करणे

१७१ ह. – जो कोणी इसम,

उमेदवारांच्या सर्वसामान्य किंवा विशेष लेखी अधिकाराशिवाय, कोणतीही सार्वजनिक सभा भरविण्यासाठी खर्च करील किंवा खर्चास प्राधिकृत करील किंवा जाहिरात करील, परिपत्रक काढील, प्रसिद्ध करील किंवा दुसऱ्या कोणत्याही मार्गाने अशा उमेदवाराच्या पुष्टचर्थ किंवा यशासाठी असे करील तर त्यास रुपये पाचशेपर्यंत दंडाची शिक्षा केली जाईल.

परंतु असे की, उमेदवाराच्या अनुमतीशिवाय कोणाही इसमाने रुपये दहापेक्षा जास्त खर्च केल्यास, खर्च केल्या दिवसापासून दहा दिवसांचे आत उमेदवाराची लेखी अनुमती मिळवील तर त्याने केलेला खर्च उमेदवाराच्या अनुमतीने केलेला प्राधिकृत खर्च असल्याचे समजले जाईल.

वरील कलमानुसार कोणताही खर्च तो कायदेशीर किंवा बेकायदेशीर आहे हे ठरविण्याची ही तरतूद आहे. खर्चाला उमेदवाराची लेखी प्राधिकृतता असणे आवश्यक आहे.

निवडणुकीचा हिशेब ठेवण्यास चुकणे

१७१ य. – जो कोणी, प्रचलित काळी अमलात असणाऱ्या कोणत्याही कायद्याने किंवा नियमाने आवश्यक असेल अशा निवडणुकीशी संबंध असेल अशा केलेल्या खर्चाचा हिशेब ठेवण्यास चुकेल तर निवडणुकीच्या संबंधात केलेल्या खर्चाचा हिशेब

न ठेवल्याबद्दल रुपये पाचशेपर्यंत दंडाची शिक्षा त्यास केली पाहिजे.

वरील कलमानुसार उमेदवाराने उमेदवारीचे काळात उमेदवारीशी संबंधित असा जो कोणताही खर्च केला तर त्याचा त्याने हिशेब ठेवला पाहिजे असे बंधन कायद्याने त्याचेवर असताना त्याने ते पाळले नाही तर हे त्याचे कृत्य गुन्ह्याचे समजले जाते व त्यासाठी त्यास दंडाची शिक्षा होऊ शकते.

"भ्रष्टाचारी कृत्ये" हा अर्थ CORRUPT PRACTICES या इंग्रजी शब्दांचा, येथे अभिप्रेत असणारा आहे. इंडियन पीनल कोड यातील निवडणुकीच्या संबंधाची दंडनीय कलमे वर सांगितली आहेत. निवडणुकीस उभे राहणाऱ्या उमेदवाराच्या निवडीस "निवडणूक-याचिका" अर्ज सादर करून आव्हान देता येते. त्यासाठी कायद्याने "भ्रष्टाचारी कृत्ये" म्हणून जी कृत्ये विहित केली आहेत ती उमेदवाराने, त्याच्या एजंटाने, किंवा त्यांचेसाठी त्यांचे अनुमतीने कोणीही केल्याचे सिद्ध करावे लागते व असे केले म्हणजे त्या उमेदवाराची झालेली निवड रद्द ठरू शकते. अशी भ्रष्टाचारी कृत्ये, लोकप्रतिनिधित्व अधिनियमातील कलम १०० (१) (ब) सहवाचन १२३ यात आहेत. लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ चे कलम १०० (१) (ब) यातील तरतुदीनुसार, निवडणूक न्यायाधीकरणाचे असे मत झाले की यशस्वी उमेदवाराने किंवा त्याच्या एजंटाने किंवा उमेदवारासाठी आणि उमेदवाराचे वतीने कोणीही काही भ्रष्टाचारी कृत्ये केली आहेत अथवा घडून आली आहेत, तर निवडणूक न्यायाधीकरण, यशस्वी उमेदवाराची झालेली निवड म्हणजे उमेदवाराने निवडणूक जिंकली असेल तर, ती त्याची झालेली निवड, रद्द झाल्याचे जाहीर करू शकते.

भ्रष्टाचारी कृत्ये उमेदवाराने स्वतः किंवा त्याचे वतीने प्रत्यक्षपणे अथवा अप्रत्यक्षपणे केल्याचे केव्हा समजले जाते, की –

(i) लवाडीने,

(ii) हेतूतः दिशाभूल करून,

(iii) दबावाने,

(iv) धमकी वा धाकदपटशाने,

(v) कोणास प्रवृत्त केले वा तसे करण्याचा प्रयत्न केला, तर

अर्थात, हे कोणा मतदाराने त्याचे इच्छेविरुद्ध त्याने मत देण्यास त्यास भाग पाडले अथवा मत देण्यापासून त्यास इच्छेविरुद्ध परावृत्त केले असेल तर –

कोणाही मतदारास उमेदवाराच्या बाजूने मत देण्यासाठी किंवा उमेदवारास मत न देण्यासाठी त्यास चिथावणी दिली,

काही देणगी देऊ केली किंवा पैशात रूपांतर होईल अशी चीजवस्तू देऊ केली, किंवा दिली,

जागा किंवा नोकरी देऊ केली किंवा दिली किंवा देण्याचे आमिष दाखविले,



वैयक्तिक लाभ करून देण्याची आशा दाखविली, वचन दिले,
जात, जमात, धर्म, पंथ यावर भर दिला, प्रचार केला,
अशा गुन्ह्याचे कृत्यास कोणी मदत केली, हातभार लावला, तर

ज्या निवडून आलेल्या उमेदवाराच्या संबंधात हे घडले असेल त्या उमेदवाराचे ते यश धोक्यात येते. निवडणुकीतील शुद्धता अधिक महत्त्वाची बाब असल्याचे गणले जावे आणि म्हणून निवडणूक-शुचित्वासाठी अशी तरतूद निवडणूकविषयक कायद्यात असणे आवश्यक आहे. यशस्वी उमेदवाराची झालेली निवड, भ्रष्टाचारी कृत्ये केल्याचे कारणास्तव रद्द ठरविण्याचे जाहीर करण्यासाठी पुढील बाबी स्पष्ट व्हाव्या लागतात –

यशस्वी उमेदवाराने,
त्याच्या निवडणूक एजंटाने,
उमेदवाराच्या किंवा त्याच्या निवडणूक एजंटाच्या अनुमतीने कोणीही इसमाने,

भ्रष्टाचारी कृत्य/कृत्ये केली आहेत. असे प्रस्थापित करता आले, तर निवडून आलेल्या उमेदवाराची निवड रद्द होते. (लालसिंग केशरीसिंग वि. वल्लभदास शंकरलाल, ए. आय. आर. १९६७ गुजरात ६२)

उमेदवाराने, त्याच्या निवडणूक एजंटाने किंवा त्यांच्या संमतीने कोणीही इसमाने निवडणुकीच्या संबंधात कायद्याने नमूद केलेली भ्रष्टाचारी कृत्ये केली एवढेच सिद्ध करून भागत नाही, तर त्यावरोबरच अशा भ्रष्टाचारी कृत्यामुळे निवडणुकीच्या निकालावर विपरीत परिणाम घडून आला हे अर्जदाराने न्यायाधीकरणास पटवून देणे आवश्यक असते. (सामंत एन्. बाळकृष्ण वि. जॉर्ज फर्नान्डिस, ए. आय. आर. १९६९ सु. को. १२०१).

याचिका अर्जात प्रतिस्पर्ध्याविरुद्ध भ्रष्टाचारी कृत्यांचा केलेला आरोप सिद्ध करण्याची संपूर्ण जबाबदारी कायद्याने निवडणूक याचिका अर्ज सादर करणाऱ्या अर्जदारावर टाकलेली आहे. अर्जात नमूद केलेले भ्रष्टाचारी कृत्यांचे आरोप संशयातीत सिद्ध झाले पाहिजेत असा कायद्याचा कटाक्ष आहे. (जगदेवसिंग वि. प्रतापसिंग, ए. आय. आर. १९६५ सु. को. १८८).

सिद्ध करण्याच्या जबाबदारीचे दोन वेगवेगळे भाग आहेत, ते असे की –

(१) कायदा व समर्थन यांशी संबंधित,
(२) पुराव्याचे स्पष्टीकरण,

पहिल्यातील जबाबदारी कायम आहे. दुसऱ्यातील जबाबदारी बदलू शकते. (टी. के. गांगी रेड्डी वि. एम. सी. अंजनय्या रेड्डी (१९६०) २२ इलेक्शन लॉ रिपोर्टर २६१; मोहनसिंग वि. भंवरलाल, ए. आय. आर. १९६४ सु. को. १३६६).

भ्रष्टाचारी कृत्यांपैकी ज्या ज्या भ्रष्टाचारी कृत्यांचा आरोप याचिका अर्जात नमूद केला असेल त्या त्या प्रत्येक भ्रष्टाचारी कृत्याच्या शाबीतीची, निवडणूक न्यायाधीकरणाच्या न्यायप्रक्रियेत आवश्यकता असते. त्यातील एक जरी सिद्ध करता

आला नाही तरीही संपूर्ण अर्ज निकाली काढला जाण्याची शक्यता असते. (गुरुजी श्रीहरी बळीराम जांवतोडे वि. विठ्ठलराव ए. आय. आर. १९७० सु. को. १८४१) केलेला आरोप/केलेले आरोप संशयातीत सिद्ध झाले पाहिजेत. पुराव्याच्या छाननीत संशयाला वाव असल्याचे आढळून येईल तर संशयाचा फायदा आरोपीला दिला जातो (गोपाळ कुरूप वि. सॅम्युअल अ. पॉल १९६१ केरळ हायकोर्ट डोबीया केस-अनरिपोर्टेड, एस. एल. सारट वि. एम्. एफ. कुरेशी, ए. आय. आर. १९६९ सु. को. ६७७)

भ्रष्टाचारी कृत्यांचा आरोप संशयातीत सिद्ध होण्यासाठी भक्कम पुराव्याची आवश्यक असते. निवडणूक याचिका अर्जाचे न्यायप्रक्रियेत, आरोपीला संशयाचा फायदा देण्याच्या निर्णयाप्रत जेव्हा कोर्ट येऊ पाहते, तेव्हा कोर्टाने त्यांचे मत भक्कम व्हावे अशी पुराव्याची छाननी करावी. पुराव्याचे छाननीतून चंचलतेला वाव राहू देऊ नये. न्याय-निःपक्षबुद्धीचे आणि चंचलबुद्धीचे वावडे आहे आणि असे वावडे राखणे हेच न्यायाचे आहे. (डी. पी. मिश्रा वि कमल ना. शर्मा, ए. आय. आर. १९७० सु. को. १४७७) याचिका अर्जदाराचे बहुतेक सर्व साथीदार त्याचे निवडणूक एजंट असतील तर त्यांनी सादर केलेल्या पुराव्याची छाननी काळजीपूर्वक सावधानतेने करण्याकडे न्यायालयाचा कटाक्ष असतो म्हणून असा साक्षीपुरावा सादर करताना अर्जदाराने फार काळजी घेतली पाहिजे (प्रतापसिंग वि. हरद्वतीलाल, ए. आय. आर. १९७० सु. को. १५००).

आरोप पुराव्याच्या पुष्टीकरणानें सिद्ध झाला पाहिजे. याचिका अर्जात ज्या आरोपाचा उल्लेख केलेला नसेल त्या आरोपाशी संबंधित असणारा पुरावा विचारात घेतला जात नाही. आरोप गोहत्येच्या प्रचारावर आधारलेला असेल तर पुरावा ब्रह्महत्येच्या प्रचाराशी संबंधित असल्यास तो विचारात घेतला जात नाही. गोहत्येचा प्रचार असा केला जातो की, उमेदवार ज्या पक्षाचा आहे त्या पक्षास गोहत्येला प्रतिबंध करणे मान्य नाही तर ब्रह्महत्येचा प्रचार जातीयविद्रोह बाढविणारा आहे. दोन्ही प्रकारचा प्रचार भ्रष्टाचारी कृत्यात गणला जातो; पण ज्या संबंधीचा प्रचार असेल त्यासंबंधीच आरोप केलेला असला पाहिजे व पुरावाही त्या आरोपाशी संबंधित असेल असाच सादर केलेला असला पाहिजे. (मनुभाई नंदलाल वि. पोपटलाल मणिलाल ए. आय. आर. १९६९ सु. को. ७३४)

व्याख्यात्याने निवडणूक प्रचाराच्या व्याख्यानात उच्चारलेले आक्षेपार्ह शब्द अचूकपणाने नोंदले गेले नसतील व केवळ त्याच्या व्याख्यानातील आशयांकितताच नमूद केली असेल तर अशा संदिग्ध पुराव्याचाही विचार न्यायालयीन प्रक्रियेत केला जात नाही. (मोहनसिंग वि. भंवरलाल राजमल, ए. आय. आर. १९६४ मध्यप्रदेश १३७). पुराव्याच्या छाननीच्या संदर्भात सुप्रीम कोर्टाने असे मत व्यक्तविले आहे की –

(अ) इंडियन इव्हिडन्स ॲक्टच्या कलम १६० प्रमाणे दस्तऐवजाचा वापर करण्यापूर्वी, त्यात नमूद असलेली सत्यस्थिती बरोबर असल्याची हमी देताना साक्षीदाराने सर्व सत्यस्थिती बिनचूकपणे स्मरणाने सांगितली पाहिजे अशी आवश्यकता नाही. दस्तऐवजात नमूद असलेली सद्यस्थिती सांगण्याच्या मनःस्थितीत साक्षीदार असल्याचे कोर्टाला पटले म्हणजे इंडियन इव्हिडन्स ॲक्ट यातील कलम १६० च्या तरतुदीची पूर्तता होते.

(ब) वक्तव्याच्या लिखित अहवालाचा, कलम १५९ च्या कारणास्तव साक्षीदाराला स्मरण करून देण्यासाठी वापरावयाचा नसून कलम १६० च्या तरतुदीच्या पूर्ततेसाठी वापरावयाचा असतो.

(क) असा अहवाल हा पुराव्याच्या पुष्टीकरणाचा भाग असल्याचे मानले जाऊ नये, तर साक्षीदाराने शपथेवर केलेल्या विधानाच्या पुष्टीकरणार्थ मानला जावा. (कांतीप्रसाद जयशंकर याज्ञिक वि. पुरुषोत्तमदास रणछोडदास पटेल, ए. आय. आर. १९६९ सु. को. ८५१).

न्यायाधीकरणाच्या न्यायप्रक्रियेत भ्रष्टाचारी कृत्याच्या तपशिलाची छाननी झालीच पाहिजे इतके कटाक्षित असले पाहिजे असेच केवळ नाही तर अशा भ्रष्टाचारी कृत्यांमुळे निवडणुकीवर विघातक परिणाम काय झाला हे स्पष्ट करणे अत्यावश्यक बाब आहे. (भगवान दत्त शास्त्री वि. राम रतन गुप्ता, ए. आय. आर. १९६० सु. को. २००).

लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम ८३ (१) (ब)ची तरतूद अशी आहे की, भ्रष्टाचारी कृत्याशी संबंधित असणाऱ्या निवडणूक याचिका अर्जात भ्रष्टाचारी कृत्याच्या आरोपाचा सविस्तर तपशील नमूद करणे आवश्यक असते. त्यात,

(१) भ्रष्टाचारी कृत्याचा आरोप ज्यांचे ज्यांचेवर असेल अशा सर्व आरोपित पक्षकारांची नावे.

(२) अशी भ्रष्टाचारी कृत्ये घडल्याचे ठिकाण.

(३) अशी भ्रष्टाचारी कृत्ये घडल्याचा दिनांक, हे नमूद असणे आवश्यक असते. (श्रीमती सरलादेवी वि. वीरेंद्रसिंग, ए. आय. आर. १९६१ मध्यप्रदेश १२७); मनुभाई अमरसी वि. पोपटलाल मणिलाल, ए. आय. आर. १९६९ सु. को. ७३४).

लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ यांतील कलम ८३ (१) (ब) ची तरतूद आज्ञार्थी आहे. (आज्ञार्थी–MANDATORY) त्यातील तरतुदीची पूर्तता झालीच पाहिजे अन्यथा याचिका अर्ज निरर्थक ठरतो.

लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम ८६ (५) च्या तरतुदीचा विचार करताना हायकोर्टाने असे व्यक्तविले आहे, की

(१) न्यायप्रक्रियेच्या परिणामकारकतेसाठी आणि न्यायाच्या रास्त व वाजवी

प्रक्रियेसाठी निवडणूक याचिका अर्जात भ्रष्टाचारी कृत्यांच्या केलेल्या आरोपात सुधारणा करणेस, विस्तार करणेस, सशर्त परवानगी द्यावी. (सशर्त म्हणजे खर्चाच्या रकमेची आकारणी वा असेच काही) मात्र,

(२) याचिका अर्जात आधीच जे नमूद नाही अशा भ्रष्टाचारी कृत्याच्या तपशिलाच्या स्पष्टीकरणार्थ केलेल्या दुरुस्तीस, सुधारित करणेस परवानगी देऊ नये.

या तरतुदीसाठी लोकप्रतिनिधित्व अधिनियमात कलम ८३ (३) होते ते आता ८६ (५) आहे.

सर्वसाधारणपणे याचिका अर्जाची सुनावणी सुरू होण्यापूर्वी अर्जात दुरुस्ती करणे इष्ट असते. अशा दुरुस्तीला कोर्टाने परवानगी द्यावी, मात्र एक नियम म्हणून दुरुस्तीसाठीचा अर्ज सादर करणेपूर्वी कोर्टाची मंजुरी आगाऊ मिळविणे आवश्यक आहे पण जर अर्जदाराचा याचिका अर्ज

सद्हेतूने केला नसेल,

माहीत असलेली सत्यस्थिती सुनावणीपूर्वी लपविली असेल वा स्पष्ट केली नसेल तर न्यायाधीकरणाकडून फेटाळला जातो.

भ्रष्टाचारी कृत्ये CORRUPT PRACTICES आणि बेकायदेशीर कृत्ये ILLEGAL PRACTICES यातील फरक इंग्रज ग्रंथकाराने असा सांगितला आहे की,

भ्रष्टाचारी कृत्य आणि बेकायदेशीर कृत्य यांतील मूलभूत फरक असा, की भ्रष्टाचारी कृत्यात भ्रष्टाचाराचा हेतू स्पष्ट होणे आवश्यक असते तर बेकायदेशीर कृत्य हे कायदेमंडळाने प्रतिबंधात्मक म्हणून ठरविलेले कृत्य, मग असे कृत्य प्रामाणिक वृत्तीने केलेले असो अथवा अप्रामाणिक वृत्तीने केलेले असो, जे करू नये असे विधि-मंडळाने ठरविलेले असते ते प्रतिबंधात्मक कृत्य म्हणजे बेकायदेशीर कृत्य.

लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ मध्ये, १९५६ साली दुरुस्ती केली. भ्रष्टाचारी कृत्यात बेकायदेशीर कृत्यांची गणना होऊ नये अशी ही दुरुस्ती आहे.

लाचलुचपतीचे कृत्य हे भ्रष्टाचारी कृत्यांपैकी एक आहे. लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम १२३ (१) प्रमाणे,

निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने,

उमेदवाराच्या निवडणूक एजंटाने,

उमेदवाराच्या किंवा त्याच्या निवडणूक एजंटाच्या संमतीने कोणाही इसमाने,

निवडणुकीत उमेदवाराला यश मिळावे म्हणून मते मिळविणेसाठी किंवा प्रति-स्पर्ध्याला मते मिळू नयेत म्हणून,

हेतूत: दिलेली देणगी, देणगीचे स्वरूप प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष कसेही असो,

देणारा व घेणारा दोघेही दोषी ठरतात. यावर खालील न्यायालयीन निकालपत्रे उपलब्ध आहेत.

ओमप्रकाश वि. लालचंद, ए. आय. आर. १९७० सु. को. १८८९,

डॉ. जगजितसिंग वि. ग्यानी कर्तारसिंग, ए. आय. आर. १९६६ सु. को. ७७३

लाचलुचपतीच्या आरोपाच्या संदर्भात पुराव्याचा विचार करताना एका इंग्रज न्यायाधीशाचा अभिप्राय असा आहे की,

" लाचलुचपतीचा आरोप उमेदवारावर केलेला असो अथवा त्याच्या एजंटावर केलेला असो, स्पष्ट आणि बुद्धीला पटेल असा पुरावा आरोपाच्या प्रस्थापनेसाठी आवश्यक आहे. पुरावा असा असावा की आरोपच केवळ नव्हे, तर त्याचे गांभीर्यही स्पष्ट झाले पाहिजे. त्यातून प्रथमत: निवडणूक बेकायदेशीर ठरली पाहिजे. सर्व पुरावा असा असावा की सर्व वाजवी शंकाकुशंका, संशय यांचा निरास झाला पाहिजे. कोठेही शंकेला वाव न राहता आरोप, आरशातील प्रतिबिंबासारखा स्पष्ट प्रतीत झाला पाहिजे. केवळ मामुली संशयास्पदता आरोपाच्या प्रस्थापनेस पुरेशी नसते. "

लाचलुचपतीच्या आरोपात उमेदवार, त्याचा निवडणूक एजंट दोषी ठरतीलही, पण त्याचा परिणाम निवडणुकीवर झाला नाही तर अशा लाचलुचपतीच्या आरोपाला निवडणूकप्रक्रियेत फारसा अर्थ नसतो असे मत " LAWS OF ENGLAND " या पुस्तकाच्या लेखकाने व्यक्तविले आहे.

एखाद्या उमेदवाराने त्याच्या निवडणूक एजंटास काही सूचना दिल्या असल्या आणि त्या सूचनांशी विसंगत असे वर्तन त्याच्या निवडणूक एजंटाने केले असले तरी त्याच्या वर्तनास सर्वस्वी जबाबदार उमेदवार आहेत आणि म्हणून निवडणूक एजंटाची निवड करताना उमेदवाराने फार काळजी घेणे जरुरीचे असते. ज्याची एजंट म्हणून नेमणूक झालेली असते त्या इसमावर अनेक प्रकारच्या जबाबदाऱ्या असतात. एकीकडे उमेदवाराचे हित सांभाळायचे तर दुसरीकडे मतदारांना सांभाळायचे असते आणि असे करताना क्षुल्लक बाबीतसुद्धा निवडणूक कामावर असणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांना, पोलीस अधिकाऱ्यांना नाराज न करण्याचे वर्तन ठेवावे लागते. प्रतिस्पर्धी उमेदवारास मिळणारी संभाव्य मते सौजन्य न सोडता फोडता आली पाहिजेत अथवा त्याला मिळणाऱ्या मतांच्या संख्येत वाढ होऊ न देण्याकडे त्याला लक्ष द्यावे लागते. निवडणूक एजंट हा उमेदवाराचा त्या कामापुरता नोकर असला तरी खऱ्या अर्थाने तो उमेदवाराचा हितचिंतक आहे, पालक आहे. थोडक्यात निवडणूकप्रक्रियेत एजंट हा उमेदवाराची गर्भवती माता आहे. उमेदवार निवडणुकीत निवडून आला म्हणजे यशस्वी प्रसूती झाली असे मानले जाते. उमेदवार निवडून आला नाही म्हणजे गर्भपात झाला असे उलट अर्थाने म्हणावे लागते. हा मोलाचा अभिप्राय इंग्रज न्यायाधीश मिस्टर ग्रोव्ह यांनी WAKEFIELD CASE यात व्यक्तविला आहे. [(1874) 2 O'M AND H 100]

लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ यात " देणगी "ची व्याख्या नाही पण कलम १२३ (१) यात "देणगी" आशयाचे स्पष्टीकरण दिले आहे. निवडणुकीच्या

संदर्भात बेकायदेशीर देणगी कोणती असावी याबाबतचा कायदेमंडळाचा दृष्टिकोन कोणता याचे स्पष्टीकरण उत्तर प्रदेश नगरपालिका अधिनियम १९५९ च्या कलम ७८ (१) आणि कलकत्ता म्युनिसिपल ॲक्ट १९५१ च्या सूची २ च्या भाग १ परिच्छेद १ यात दिले आहे. इंडियन पीनल कोडच्या कलम १६१ यातील स्पष्टीकरणातही हे नमूद आहे. या स्पष्टीकरणात "देणगी" आर्थिक देवाणीतील वस्तू एवढाच मर्यादित आशय नाही किंवा पैशात रूपांतरित होणारी किंमती वस्तू असाही मर्यादित आशय यात नाही, तर यापेक्षा अधिक व्यापकता त्यात आहे. देणगी प्रत्यक्ष स्वरूपात व्यक्त झालीच पाहिजे असा कटाक्ष नाही, ती अप्रत्यक्ष स्वरूपातही असू शकते. बेकायदेशीर अथवा नियमबाह्य कृत्य करण्यास प्रवृत्त करण्यासाठी खाऊपिऊ घालणे, ही अप्रत्यक्षरीत्या बेकायदेशीर देणगी होय, बेकायदेशीर वा नियमबाह्य कृती करण्यास प्रवृत्त व्हावे म्हणून त्या व्यक्तीस कोणत्याही दृश्य अदृश्य, प्रत्यक्ष अप्रत्यक्ष मार्गाने खूष करणे, त्याची मर्जी प्रसन्न राखणे हे कृत्यही बेकायदेशीर देणगीत जमा होते.

"कायदेशीर मोबदला" LEGAL REMUNERATION याची व्याख्याही या स्पष्टीकरणात दिली आहे. केलेल्या कायदेशीर कामाचा मिळणारा कायदेशीर मोबदला असा थोडक्यात आशय आहे. यातील कायदेशीर कामाचा कायदेशीर मोबदला या शब्दात या व्याख्येची आशयघनता आहे. काम कायदेशीर असावे व त्याचा मोबदलाही कायदेशीर असावा. कायदेशीर काम रुपये पाच मोबदल्याचे असेल व त्यासाठी रुपये पन्नास मोबदला दिला तर रुपये पंचेचाळीस कायदेशीर कामाचा बेकायदेशीर मोबदला ठरतो. इंडियन पीनल कोड यातील १६१ कलम सरकारी नोकरांनी घेतलेल्या/त्यांना दिलेल्या बेकायदेशीर देणगीसंबंधीचे आहे. बेकायदेशीर देणगी स्वीकारल्यावर ते योग्य कृत्य असल्याचे कोणतेही समर्थन विचारात घेतले जात नाही. निवडणूकविषयक कायद्यातील देणग्यांचे प्रकार चार आहेत.

आर्थिक देणगी
आर्थिकच पण पैशात रूपांतरित होणारी वस्तू
सर्व प्रकारची करमणूक आणि
बक्षिसाच्या आशेने कामात गुंतवणे किंवा काम देणे.

हे चार प्रकार परीपूर्ण आहेत असेच काही नाही. तसेच स्पष्टीकरणातही व्याख्येची परिपूर्तता नाही. पण सर्वसाधारणपणे "राजी राखणे" या आशयात सर्व समावेशकता आहे. (एस. बी. अधीयान वि. एस. कंदास्वामी, ए. आय. आर. १९५८ सु. को. ८५७). लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम १२३ (१) (अ) च्या आशयात "देणगीचा स्वीकार" महत्त्वाचे नाही, तर "देणगी दिली" महत्त्वाचे असल्याचा अभिप्राय आहे.

या कलमातील " हेतूतः, प्रत्यक्षाप्रत्यक्ष उद्युक्त करणे " या शब्दावरून असे प्रतीत होते, की हेतुपूर्ततेसाठी देणगी दिली, देऊ केली हे महत्त्वाचे, देणगीचा स्वीकार हे त्यापेक्षा कमी महत्त्वाचे, तरीही देणे वा घेणे, दोन्हीही कृत्यें गुन्ह्याचीच. निवडणुकीच्या संदर्भात एकाचा परिणाम अधिक गंभीर, मात्र दुसरा उमेदवार निवडून येण्यासाठी एका उमेदवाराने उमेदवारी मागे घेणे यात गुन्ह्याचे कृत्य नाही.

सद्हेतूने धर्मादाय कारणास्तव दिलेली देणगी कायद्यान्वये बेकायदेशीर कृत्य नाही, जरी अशा देणगीचे निवडणूक कारणाचे भांडवल केले तरी ही देणगी आक्षेपार्ह नाही, देणगी दिली त्या वेळी देणगी देण्यामागे भ्रष्टाचारी कृत्याचा वास आला तरी धर्मादाय कारणासाठी दिलेली देणगी प्राधिकृत असेल तर ती बेकायदेशीर नाही. अशा कृत्यात देणगी देण्यामागील हेतू प्रामाणिक होता की अप्रामाणिक होता या प्रश्नाची उकल करावीच लागते. यासाठी सर्व पुराव्यांची छाननी करणे जरुरीचे असते. मात्र धर्मादाय देणगीत अशा प्रश्नांची गुंतवणूक करू नये असे इंग्रज न्यायाधीश मिस्टर ग्रोव्ह यांचे मत आहे.

देणगी देण्याच्या कृत्यात,
उमेदवाराचा प्रत्यक्ष हस्तक्षेप किती ?
त्याच्या वाणीचा प्रभाव किती ?
जिंदगीचे स्वरूप व कालावधी
व त्यांचा निवडणुकीतील संबंध किती ?

या सर्वांचा साकल्याने विचार, अशा देणगीच्या दबावाने मते मिळविण्याचा प्रयत्न झाला किंवा कसे या दृष्टिकोनातून केला पाहिजे. (बंकबेशरी दास वि. चित्तरंजनदास नाईक, ए. आय. आर. १९६३ ओरिसा ८३). देणगी देण्यामागे धर्मादाय संस्थेच्या आर्थिक व्यवहारास हातभार लावण्याचा हेतू होता की मते मिळविण्यासाठी धार्मिक संस्थेशी संबंध असणाऱ्या मतदारांवर प्रभाव पाडून त्यांना अंकित करून घेण्याचा हेतू होता यावर देणगी प्रामाणिक हेतूने दिली किंवा कसे हे ठरविता येते.

विशिष्ट उमेदवारालाच मते दिली पाहिजेत असा प्रचार करण्यात वावगे काही नाही, पण मतदारांनी या विशिष्ट उमेदवारालाच मते दिली पाहिजे अशी सक्ती मतदारांवर करणे आणि मते दिली नाहीत तर मारहाण केली जाईल, जिवाला धोका उत्पन्न केला जाईल अशी धमकी देणे, प्रसंगी मारहाण करणे हे कृत्य भ्रष्टाचारी कृत्य होय व हे सिद्ध झाल्यास उमेदवाराची उमेदवारी अनर्हत ठरते व त्याची निवड रद्द होते. हे कृत्य म्हणजे निवडणुकीतील गुन्ह्याचे कृत्य होय.

कोणत्याही प्रकारे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष निवडणुकीच्या प्रक्रियेत हस्तक्षेप होता कामा नये. हस्तक्षेपाचा प्रयत्न होता कामा नये. ही निवडणूक प्रक्रियेतील पथ्ये पाळण्याची जबाबदारी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांवर आहे. मतदारांना मतदानाचा हक्क पूर्ण मुक्त वातावरणात, कोणत्याही प्रकारे दबाव-दडपणा-

पासून मुक्त मनाने बजावता आला पाहिजे. यात व्यत्यय जो कोणी करील किंवा ज्याच्यामुळे येईल त्याने भ्रष्टाचारी कृत्य केले असे ठरविले जाते. निवडणुकीतील शुचिता अन् शुद्धता त्याच्यामुळे नष्ट झाली असे म्हणण्यात काहीही प्रत्यवाय नाही. (नर्मदाप्रसाद वि. छगनलाल, ए. आय. आर. १९६९ सु. को. ३९५).

निवडणुकीच्या संदर्भात "गैरवाजवी दबाव" हे भ्रष्टाचारी कृत्य होय. गैरवाजवी दबाव याचा या संदर्भातील थोडक्यात पण स्पष्ट अर्थ असा, की मतदानाच्या मुक्त वापराच्या हक्कात अधिक्षेप करणे. निवडणूक याचिका-अर्जात यासंबंधीच्या आरोपाचे निवेदन निःसंदिग्ध आणि स्पष्ट असावे. लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम ८३ (१) (क) यातील ही तरतूद सिव्हिल प्रोसीजर कोड ऑर्डर ६ रूल ४ च्या तरतुदीशी तुलना करण्यासारखी आहे.

निवडणुकीत मतदाराने कोणा उमेदवाराला मत द्यायचे आणि कोणा उमेदवाराला मत द्यायचे नाही हे ठरविण्याचा व त्याप्रमाणे करण्याचा मतदाराचा हक्क. मतदाराच्या या हक्कावर कोणालाही कोणत्याही प्रकारे आक्रमण–अतिक्रमण करता येत नाही. उमेदवार शिक्षित आहे की अशिक्षित आहे, साक्षर आहे की निरक्षर आहे, तो अमूक पंथाचा आहे, अमूक जाती-जमातीचा आहे, तो अमूक धर्माचा आहे असले प्रश्न उपस्थित करून निवडणुकीत व्यत्यय आणणे हा गुन्हा आहे. (लालसिंग केशरीसिंग वि. वल्लभदास शंकरलाल, ए. आय. आर. १९६७ गुजरात ६२).

निवडणुकीच्या संबंधात एजंट नावाची व्यक्ती प्रभाव पाडणारी आहे. लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५० च्या कलम १२३ (२) (ii) यात हा शब्द आला आहे. एजंट

इलेक्शन एजंट

पोलिंग एजंट आणि

उमेदवाराच्या संमतीने निवडणुकीच्या संबंधातील कोणतेही काम उमेदवाराचे वतीने करणाऱ्या इसमासही एजंट म्हणतात. अशी व्यक्ती मतदारसंघातीत मतदारांवर प्रभाव गाजविणारी असते. गैरवाजवी प्रभाव पाडणे किंवा प्रभावाचा वापर गैरवाजवी मार्गाने करणे म्हणजे निवडणुकीतील गैरवाजवी दबाव होय. निवडणूकविषयक कायद्यातील एजंट निराळा आणि लॉ ऑफ कॉन्ट्रॅक्ट यातील एजंट निराळा.

निवडणूकविषयक कायद्यातील भ्रष्टाचारी कृत्यात INDUCEMENT–उद्युक्त करणे–हा शब्द आहे. या शब्दातील निवडणुकीच्या संबंधात आक्षेपार्ह अर्थ असा की "मतदाराच्या इच्छेवर मानसिक नियंत्रण ठेवणे." म्हणजे आपण म्हणू त्याला मतदाराने मत दिले पाहिजे किंवा आपण म्हणू त्या उमेदवाराला त्याने मत देता कामा नये. अशी त्याच्या मताची घडण घडविणे म्हणजेच आपल्या इच्छेप्रमाणे त्याच्या मनावर आपले नियंत्रण गाजविणे असा अर्थ एका इंग्रज ग्रंथकाराने निवडणूकविषयक ग्रंथात दिला आहे.

धर्म, पंथ, जात, प्रादेशिकता, भाषा यांवर भर देऊन प्रचार केला जातो हाही गैरवाजवी दबावाचा एक प्रकार आहे. SECT या इंग्रजी शब्दाचा अर्थ 'पंथ' असा आहे. ऑक्सफर्ड इंग्लिश डिक्शनरीमध्ये तो अधिक विस्ताराने दिला वाहे.

Sect – A Religious following – धर्मानुयायी Adherence to a particular Religious teacher or faith, especially a body of persons who unite in holding certain views differing from those of others who are accounted to be of the same religios. धर्मावर अनन्यसाधारण निष्ठा असणे, दैववादी. एकाच धर्माचे एकापेक्षा अधिक पंथ असतील तरीही विशिष्ट पंथावर नितांत निष्ठा बाळगणे.

In modern use commonly applied to a separately organised religious body having its distinctive name and its own places of worship. धर्म समान असला तरी पंथ भिन्न असू शकतात. प्रत्येक पंथाचा स्वतंत्र संघ-समह असतो, त्यांची पूजा-अर्चा पद्धती स्वतंत्र असते.

A DINOMINATION संज्ञा.

मते मिळविण्यासाठी धर्माचा, पंथाचा प्रचार करणे हे भ्रष्टाचारी कृत्य समजले जाते. धार्मिक भावनेला आवाहन करून त्या चेतविण्याने वर्गविद्रोह निर्माण होतो म्हणून हे कृत्य गैरवाजवी दबावाचे आहे. (लालसिंग केशरीसिंग वि. वल्लभदास शंकरलाल, ए. आय. आर. १९६७ गुजरात ६२५; कांतीप्रसाद जयशंकर याज्ञिक वि. पुरुषोत्तमदास रणछोडदास पटेल, ए. आय. आर. १९६९ सु. को. ८५१; कुलतारसिंग वि. मुखतियारसिंग, ए. आय. आर. १९६५ सु. को. १४१).

उमेदवाराने निवडणुकीसाठी कोणती खूण स्वीकारावी यावरही काही मर्यादा आहे. अशा प्रकरणात "ध्रुवाचा तारा" ही खूण उमेदवारानें घेतल्याचा प्रश्न न्यायालयात उपस्थित झाला. ध्रुवाचा तारा ही खूण धार्मिकतेला आवाहन करणारी आहे असा प्रतिस्पर्धी उमेदवाराचा दावा होता. या प्रश्नाची उकल न्यायालयाने दोन दृष्टिकोनातून केली.

ध्रुवाचा तारा ही खूण विशिष्ट धर्म, धर्मपंथ यांना आवाहन करणारी आहे का?

हस्तपत्रिकेवर ही खूण मुद्रित करून त्या हस्तपत्रिकांचे वाटप करण्यात धर्माचा, धर्मपंथाचा प्रचार होऊ शकतो का?

ध्रुवताऱ्याशी निगडित असणारे गुणधर्म निश्चितच काही विशिष्ट भावनांना आवाहन करणारे, विशिष्ट भावना उत्तेजित करणारे आहेत. अढळता हा मुख्य गुणधर्म त्यात आहे, अनन्यसाधारण निष्ठा भावनेला उत्तेजित करण्याचा गुणधर्म त्यात आहे. जिद्द, चिकाटी, दीर्घ परिश्रम हेही गुणधर्म त्यातून भावनेला स्पर्श करणारे आहेत. तरीही ध्रुवाला कोणी देव-देवतेसमान मानीत नाहीत. तो कोणत्याही विशिष्ट धर्मपंथाचा अध्वर्यू असल्याचे मानले जात नाही. अशा कोणत्या विशिष्ट

धर्मपंथाचे कोणी अनुयायीही नाहीत म्हणून ही खूण धार्मिकतेला, विशिष्ट धर्मपंथाला आवाहन करणारी नाही असा निर्णय न्यायालयाने दिला. (रमणभाई आशाभाई वि. उन्नी अजितकुमार, ए. आय. आर. १९६५ सु. को. ६६९).

असेच दुसरे एक प्रकरण सुप्रीम कोर्टापुढे आले. (सुवोत देवग्राम वि. राम नारायण प्रसाद, ए. आय. आर. १९६० सु. को. १४८). ज्या उमेदवाराविरुद्ध हा दावा होता तो उमेदवार झारखंड पक्षाचा आदिवासी उमेदवार होता. त्याने निवडणूक खूण "तोटी" निवडली होती. आदिवासी समाजात धार्मिक पंथभेद आहेत. आदिवासी समाजातील झारखंड पंथात तोटी-नळ यावर आधारीत काही धार्मिक सण, उत्सव यामध्ये काही समारंभ केले जातात, हस्तपत्रिकेत तोटीचे चित्र छापून अशा धार्मिक भावनेला आवाहन करून मते मिळविली असे प्रतिपादन न्यायालयात विरोधी पक्षाने केले. ते न्यायालयाने ग्राह्य मानून त्या उमेदवाराची झालेली निवड रद्द ठरविली.

सुप्रीम कोर्टाच्या निर्णयात 'तोटी' या खुणेवर जास्त भर दिला असल्याचे दिसून येत नाही तर त्या खुणेवरून धार्मिक भावनेला उत्तेजन दिल्याचा, आवाहन केल्याचा जो प्रचारी मजकूर होता त्यावर अधिक भर दिल्याचे दिसून येते. प्रचाराचा भर असा होता की,

"जर तोटीला मत दिले तर देवापर्यंत तुम्ही पोहोचू शकाल, देव खूष होईल. तोटीला मत दिले नाही तर देवाचा कोप होईल, अवर्षण व दुष्काळ पडेल."

धार्मिक भावनेला आवाहन करणे हे भ्रष्टाचारी कृत्य होय. गैरवाजवी दबावाचे कृत्य होय.

वरील दोन्ही प्रकरणांच्या निकालपत्रांतून हे स्पष्ट होते, की ध्रुवतारा ही खूण आणि तोटी ही खूण, या दोन्ही खुणा धार्मिक नाहीत. धर्मपंथ भावनेला आवाहन करण्यासाठी या खुणांचा वापर केला व मते मिळविली तर ते भ्रष्टाचारी कृत्य होते.

असेच आणखी एक प्रकरण सुप्रीम कोर्टापुढे आले. (जगदेवसिंग वि. प्रतापसिंग, ए. आय. आर. १९६५ सु. को. १८३). यात उमेदवाराने 'ओम' ही खूण निवडली होती. ही खूण विशिष्ट धर्माची, धर्मपंथाची नाही पण परमेश्वराच्या प्रार्थनेची सुरुवात या उच्चाराने होते म्हणून ही खूण निवडणे व मते मिळविणे हे गैरवाजवी दबावाचे कृत्य आहे असा निर्णय सुप्रीम कोर्टाने दिला.

जाती-जमातींत शत्रुत्व, वैमनस्य, कटुता पसरविणाऱ्या भाषेला निवडणूक प्रचारात स्थान नाही अशी भाषा गैरवाजवी दबावाचे कृत्यात येते. (बी. पी. मौर्य वि. प्रकाशवीर शास्त्री, ए. आय. आर. १९७० सु. को. ५२२).

लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम १२३ (४) यात निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने प्रतिस्पर्धी उमेदवाराबद्दल खोटे निवेदन करू नये, प्रसिद्ध

करू नये, असे करणे हे भ्रष्टाचारी कृत्य आहे असे नमूद आहे.

उमेदवाराकडून

त्याच्या एजंटाकडून

उमेदवाराच्या संमतीने इतर कोणा इसमाकडून

वस्तुस्थितीच्या कोणत्याही निवेदनाचे की, जी वस्तुस्थिती खोटी आहे,

ती खोटी असल्याबद्दल उमेदवाराचा विश्वास आहे अशा,

निवेदनाचे प्रसिद्धीकरण केल्यास, की जे निवेदन निवडणुकीशी संबंधित आहे,

दुसऱ्या कोणा उमेदवाराच्या वैयक्तिक चारित्र्याशी किंवा वर्तनाशी संबंधित आहे, आणि

दुसऱ्या कोणा उमेदवाराच्या यशावर विपरीत परिणाम घडवून आणील असे घातक असेल,

तर लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम १२३ (४)च्या व्याप्तीत ते भ्रष्टाचारी कृत्य होय. (शिवपालसिंग वि. राम प्रताप, ए. आय. आर. १९६५ सु. को. ६७७; ओमप्रकाश वि. लालचंद, ए. आय. आर. १९७० सु. को. १८८९; बद्रीनारायण सिंग वि. कामदेव प्रसाद सिंग, ए. आय. आर. १९६१ पाटणा ४१; सरलादेवी वि. बीरेंद्र सिंग, ए. आय. आर. १९६१ मध्यप्रदेश १२७).

जे खरे नाही अशी खात्री आहे असे कोणतेही विधान खरे असल्याचे भासविण्यासाठी प्रसिद्ध केल्यास, मग ते कोणीही प्रसिद्ध केलेले असो,

उमेदवाराने प्रसिद्ध केलेले असो, किंवा त्याच्या एजंटाने प्रसिद्ध केलेले असो, किंवा उमेदवाराच्या संमतीने इतर कोणाही इसमाने प्रसिद्ध केलेले असो.

अशा प्रसिद्धीकरणाची सर्व जबाबदारी उमेदवारावर आहे असे कायदा मानतो. मात्र ज्याने हे भ्रष्टाचारी कृत्य केले असा दावा अर्जदाराचा असेल त्यानेच हे भ्रष्टाचारी कृत्य केले हे सिद्ध करण्याची जबाबदारी अर्जदाराची आहे.

ज्या विधानात वास्तवता नाही असे निवेदन, खोटे असत्य निवेदन होय. या आशयाला धरून असणारा गुन्हा इंडियन पीनल कोड कलम १७१ ग मध्ये नमूद आहे. यापूर्वी त्याचे स्पष्टीकरण केलेले आहे. इंडियन पीनल कोडच्या कलम ५०० ची तरतूद, बदनामी केल्यासंबंधीचा गुन्हा स्पष्ट करणारी आहे. उमेदवाराच्या संबंधात असा बदनामीकारक मजकूर प्रसिद्ध केल्यास उमेदवाराने इंडियन पीनल कोडच्या तरतुदीप्रमाणे बदनामी करणारावर फिर्याद करावी किंवा निवडणूक कायद्यातील तरतुदीप्रमाणे "भ्रष्टाचारी कृत्य" या सदराखाली दावा चालवावा.

उमेदवाराने कार्यालयीन निधीचा अपहार केला हे निवेदन, जर उमेदवाराने खरोखरीच निधीचा अपहार केला असेल तर वस्तुस्थितीचे निवेदन होय. ते खरे आहे, खोटे नाही हे निवेदन करणाराने शाबीत केले म्हणजे त्याने भ्रष्टाचारी कृत्य केले असे होत नाही व भ्रष्टाचारी कृत्यासाठी तो दोषी ठरविला जात नाही. तसेच

इंडियन पीनल कोड कलम ५०० खाली बदनामीच्या गुन्ह्यातही तो दोषी ठरत नाही. तसेच,

यापूर्वीच्या निवडणुकीत उमेदवाराने प्रतिस्पर्धी उमेदवाराकडून पैसे घेऊन आपली उमेदवारी मागे घेतली होती हे निवेदनही, जर त्यातील सत्यता पटवून दिली तर खोटे नाही व निवेदन करणारा दोषी नाही. पण जर यातील सत्यता त्यास पटवून देता आली नाही तर असे खोटे निवेदन केल्याबद्दल म्हणजेच पर्यायाने उमेदवाराला मते मिळू नयेत म्हणून भ्रष्टाचारी कृत्य केल्याबद्दल तो दोषी ठरतो. (कुमारानंद वि. ब्रिज मोहनलाल, ए. आय. आर. १९६७ सु. को. ८०८).

अशा खोट्या निवेदनाचे प्रसिद्धीकरण निवडणुकीतील प्रचाराच्या संदर्भात कोणीही केले तरी ज्या उमेदवाराच्या वरकरणी भल्याकरिता ते केले असेल त्या उमेदवारावर त्याच्या प्रसिद्धीकरणाची जबाबदारी असल्याचे कायदा मानतो हे मागे सांगितलेच आहे. तेव्हा उमेदवाराच्या संमतीने हे कृत्य केले किंवा संमती नसताना हे कृत्य केले या प्रश्नाला न्यायप्रक्रियेत फारसे महत्त्व नसते. भ्रष्टाचारी कृत्य केले हे सिद्ध झाल्यानंतर याचिका-अर्जात अर्जदाराने त्याच्या ज्या प्रतिस्पर्धी उमेदवाराचे नाव, हे कृत्य केल्याच्या संदर्भात गोवले असेल त्याने ते केले हे गृहीत धरले जाते. (अब्दुल मजीद वि. भार्गवन्, ए. आय. आर. १९६३, केरळ १८; श्रीमती सरलादेवी वि. बीरेंद्रसिंग, ए. आय. आर. १९६१ मध्यप्रदेश १२७).

सुप्रीम कोर्टापुढे या संदर्भात असे एक प्रकरण आले की, (राम कृष्णा वि. जयसिंग केस नंबर १९६७ चा १९४९). उमेदवाराने निवडणुकीच्या सर्व कामाची जबाबदारी त्याच्या निवडणूक एजंटावर टाकली होती. त्या एजंटाने प्रतिस्पर्धी उमेदवाराची बदनामी होईल अशा मजकुराची भित्ती-पत्रके छापून भिंतीवर लावली होती. या दाव्यात रामकृष्णाने कबूल केले–

१. ती भित्तीपत्रके त्याने पाहिली होती.

२. त्याच्या छपाईचे बिल जेव्हा त्याचेपुढे आले तेव्हा ते त्याने चुकते केले होते.

३. भिंतीवर डकविणाऱ्या मजूरांची मजूरी त्याने दिली होती.

४. निवडणूक-खर्चाच्या विवरणपत्रात हा खर्च त्याने नमूद केला होता.

यावरून भ्रष्टाचारी कृत्यात रामकृष्णाची संमती होती हे सुप्रीम कोर्टाने गृहीत धरले.

एखाद्याच्या चारित्र्यावर शितोडे उडविणे म्हणजे चारित्र्यहनन करणे होय. निवडणुकीच्या प्रचारात उमेदवाराचे चारित्र्यहनन करणे, त्याच्या व्यक्तिगत वर्तनाबद्दल नालस्ती करणे हे कृत्यही निवडणूकविषयक कायद्यात भ्रष्टाचारी कृत्य असल्याचे मानले जावे, असे सुप्रीम कोर्टाने (टी. के. गांगी रेड्डी वि. एम. सी. अंजनय्या रेड्डी (१९६०) २२ इलेक्शन लॉ रिपोर्टर २६१). यांत नमूद केले आहे.

'खून करण्यास प्रोत्साहन दिले, चिथावणी दिली व अशा प्रकारे राजकीय

चारित्र्य कलंकित आहे ' असे निवेदन एखाद्या उमेदवाराच्या संबंधात करणे म्हणजे त्याचे चारित्र्यहनन करणे होय. (इंदरलाल वि. लालसिंग, ए. आय. आर. १९६२ सु. को. ११५६). या प्रकरणी सुप्रीम कोर्टाने निकालपत्रात अशी सूचना केली आहे, की

" खासगी चारित्र्य आणि सार्वजनिक चारित्र्य यांत फरक आहे. राजकारणापासून पूर्णपणे अलिप्त असेल ते चारित्र्य खासगी चारित्र्य होय. पण ज्याच्या वर्तनातून राजकीय परिस्थितीला स्पर्श होतो त्याचे ते चारित्र्य, सार्वजनिक चारित्र्य होय. अशा सार्वजनिक चारित्र्य असणाऱ्या उमेदवाराच्या चारित्र्याबद्दल निवेदन करणाराने सावधगिरी बाळगून निवेदन करावे, नाहीपेक्षा असे निवेदन वादग्रस्त ठरून ठपका पदरी येण्याची शक्यता असते (शिवलालसिंग वि. राम प्रताप, ए. आय. आर. १९६५ सु. को. ६७७).

चारित्र्यहननाचे सांप्रतचे ठळक उदाहरण म्हणजे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री बॅरिस्टर अंतुले. मुख्यमंत्रिपदाचा गैरवापर केल्याची त्यांच्याविरुद्धची प्रकरणे सध्या न्यायप्रविष्ट आहेत म्हणून अधिक चर्चा त्यासंबंधी करता येत नाही.

मतदारांना मतदानकेंद्रावर आणण्यासाठी आणि तेथून परत जाण्यासाठी उमेदवाराने वाहनाची व्यवस्था करणे व वाहनाचा वापर करणे हे निवडणुकीच्या संबंधात भ्रष्टाचारी कृत्य असल्याचे कायद्यात नमूद आहे. या कायद्यातील ही तरतूद लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम १२३ (५) च्या तरतुदीसारखी आहे.

वाहन भाड्याने ठरविणे किंवा वाहनाची व्यवस्था करणे त्यासाठी (भाड्यापोटी रक्कम दिलेली असो वा नसो) मतदारांना मतदानकेंद्रावर आणण्यासाठी व मतदानकेंद्रावरून परत जाण्यासाठी हे केले तर ते भ्रष्टाचारी कृत्य होय. वाहन भाड्याने ठरविले किंवा वाहनाची व्यवस्था केली एवढेच शाबीत करून भागत नाही तर मतदारांना नेण्या-आणण्यासाठी त्याचा वापर केला हेही शाबीत व्हावे लागते. (जशभाई चुनीभाई पटेल वि. अन्वरबेग अ. मिरझा, ए. आय. आर. १९६९ सु. को. ५८६).

निवडणूक कामात उमेदवाराने सरकारी नोकरीत असणाऱ्या कोणाही इसमाची मदत घेऊ नये. अशी मदत घेणे हे भ्रष्टाचारी कृत्य होय. या कलमातील ही तरतूद, लोकप्रतिनिधित्व अधिनियमाच्या कलम १२३ (७) मध्ये आणि बहुतेक सर्व राज्यांच्या नगरपालिका-निवडणुका यासंबंधीच्या कायद्यात आहे. उमेदवाराने निवडणुकीच्या कामात अशा कोणाही इसमाची नेमणूक करू नये, की जो इसम

(अ) सरकारी नोकरीत आहे, आणि

(ब) सरकारी विभागाचा/खात्याचा अधिकारी आहे.

मते मिळविण्यासाठी सरकारी नोकरीत असणाऱ्या कोणाही इसमाची मदत घेणे,

त्यासाठी त्यास वेतन, मोबदला, बक्षिसी वा असेच काही दिलेले असो अथवा नसो, देऊ केलेले असो अथवा नसो, हे कृत्य भ्रष्टाचारी कृत्य होय व असे भ्रष्टाचारी कृत्य केल्याचे शाबीत झाल्यास, सरकारी नोकराची निवडणूक कामात मदत घेणाऱ्या उमेदवाराची निवड अवैध ठरते. प्रसंगी सरकारी नोकराच्या नोकरीचे संपुष्टनही होणे संभवनीय आहे.

निवडणुकीचे दिवशी सार्वजनिक सभेस प्रतिबंध

२३. [१] ज्या तारखेस किंवा ज्या तारखांना वॉर्डातील निवडणूक घेतली जात असेल तेव्हा म्युनिसिपल क्षेत्रातील त्या वॉर्डात, इसमाने सार्वजनिक सभा बोलावू नये, भरवू नये किंवा उपस्थित राहता कामा नये.

[२] पोटकलम (१)च्या तरतुदीचा भंग करणाऱ्या इसमास, दोषसिद्धीनंतर दोनशे पन्नास रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा केली पाहिजे.

निवडणूक सभेत व्यत्यय

२४. [१] म्युनिसिपल क्षेत्रातील कोणत्याही वॉर्डाच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केल्यानंतर म्युनिसिपल क्षेत्रात सार्वजनिक सभा भरविल्या जातील त्यांना हे कलम लागू आहे.

[२] ज्याला हे कलम लागू आहे त्या सार्वजनिक सभेत जो कोणी इसम, ज्या कारणासाठी सभा बोलावली असेल तो व्यवहार चालू ठेवण्यास प्रतिबंध करण्याच्या कारणास्तव गोंधळ माजविण्याच्या स्वरूपाचे कृत्य करील किंवा असे कृत्य करण्यास दुसऱ्यास प्रोत्साहन देईल, तर त्यास दोनशे पन्नास रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा केली पाहिजे.

[३] पोटकलम (२) खालील गुन्हा कोणी इसम करीत असल्याचा जर कोणा पोलीस अधिकाऱ्यास वाजवी संशय आल्यास त्याने, जर सभेच्या अध्यक्षाने विनंती केली तर त्या इसमाने त्याचे नाव व पत्ता जाहीर करण्यास त्यास भाग पाडावे आणि त्या इसमाने तसे करण्यास नकार दिला अथवा तसे केले नाही तर किंवा जर पोलीस अधिकाऱ्यास, त्याने दिलेले नाव पत्ता, खोटे असल्यावद्दल संशय आला तर पोलीस अधिकाऱ्याने त्यास वॉरंटाशिवाय अटक करावी.

मतदानकेंद्रात किंवा जवळ प्रचार करण्यास प्रतिबंध

२५. [१] कोणत्याही मतदानकेंद्रात मतदान घेतले जात असेल अशा तारखेस किंवा तारखांना, इसमाने मतदानकेंद्रात किंवा मतदान-केंद्रापासून शंभर मीटर अंतरातील कोणत्याही सार्वजनिक वा खाजगी जागेत खालील कोणतीही कृत्ये करता कामा नये. जसे –

(अ) मतासाठी प्रचार, किंवा
(ब) कोणाही मतदारास मतासाठी आग्रह करणे, किंवा
(क) कोणा विशिष्ट उमेदवारास मत न देण्यासाठी मतदारास प्रवृत्त करणे, किंवा
(ड) निवडणुकीत मत न देण्याबद्दल मतदारास प्रवृत्त करणे, किंवा
(ई) निवडणुकीचे संबंधात, कार्यालयीन नोटीस नाही अशी कोणतीही नोटीस किंवा खूण प्रदर्शित करणे.

[२] जो कोणी इसम पोटकलम (१)च्या तरतुदीचा भंग करील त्यास दोषसिद्धीनंतर दोनशेपन्नास रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा केली जाईल.

भाष्य

या कायद्यातील या तीन कलमांच्या तरतुदी, लोकप्रतिनिधित्व कायद्यातील कलम १२६, १२७ व १३० यांतील तरतुदींसारख्या आहेत.

कलम २३ ची तरतूद, लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम १२६ ची तरतूद यांत फरक नाही. ही तरतूद घटनात्मक तरतुदीशी विसंगत असल्याचा दावा (रामेश्वर महंत वि. राज्य, ए. आय. आर. १९५७ पाटणा २५२) पाटणा हायकोर्टापुढे आला होता; पण तो हायकोर्टाने फेटाळून लावला आहे.

राज्यघटनेच्या तरतुदीप्रमाणे हा विषय राज्यशासनाच्या पूर्ण अखत्यारीतील असून या विषयावर कायदे करण्याचा अधिकार राज्यघटनेच्या सूची ७, यादी २, सदर ५ यात समाविष्ट आहे आणि अशा कायद्यात, तत्संबंधीच्या गुन्ह्याबद्दल दंडनीय तरतूद करण्याचा अधिकारही राज्य विधिमंडळांना राज्यघटनेने दिला आहे.

मतदानकेंद्रावर मतदान करण्यासाठी जी तारीख नेमली असेल त्या तारखेस निवडणुकीच्या संबंधात कोणतीही सभा नगरपालिकेच्या हद्दीत घेऊ नये हा प्रतिबंधात्मक उपाय २३ व्या कलमाच्या तरतुदीत आहे.

निवडणुकीच्या संबंधात भरणाऱ्या प्रचारी सभा शांततेने पार पाडल्या जाव्यात ही अपेक्षा २४ व्या कलमाच्या तरतुदीत आहे.

मतदानाचे तारखेस मतदानकेंद्राचे आसपास
मतासाठी प्रचार करणे,
मतदाराचे, मत देण्यासाठी मन वळविणे
विशिष्ट उमेदवारालाच मत द्यावे म्हणून मतदारास उद्युक्त करणे

निवडणुकीच्या संबंधात खाणाखुणा करणे, सूचनांचे प्रदर्शन करणे यास या कलमाने बंदी घातली आहे.

मतदानकेंद्रात किंवा जवळ शिस्तहीन वर्तनाबद्दल दंडन

२६. [१] कोणत्याही मतकेंद्रात ज्या तारखेस किंवा तारखांना मतदान घेतले जात असेल तेव्हा इसमाने करता कामा नये–

(अ) मतदानकेंद्राचे प्रवेशद्वारात किंवा त्याशेजारील कोणत्याही सार्वजनिक अथवा खासगी जागेत मानवी आवाजाचे ध्वनिवर्धन व प्रत्याक्षेपण करणारी साहित्यसामग्री वापरील अथवा चालू ठेवील तर असे प्रत्याक्षेपण किंवा ध्वनिवर्धन, किंवा

(ब) मतदानकेंद्राचे प्रवेशद्वारात किंवा त्याशेजारील कोणत्याही सार्वजनिक अथवा खासगी जागेत ओरडेल किंवा अन्यथा शिस्तहीन स्वरूपाची कृती करील

की ज्यामुळे, मत देण्यासाठी मतदानकेंद्रावर आलेल्या इसमास उपद्रव पोहोचण्यास कारण होईल किंवा मतदानकेंद्रावर कर्तव्य करीत असणारे अधिकारी व इतर इसम यांच्या कर्तव्यात अधिक्षेप होणेस कारण होईल.

[२] पोट कलम (१) तरतुदींचा जो कोणी इसम भंग करील, किंवा असा भंग करण्यास हेतुपुरस्सर मदत करील अथवा प्रोत्साहित करील त्यास दोषसिद्धीनंतर तीन महिनेपर्यंत वाढविता येईल इतक्या सत्राचे कैदेची किंवा रुपये दोनशे पन्नास पर्यंत दंडाची किंवा दोन्ही शिक्षा केली जाईल.

[३] जर मतदानकेंद्रावरील अध्यक्षीय अधिकाऱ्यास, कोणीही इसम या कलमाखालील दंडनीय अपराध करीत आहे असा विश्वास वाटेल असे वाजवी कारण असल्यास, त्याने कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास अशा इसमास अटक करण्याचा आदेश द्यावा आणि त्यानुसार पोलीस अधिकाऱ्याने त्यास अटक करावी.

[४] पोट कलम (१) च्या तरतुदीच्या कोणत्याही उल्लंघनाच्या प्रतिबंधास्तव कोणीही पोलीस अधिकाऱ्याने कृती करावी आणि शक्ती वापरावी; आणि अशा उल्लंघनासाठी वापरली गेलेली साहित्यसामग्री जप्त करावी.

मतदानकेंद्रावरील गैरवर्तनाबद्दल दंडन

२७. [१] जो कोणी इसम कोणत्याही मतदानकेंद्रावर मतदानासाठी नियत केलेल्या कालावधीत स्वतः गैरवर्तन करील किंवा अध्यक्षीय अधिकाऱ्याच्या कायदेशीर आदेशांचे पालन न करील तर अध्यक्षीय अधिकाऱ्याने किंवा कामावर असलेल्या कोणीही पोलीस अधिकाऱ्याने किंवा अध्यक्षीय अधिकाऱ्याने यासंबंधात प्राधिकृत केलेल्या कोणीही इसमाने मतदानकेंद्राबाहेर त्यास काढावे.

[२] पोट कलम (१) खाली दिलेल्या शक्तीचा वापर मतदानकेंद्रावर मत देण्यासाठी आलेल्या कोणत्याही मतदारास त्या केंद्रावर मत देण्याच्या संधीपासून प्रतिबंध होईल असे करू नये.

[३] मतदानकेंद्राबाहेर हाकलून लावलेला जो कोणी इसम अध्यक्षीय अधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय मतदानकेंद्रात पुन्हा प्रवेश करील तर दोषसिद्धीनंतर

त्यास तीन महिनेपर्यंत वाढविता येईल इतक्या कैदेची किंवा रुपये दोनशे पन्नासपर्यंत दंडाची किंवा दोन्ही शिक्षा केली जाईल.

[४] पोट कलम (३) खालील गुन्हा दखलपात्र राहील.

निवडणुकीत बेकायदेशीर वाहने उपलब्ध करणे वा भाडयाने देण्याबद्दल दंडन

२८. निवडणुकीशी निगडित असणाऱ्या, कलम २२ च्या पोटकलम (५) मध्ये स्पष्ट केलेल्या कोणत्याही भ्रष्टाचारी कृत्याबद्दल जो कोणी इसम दोषी ठरेल त्यास दोषसिद्धीनंतर रुपये दोनशे पन्नासपर्यंत दंडाची शिक्षा केली पाहिजे.

भाष्य

मतदान चालू असताना मतदानकेंद्रात किंवा जवळपास कोणत्याही प्रकारे नियमबाह्य वर्तन करण्यावर बंदी घातली आहे. मतदान चालू असताना मतदानाच्या जागेत परवानगीशिवाय, अनधिकृतपणे प्रवेश करणे गुन्हा आहे. असा गुन्हा करणाऱ्या इसमास पोलीस अधिकारी तात्काळ अटक करू शकतो. या गुन्ह्यासाठी तीन महिने तुरुंगवासाची किंवा अडीचशे रुपये दंडाची किंवा दोन्हीही शिक्षा होऊ शकतात. या कलमातील तरतूद आणि लोकप्रतिनिधित्व अधिनियमाच्या कलम १३१ ची तरतूद सारखी आहे. अशा गुन्ह्याचे प्रकरण पाटणा हायकोर्टापुढे आले होते. (नागेंद्रनाथ वि. राज्य, ए. आय. आर. १९५४ पाटणा ३५६)

कलम २७ ची तरतूद आणि लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ कलम १३२ ची तरतूद सारखी आहे.

मतदानकेंद्रात किंवा जवळपास शांततेचा भंग होईल असे वर्तन, खोडया करण्यावर बंदी घातलेली आहे.

कलम २८ ची तरतूद आणि लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम १३३ ची तरतूद सारखी आहे. कलम २२ च्या पोट कलम (५) च्या तरतुदीचा भंग झाल्यास या कलमाच्या तरतुदीनुसार दंडाची शिक्षा होऊ शकते.

मतांच्या गोपनीयतेचे निर्वाहन

२९. [१] निवडणुकीत मतनोंदणी आणि मतमोजणी यांशी संबंधित असणारे कर्तव्य जो प्रत्येक अधिकारी, कारकून, एजंट किंवा इतर कोणी इसम करीत असेल, त्याने मतासंबंधी गोपनीयतेचे निर्वाहन व साहाय्य केले पाहिजे; आणि त्याने कोणत्याही कायद्याने वा कायद्याखाली प्राधिकृत असलेल्या कारणास्तव सोडून, कोणाही इसमास अशा गोपनीयतेचे उल्लंघन होईल अशी कोणतीही माहिती कळविता कामा नये.

[२] पोट कलम (१) यातील कोणत्याही तरतुदीचा जो कोणी इसम भंग करील

त्यास दोषसिद्धीनंतर तीन महिनेपर्यंत वाढविता येईल अशी कैदेची किंवा दंडाची किंवा दोन्ही शिक्षा केली जाईल.

निवडणुकीत अधिकारी वगैरे यांनी उमेदवारासाठी काही कृती करता कामा नये अथवा मतासाठी दबाव आणू नये

३०. [१] जो कोणी इसम, निर्वाचन अधिकारी किंवा निवडणुकीत अध्यक्षीय अधिकारी अथवा मतदान केंद्राधिकारी किंवा अधिकारी किंवा कारकून म्हणून, निर्वाचन अधिकाऱ्याने किंवा अध्यक्षीय अधिकाऱ्याने निवडणुकीशी निगडित असणारे कोणतेही कर्तव्य करण्यासाठी नेमले असेल त्याने निवडणुकीचे काम किंवा व्यवस्थापनाचे कोणतेही काम–मतदानाचे काम सोडून इतर–किंवा कोणतीही कृती निवडणुकीतील उमेदवाराच्या उद्दिष्टांच्या साध्यासाठी करता कामा नये.

[२] कोणी इसमाने वरीलप्रमाणे आणि पोलीस दलातील कोणी सदस्याने असा प्रयत्न करता कामा नये –

(अ) निवडणुकीत मत देण्यासाठी कोणाही इसमास प्रवृत्त करणे, किंवा

(ब) निवडणुकीत मत देण्यापासून कोणाही इसमास परावृत्त करणे, किंवा

(क) निवडणुकीत मतासाठी कोणत्याही इसमावर कोणत्याही स्वरूपाचा दबाव आणणे.

[३] पोट कलम (१) यातील कोणत्याही तरतुदीचा जो कोणी इसम भंग करील त्यास दोषसिद्धीनंतर सहा महिनेपर्यंत वाढविता येईल इतक्या कैदेची किंवा दंडाची किंवा दोन्हीही शिक्षा केली जाईल.

निवडणुकीशी संबंधित असणाऱ्या कार्यालयीन कर्तव्याचे उल्लंघन

३१. [१] ज्याला हे कलम लागू आहे असा जो कोणी इसम वाजवी कारणाशिवाय कोणती कृती केल्यामुळे किंवा कार्यालयीन कृती न केल्यामुळे दोषी ठरला असेल तर त्यास दोषसिद्धीनंतर रुपये पाचशेपर्यंत दंडाची शिक्षा केली जाईल.

[२] अशा इसमाविरुद्ध, त्याने केलेल्या कृतीमुळे वा न केलेल्या कृतीमुळे नुकसानीविरुद्ध दावा अथवा इतर कायदेशीर कारवाई केली जाता कामा नये.

[३] हे कलम ज्यांना लागू आहे असे इसम जे म्युनिसिपल मतदारांची यादी तयार करण्याचे कामावर नेमलेले इतर इसम आणि निर्वाचन अधिकारी, केंद्राधिकारी, उमेदवारांचे नामांकन दिलेले, नामांकन मागे घेतलेले स्वीकारणारे, किंवा कोणत्याही निवडणुकीत मतनोंदणी किंवा मतमोजणी करणारे आणि या कलमाचे कारणास्तव "कार्यालयीन कर्तव्य" करणारे या आशयाप्रमाणे समजले आहेत आणि ज्यांना या कायद्यान्वये किंवा या कायद्याखाली असणाऱ्या कर्तव्याव्यतिरिक्त इतर कर्तव्ये नेमून दिलेली आहेत ते यात समाविष्ट नाहीत.

भाष्य

या कलमातील तरतूद आणि लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ यातील कलम १२८ ची तरतूद सारखी आहे.

निवडणुकीच्या कामावर असणाऱ्या सरकारी नोकरांनासुद्धा कोणत्या मतदाराने कोणत्या उमेदवाराला मत दिले हे समजू शकणार नाही अशीच मतदानाची पद्धत आहे. तरीही अंध-अपंग मतदाराला मतदानामध्ये दुसऱ्या व्यक्तीची मदत घेणे आवश्यक असते. मदत देणाऱ्या व्यक्तीला त्या अंध-अपंग व्यक्तीने मत कोणाला दिले हे समजते. त्याची त्याने परिस्फुटता करता कामा नये. गोपनीयतेच्या निर्वाहनाच्या तरतुदीचे हे कलम आहे.

कलम ३० व ३१ ची तरतूद व लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ कलम १२९ व १३४ च्या तरतुदी सारख्या आहेत.

निवडणुकीच्या कामासाठी मतदानकेंद्रावर काम करणाऱ्या सरकारी नोकराने कोणाही मतदाराचे मत देण्याबद्दल वा न देण्याबद्दल मन वळविण्याचा, किंवा त्यास प्रवृत्त करण्याचा प्रयत्न करू नये. मतदानासाठी मतदारावर कोणत्याही प्रकारे गैरवाजवी दबाव आणू नये. तसे करणे हा गुन्हा आहे व त्यास गुन्हा घडल्यास तुरुंगवासाची किंवा दंडाची किंवा दोन्हीही शिक्षा होऊ शकते.

इंडियन पीनल कोड कलम २१ प्रमाणे सरकारी नोकर हे लोक-सेवक आहेत. त्यांना संरक्षण आहे. नोकरीच्या संदर्भात त्यांचे हातून गुन्ह्याचे कृत्य घडल्यास त्यांच्या वरिष्ठ खातेप्रमुखांच्या पूर्वपरवानगीशिवाय त्याचेविरुद्ध कोणत्याही कोर्टात खटला चालविता येत नाही. मतदानकेंद्रावर काम करणाऱ्या सरकारी नोकराने, या कलमात सांगितलेले गुन्ह्याचे कृत्य केल्यास त्याचेवर खटला भरण्यापूर्वी कलेक्टरची पूर्वपरवानगी आवश्यक आहे.

मतदानकेंद्रातून मतपत्रिका हलविणे हा गुन्हा होय

३२. [१] निवडणुकीत, जो कोणी इसम, मतदानकेंद्राबाहेर मतपत्रिका लबाडीने नेईल किंवा नेण्याच्या प्रयत्नात राहील किंवा असे कृत्य करण्यात मदत करील किंवा सहभागी होईल त्यास दोषसिद्धीनंतर एक वर्षपर्यंत वाढविता येईल इतक्या कैदेची किंवा रुपये पाचशेपर्यंत दंडाची किंवा दोन्ही शिक्षा केली जाईल.

[२] पोटकलम (१) खालील गुन्हा कोणी इसमाने केला आहे अथवा करील असे विश्वास ठेवण्यासारखे कारण मतदानकेंद्रावरील अध्यक्षीय अधिकाऱ्यास आहे असे वाटल्यास, अशा अधिकाऱ्याने, असा इसम मतदानकेंद्र सोडून जाणेपूर्वी अटक करावी किंवा अशा इसमास अटक करण्याचा आदेश पोलीस अधिकाऱ्यास द्यावा आणि पोलीस अधिकाऱ्याने अशा इसमाची झडती घ्यावी अथवा झडती घेण्यास उद्युक्त व्हावे.

परंतु असे, की जेव्हा स्त्रीची झडती घेणे आवश्यक असेल तेव्हा कटाक्षित सभ्यतेने दुसऱ्या स्त्रीकडून झडती घेवविली पाहिजे.

[३] अटक केलेल्या इसमाचे झडतीत कोणतीही मतपत्रिका सापडली तर अध्यक्षीय अधिकाऱ्याने ती पोलीस अधिकाऱ्याचे ताब्यात सुरक्षणासाठी दिली पाहिजे.

[४] पोटकलम (१) खालील गुन्हा दखलपात्र आहे.

निवडणुकीचे इतर गुन्हे व त्यासाठी दंडन

३३. [१] निवडणुकीच्या गुन्ह्यासाठी इसम दोषी ठरेल, जर कोणत्याही निवडणुकीत, त्याने

(अ) कोणतीही नामांकन-पत्रिका लबाडीने फाडली अथवा नष्ट केली, किंवा

(ब) कोणतीही यादी, नोटीस किंवा निर्वाचन अधिकाऱ्याने त्याचे अधिकारात कोणताही दस्तऐवज फाडला अथवा नष्ट केला अथवा हालविला, किंवा

(क) कोणतीही मतपत्रिका अथवा कार्यालयीन ठसा उमटविलेली मतपत्रिका, लबाडीने फाडली किंवा नष्ट केली, किंवा

(ड) आवश्यक अधिकाराशिवाय कोणा इसमास मतपत्रिका दिली किंवा कोणा इसमाकडून कोणतीही मतपत्रिका मिळविली किंवा कोणतीही मतपत्रिका ताब्यात ठेवली किंवा

(ई) आवश्यक अधिकाराशिवाय मतपेटी किंवा निवडणुकीनंतर वापरावयाची मतपत्रिका घेतली, नष्ट केली, उघडली, किंवा अन्यथा अधिक्षेपित केली किंवा

(फ) लबाडीने किंवा आवश्यक अधिकाराशिवाय, जसे असेल तसे, वरील कोणतेही कृत्य करण्यास उद्युक्त होईल अथवा असे कृत्य करण्यास स्वेच्छेने कोणास मदत करील अथवा त्यात सहभागी होईल.

[२] कोणताही इसम या कलमाखालील गुन्ह्याबद्दल दोषी ठरला, तर त्यास

(अ) जर तो निर्वाचन अधिकारी किंवा मतदानकेंद्रावरील अध्यक्षीय अधिकारी किंवा इतर कोणी अधिकारी अथवा कारकून अथवा इतर कोणी निवडणुकीशी संबंधित कार्यालयीन कामासाठी नेमलेला असेल, तर दोषसिद्धीनंतर, दोन वर्षांपर्यंत वाढविता येईल अशा कैदेची किंवा दंडाची किंवा दोन्ही शिक्षा केली जाईल.

(ब) जर तो इसम दुसरा कोणी इसम असेल, तर दोषसिद्धीनंतर, सहा महिने-पर्यंत वाढविता येईल अशा कैदेची किंवा दंडाची किंवा दोन्ही शिक्षा केली जाईल.

[३] या कलमाचे कारणास्तव, निवडणुकीच्या कामात इसमाने भाग घ्यावा असे ज्याचे काम असेल अशा इसमाचे काम, किंवा कामाचा भाग, यात मतमोजणी

किंवा निवडणुकीनंतर वापरलेल्या मतपत्रिकांची किंवा अशा निवडणुकीशी संबंधित अशा इतर दस्तऐवजांची जबाबदारी यांचा समावेश आहे. " कार्यालयीन कर्तव्य " असल्याचे समजले जाईल. पण " कार्यालयीन कर्तव्य " या आशयात, या कायद्याने किंवा या कायद्याखालील कोणतेही कामाव्यतिरिक्त इतर काम सोपविले असेल त्यांचा यात समावेश नाही.

[४] पोटकलम (२) चे सदर (ब) खालील गुन्हा दखलपात्र आहे.

विशिष्ट गुन्ह्यासाठी फिर्याद

३४. कलम ३० किंवा कलम ३१ किंवा कलम ३३ चे पोटकलम (२) चे सदर (ब) प्रमाणे कोणत्याही गुन्ह्याची दखल, कलेक्टरने दिलेल्या आदेशान्वये किंवा आदेशाखाली तक्रार केलेली असल्याशिवाय न्यायालयाने घेता कामा नये.

निवडणुकीसाठी जागा, गाड्या मागविणे

३५. [१] कलेक्टरला किंवा कलेक्टरने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याला (यापुढे त्यास ' रिक्विझिशनिंग अधिकारी ' म्हटले जाईल. याचे मराठी भाषांतर ' बलाहारी अधिकारी ' असे होऊ शकेल.)

असे वाटले की; निवडणुकीशी संबंधित कामासाठी –

(अ) मतदानकेंद्र म्हणून वापर करण्याचे कारणास्तव किंवा मतदानानंतर मतपेटचा ठेवण्यासाठी कोणत्याही जागेची जरुरी आहे किंवा जरुरी लागण्यासारखी आहे, किंवा

(ब) कोणत्याही मतदानकेंद्राकडे किंवा केंद्रापासून मतपेट्यांच्या वाहतुकीच्या कारणास्तव किंवा अशा निवडणुकीचे कामात स्थैर्यत्व निर्वाहनासाठी पोलीसदलातील सदस्यांना किंवा अशा निवडणुकीशी निगडित असणारी कर्तव्ये बजावणेसाठी कोणी अधिकारी किंवा इतर इसम यांना नेण्या-आणण्याचे कारणास्तव कोणतेही वाहन, गाडी किंवा जनावर यांची जरुरी आहे अथवा जरुरी लागण्यासारखी आहे; तर

रिक्विझिशनिंग अधिकाऱ्याने लेखी आदेशाने अशी जागा, किंवा असे वाहन, गाडी किंवा जनावर, जसे असेल तसे, ताब्यात घ्यावे आणि ताब्यात घेण्याच्या संबंधात, पुढे त्वरा आणि जरुरी वाटेल त्याप्रमाणे आदेश द्यावा.

परंतु असे, की उमेदवाराच्या अशा निवडणुकीशी संबंधित, उमेदवार किंवा त्याचा एजंट यांनी कायद्याने वापर करीत असेल अशी गाडी, वाहन किंवा जनावर, अशा निवडणुकीचे या कलमाखाली मतदान पूर्ण होईपर्यंत ताब्यात घेता कामा नये.

[२] रिक्विझिशनिंग अधिकाऱ्यास, जो मालक आहे असे समजले जात असेल अशा इसमास किंवा मालमत्ता ज्याचे ताब्यात आहे अशा इसमास उद्देशून लेखी

आदेश दिल्यावर आणि ज्याला उद्देशून असा आदेश असेल त्याचेवर कलम ३२५ खाली नोटीस म्हणून विहित पद्धतीने बजावल्यावर, रिक्विझिशन अमलात आल्याचे समजले जाईल.

[३] असा आदेश ज्याला उद्देशून असेल अशा कोणाही इसमावर, त्याचे ताब्यात असणारी अशी जागा, किंवा अशी गाडी किंवा वाहन किंवा जनावर, रिक्विझिशनिंग अधिकाऱ्यास किंवा आदेशात स्पष्ट असेल अशा दुसऱ्या अधिकाऱ्यास देणे बंधनकारक राहील.

[४] जेव्हा पोटकलम (१) खाली कोणतीही मालमत्ता ताब्यात घेतली जाईल तेव्हा या पोटक लमात नमूद असलेल्या कारणास्तव ज्या कालावधीपर्यंत ताब्यात घेतली असेल तो कालावधी संपल्यानंतर अधिक कालावधी ती मालमत्ता ताब्यात ठेवण्यासाठी वाढवू नये.

स्पष्टीकरण – या कलमाचे कारणास्तव 'जागा' म्हणजे कोणतीही जमीन, इमारत किंवा इमारतीचा भाग आणि यात झोपडी, बखळ किंवा इमला किंवा तिचा कोणताही भाग यांचा समावेश होतो.

[५] या कलमाखालील कोणत्याही आदेशाचा भंग जो कोणी इसम करील; त्यास दोषसिद्धीनंतर एक वर्षपर्यंत वाढविता येईल इतक्या कैदेची किंवा दंडाची किंवा दोन्ही शिक्षा केली जाईल.

भरपाईबद्दल देणे

३६. [१] मागील कलमाच्या अनुसरणार्थ जेव्हा रिक्विझिशनिंग अधिकारी, कोणतीही जागा, कोणतीही गाडी, वाहन किंवा जनावर ताब्यात घेईल तेव्हा, भरपाई घेण्यास पात्र असणाऱ्या इसमास नगरपालिकेने भरपाई दिली पाहिजे. रिक्विझिशनिंग अधिकाऱ्याने खालील बाबींचा विचार करून भरपाईची रक्कम निश्चित केली पाहिजे; जसे

(अ) जागेच्या प्रकरणी –

(i) जागेच्या संबंधांत देय असणारे भाडे किंवा जर भाडे देय नसेल, तर त्या वसतीतील तत्समान जागेचे देय असणारे भाडे,

(ii) हितसंबंधित इसमास, ताब्यात घेतलेल्या जागेच्या परिणामी त्याचे निवासस्थान किंवा व्यवसायाचे ठिकाण त्यास बदलणे भाग पडले तर अशा बदलाबाबत येणारा तदनुषंगिक वाजवी खर्च, काही असल्यास

(ब) कोणतीही गाडी, वाहन, जनावर यांचे बाबतीत, अशा वसतीतील अशा गाडीचे, वाहनाचे, जनावराचे प्रचलित असणाऱ्या दराचे भाडे.

[२] हितसंबंधित कोणी इसम किंवा भरपाई मिळविणेस पात्र असल्याबद्दल

हक्क सांगणारा कोणी इसम, रिक्विझिशनिंग अधिकाऱ्याच्या आदेशाने, या कारणावरून –

(i) भरपाईच्या रकमेचे निश्चितीकरण, किंवा

(ii) भरपाई मिळविण्यास पात्र असलेल्या इसमाचे नाव,

(iii) दोन किंवा अधिक इसमांतील भरपाई रकमेचा भाग

व्यथित झाल्यास, पोट कलम (१) खालील आदेश मिळाल्यापासून एक महिन्यात किंवा जर आदेश त्याला उद्देशून नसेल तर, आदेशाच्या तारखेपासून एक महिन्यात जिल्हा न्यायालयात त्याने आवाहन दाखल करावे आणि अशा आवाहनाचा निर्णय अंतिम समजला पाहिजे.

स्पष्टीकरण – या कलमाचे कारणास्तव 'हितसंबंधित इसम' याचा आशय असा की –

(अ) जागेच्या प्रकरणी,

(i) ताब्यात घेण्यापूर्वी लगतपूर्व जागा प्रत्यक्षतः ज्याचे ताब्यात होती तो, किंवा

(ii) जेव्हा कोणाही इसमाचे प्रत्यक्षतः ताब्यात नसेल, तेव्हा अशा जागेचा मालक.

(ब) कोणतीही गाडी, वाहन, किंवा जनावर या प्रकरणी, त्यांचा मालक आणि

(क) भरपाई मिळणेस पात्र असणारा इतर कोणी इसम. परंतु असे, की असा ताबा घेण्यापूर्वी लगतपूर्व मालकाव्यतिरिक्त इतर कोणा इसमाचे ताब्यात अशी कोणतीही गाडी, वाहन, किंवा जनावर होते, तो इसम व मालक यांच्यामध्ये, ताब्यात घेतल्याच्या संबंधात देय असणारी भरपाई रकमेचे ते राजी असतील अशा पद्धतीने किंवा राजी होत नसल्यास रिक्विझिशनिंग अधिकारी ठरवील अशा पद्धतीने भाग करावेत.

माहिती मिळविण्याची शक्ती

३७. [१] रिक्विझिशनिंग अधिकाऱ्याने, कलम ३५ खाली कोणतीही मालमत्ता ताब्यात घेण्याचे हेतूने, किंवा कलम ३६ खाली भरपाई देणे निश्चित करावयाच्या आदेशास्तव त्या आदेशात स्पष्ट करून अशा मालमत्तेची त्याचे ताब्यात असल्या-संबंधीची माहिती अशा अधिकाऱ्यास कळवावी.

[२] जर कोणी इसम, की ज्यास उद्देशून असा आदेश असेल, तो माहिती पुरविण्याचे नाकारील किंवा चुकीची खोटी माहिती हेतुपुरस्सर पुरवील तर त्यास दोषसिद्धीनंतर तीन महिनेपर्यंत वाढविता येईल इतक्या कैदेची किंवा दंडाची किंवा दोन्ही शिक्षा केली जाईल.

ताब्यात घेणेची जागा, ताब्यातून मुक्त करणे

३८. [१] ताब्यात घेणेची जागा जो कोणी इसम कलम ३५ खालील आदेशाचा भंग करून ताब्यात ठेवील, त्यास यासंबंधात रिक्विझिशनिंग अधिकाऱ्याने शक्तिप्रदान केलेल्या अधिकाऱ्याने जागेतून ताबडतोब हुसकून लावावे.

[२] शक्तिप्रदान्वित अशा अधिकाऱ्याने जाहीर वाजवी ताकीद दिल्यानंतरही न जुमानणाऱ्या, सोयी काढून न घेणाऱ्या, बाजूस न होणाऱ्या किंवा कुलूप न उघडणाऱ्या, कडी न काढणाऱ्या, दरवाजा किंवा इमारत न उघडणाऱ्या स्त्रीला हुसकून लावणेस परिणामकारक अशी कोणतीही आवश्यक कृती करावी.

जागेचा ताबा परत करणे

३९. [१] कलम ३५ खाली ताब्यात घेतलेली कोणतीही जागा जेव्हा ताब्यातून परत करणे असेल तेव्हा ताब्यात घेतल्याचे वेळी ती ज्याचे ताब्यातून घेतली असेल त्या इसमाला किंवा जेव्हा असा कोणी इसम तेथे नसेल, तेव्हा अशा ताब्यात घेतलेल्या जागेचा मालक असल्याचे रिक्विझिशनिंग अधिकाऱ्यास समजले जात असेल अशा इसमाला ताबा परत दिला पाहिजे. असा ताबा, ताब्यात असताना असलेल्या सर्व दायित्वातून पूर्ण विमुक्त होईल असा निर्वेध ताबा दिला पाहिजे. मात्र ज्याला जागेचा ताबा दिला असेल त्या इसमाविरुद्ध जागेच्या संबंधात ताब्याबद्दलच्या कोणत्याही पात्र हक्कासाठी कायदेशीर कारवाई होणे असेल तर त्या हक्कास बाधा येता कामा नये.

[२] कलम ३५ खाली ताब्यात घेतलेल्या जागेचा ताबा जेव्हा पोट कलम (१) खाली परत ज्यास द्यावयाचा तेव्हा तो इसम किंवा त्याचा एजंट किंवा त्याचे वतीने ताब्याचा स्वीकार करणारा कोणी शक्तिप्रदानित इसम जर आढळला नाही किंवा सहजी उपलब्ध झाला नाही तर रिक्विझिशनिंग अधिकाऱ्याने ताब्यात घेतलेली जागा ताब्यातून मुक्त केल्याची नोटीस कार्यालयीन राजपत्रात प्रसिद्ध करण्यास व जागेच्या ठळक भागावर डकविण्यास उद्युक्त झाले पाहिजे.

[३] पोट कलम (२) मध्ये निर्देशित केलेली नोटीस जेव्हा कार्यालयीन राजपत्रात प्रसिद्ध होते, तेव्हा अशा नोटीसमध्ये स्पष्ट केलेली जागा, ताब्याचे अधीन, प्रसिद्ध केलेल्या दिवशी आणि दिवसापासून, बंद केली पाहिजे आणि ताबा घेणेस पात्र असणाऱ्या इसमाचे ताब्यात ती दिली असे समजले गेले पाहिजे आणि रिक्विझिशनिंग अधिकारी किंवा नगरपालिका अशा तारखेच्या नंतरच्या कोणत्याही कालावधीसाठी अशा जागेच्या संबंधात कोणतीही भरपाई किंवा इतर हक्क यास जबाबदार राहणार नाही.

भाष्य

कलम ३२ ची तरतूद, लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम १३५ च्या तरतुदीसारखी आहे.

कलम ३३ ची तरतूद, लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम १३६ च्या तरतुदीसारखी आहे.

कलम ३४ ची तरतूद लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम १३७ च्या तरतुदीसारखी आहे.

कलम ३२, ३३, ३४ प्रमाणे गुन्ह्याचे कृत्य घडल्यास गुन्हा करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध खटला भरण्यापूर्वी कलेक्टरची परवानगी घ्यावी लागते.

कलम ३५ ची तरतूद आणि लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम १६९ ची तरतूद सारखी आहे.

निवडणुकीशी संबंध असणाऱ्या कलेक्टरला किंवा यासंबंधात त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याला निवडणुकीच्या कामासाठी आवश्यक वाटल्यास, मतपेटचा ठेवण्यासाठी, मतदानाच्या वाहतुकीसाठी त्याला सोईस्कर वाटेल त्याप्रमाणे कोणतीही जागा, वाहन, गाडी ताब्यात घेण्याचा, ताब्यात ठेवण्याचा अधिकार आहे. निवडणूक कामावर असणाऱ्या पोलीसदलातील पोलिसांच्या वाहतुकीसाठीसुद्धा जागा किंवा वाहन-गाडी ताब्यात घेण्यापूर्वी तशी लेखी आज्ञा काढणे जरुरीचे आहे. मात्र अशा प्रकारे ताब्यात घेतलेल्या जागेचा, वाहनाचा वापर उमेदवाराला त्याच्या निवडणुकीच्या कामासाठी करता येणार नाही. लेखी आज्ञा जागेच्या, वाहनाच्या मालकाच्या नावाने काढली पाहिजे. लेखी आज्ञेचा मसुदा या कायद्यातील कलम ३२५ प्रमाणे विहित केला आहे. लेखी आज्ञेचा भंग करणारा जागेचा, वाहनाचा मालक किंवा जागेचा, वाहनाचा ताबेदार गुन्हेगार ठरतो व त्यास या कलमातील तरतुदीप्रमाणे शिक्षा होऊ शकते. ताब्यात घेतलेल्या जागेचे, वाहनाचे भाडे, भरपाई सरकारने केली पाहिजे अशी तरतूद या कायद्याने केलेली आहे. जर कोणी अडथळा करील तर सक्तीने तो अडथळा दूर सारण्याचा अधिकार कलेक्टरला किंवा यासंबंधात त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याला आहे.

निवडणुकीचे काम संपताच, वरीलप्रमाणे ताब्यात घेतलेली जागा, वाहन ज्याचेकडून ताब्यात घेतली असेल त्याच्या ताब्यात परत दिली पाहिजे हे बंधन या कायद्यात आहे. ताबा परत घेण्यास कोणी इसम, मालक किंवा ताबेदार पुढे आला नाही, आणि म्हणून ताबा देता आला नाही तर कायद्यात सांगितलेल्या विहित पद्धतीचा अवलंब करून सरकारी अधिकाऱ्याने ताबा सोडून द्यावा.

नगरसदस्यांच्या पदाचा सत्रकाल

४०. [१] या कायद्यातील अन्यत्र तरतुदीरक्षित, सर्वसाधारण निवडणुकीत निवडून आलेल्या नगरसदस्यांनी पाच वर्षे सत्रासाठी पद धारण केले पाहिजे, की राज्य सरकारला अपवादात्मक परिस्थितीत कार्यालयीन राजपत्रात सूचनापत्राने, अशा सूचनापत्रात स्पष्ट केलेल्या कारणावरून एकूण वर्षे सहापेक्षा अधिक नाही

इतका सत्रकाल वाढविता येईल.

[२] अशा नगरसदस्यांच्या पदाच्या सत्रकालाचा प्रारंभ कलम १९ अ खाली नगरसदस्यांना निवडून घेण्याची विशेष सभा ज्या तारखेस भरली जाईल त्या तारखेस होईल.

[३] पोट कलम (१) आणि (२) यांत काहीही नमूद असले तरी, मावळत्या नगरसदस्यांच्या पदाचा सत्रकाल, अशी सभा ज्या दिवशी असेल त्या आधीच्या लगतपूर्व दिवसापर्यंत वाढवून, संपला असे समजणेत येईल.

[४] पोटनिवडणुकीत निवडून आलेला सदस्य, तो ज्या नगरसदस्यांच्या रिकाम्या झालेल्या जागेवर निवडून आला असेल त्याचा सत्रकाल असेपर्यंत, जसे काही ती जागा रिकामी झाली नाही असे गृहीत धरून, पदावर राहील.

[५] निवडून घेतलेल्या नगरसदस्याचा पदाचा सत्रकाल, ज्या तारखेस त्याचे नाव कार्यालयीन राजपत्रात प्रसिद्ध झाले असेल, त्या तारखेपासून सुरू होईल आणि निवडून आलेल्या नगरसदस्यांच्या सत्राबरोबर तो सत्रकाल संपुष्टात येईल.

[६] नियुक्त नगरसदस्यांच्या पदाचा सत्रकाल, पोट कलम (२)मध्ये निर्देशित केलेली सभा ज्या तारखेस भरली असेल त्यापूर्वी जर नियुक्त झालेला असेल तर अशी सभा भरल्याच्या तारखेपासून की ज्या तारखेस कार्यालयीन राजपत्रात त्याच्या नियुक्तीची प्रसिद्धी होईल, त्या तारखेपासून सुरू होईल. त्याच्या पदाचा सत्रकाल, निवडून आलेल्या नगरसदस्यांबरोबर वाढविला जाईल.

[७] कलम १९ चे पोट कलम (१) खाली, कार्यालयीन राजपत्रात सर्वसाधारण निवडणुकीचा निकाल प्रसिद्ध होईल अशा सर्वसाधारण निवडणुकीत निवडून आलेल्या नगरसदस्यांचा पदाचा सत्रकाल, प्रसिद्धीनंतर प्रथम, कार्यालयीन राजपत्रात ज्या तारखेस त्याचे नाव प्रसिद्ध झाले असेल त्या तारखेपासून सुरू होईल, पण ज्या नगरसदस्यांच्या निवडणुकीचा निकाल प्रथमतः प्रसिद्ध झाला असेल त्यांच्याबरोबरच सत्रकाल संपुष्टात येईल.

भाष्य

लोकशाही पद्धतीत वतनदारी कार्यपद्धतीला वाव नाही. वतनदारी पद्धत नाही म्हणजे सत्तेला कालमर्यादा घालावीच लागते. जे थोड्या किंवा तात्पुरत्या कालावधीसाठी सत्तेवर असतात ते सत्तेवर राहण्यासाठी कालावधीची वाढ कशी करावी यासाठी कारणे आणि निमित्ते शोधत असतात. आणि म्हणून लोकशाही कार्यपद्धतीत सत्तेला काळाची मर्यादा घालणे तर्कसुसंगत आहे. विधिमंडळाला, सत्तला काळाची मर्यादा घालावीच लागते. (सूरज प्रकाश वि. स्टेट ऑफ पंजाब, ए. आय. आर. १९६८ दिल्ली ३०)

या कायद्याच्या, या कलमात सांगितलेला सत्रकालावधी जनरल निवडणूक

झाल्यानंतर ज्या तारखेस पहिली सभा निवडून आलेल्या कौन्सिलरांची झाली असेल–की ज्या सभेत नगरपालिकेच्या अध्यक्षाची व उपाध्यक्षाची निवड करतात–ती सभा झाली असेल त्या तारखेपासून, सुरू होतो.

या कायद्याच्या कलम १८ (२) च्या तरतुदीप्रमाणे जो कौन्सिलर नॉमिनेटेड आहे, त्याचाही सत्रकाल वर नमूद केलेल्या पहिल्या सभेच्या तारखेपासून सुरू होतो. निवडून आलेल्या किंवा निवडून आल्याचे समजले गेले पाहिजे अशी या कायद्यात जी तरतूद आहे त्याप्रमाणे निवडून आल्याचे ज्यांना समजले जाते अशा कौन्सिलरांचा, त्यांच्या पदधारणेचा सत्रकाल या कलमातील तरतुदीप्रमाणे पाच वर्षांचा आहे. हा पाच वर्षांचा सत्रकाल अपवादात्मक विशिष्ट परिस्थितीत, शासकीय राजपत्रात सूचनापत्र प्रसिद्ध करून एकूण सत्रकाल सहा वर्षांपेक्षा जास्त होणार नाही इतका राज्यसरकारला वाढविता येतो. ज्या तारखेपासून उगवत्या कौन्सिलरांचा सत्रकाल सुरू होतो त्याच तारखेस मावळत्या कौन्सिलरांचा सत्रकाल संपतो. भारतातील निरनिराळ्या राज्यांच्या नगरपालिका कायद्यात कौन्सिलरांच्या सत्रकाळात एकवाक्यता नाही. म्हैसूर म्युनिसिपालिटीज ॲक्ट १९६४ यातील कौन्सिलरांच्या पदधारणेचा सत्रकाल ४ वर्षांचा आहे.

निवडून आलेल्या कौन्सिलरांचे हक्क, हे सर्वसाधारण हक्क नसून ते वैधतेतून बाहेर आलेले, व्यक्त झालेले हक्क आहेत. ज्या वैधतेतून हे हक्क आले आहेत त्या वैधतेच्या मर्यादा या हक्काला आहे. हक्क असणे आणि हक्काचा वापर करणे या दोन्हींत फरक आहे. जर एखाद्या कौन्सिलरास म्युनिसिपालिटीच्या कौन्सिलरांच्या मीटिंगला उपस्थित राहण्यास, उपस्थितीच्या वा अन्य कारणावरून इतर कौन्सिलरांनी मज्जाव केला तर त्यांनी केलेल्या मज्जावावर सिव्हिल कोर्टात दावा प्रविष्ट करून स्थगिती मिळविता येते. (हिरा वि. छेट्टू, १९६७ अलाहाबाद लॉ जर्नल ५४).

म्युनिसिपालिटीच्या प्रशासन व्यवहारात, यासंबंधी तयार केलेल्या रीति-नियमांतील तरतुदींच्या अधीन राहून प्रत्येक कौन्सिलराला लक्ष घालण्याचा हक्क आहे. साहजिकच प्रत्येक कौन्सिलर हा कौन्सिलचा एक जबाबदार घटक आहे. लोकहिताशी संबंधित असणाऱ्या कायद्यातील तरतुदीनुसार अशा कौन्सिलरांनी आपल्या वर्तनाची उच्च पातळी राखावी अशी अपेक्षा जनतेने करणे यात काही चूक नाही. कौन्सिलर हा ज्या मतदारसंघातून निवडून आला असेल त्या मतदार-संघाचा तो एक पालक-घटक आहे असे त्या मतदारसंघातील मतदारांना वाटते व कौन्सिलराने त्या मतदारसंघाच्या मतदारांचे आपण सेवक आहोत अशा भावनेने वागावे.

निवडून आलेल्या कौन्सिलराच्या पदाचा सत्रकाल
त्याच्या मृत्यूमुळे,
राजीनामा दिल्यामुळे,

काढून टाकल्यामुळे
तशा संबंधित तारखेला संपतो. तो ज्या पदावर निवडून आला होता त्या पदाचा सत्रकाल, वर सांगितलेल्या कारणास्तव त्याच्यापुरता संपतो, पण पदाचा सत्रकाल कायद्यातील तरतुदींप्रमाणे विहित कालावधीचा जो असेल तो व तेवढ्या कालावधी-पर्यंत पुढे चालू राहतो. उर्वरित कालावधीत त्याच्या जागी जो दुसरा कोणी इसम कौन्सिलर म्हणून येईल, त्याच्या पद-उपभोगाचा तो काल राहील. या कायद्यातील कलम ३१५ (३) च्या तरतुदीप्रमाणे कौन्सिलच्या विसर्जनाची आज्ञा होताच कौन्सिलरांनी, कौन्सिल पद धारण करीत असतील ते पद सोडले पाहिजे. तद्वतच जेव्हा एखाद्या नगरपालिकेच्या क्षेत्रात फेरबदल होतो–म्हणजे क्षेत्रविभाग महा-नगरपालिकेच्या क्षेत्रात समाविष्ट केला गेला अथवा दुसऱ्या नगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ट केला गेला वा अशाच अन्य कारणांमुळे क्षेत्र-विभागातील फेरबदलाने संपुष्टन झाले– (या कायद्यातील कलम ६ च्या तरतुदीप्रमाणे राज्यशासनाने राजपत्रात सूचनापत्र प्रसिद्ध केले असेल त्या अनुसार) तर शासनाला कलम ३४०च्या तरतुदीप्रमाणे अस्तित्वात असणाऱ्या कौन्सिलरांनी त्याचे कौन्सिल पद सोडावे अशी आज्ञा बजावण्याचा अधिकार आहे.

ज्याचे नाव कलम १९अ च्या तरतुदीप्रमाणे राजपत्रात प्रसिद्ध झाले असेल अशा कौन्सिलरांना ही सत्र कालावधीची तरतूद लागू होते. जर अध्यक्षाच्या कारवाईने कलम ५५च्या तरतुदीप्रमाणे कौन्सिलचे संपुष्टन झाले असेल तर पुनर्रचित झालेल्या कौन्सिलच्या नव्या कौन्सिलरांना उर्वरित सत्रकाल संपेपर्यंत कौन्सिल पद धारण करता येते.

उगवत्या कौन्सिलरांचा सत्रकाल केव्हा सुरू होतो व मावळत्या कौन्सिलराचा सत्रकाल केव्हा संपुष्टात येतो हे वर सांगितले आहे. असा सत्रकाल संपुष्टात येण्याच्या अखेरच्या टप्प्यातील एका वर्षाच्या कालावधीत को-ऑप्टेड कौन्सिलरांचे पद रिकामे असेल तर ते भरले जाऊ नये.

नगरसदस्यांचा राजीनामा

४१. [१] अध्यक्षाला राजीनामा लेखी सादर करून नगरसदस्याला त्याच्या पदातून मुक्त होता येईल.

[२] असा राजीनामा अध्यक्षाला मिळाल्यावर परिणामीत येईल.

भाष्य

या कलमातील तरतुदींप्रमाणे कोणाही कौन्सिलरला म्युनिसिपल कौन्सिलच्या अध्यक्षाला राजीनामा लेखी सादर करून कौन्सिल-सदस्याच्या जबाबदारीतून मुक्त होता येते.

अध्यक्षाला, कौन्सिलरने सादर केलेला लेखी राजीनामा मिळेल तेव्हापासून तो परिणामीत आल्याचे समजले जावे.

पदसत्राचा कालावधी पूर्ण होण्यापूर्वीच असा राजीनामा दिला असेल तर मागील कलमाच्या तरतुदीच्या अधीन ते रिक्त झालेल पद भरता येते.

ज्याला कौन्सिल सदस्याच्या जबाबदारीचे ओझे सांभाळणे नको असेल अशा कौन्सिलरने राजीनामा द्यावा. राजीनामा देणारा कौन्सिलर इलेक्टेड कौन्सिलरच असला पाहिजे असे काही नाही. तो को-ऑप्टेड असो किंवा नॉमिनेटेड असो, त्याने त्याचा राजीनामा अध्यक्षाला उद्देशूनच लिहिला पाहिजे आणि अध्यक्षालाच सादर केला पाहिजे. राजीनामा देण्यामागील हेतू कोणताही असो, राजीनामा देण्याचा हेतू योग्य असेल, त्यात सद्हेतू असेल, तो नियमान्वित असेल आणि तसे अध्यक्षाला वाटले तरी त्याची चौकशी कलेक्टर करू शकतात. (गंगाबाई जगन पाडोरे वि. प्रेसिडेंट म्यु. कौन्सिल तुमसर ७२ बॉम्बे लॉ रिपोर्टर २१४).

एखाद्या कौन्सिलरला कौन्सिलरच्या पदावरून, कायद्यातील तरतुदीनुसार बाजूस सारावयाचे असेल तर कलम ४२ प्रमाणे राज्य शासनाने त्यास नोटीस दिली पाहिजे. अशी नोटीस मिळाल्यावर, केवळ त्याने राजीनामा दिला म्हणून त्याला पदावरून दूर सारले असे होत नाही. कारणे दाखवा नोटीसचा परिणाम राजीनाम्यामुळे थांबत नाही. हा अपवाद वगळता पुन्हा कौन्सिलर होण्यासाठी तो अनर्हत ठरत नाही.

कोणत्या तारखेपासून आपल्या राजीनाम्याला परिणामीत करावे हे राजीनाम्यात कौन्सिलरने नमूद केले असेल आणि राजीनाम्याच्या कारणावरून कौन्सिलरच्या पदावरून त्यास बाजूस करायचे असेल, तर राजीनाम्यात त्याने नमूद केलेल्या तारखेपूर्वी, जरी असा राजीनामा त्या तारखेपूर्वी अध्यक्षाला मिळाला असला तरीही, राजीनाम्याच्या कारणावरून कौन्सिलरच्या पदातून मुक्त करता येत नाही. (वाय. के. माथूर वि. कमिशनर म्यु. कॉर्पोरेशन दिल्ली, ए. आय. आर. १९७४ दिल्ली ५८).

पदातून काढून टाकण्यातील नगरसदस्यांचे दायित्व

४२. [१] राज्य सरकारने स्वतः होऊन किंवा नगरपालिकेच्या शिफारशीने जर कर्तव्य करीत असताना कोणत्याही गैरवर्तनाबद्दल किंवा कोणत्याही घृणास्पद वर्तनाबद्दल दोषी ठरला तर कोणत्याही नगरसदस्याला त्याच्या पदावरून काढून टाकावे.

[२] त्याचसारखे, राज्य सरकारने, राज्य सरकारच्या मताने नगरसदस्य म्हणून कर्तव्य करण्यास असमर्थ आहे असे वाटेल त्या कोणत्याही नगरसदस्यास काढून टाकावे.

परंतु असे की या कलमाखाली काढून टाकणे असलेला नगरसदस्य अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष म्हणून कर्तव्य करीत असताना काढून टाकता येणार नाही.

[३] नगरपालिकेने पोट कलम (१) किंवा (२) चे कारणास्तव कोणत्याही नगरसदस्यास काढून टाकण्याचा शिफारशीचा ठराव आणि राज्य सरकारला, काढून टाकण्याचा आदेश, ज्याचे संबंधात असेल त्या नगर सदस्यास, अशी शिफारस किंवा आदर्श का दिला जाऊ नये याची कारणे दाखविण्याची रास्त संधी दिल्याशिवाय जसे असेल तसे, दिला जाता कामा नये.

[४] पोट कलम (१) किंवा (२) खाली राज्य सरकार आदेश देईल त्या प्रत्येक प्रकरणी नगरसदस्य होण्यासाठी किंवा दुसऱ्या कोणत्याही स्थानिक प्राधीकरणाचा सदस्य किंवा सभासद होण्यासाठी अशा आदेशाचे तारखेपासून पाच वर्ष कालावधीसाठी तो नगरसदस्य अनर्हत असल्याचे ठरविले पाहिजे.

नगरसदस्याच्या नंतरच्या अनर्हतेवर राजीनामा आघात करीत नाही

४३. कलम ४१ खाली नगरसदस्यपदातून झालेला असला तरीही, जर तो त्यानंतर कलम ४२ चे पोट कलम (१) खाली दोषी असल्याचे आढळले तर राज्य सरकारने नगरसदस्य म्हणून किंवा इतर कोणत्याही स्थानिक प्राधीकरणाचा सदस्य किंवा सभासद म्हणून त्यास आदेशाच्या तारखेपासून पाच वर्षे कालावधीसाठी अनर्हत ठरविल्याचा आदेश दिला पाहिजे.

परंतु असे की राजीनामा दिल्याच्या तारखेपासून एक वर्ष संपल्यानंतर आणि त्यास सुनावणीची रास्त संधी दिल्याशिवाय कोणाही इसमाविरुद्ध अशी कृती केली जाता कामा नये.

भाष्य

म्युनिसिपालिटीसंबंधीच्या कायद्याने, म्युनिसिपल सदस्याला त्याच्या पदावरून काढून टाकणे असेल तर म्युनिसिपल कौन्सिलची तशी शिफारस राजशासनाला मिळावयास पाहिजे व राज्यशासनाने त्यास पदावरून काढले पाहिजे असा अधिकार राज्य शासनाला कायदे मंडळाने दिला आहे. हा अधिकार इच्छांकित "DISCRETION" आहे. कौन्सिलने शिफारस केली म्हणजे त्या कौन्सिलरला काढलेच पाहिजे असे बंधन राज्यशासनावर नाही, हे या कलमातील इंग्रजी MAY या शब्दावरून ध्वनित होते. अशी कौन्सिलची शिफारस नसताही कौन्सिलरला त्याच्या कौन्सिलपदावरून राज्यशासनाला काढता येते हे ON ITS OWN MOTION या शब्दरचनेवरून ध्वनित होते. कौन्सिलरला कौन्सिलपदावरून बाजूस करण्याची या कलमात तरतूद आहे, मग तो कौन्सिलर इलेक्टेड असो, को-ऑप्टेड असो वा नॉमिनेटेड असो. कौन्सिलरला पदावरून दूर सारण्याचा हुकूम काढण्यापूर्वी,

तो कौन्सिलर त्याचे कर्तव्य नीटपणे करीत नाही,

गैरवर्तनास्तव तो दोषी ठरला आहे,

त्याचे कर्तव्य बजावणेस तो असमर्थ आहे,

या कारणांची खात्री राज्यशासनानें करून घेतली पाहिजे. अशी खात्री करून घेतल्यावर त्या कौन्सिलरवर कारणे दाखवा नोटीस बजावली पाहिजे. त्याचा खुलासा ऐकून घेण्याची, सुनावणीची संधी त्यास दिली पाहिजे. इतके करूनही तो कौन्सिलर, इलेक्टेड असो, को-ऑप्टेड असो वा नॉमिनेटेड असो, गैरवर्तनामुळे काढून टाकणे असेल, तर काढून टाकण्याइतके ते गैरवर्तन गंभीर असले पाहिजे तरच काढून टाकणे न्यायाचे ठरेल. अशा गैरवर्तनामुळे काढल्यास तो पुढील पाच वर्षेपर्यंत स्थानिक प्राधीकरणाचा सदस्य होण्यासाठी अनर्हत ठरतो.

अध्यक्ष आणि उपाध्यक्ष, प्रथम कौन्सिलर आणि नंतर अध्यक्ष आणि उपाध्यक्ष आहेत; पण तरीही या कलमाच्या तरतुदीतून अध्यक्ष, उपाध्यक्ष यांना वगळले आहे. कौन्सिलर अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष पदावर असला तरी कौन्सिलरचे त्याचे पद नष्ट होत नाही. पण अध्यक्ष आणि उपाध्यक्ष पदावर असणाऱ्यांना त्या पदावरून काढून टाकण्याची या कायद्यातील तरतूद निराळी आहे. त्याचा विचार त्या संबंधित कलमाखालील भाष्यात करू.

कौन्सिलरच्या पदावरून काढण्यासाठी जे गैरवर्तन घसास लावावयाचे ते गैरवर्तन कौन्सिलर पदावर असताना, कौन्सिलरच्या पदाशी संबंधित असले पाहिजे. (सायरमान वि. स्टेट, १९५७ राजस्थान लॉ रिपोर्टर ३८५).

कौन्सिलर म्हणून काम करण्यास असमर्थता केवळ प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळेच उद्‌भवते असे नव्हे, तर इतर अनेक कामांच्या व्यापामुळेही अशी असमर्थता दुष्टोत्पत्तीस येते. काही कामे अशीही असू शकतात, की कौन्सिलरला म्युनिसिपल कौन्सिलच्या कामापेक्षा जास्त महत्त्व त्या इतर कामांतच वाटत असेल व त्याच इतर कामांत तो व्यग्र असेल तर म्युनिसिपल कौन्सिलच्या कामासाठी तो असमर्थच ठरणार.

गैरवर्तनास्तव काढून टाकण्यापूर्वी, गैरवर्तनाची चौकशी नैसर्गिक न्यायतत्त्वानुसार झाली पाहिजे. नैसर्गिक न्यायाची तत्त्वे पुढीलप्रमाणे :–

ज्याला आरोपापासून बचाव करावयाचा असतो, त्या आरोपिताला त्याचेवरील आरोप स्पष्टपणे बचावाची सुरुवात करण्यापूर्वी आगाऊ समजला पाहिजे.

त्याचेवरील आरोपाच्या संबंधात जो लिखित पुरावा असेल त्याच्या प्रती चौकशीचे कामकाज सुरू होणेपूर्वी अथवा फिर्यादी पक्षाचा पुरावा चालू असताना त्याला दिल्या पाहिजेत.

साक्षीदारांच्या साक्षी त्याच्या समक्ष नोंदवून घेतल्या पाहिजेत व त्या साक्षीतील त्याच्या विरुद्धची विधाने खोडून काढण्याची संधी त्यास दिली पाहिजे, म्हणजे

साक्षीदाराची उलटतपासणी त्यास घेऊ दिली पाहिजे.

फिर्यादी पक्षाचा साक्षीपुरावा संपल्यावर बचाव पक्षास त्याचा साक्षीपुरावा सादर करण्याची संधी दिली पाहिजे.

चौकशी अधिकारी म्हणून काम करणाराने सद्सद्विवेक बुद्धीने, निर्लेप आणि निःपक्ष बुद्धीने चौकशीचे काम केले पाहिजे.

नैसर्गिक न्यायतत्त्वांचे विवेचन ज्यात केले आहे असे अनेक न्यायालयीन निवाडे उपलब्ध आहेत. त्यांची यादी विस्तार भयास्तव देणे शक्य होणार नाही. इच्छुक वाचकांनी प्रस्तुत लेखकाचे "औद्योगिक कामगारांच्या गैरवर्तनाची चौकशी, स्वरूप पद्धत आणि कामकाज" हे पुस्तक वाचावे. त्यात नैसर्गिक न्यायतत्त्वांचे विवेचन न्यायालयीन निवाड्यांच्या उदाहरणांसह केले आहे.

कोणत्याही प्रकारचे गैरवर्तनामुळे नाही वा अकार्यक्षमतेचा ठपका नाही, तर केवळ राजीनामा दिल्यामुळे कौन्सिल-सदस्याच्या पदातून मुक्त होणारा नागरिक पुन्हा कौन्सिलर म्हणून वा अन्य स्थानिक प्राधीकरणाचा, स्थानिक मंडळ, महामंडळ यांचा सदस्य म्हणून पदधारणास अनर्हत ठरत नाही. मात्र ठपका ठेवून कौन्सिलरच्या पदातून ज्याला काढले आहे असा कौन्सिलर, ठपका ठेवलेल्या तारखेपासून पुढे पाच वर्षेपर्यंत कौन्सिलरचे पद अथवा अन्य स्थानिक प्राधीकरण, स्थानिक मंडळ, महामंडळ यांचे सदस्यपद धारण करणेस या कायद्याने अनर्हत ठरविले आहे.

पदधारणेच्या सत्रकालात नगरसदस्याची अनर्हता

४४. [१] नगरसदस्य पदधारणेस अनर्हत ठरविला पाहिजे, जर पदधारणेच्या कोणत्याही कालावधीत तो –

(अ) कलम १६ यातील पोट सदर (ई) आणि पोट सदर (आय) यात स्पष्ट केलेली अनर्हता सोडून, इतर कोणत्याही अनर्हतेच्या अधीन आहे अथवा असेल,

(ब) नगरसदस्य म्हणून किंवा कोणत्याही स्थानिक प्राधीकरणाचा सदस्य किंवा सभासद म्हणून, कलम १६ च्या पोट कलम (३)ची पोट सदरे (अ) (ब), (क), (ई) आणि (ग) यांत सांगितल्याप्रमाणे कोणतेही हित अथवा सहभाग की ज्यात तो अशीलाचे वतीने व्यावसायिक हितसंबंधित असेल त्या हितसंबंधाचे किंवा सहभागाचे मोल कितीही असो, त्याचा स्वतःचा किंवा त्याच्या भागीदाराच्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष हित वा सहभाग असल्याच्या बाजूने मत देण्यास, किंवा

(क) नगरपालिकेच्या बाजूने अथवा विरुद्ध कोणत्याही प्रकरणी व्यावसायिक हितसंबंधित असेल किंवा गुंतला असेल, किंवा

(ड) नगरपालिकेच्या सतत येणाऱ्या सहा महिन्यांतील सभेस गैरहजेरीसंबंधी

दिलेल्या अर्जावर नगरपालिकेने ठरावाने मंजुरी दिल्याशिवाय तो स्वतः होऊन गैरहजर असेल.

आणि पोट कलम (३)च्या तरतुदीचे अधीन नगरसदस्य म्हणून सातत्याने राहण्यास असमर्थ असेल आणि त्याचे पद रिकामे राहिले असेल;

परंतु असे की –

(i) सदर (क) खाली नगरसदस्य अनर्हत ठरता कामा नये. जर तो नगरपालिकेसाठी कोणताही मोबदला घेतल्याशिवाय त्यात काम करीत असेल किंवा न्यायालयात किंवा कोणत्याही प्राधिकाऱ्यापुढे नगरपालिकेविरुद्ध या कायद्याखालील स्वतःचे प्रकरणी स्वतः उपस्थित राहून काम चालवीत असेल, मग व्यवसायाने तो वकील असला वा नसला तरीही,

(ii) सदर (ड)चे कारणास्तव, जेव्हा नगरसदस्य गैरहजेरीसाठी अर्ज करील तर ती रजा, त्याने अर्ज केल्या तारखेपासून साठ दिवसांत नामंजूर केली नाही तर मंजूर केल्याचे समजले पाहिजे.

[२] पोट कलम (१) खाली जेव्हा नगरसदस्य निवडून आलेला असो, निवडून घेतलेला असो किंवा नियुक्त करून घेतलेला असो, कोणतीही अनर्हता असो, मुख्याधिकारी यांनी त्यांना अनर्हता कोणत्याही मार्गाने समजल्या तारखेपासून एक महिन्याचे आत कलेक्टरला अहवाल सादर करणे हे त्याचे कर्तव्य राहील.

[३] प्रत्येक प्रकरणात जागा रिकामी झाली किंवा नाही हे ठरविणारा अधिकारी कलेक्टर असला पाहिजे. पोट कलम (२) खालील मुख्याधिकारी यांचा अहवाल मिळाल्यावर किंवा त्याने स्वतः होऊन किंवा मतदाराने त्याचेकडे केलेल्या अर्जावरून कलेक्टरने निकाल द्यावा आणि हा निकाल संबंधित नगरसदस्य, मुख्याधिकारी आणि अर्जदार, कोणी असल्यास कळविला पाहिजे. कलेक्टरने जागा रिकामी झाली आहे असा निर्णय जोपर्यंत घेतलेला नाही आणि असा निर्णय वर नमूद केल्याप्रमाणे जोपर्यंत कळविला नाही तोपर्यंत नगरसदस्याने धारण केलेले पद संपुष्टात आल्याचे समजले जाणार नाही.

[४] कलेक्टरच्या निर्णयाने व्यथित झालेल्या कोणत्याही इसमाने, त्याला कलेक्टरचा निर्णय मिळाल्या तारखेपासून पंधरा दिवसांत राज्य सरकारला आवाहन करावे आणि राज्य सरकार देईल तो आदेश अंतिम राहील.

परंतु असे, की पोट कलम (३) खाली कलेक्टरने किंवा पोट कलम (४) खाली आवाहनात राज्य सरकारने कोणत्याही नगरसेवकाविरुद्ध, त्याला सुनावणीची रास्त संधी दिल्याशिवाय, आदेश देता कामा नये.

स्पष्टीकरण – जर कोणताही, निवडून आलेला, निवडून घेतलेला किंवा नियुक्त केलेला नगरसदस्य, कलम १६ मध्ये स्पष्ट केलेल्या अनर्हतेच्या अधीन, त्याचे निवडणुकीचे, निवडून घ्यावयाचे किंवा नियुक्त करावयाचे, जसे असेल तसे, कोणतेही

वेळी अनर्हत असेल अथवा अनर्हता चालू राहील तर या कलमाचे कारणास्तव, तो ज्या सत्रकालावधीसाठी निवडून आला असेल, निवडून घेतला असेल किंवा नियुक्त केलेला असेल त्या कालावधीत अनर्हत असल्याचे समजले जाईल.

भाष्य

या कलमात नगरपालिकेचा सदस्य – म्युनिसिपल कौन्सिलर – याला अनर्हत ठरविण्याची तरतूद आहे.

कोणत्याही नगरपालिकेचा सदस्य जर कलम १६ यातील तरतुदीप्रमाणे अनर्हत ठरला असेल तर नगरसदस्याचे पद धारण करणेस तो अनर्हत ठरविला आहे. कलम १६ चे पोट सदर (ह) सोडून इतर कलम १६ तील सर्व तरतुदी या कलमात आहेत.

जर एखादा कौन्सिलर कौन्सिलच्या सभेला विनापरवानगी गैरहजर राहील तर कौन्सिलर म्हणून त्यास अनर्हत ठरविण्याची तरतूद या कलमातील पोट कलम (ड) मध्ये आहे. तिचा विचार या भाष्यात करीत आहे.

एखाद्या नगरसदस्याला नगरसदस्यत्वाच्या पदावरून काढून टाकण्यापूर्वी (गैरहजेरीच्या कारणावरून) खालील अटींची पूर्तता झाली पाहिजे, असे उत्तर प्रदेश म्युनिसिपालिटीज् ॲक्ट १९१६ च्या कलम ४० (१) (अ) मध्ये आहे, ती अट –

(i) लागोपाठ भरणाऱ्या सभेला, पूर्वपरवानगीशिवाय तो गैरहजर असला पाहिजे

(ii) त्याच्या गैरहजेरीचा कालावधी लागोपाठ सतत तीन महिन्यांचा असला पाहिजे

(iii) म्युनिसिपल बोर्डाची/कौन्सिलची परवानगी त्याने मिळविलेली नव्हती

या कायद्यातील तरतुदीप्रमाणे पुढील अटींची पूर्तता झाली पाहिजे, ती अट–

(i) लागोपाठ भरणाऱ्या कौन्सिलच्या सभेला पूर्वपरवानगीशिवाय गैरहजर असणे

(ii) अशा गैरहजेरीच्या सभांचा कालावधी सातत्याने येणाऱ्या सहा महिन्यांचा असणे

(iii) म्युनिसिपल कौन्सिलची पूर्वपरवानगी मिळविलेली नसणे

दोन्ही कायद्यांतील कलमांच्या आशयात फरक नाही, पण शब्दरचनेत फरक आहे. उत्तर प्रदेशच्या कायद्यात CONSECUTIVE शब्द पुढील आशयात वापरला आहे

"That he had absented himself from the Consecutive Meetings."

तर या कायद्यातील कलमात SUCCESSIVE हा शब्द वापरला आहे.

"Absents himself during six successive months from the Meetings...."

CONSECUTIVE या शब्दाचा शब्दकोषातील अर्थ असा आहे – एका पाठोपाठ एक.

SUCCESSIVE या शब्दाचा शब्दकोषातील अर्थ असा आहे–अनुक्रमाने येणारा, लागोपाठचा.

शब्दरचनेत फरक असला तरी अर्थांकित आशयात फरक नाही.

गैरहजेरीचा काळ कसा मोजावा हे मात्र कलमातील शब्दरचनेवरून ठरवावे लागते. कारण कौन्सिलर, तो इलेक्टेड असो, को-ऑप्टेड असो वा नॉमिनेटेड असो, दररोज नियमितपणे, नियमित वेळी कामावर हजर असलाच पाहिजे असे नित्य-नियमित नोकराप्रमाणे त्याचेवर कटाक्षित बंधन नाही. म्हणून त्याची गैरहजेरी अमूक एका विशिष्ट तारखेपासून मोजता येणार नाही. तसेच दररोज कौन्सिलची मीटिंग भरतेच असेही नाही. या मुद्यावर अलाहाबाद हायकोर्टापुढे (राम शंकर वि. कमिशनर रोहील खंड डिव्हिजन १९६६ अलाहाबाद लॉ जर्नल १०६७) प्रकरण आले. त्यातील परिशीलनावरून पुढील वस्तुस्थिती स्पष्ट झाली.

म्युनिसिपल बोर्डाची मीटिंग २२–१०–१९६५ तेव्हापासून कौन्सिलर सतत सहा महिने गैरहजर आहे. उत्तर प्रदेश कायद्यातील अनर्हत ठरविण्याचा गैरहजेरीचा कालावधी "THREE CONSECUTIVE MONTHS" असा आहे. म्हणजे 'अनुक्रमाने येणारे सततचे तीन महिने' असा आहे. दि. २२–१०–१९६५ पासून जरी तो गैरहजर असला तरी २२–१०–१९६५ च्या पूर्वी झालेल्या मीटिंगनंतरची पहिली मीटिंग २६–११–१९६५ रोजी झाली. कायद्यातील कलमात "महिने" असा शब्द असल्याने महिना म्हणजे कालदर्शक महिना असा अर्थ घ्यावा लागतो. तेथून तीन महिने २२–१०–१९६५ ते २२–१–१९६६ रोजी पूर्ण होतात. पण मीटिंगच्या तारखेपासून मोजावयाचे ठरल्यास २६–११–१९६५ च्या मीटिंगच्या तारखेपासून तीन महिने पूर्ण होतात ती तारीख २६–११–१९६५ ते २६–२–१९६६ रोजी पूर्ण होतात. २६–२–१९६६ रोजी मीटिंग भरली असेल तर विनापरवाना गैरहजेरीचे तीन लागोपाठ महिने येण्यास तीन महिन्यांचा कालावधी २६–२–१९६६ रोजी पूर्ण होतो. पण या तारखेपूर्वी भरलेली मीटिंग जरी या महिन्यात भरलेली असली तरी हा महिना कालावधीच्या कालगणनेसाठी सोडणे भाग आहे आणि २६–२–१९६६ नंतर जी प्रथम मीटिंग भरली असेल तेथपर्यंत तो तीन महिन्यांचा कालावधी विनापरवाना गैरहजेरीच्या कालगणनेसाठी वाढवावा लागतो. हाच आशय, याच अलाहाबाद हायकोर्टापुढील (लतीफ नोमानी वि. कमिशनर गोरखपूर १९६७ अलाहाबाद लॉ जर्नल ४३१) या प्रकरणात हायकोर्टाने व्यक्त केला आहे. सदरच्या प्रकरणात विनापरवाना गैरहजर राहिलेल्या सदस्याची सभेची उपस्थिती

३०–९–१९६५ ची असून तेथून पुढे तो गैरहजर आहे. तेथून पुढे तीन महिने संपतात तो दिवस २९–१२–१९६५ हा होय. पण या तारखेनंतर जी मीटिंग भरली ती विचारात घेतली. या तारखेआधी भरलेली मीटिंग विचारात घेतली नाही व जी मीटिंग विचारात घेतली ती मीटिंगची तारीख २९–१–१९६६ असल्याने या तारखेपर्यंतचा कालावधी, अनर्हत ठरविण्यासाठी मोजला पाहिजे असे हायकोर्टाने मत व्यक्तविले. मात्र याच प्रकरणात हायकोर्टाने असेही मत व्यक्तविले आहे, की "तीन लागोपाठ येणारे सतत महिने" म्हणजे असे नव्हे, की या तीन लागोपाठ येणाऱ्या सततच्या तीन महिन्यांतील प्रत्येक महिन्यात मीटिंग भरलीच पाहिजे तरच ते तीन लागोपाठ येणारे सततचे तीन महिने धरावेत. जर एखाद्या महिन्यात मीटिंग भरलीच नाही तर तो महिना अनर्हत ठरविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या कालावधीच्या कालगणनेतून वगळला, तर कायद्यातील तरतुदींचा तो पराभव ठरेल. गैरहजर राहिल्याच्या पहिल्या मीटिंगपासून तीन महिने ज्या महिन्यात संपतात त्या महिन्यात त्या तारखेदिवशी किंवा नंतर लागलीच भरणाऱ्या मीटिंगच्या तारखेपर्यंतच्या कालावधीचे गणन अनर्हत ठरविण्यासाठी करावे.

संबंधित म्युनिसिपालिटीच्या चीफ ऑफिसरने, अशा प्रकारे, म्हणजे या कलमात सांगितलेल्या तरतुदीप्रमाणे ज्या नगरसदस्याला अनर्हत ठरविणे आवश्यक असेल त्याचे संबंधीचा अहवाल कलेक्टरला सादर केला पाहिजे आणि कलेक्टरने तत्संबंधीचा निर्णय घ्यावयाचा आहे. याचाच स्पष्ट अर्थ असा, की अनर्हत म्हणून जर कोणा नगरसदस्याला तो नगरसदस्याच्या पदावर असताना, नगरसदस्याच्या पदावरून काढून टाकायचे असेल तर याचा निर्णय घेणारा सक्षम अधिकारी कलेक्टर आहे. आणि कलेक्टरला असा निर्णय चीफ ऑफिसरच्या अहवालाशिवाय घेण्याचा अधिकार नाही. या कलमाच्या तरतुदीप्रमाणे अनर्हत ठरविण्यासंबंधीचा अहवाल

चीफ ऑफिसरने केला पाहिजे,

कलेक्टरने त्यावर निर्णय घेतला पाहिजे, अशी पूर्तता झाली पाहिजे.

नगरसदस्याला अनर्हत ठरविणे कलेक्टरला जर भाग पडले तर कलेक्टरने नैसर्गिक न्यायतत्त्वाचे अनुसरण करून त्या नगरसदस्याची चौकशी केली पाहिजे. कलेक्टरचा अनर्हत ठरविण्यासंबंधीचा निर्णय ज्या तारखेस नगरसदस्यावर बजावला जाईल त्या तारखेपासून नगरसदस्याची जागा रिकामी झाली असे समजणेत येते. ही रिक्त जागा कायद्यातील तरतुदीप्रमाणे भरावयाची किंवा सत्रकालसंपेपर्यंत रिकामीच ठेवायची याचाही निर्णय कायद्यातील तरतुदीप्रमाणे सक्षम अधिकाऱ्याने घेतला पाहिजे. मात्र नगरसदस्याची जागा रिक्त झाली हे जाहीर करण्याचा निर्णय जाहीर होईपर्यंत नगरसदस्याचे नगरसदस्य पदाचे संपुष्टन होत नाही. पण असे नगरसदस्य पद रिकामे झाल्याचे जाहीर केले जाते तेव्हा अशी रिक्त जागा

पोटनिवडणुकीने,

को-ऑप्शनने, किंवा
नॉमिनेशनने
पण कायद्यातील तरतुदीप्रमाणे भरली जाते व त्यासाठी कलम ४८ (१) च्या तरतुदीचा विचार केला जातो.

कलेक्टरच्या निर्णयामुळे व्यथित झालेल्या नगरसदस्याला कलेक्टरच्या निर्णया-विरुद्ध अपील करता येते. तशी तरतूद या कलमात आहे. पण ते निर्णय मिळाल्या तारखेपासून पंधरा दिवसांत राज्य शासनाकडे केले पाहिजे. शासनाचा निर्णय अंतिम समजण्यात येतो. अपिलाचा निर्णय, उभय पक्षांचे म्हणणे ऐकून घेऊन व त्यांना त्यांची बाजू मांडण्याची पूर्ण संधी देऊन, दिला पाहिजे असा या कलमातील तरतुदीत कटाक्ष आहे.

नगरपालिकेस देय असलेले कर भरण्यास चुकल्यास अनर्हताचे बाबतीत विशेष तरतूद

४५. [१] प्रत्येक वर्षातील, एप्रिल, जुलै, ऑक्टोबर आणि जानेवारीच्या पंधरा तारखेस मुख्याधिकारी यांनी सर्व नगरसदस्यांची, अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यासह, जो कोणी एप्रिल, जुलै, ऑक्टोबर आणि जानेवारी अनुक्रमे पहिल्या तारखेस, लगतपूर्व आधी नगरपालिकेस त्यांनी देणे असलेला कर किंवा असलेले कर तो देय असलेल्या तारखेपासून दोन महिन्यात भरण्यास चुकला असेल अशांची, प्रत्येकाकडून येणे असलेली रक्कम, प्रत्येक करामागे नमूद करून, यादी तयार करून कलेक्टरला सादर केली पाहिजे. नंतरच्या, नगरसदस्यांच्या सभेपुढे यादीची प्रत ठेवली पाहिजे.

[२] त्याचबरोबर, मुख्याधिकारी यांनी अशा यादीत समाविष्ट असलेल्या प्रत्येक नगरसदस्यास विहित नमुन्यात विशेष नोटीस काढली पाहिजे आणि अशी नोटीस काढलेल्या तारखेपासून एक महिन्यात त्याने भरावयाच्या कराची रक्कम भरण्यास त्यास भाग पाडले पाहिजे.

[३] मुख्याधिकारी यांनी कलेक्टरला मे, ऑगस्ट, नोव्हेंबर आणि फेब्रुवारी महिन्याच्या शेवटचे दिवशी, त्यानंतर लागलीच, दर्शविणारे विवरणपत्र –

(i) पोट कलम (१) खाली तयार केलेल्या यादीत समाविष्ट केलेल्या नगरसदस्याचे नाव

(ii) अशा प्रत्येक करामागे येणे असलेल्या प्रत्येक नगरसदस्याच्या कराची रक्कम आणि अशी रक्कम देयपात्र झालेली तारीख

(iii) पोट कलम (२) खाली अशा नगरसदस्यास विशेष नोटीस काढ-ल्याची तारीख आणि

(iv) नगरसदस्याने रक्कम भरल्याची तारीख आणि उर्वरित रक्कम, काही असल्यास, न भरल्याची कारणे,

[४] पोट कलम (३) खालील विवरण मिळाल्यावर कलेक्टरने, पोट कलम (२) खाली काढलेल्या नोटीशीत स्पष्ट केलेल्या तारखेस कोणताही कर भरण्यास चुकला असेल अशा प्रत्येक नगरसदस्यास विशेष नोटीस काढून, विशेष नोटीस काढल्याच्या तारखेपासून एक महिन्यात, त्याला अनर्हत का ठरवू नये आणि पद रिकामे झाल्याचे जाहीर का करू नये याचे निवेदन करण्यासाठी बोलवावे. कर न भरल्याच्या कारणाचा समाधानकारक खुलासा कलेक्टरला करण्यास जर नगरसदस्य चुकेल, तर असा नगरसदस्य अनर्हत झाल्याचा आणि त्याचे पद त्यामुळे रिकामे झाल्याचा आदेश काढला पाहिजे.

परंतु असे की, नगरसदस्याची आर्थिक परिस्थिती किंवा पोट कलम (४) खालील नोटीस मिळाल्यानंतर त्याने थकबाकी चुकती केली आहे हा वस्तुस्थितीचा खुलासा या पोट कलमाचे कारणास्तव समाधानकारक असणार नाही.

[५] कलेक्टरच्या निर्णयाने व्यथित झालेल्या कोणीही इसमाने, कलेक्टरचा निर्णय त्याला मिळाल्या तारखेपासून पंधरा दिवसांचे कालावधीत, राज्य सरकारकडे आवाहन करावे आणि अशा आवाहनात राज्यसरकार देईल तो आदेश अंतिम राहील.

परंतु असे, की देय असलेल्या कराची रक्कम नगरपालिकेत अनामत भरल्याशिवाय राज्य सरकारने असे आवाहन दाखल करून घेता कामा नये.

[६] अनर्हत ठरलेल्या नगरसदस्याने, अनर्हत ठरलेल्या तारखेस आपण होऊन थकबाकी चुकती केली किंवा या कायद्याने किंवा कायद्याखालील कामकाज पद्धतीनुसार अशी थकबाकी त्याचेकडून वसूल केली अशी वस्तुस्थिती असली तरीसुद्धा नगरसदस्य होणेसाठी किंवा कोणत्याही स्थानिक प्राधीकरणाचा सदस्य किंवा सभासद होण्यासाठी अशा अनर्हत झाल्याच्या तारखेपासून पाच वर्षांच्या कालावधीसाठी असा नगरसदस्य अनर्हत राहील.

करवसुलीच्या नगरपालिकांच्या इतर शक्तीवर कलम ४५ चा आघात नाही.

४६. या कायद्याने अथवा कायद्याखाली तरतुदीलेल्या कोणत्याही पद्धतीने कोणत्याही नगरसदस्याकडून येणे असलेली कराची रक्कम वसूल करण्याच्या नगरपालिकेच्या शक्तीवर आघात होईल असे काहीही मागील लगतपूर्व कलमात नाही.

नगरसदस्यत्वाचे संपुष्टनानंतर नगरसदस्याने सर्व पदांतून मुक्त व्हावे.

४७. कोणतेही कारणावरून असो नगरसदस्यत्व संपुष्टात आल्यावर इसमाने, तो नगरसदस्य म्हणून धारण करीत होता ती सर्व पदे वस्तुस्थितीनुसार मुक्त केली पाहिजेत.

भाष्य

म्युनिसिपालिटीला देय असणारी कराची रक्कम जर कोणी नगरसदस्य असताना, न देईल अथवा देण्यास चुकेल तर त्यास अनर्हत ठरविण्याची विशेष तरतूद ह्या कलमात आहे. कलम १६ तील अशाच मुद्यावरून उमेदवारास अनर्हत ठरविण्याची जी तरतूद आहे ती व या कलमातील तरतूद यांतील आशयात फरक नाही. फरक आहे तो तपशिलात आहे. जेव्हा एखादा मतदार नागरिक म्युनिसिपालिटीची निवडणूक लढवू इच्छितो, तेव्हा तो उमेदवारीचा अर्ज भरतो. या वेळी म्हणजे नामांकनपत्र दाखल करण्याचे दिवशी म्युनिसिपालिटीस देय असणारी कराची वा अन्य कोणतीही थकबाकी त्याचे नावे असेल तर तो उमेदवारी अर्ज भरण्यास अनर्हत होतो ही कलम १६ ची तरतूद आहे. निवडून आल्यावर नगरसदस्याचे पद धारण करीत असतानाच्या सत्र कालावधीत म्युनिसिपालिटीला देय असणारी त्याचे नावाची कराची रक्कम, कायद्यातील तरतुदीप्रमाणे योग्य मुदतीत जर त्याने भरली नाही, तर त्यास अनर्हत ठरवावे अशी या कलमातील तरतूद आहे. थकबाकीदार उमेदवार अनर्हत आहेच, तेथे अनर्हत ठरविण्याची आवश्यकता नाही; पण नगरसदस्य पदावर असणारा नगरसदस्य थकबाकीदार झाल्यास अनर्हत ठरवावा लागतो. त्यासाठी कायद्याने ठरविलेल्या चाकोरीतून जावे लागते. ती चाकोरी या कलमात स्पष्ट केली आहे.

या कलमातील तरतुदीशी साम्य असणारी तरतूद सिटी ऑफ बंगलोर म्युनिसिपल कॉर्पोरेशन ॲक्ट १९४९ च्या कलम ५६ मध्ये आहे. या कलमाचे पोट कलम (२)चे सदर (ई ई) थकबाकीदार ARREARS या कलमाच्या पोट कलम (४) च्या परंतुकेत ARREARS हा शब्द वापरला आहे. ARREARS म्हणजे थकबाकीदार. सिटी ऑफ बंगलोर म्युनिसिपल कॉर्पोरेशन ॲक्ट १९४९ च्या कलम ५६ (२) (इ इ)ची 'थकबाकीदार' अशी संबंधित असणारी तरतूद, घटनेच्या आर्टीकल १४ च्या तरतुदीशी विसंगत असल्याचा दावा म्हैसूर हायकोर्टात उपस्थित करण्यात आला होता. (व्ही. नारायणाचार्य वि. कमिशनर ऑफ सिटी ऑफ बंगलोर, ए. आय. आर. १९७१ म्हैसूर १८५–१९७१ म्हैसूर लॉ जर्नल २२५) च्या प्रकरणातील म्हैसूर हायकोर्टाचे परिशीलन असे –

[१] कलम ५६ (२) (ई ई) यातील " थकबाकी " या शब्दातील आशयाचा संबंध " OF ANY KIND " कोणत्याही प्रकारचे, " DUE " देणे या शब्दांशी असून हे कोणत्याही प्रकारचे देणे " BY HIM TO THE CORPORATION" म्यु. कॉर्पोरेशनला त्याने देणे असलेले असावे.

यावरून, कॉर्पोरेशनला देणे असलेली रक्कम,

नगरसदस्याने देणे असलेली रक्कम, या दोन गोष्टी स्पष्टपणाने प्रतीत होतात

आणि ही देणे असलेली रक्कम "थकबाकी" या शब्दातील आशय स्पष्ट करते.

[२] कलम ५६ (२) (ई ई) यातील कोणत्याही प्रकारची थकबाकी या शब्दरचनेवरून,

जी रक्कम देणे आहे, देय आहे ती न दिल्यामुळे, देण्यास चुकल्यामुळे नावे पडली आहे ती रक्कम थकबाकी रक्कम. थकबाकी म्हणून नावे पडलेली रक्कम नंतर जरी चुकती केली तरीही ती थकबाकी वसूल झाली असा लेखाशास्त्रातील तत्त्वानुसार निर्णय घ्यावा लागतो. म्हणजे थकबाकीदार हे विशेषण विहित योग्य मुदतीत रक्कम भरली नाही व म्हणून थकबाकी सदरात ती नावे पडली की तेव्हापासून "थकबाकीदार" हे विशेषण चिकटले.

[३] कायद्यातील तरतुदीप्रमाणे, जो "थकबाकीदार" तो नगरसदस्य नगरसदस्य–पदावर राहण्यास अनर्हत ठरतो.

ठरलेली अनर्हतता, माफी करण्यालायक आहे किंवा कसे, दुर्लक्ष करण्यासारखी आहे किंवा कशी हे तिच्या गांभिर्यावरून निर्णय घेणाराने ठरवावे. हे ठरविण्याची क्षमता असणाऱ्या प्राधिकाऱ्याने त्याच्या इच्छेनुसार DISCRETION ठरवावे. ही त्या प्राधिकाऱ्याची "इच्छांकित शक्ती" DISCRETIONERY POWER राज्यघटनेच्या आर्टिकल १४ च्या तरतुदीशी विसंगत असल्याचा दावा होता तो हायकोर्टाने फेटाळला.

म्युनिसिपालिटीला देय असणाऱ्या रकमेच्या संबंधात जो थकबाकीदार ठरला, तो उमेदवारीस अथवा पदधारणेस अनर्हत ठरला. एकदा थकबाकीदार ठरला म्हणजे, जरी ती थकबाकीची रक्कम त्याने नंतर चुकती केली तरी थकबाकीदार हे विशेषण नाहीसे होत नाही. मात्र तसे ठरविण्यापूर्वी देय रकमेच्या आकारणीची नोटीस, रक्कम देय असणारांवर बजावली जाणे आवश्यक आहे. आणि अशा प्रकारच्या बिलाच्या नोटीसमध्ये अमूक तारखेस किंवा तत्पूर्वी रक्कम चुकती केली पाहिजे असा आदेश नमूद केलेला असणे आवश्यक आहे. आदेशाप्रमाणे त्या तारखे-अखेरीपर्यंत जर रक्कम चुकती झाली नाही तर अथवा ती तारीख वाढवून मागितली असेल व त्याप्रमाणे वाढवून दिली असेल तर वाढविलेली तारीख अखेरीपर्यंत रक्कम चुकती झाली नाही तर त्याच्या दुसऱ्या दिवशी तो थकबाकीदार ठरतो, असे मुंबई हायकोर्टाचे मत आहे. (रड्डुलाल वि. वासुदेव, १९६४ महाराष्ट्र इलेक्शन जर्नल ५०).

नगरसदस्य थकबाकीदार ठरल्यानंतर तो अनर्हत ठरविलाच पाहिजे असा दंडक कायद्यात नाही. थकबाकीदार नगरसदस्य अनर्हत ठरो वा न ठरो, त्याची थकबाकी वसूल करण्यासाठी, नगरपालिकेने थकबाकी वसूल करण्याची कायद्यातील जी विहित पद्धत असेल त्या विहित पद्धतीनेच ती वसूल करावी. त्यात तो केवळ नगरसदस्य होता किंवा आहे म्हणून बदल करता येत नाही.

कौन्सिलर म्हणून अनर्हत ठरल्यावरोबर, कौन्सिलरच्या पदावर असताना कौन्सिलर म्हणून म्युनिसिपालिटीच्या कारभारातील जी जी पदे तो धारण करीत असेल ती ती सर्व पदे त्याने सोडली पाहिजेत.

नैमित्तिक रिक्तता कशी भरावी

४८. [१] निवडून आलेल्या, निवडून घेतलेल्या किंवा नियुक्त केलेल्या सदस्याने पद-स्वीकृती केली नाही किंवा नगरसदस्य म्हणून राहण्यास असा इसम अनर्हत ठरविला असेल किंवा कलम २१ खाली कोणतीही निवडणूक अवैध ठरविली असेल किंवा पदाचा सत्रकाल संपण्यापूर्वी नगरसदस्याच्या मृत्युमुळे, राजीनाम्यामुळे त्यास काढून टाकल्यास किंवा त्याच्या दुर्बलतेमुळे झालेली रिकामी जागा, पोटनिवडणुकीने किंवा आपल्यातून निवडून घेण्याने किंवा नियुक्तीने, नगरसदस्य निवडून आला, निवडून घेतला किंवा नियुक्त केला अशा अनुसरणाने भरली पाहिजे.

परंतु असे की, जागा रिकामी झाल्यानंतरच्या सहा महिन्यांत सर्वसाधारण निवडणुकीचा संभव असेल तर नैमित्तिक जागा भरण्यासाठी पोटनिवडणूक घेणे, किंवा निवडणूक घेणे किंवा नियुक्त करून घेणे, हे होता कामा नये.

जागा रिकामी झाल्यापासून किंवा रिकामी झाल्याचे समजल्यापासून, जे उशिराचे असेल ते, पंधरा दिवसांत नगरसदस्याच्या पदाची रिक्तता मुख्याधिकारी यांनी कलेक्टरला अहवालित केली पाहिजे.

भाष्य

म्युनिसिपालिटीच्या चीफ ऑफिसरने केलेला अहवाल या कलमाच्या पोट कलम (२)प्रमाणे, कलेक्टरला मिळाल्यावर आणि कलम ४५ (४)प्रमाणे कौन्सिलरचे पद रिकामे झाल्याचे जाहीर केल्यानंतर किंवा कलम २१ च्या तरतुदीप्रमाणे निवडणूक रद्द ठरविल्यानंतर, अनर्हत ठरलेला कौन्सिलर, इलेक्टेड, को-ऑप्टेड, नॉमिनेटेड, जसा असेल त्याप्रमाणे निवडणुकीने, को-ऑप्शनने किंवा नॉमिनेशनने ती रिक्त जागा, या कलमाच्या परंतुकातील तरतुदीच्या अधीन भरली पाहिजे.

जेव्हा पोटनिवडणुकीने जागा भरण्याचा निर्णय घेतला जातो तेव्हा अशा पोट-निवडणुकीच्या कार्यवाहीसाठी निवडणुकीचे जे नियम आहेत ते सर्व जसेच्या तसे लागू केले आहेत अशी महाराष्ट्र म्युनिसिपालिटीज् इलेक्शन रूल्स १९६६, नियम ६३ ची व्याप्ती आहे.

श्री. गंगाबाई वि. प्रेसिडेंट म्युनिसिपल कौन्सिल, ए. आय. आर. १९७० बॉम्बे १७० या दाव्याचे प्रकरणी मुंबई हायकोर्टाने "रिक्त जागा" याचे स्पष्टीकरण असे केले आहे की, रिक्त जागा म्हणजे नियमान्वित आणि कायद्यान्वये जी रिकामी झाली आहे ती रिक्त जागा आणि अशी जागा कायद्यातील तरतुदीप्रमाणे,

तरतुदीच्या पालनानुसार रिक्त झालेली असली पाहिजे.

कलेक्टरचे पुढील बाबतीत समाधान झाले पाहिजे, म्हणजेच त्याची खात्री झाली पाहिजे, की –

कौन्सिलरपदाची जी जागा रिकामी झाली आहे ती वस्तुस्थिती आणि कायदा यानुसार रिकामी झाली आहे अशी खात्री झाल्याशिवाय कलेक्टरने महाराष्ट्र म्युनिसिपालिटीज् इलेक्शन रूल्स १९६६ च्या नियम ६३ च्या तरतुदीचा वापर करता कामा नये. जरी कौन्सिलरच्या राजीनाम्यामुळे ते पद रिकामे होणार असले किंवा झाले असले तर त्या जागेसाठी पोटनिवडणुकीचा निर्णय घेण्यापूर्वी कौन्सिलरने राजीनामा सद्हेतूने, योग्य कारणास्तव दिलेला असल्याची खात्री करून घेतलेली असावी. जो राजीनामा सशर्त असतो तो राजीनामा नव्हे. त्यात नमूद केलेल्या अटींची पूर्तता होणे वा न होणे, पूर्तता करणे वा न करणे या गोष्टी पूर्ण भिन्न आहेत. पण राजीनामा सादर करणाराने तशी अट नमूद केली असल्याने त्या अटीचा, या किंवा त्या बाजूने विचार करावाच लागतो. त्या अटीच्या संदर्भात जो निर्णय घेतला असेल तो संबंधिताला कळविणे न्यायोचित आहे.

(कलम ४८ अ ची तरतूद प्रशासकाच्या नेमणुकीसंबंधीची आहे. या पुस्तकाच्या मर्यादित विषयात ही तरतूद येत नसल्याने याचे भाषांतर आणि भाष्य येथे दिले नाही. कलम ४९ ची तरतूद या पुस्तकाच्या आशयाशी अनुषंगिक असल्याने याचे भाषांतर व भाष्य येथे देत आहे.)

४९. [१] अधिनियमात अन्यथा तरतुदिली असेल त्याशिवाय म्युनिसिपल क्षेत्रातील स्थानिक प्रशासन, कौन्सिलमध्ये समाविष्ट केले आहे.

[२] या अधिनियमाने किंवा सांप्रत अमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याने किंवा कायद्याखाली लादली असेल त्या कर्तव्यांपेक्षा आणखी अधिक, प्रत्येक कौन्सिलने म्युनिसिपल क्षेत्राचे हद्दीत खालील बाबींची रास्त तरतूद आणि उपक्रम केला पाहिजे आणि जेव्हा अन्यथा परिणामकारक योजना करणे शक्य नसेल तरी तेही म्युनिसिपल क्षेत्राबाहेरसुद्धा केले पाहिजे; जसे –

(अ) सार्वजनिक रस्ते, ठिकाणे आणि इमारती यात प्रकाश.
(ब) सार्वजनिक रस्ते, ठिकाणे यात पाणी.
} यांची सोय करणे.

(क) सार्वजनिक रस्ते, ठिकाणे आणि गटारे आणि सर्व जागा, ज्या खाजगी मालमत्ता नाहीत त्या, की ज्या सार्वजनिक उपभोगासाठी आहेत त्या, अशा जागा कौन्सिलमध्ये समाविष्ट झालेल्या असोत वा नसोत, स्वच्छ ठेवणे, अपायकारी प्रदूषणे नष्ट करणे आणि सार्वजनिक उपद्रवाला मदत होत असेल ती नाहीशी करणे.

(ड) अग्निशामक आणि जेव्हा आगीमुळे जीवित-वित्तहानी पोहोचेल त्यापासून संरक्षण.

(ई) धोकादायक व्यवसाय किंवा कृती किंवा त्यात सहभागी होणाऱ्या कृतीचे नियमन.

(फ) सार्वजनिक रस्ते व ठिकाणे आणि जागा, ज्या खाजगी मालमत्ता नाहीत व सार्वजनिक उपभोगाच्या आहेत, मग अशा जागा कौन्सिलच्या किंवा सरकारच्या असोत किंवा नसोत, त्यावरील अडथळे आणि कामे हलविणे.

(ग) धोकादायक इमारती किंवा ठिकाणे हलविणे किंवा सुस्थित करणे आणि अनारोग्य वस्तीचे पुनर्वसन करणे.

(ह) निर्जीव, निःसारतेच्या विल्हेवाटीसाठी इमारती किंवा ठिकाणे व्यापणे, ताब्यात घेणे, निर्वाहन करणे आणि नियमान्वित करणे.

(आय) सार्वजनिक रस्ते, नाल्यावरील पूल, नगरहद्दीच्या खुणा, बाजार, खाटीकखाने, मुत्र्या, हमाम, संडास, गटारे, मैलावाहके, स्वच्छतागृहे, स्नानगृहे, पाणपोयी, टाकी, भिती, जलाशये आणि तत्सम यांची बांधकामे, फेरबदल आणि निर्वाहन करणे.

(जे) आधिक्य पाण्याचा पुरवठा मिळविणे आणि करणे, निर्वासितांच्या अपुऱ्या आणि निकृष्टांचे निर्मूलनास्तव योग्य व पुरेशी अशा अनारोग्यास प्रतिबंध करण्यासाठी, जेव्हा अशा आधिक्य पाण्याचा पुरवठा मिळविणे व करणेची गरज असेल तेव्हा रास्त खर्चाने मिळविणे व करणे.

(के) रस्त्यांचे संबोधन आणि जागांचे क्रमांकन.

(ल) जन्म-मृत्यू नोंद.

(म) सार्वजनिक लस टोचणी.

(न) गाई-म्हशींच्या प्रसूतीसाठी आणि त्यांना शुद्ध पाण्याच्या पुरवठ्यासाठी नगरहद्दीत योग्य जागा राखणे.

(ओ) सार्वजनिक रुग्णालयांचे प्रस्थापन आणि निर्वाहन आणि सार्वजनिक आरोग्य परिहाराची तरतूद करणे आणि कुटुंबनियोजन यांचे संघटन करणे.

(प) प्राथमिक शाळांचे प्रस्थापन आणि निर्वाहन.

(क्यू) राज्यसरकारला कौन्सिलने सादर करणे भाग आहे असे सामान्य वा विशेष आदेशानुसार नगरक्षेत्रातील नगर प्रशासनाची विवरणे, वार्षिक अहवाल यांची छपाई.

(आर) नगरक्षेत्राच्या हद्दी आणि कोणताही फेरबदल, कलेक्टर संमत करतील त्याप्रमाणे नगरहद्दीच्या खुणाची महत्तम उभारणी करणे.

(आर-अ) नगरहद्दीतील निरुपयोगी संडासांचे उपयोगात आणता येईल असे परिवर्तन करणे.

(स) केरकचरा, घाण यांची विल्हेवाट लावणे आणि राज्य सरकारला

आवश्यक असल्यास असा केरकचरा घाण यांचे कंपोस्ट खत करणे.

(स–ला) कोणत्या जागेपासून कोणत्याही जागेपर्यंत, ठिकाणापर्यंत नगरक्षेत्रात किंवा क्षेत्रभागात, माणसाने डोक्यावरून मैला वाहणे वा दुसऱ्यास मैला वाहून नेण्यास सांगणे भाग पाडता कामा नये किंवा सक्ती करता कामा नये.

(स–अ) कौन्सिलच्या स्वच्छता विभागाच्या नोकरवर्गाचे जीवनमान आणि शर्ती व विकासासाठी राज्य सरकार वेळोवेळी करील त्या आदेशाप्रमाणे योजना आखणे, करणे.

(स–ब) ज्या नगरक्षेत्रात राहात असतील अशा मागासवर्गीय जाती-जमाती, विमुक्त जाती, अनामिक टोळ्या यांच्यासाठी कल्याणकारी योजना, विशेषत: राज्य सरकार वेळोवेळी आदेश देईल त्याप्रमाणे त्या वर्गांच्या सुधारण्यासाठी अशा योजना आखणे व करणे.

(ट) सांसर्गिक रोग प्रसारण व धोकादायक स्थिती असेल तेव्हा रुग्णांच्या वस्ती व औषधोपचार यासाठी विशेष तरतूद अशी करणे की अशांच्या फैलावास पुनरोद्भवास प्रतिबंध व्हावा.

(यू) दुष्काळी परिस्थितीत किंवा नगरक्षेत्रातील निराधार, निराश्रित कंगालासाठी परिहार कामांचे प्रस्थापन आणि निर्वाहन करणे.

(व्ही) कलम १०५ मध्ये स्पष्ट केलेल्या सक्त करांची आकारणी करणे.

[३] म्युनिसिपालिटीची मालमत्ता व निधी यातून कौन्सिलने पूर्णत: अथवा भागश:, मर्जीनुरूप तरतूद करावी–

(अ) जागेवर पूर्वी बांधकाम असो अथवा नसो, नवीन सार्वजनिक रस्त्यांची आखणी करणे आणि त्या कारणास्तव मोकळी जागा आणि जागेवर इमारतीचे बांधकाम चालू असणे अथवा मागे हटविणे आवश्यक असेल अशी जागा ताब्यात घेणे.

(ब) सार्वजनिक रुग्णालये, पूर्वप्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण संस्था, वाचनालये, संग्रहालये, पिसाटांची विश्रामगृहे, क्रीडागृहे, आखाडे आणि अपंग-अनाथासाठी आश्रमगृहे यांचे प्रस्थापन आणि निर्वाहन करणे आणि त्यासाठी इमारतींचे, अशाच इतर सार्वजनिक इमारतींबरोबरच, जसे सभागृहे, म्युनिसिपल कार्यालये, दुकाने, धर्मशाळा, मोकळी प्रेक्षागृहे रिंगणे आणि विश्रामगृहे, बांधकाम करणे व निर्वाहन करणे,

(क) सार्वजनिक मैदान, बाग आणि तसेच रस्त्यांच्या कडेला रोपे लावणे, झाडे लावणे यांची आखणी करणे व निर्वाहन करणे.

(ड) जनतेसाठी संगीताची तरतूद करणे.

(ई) जनगणन करणे आणि अचूक नोंदणीसाठी आणि जीवनावश्यक

सांख्यिकीकरणाची माहिती पुरविणारास बक्षीस मंजूर करणे.

(फ) जमीन मोजणी,

(ग) सन्माननीय किंवा वेतनधारी दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयाच्या निर्वाहनासाठी वेतन, भत्ते, भाडे आणि इतर तदनुषंगिक किंवा अशाच प्रकारे इतर खर्च करणे.

(ह) या कायद्याच्या कलम २९३ खाली किंवा बॉम्बे पोलीस ॲक्ट १९५१च्या कलम ४४ खाली अटकविलेल्या किंवा नष्ट केलेल्या कुत्र्यांच्या रक्षणाची, अटकविण्याची किंवा नष्ट करण्याची योजना करणे.

(आय) कलम २८० मध्ये स्पष्ट केलेली उपद्रवी व्यवसाय चालविण्यासाठी योग्य जागांची हमी देणे किंवा हमीसाठी मदत करणे.

(जे) पब्लिक हेल्थ डायरेक्टरने संमत केलेल्या सर्वसामान्य पद्धतीला अनुसरून, कौन्सिलच्या नियंत्रणात असणाऱ्या नाला-गटारीत घाण सोडण्यासाठी खासगी इमारतीवर किंवा वापरासाठी, पात्र, जोडणी, नळ व जी काही असतील ती साधने पुरविणे, बांधकाम करणे व निर्वाहन करणे.

(के) चराऊ कुरणे व्यापणे व निर्वाहन करणे आणि डेअरी फार्म व बीजसंकर फार्म यांचे आस्थापन आणि निर्वाहन करणे.

(ल) मैला वाहून नष्ट होण्यासाठी फार्मचे किंवा कारखान्याचे आस्थापन आणि निर्वाहन करणे.

(म) टेलिफोन लाइनचे बांधकाम, निर्वाहन, व्यवस्थापन, संघटन किंवा खरेदी किंवा जेव्हा म्युनिसिपल क्षेत्राच्या बाहेर टेलिफोन लाइन विस्तारण असल्यास डायरेक्टरच्या पूर्वमंजुरीचे अधीन होणाऱ्या लाइनच्या बांधकामासाठी खर्चाच्या पैशाच्या व्याजासाठी अधिकाराची हमी देणे.

(न) म्युनिसिपल नोकरांच्या किंवा नोकरवर्गाच्या आणि त्यांच्या अवलंबियांच्या भल्यासाठी विकास करणे.

(ओ) कौन्सिलने नेमलेल्या नोकरांसाठी निवासाची तरतूद करणे.

(प) गरीब वर्गासाठी असलेल्या प्रसाधनांची बांधकामे करणे.

(क्यू) जनतेच्या सोयीसाठी लाइट-रेल्वे, ट्रामवेज, आणि वाहतुकीसाठी यांत्रिकी-वाहने बांधणे, खरीदणे, संघटन करणे, निर्वाहन करणे आणि व्यवस्थापन करणे.

(र) विद्युत्-शक्ती किंवा वायु-प्रसारणासाठी कोणतेही कार्य खरीदणे, बांधणे, निर्वाहन करणे, दुरुस्ती करणे.

(स) लोकल सेल्फ गव्हर्नमेंट इन्स्टिट्यूट मुंबई, किंवा राज्यातील इतर कोणतीही संघटना किंवा संस्थांच्या की ज्या केवळ ग्रामीण विभागातील स्थानिक-स्वयंशासित बाबींशी पूर्णपणे निगडित आहेत आणि राज्य-

शासनाने मान्यता दिलेली आहे अशा संस्थांच्या निधीत सहभाग करणे.

(ट) शैक्षणिक संस्थांच्या, यात वाचनालये, संग्रहालये, कोणतीही रुग्णालये, दवाखाने किंवा जनतेच्या स्वास्थ्य-परिहारासाठी तत्सम संस्थांचे किंवा धर्मादायस्वरूपी कोणत्याही संस्थांचे बांधकामात, आस्थापनात किंवा निर्वाहनात सहभाग करणे.

(यू) खासगी प्राथमिक किंवा माध्यमिक शाळांना किंवा विद्यार्थी वसतिगृहांना अनुदान किंवा देणगी देणे.

(व्ही) म्युनिसिपल क्षेत्रातील रहिवाशांच्या लाभासाठी दूध किंवा दुग्धोपादित वस्तूंचा पुरवठा, वितरण व प्रक्रियेकरण यासाठी सुविधन करणे.

(डब्ल्यू) म्युनिसिपल क्षेत्रात जनतेची कोणतीही स्वागते, समारंभ, यात्रा, करमणूक किंवा प्रदर्शन यासाठी प्रत्येक प्रकरणात 'अ' वर्ग, 'ब' वर्ग आणि 'क' वर्ग कौन्सिलचा खर्च अनुक्रमे रु. २००, १५० आणि रु. १००पेक्षा अधिक नसेल आणि अशा कौन्सिलचा वार्षिक खर्च अनुक्रमे रु. १०००, रु. ७६० आणि रु. ५०० पेक्षा अधिक नसेल तर करावा. परंतु काहीही असले तरी, त्यासाठी कलेक्टरची मंजुरी–

(i) प्रत्येक प्रकरणी, वर स्पष्ट केल्याप्रमाणे जर परवानित मर्यादेपेक्षा जास्त खर्च जेव्हा असेल,

(ii) प्रत्येक प्रकरणी, वर स्पष्ट केल्याप्रमाणे जर, जो कोणताही खर्च, वार्षिक खर्चाच्या मर्यादेपेक्षा जास्त होणार असेल,

(iii) पोट कलम (२) मध्ये स्पष्ट केली नाही अशी कोणतीही बाब, की जी जनतेच्या सुरक्षेसाठी, आरोग्यासाठी आणि सोयीसाठी असेल तर,

घेतली पाहिजे.

[४] पोट कलम (२) मध्ये स्पष्ट केलेली कोणतीही कर्तव्ये बजावली नाहीत म्हणून कोणत्याही कौन्सिल, कौन्सिलर, अधिकारी किंवा नोकर याविरुद्ध नुकसानी-साठी किंवा विहित बजावणीसाठी दावा चालविला जाता कामा नये.

[५] तसेच, प्रत्येक कौन्सिलने, राज्यसरकार सर्वसामान्य किंवा विशेष आदेशाने वेळोवेळी, म्युनिसिपल क्षेत्रात किंवा क्षेत्राबाहेर विश्रामगृह, रुग्णालय, जसे राज्यसरकार योग्य असल्याचे जाहीर करील त्या कारणास्तव म्युनिसिपालिटीची मालमत्ता आणि निधी यातून पुढील कारणासाठीं खर्च करावा.

(अ) ज्यांच्या बाबतीत क्रिमिनल प्रोसीजर कोड १८९८ यातील प्रकरण ३४ खाली आज्ञा अमलात नसेल अशा वेडयांच्या,

(ब) महारोगी रुग्णांच्या

निवासासाठी किंवा सांप्रत काळी अमलात असणाऱ्या कोणत्याही कायद्याखाली म्युनिसिपल क्षेत्राबाहेर हलविण्यासाठी.

परंतु असे की, अशा वेडच्याच्या किंवा महारोग्याच्या निर्वाहनासाठी आणि उपचारासाठी वर सांगितल्याप्रमाणे विश्रामधाम, रुग्णालय किंवा निवास यांसाठी असा वेडा किंवा महारोगी, त्यात प्रविष्ट होण्यापूर्वी लगतपूर्व निदान एक वर्ष म्युनिसिपल क्षेत्रात राहात नसेल तर या पोटकलमाखाली कौन्सिल जबाबदार असता कामा नये.

परंतु पुढे असे की, इंडियन लुनॅसी ॲक्ट १९१२ च्या कलम ८८ च्या तरतुदीखाली हायकोर्टाने किंवा डिस्ट्रिक्ट कोर्टाने, अशा वेडच्याच्या निर्वाहासाठी जिंदगी उपलब्ध आहे किंवा कायद्याने बंधनकारक असणारी व्यक्ती त्याच्या निर्वाहास, त्याला सांभाळण्यास सक्षम आहे असे कौन्सिलने दाखविण्याची संधी दिल्याशिवाय, आदेश देता कामा नये. कोणत्याही विश्रामधामच्या की या कलमाखाली वेडच्याचे निर्वाहन, आणि उपचार यांसाठी कौन्सिल जबाबदार असल्याने वेडच्यास स्थान दिले असेल, त्याच्या मुख्याधिकाऱ्याने, वेडच्याच्या निर्वाहनासाठी व उपचारासाठी अशा प्रत्येक वेडच्यास अटकावून ठेवण्यासाठी होणाऱ्या खर्चाच्या स्पष्ट लेखाचे निर्वाहन केले पाहिजे आणि अर्ज केल्यावरून कौन्सिलला त्याची प्रत दिली पाहिजे.

[६] जर कोणते कौन्सिल नळावाटे पाणी पुरवील, तर त्याने, राज्यसरकार सर्वसामान्य वा विशेष आदेशाने ठरवील अशा खंडित पद्धतीने आणि अशा शुल्क रकमेने, पुरवावयाच्या पाण्याची पारख जाणून घेण्यासाठी त्यासंबंधात राज्यसरकारने मान्यता दिलेल्या प्रयोगशाळेतून पाण्याची तपासणी व पृथक्करण केले पाहिजे.

परंतु असे की, या तरतुदीतून कोणत्याही कौन्सिलला राजपत्रात अधिसूचित करून वगळावे.

[७] म्युनिसिपालिटीच्या जिंदगी किंवा निधी यातून वर्गणी देऊन कोणतीही शैक्षणिक किंवा धर्मादाय संस्था वार्षिक सत्रांसाठी किंवा बेमुदत कालावधीसाठी चालू ठेवण्यास बंधनकारक असेल किंवा अशी कोणतीही व्यवस्था करण्यास जेव्हा कौन्सिल वचनबद्ध असेल तेव्हा कौन्सिलसाठी किंवा तिच्या वारसासाठी राज्यसरकारच्या मंजुरीने, अशी आश्वासने आणि चालू व्यवस्था बंद करणे किंवा वार्षिक वर्गणी स्थगित करणे, हे विधियुक्त असेल. परंतु असे की, अशा संस्थेच्या व्यवस्थापकास किंवा व्यवस्थापकांना असे करण्याचा उद्देश असल्याची निदान बारा महिन्याची नोटीस दिली पाहिजे.

भाष्य

म्युनिसिपालिटी ही तशी निर्जीव अन् निष्प्राण आहे, पण म्युनिसिपालिटी ही तिच्या सदस्यसमूहामुळे व्यक्तिसमूही संस्था आहे व म्हणून तो चलनवलनांकित सजीव आहे. म्युनिसिपालिटीची कर्तव्ये म्हणजे त्या अर्थाने नगरसदस्यसमूही संस्थांची कर्तव्ये होत. ही जितक्या चांगल्या तऱ्हेने व कार्यक्षमतेने नगरसदस्याकडून बजावली

जातील तितकी ती म्युनिसिपालिटी चांगली व कार्यक्षम असल्याचे समजले जाते.

म्युनिसिपलविषयक कायद्यानुसार म्युनिसिपालिटीवर जी कर्तव्ये लादलेली आहेत त्यांचे दोन भाग पाडता येतात. पहिल्या भागातील कर्तव्ये म्युनिसिपालिटीने केलीच पाहिजेत अशी कायद्यान्वये सक्तीची आहेत. अशा कर्तव्यांना बंधनकारक कर्तव्ये OBLIGATORY DUTIES म्हणतात. दुसऱ्या भागातील कर्तव्ये ऐच्छिक DISCRETIONARY आहेत.

जनतेच्या उपयोगासाठी, जनतेची सेवा म्हणून वीजनिर्मिती, वीजपुरवठा आणि विजेचे वितरण यासाठी–

यांत्रिक शक्तीवर चालणारी वाहने, वाहतुकीच्या सोयीसाठी रस्ते बांधणे,

जनतेला शुद्ध आणि निरोगी पिण्याचे पाणी पुरवण्यासाठी,

उपक्रमांची बांधकामे करणे, खरेदी करणे, निर्वाहन करणे, विस्तारित करणे, व्यवस्थापन करणे

ही कर्तव्ये बंधनकारक आहेत.

सूचनांकित क्षेत्रात NOTIFIED AREA जेव्हा सूचना–पत्रकान्वये कर लादला जातो, तो कायदा असल्याचे समजले जावे व जेव्हा सूचनांकित क्षेत्र नगरपालिकेत विलीन केले जाते तेव्हा तो कर लादलेल्या कायद्याचा अमलही तसाच पुढे चालू राहतो. अशा कराची आकारणी आणि वसुली, जे नागरिक अशा कराच्या रकमेला देयपात्र असतील त्यांच्या संबंधात करणे हे नगरपालिकेचे कर्तव्य बंधनकारक असून असे केले नाही अथवा करण्यास चुकल्यास, कायद्याचे पालन नगरपालिका करीत नाही असे मत अलाहाबाद हायकोर्टाने व्यक्तविले आहे. (श्याम बाबू गुप्ता वि. कमिशनर, आग्रा डिव्हिजन १९६६ अलाहाबाद लॉ जर्नल ९००).

नगरातील रस्ते व मोठ्या रस्त्यांना जोडले गेलेले लहान लहान रस्ते यांच्या बांधणीचा खर्च, रस्त्यावर उजेडासाठी करावयाच्या प्रकाश योजनेचा खर्च नगरपालिकेने केलाच पाहिजे ते बंधनकारक कर्तव्य आहे. हा खर्च रस्त्यावरून धावणाऱ्या वाहनचालकासाठी केला किंवा करीत आहोत हे नगरपालिकेचे म्हणणे मद्रास हायकोर्टाने फेटाळून लावले आहे. अशा खर्चाच्या वसुलीसाठी वाहनचालकावर म्युनिसिपालिटीने लावलेला करही योग्य नाही असे (इंडिया शुगर अँण्ड रिफायनरीज लि. वि. म्युनिसिपल कौन्सिल होसपेट, ए. आय. आर. १९४८ मद्रास १९१) या प्रकरणी मत व्यक्तविले आहे. सार्वजनिक सेवा-सुविधा नगरपालिकेने जनतेच्या सेवेसाठी उपलब्ध केल्याच पाहिजेत. ते त्यांचे वैध कर्तव्य आहे.

ऐच्छिक कर्तव्यात वाचनालय चालविणे, वस्तुसंग्रहालय चालविणे अथवा निर्वाहित करणे, कलादालन निर्वाहित करणे, वनस्पतिसंग्रहालय, प्राणिसंग्रहालय यांचे निर्वाहन करणे या गोष्टी येतात. तसेच

सार्वजनिक जागेत जनतेसाठी संगीत, नाट्य, चित्रगृह बांधणे व निर्वाहन करणे

या बाबींचा समावेश होतो. (म्युनिसिपल बोर्ड, वि. सरदार इकबालसिंग, ए. आय. आर. १९५८ अलाहाबाद ८५३).

सार्वजनिक आरोग्य वृद्धीकरणाची तज्ज्ञांची परिषद असो वा जनतेच्या सोयी-सुविधांचा विचार करणाऱ्या विचारवंतांची परिषद/परिसंवाद असो, अशा कार्यास हजर राहण्यासाठी, सहभाग घेण्यासाठी, त्या त्या संबंधित खात्यांतील अधिकाऱ्यांचे शिष्टमंडळ नगरपालिकेने पाठविले व त्यासाठी खर्च केला तर हे कर्तव्य अवैध ठरत नाही असे सुप्रीम कोर्टाचे मत आहे. (सिटी ऑफ नागपूर कॉर्पोरेशन वि. जॉन सर्वेज फिलिप, ए. आय. आर. १९६३ सु. को. ८९७).

यासंबंधीच्या विधिमंडळाच्या प्रदानित शक्तीचा विचार निरनिराळ्या राज्यांच्या हायकोर्टांनी साकल्याने केल्याचे न्यायनिवाडे उपलब्ध आहेत. (प्रदानित शक्ती DELIGATION POWER) अशाच न्यायालयीन निकालपत्रांपैकी सुप्रीम कोर्टाची काही निकालपत्रे पुढीलप्रमाणे :–

हरिशंकर बागला वि. स्टेट ऑफ मध्य प्रदेश, ए. आय. आर. १९५४ सु. को. ४६५

दिल्ली लॉज ॲक्ट, ए. आय. आर. १९५१ सु. को. ३३२

राजनारायण वि. पाटणा ॲड्मिनिस्ट्रेशन कमिटी, ए. आय. आर. १९५४ सु. को. ५६९

बसनलाल मगनभाई वि. मुंबई राज्य, ए. आय. आर. १९६१ सु. को. ४

या विषयावरील मुंबई हायकोर्ट, नागपूर हायकोर्ट, मध्य प्रदेश हायकोर्ट, मद्रास हायकोर्ट, यांचीही अनेक निकालपत्रे आहेत.

बंधनकारक असणारी कर्तव्ये करण्यात जी म्युनिसिपालिटी कुचराई करते, त्या म्युनिसिपालिटीच्या कपाळी अकार्यक्षमतेचा शिक्का बसतो. बंधनकारक कर्तव्ये योग्य प्रकारे करून ऐच्छिक कृत्येही करण्यात ज्या स्थानिक संस्थेचा हातभार आहे अशा स्थानिक संस्था प्रागतिक–पुढारलेल्या–आहेत. पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन ही अशांपैकीच एक स्थानिक संस्था आहे. प्रस्तुत लेखकाला या संस्थेबद्दल आदर आणि अभिमान वाटतो.

अध्यक्षाची निवडणूक आणि उपाध्यक्षाची नेमणूक

५१. [१] प्रत्येक नगरपालिकेस अध्यक्ष असला पाहिजे, की जो कलम ११ खाली तयार केलेल्या यादीतील मतदारांनी निवडलेला असेल.

[२] कलम १५ खाली नगरसदस्य म्हणून निवडून येण्यास अर्हता असलेला प्रत्येक इसम निवडणुकीत अध्यक्ष म्हणून निवडण्यास अर्हताप्राप्त असला पाहिजे.

[३] अध्यक्षाच्या निवडणुकीनंतर, नगरपालिका क्षेत्रात मतमोजणी झाल्यानंतर, लवकरात लवकर सोयीप्रमाणे कलेक्टरने कार्यालयीन राजपत्रात, निर्णय प्रसिद्ध केला पाहिजे.

[४] जर निवडणुकीत अध्यक्ष निवडला नाही तर अध्यक्षाच्या निवडीसाठी, नवी निवडणूक घेतली पाहिजे आणि नव्या निवडणुकीत जर अध्यक्षाची निवडणूक होणेस चुकेल तर, या कायद्यात काहीही नमूद असले तरी, अशी रिकामी जागा राज्यसरकारने अर्हताप्राप्त इसमाच्या नियुक्तीने भरली पाहिजे.

[५] पोट कलम (४) किंवा (६) खाली राज्यसरकारने नियुक्त केलेला कोणीही इसम या कायद्याखालील निवडणुकीत निवडून आला असे समजले पाहिजे.

[६] निवडून आलेल्या नगरसदस्यांच्या सत्रकाळात जर कोणत्याही कारणामुळे अध्यक्षाचे पद रिकामे झाले तर पोट कलमे (१) ते (५) यांतील तत्समान तरतुदींचे अनुसरण केले पाहिजे.

परंतु असे की, निवडून आलेल्या नगरसदस्यांच्या पदाचा सत्रकाल संपण्यापूर्वीच्या तारखेआधीच्या सहा महिन्यांत जागा रिकामी झाली तर राज्यसरकारने अर्हताप्राप्त व्यक्तीच्या नियुक्तीने भरली पाहिजे.

[७] (अ) प्रत्येक नगरपालिकेस उपाध्यक्ष असला पाहिजे, की जो अध्यक्षाने, त्याने निवडून आलेल्या नगरसदस्यांमधून, पहिली सभा बोलावली असेल ती भरण्यापूर्वी किंवा उपाध्यक्षाचे पद कोणत्याही कारणास्तव रिकामे झाले असल्यास त्या तारखेपासून सात दिवसांत, जसे असेल तसे, नेमून घेतला पाहिजे.

(ब) अध्यक्षाने सदर (अ) खाली उपाध्यक्षाची नेमणूक केल्याबरोबर कलेक्टरला आणि अशा नेमणुकीनंतर लागलीच भरणाऱ्या सभेत नगरसदस्य मंडळालाही कळविले पाहिजे.

[८] पोट कलम (७) चे सदर (अ) खाली स्पष्ट केलेल्या कालावधीत जर अध्यक्ष उपाध्यक्षाची नेमणूक करणेस चुकेल तर मुख्याधिकारी यांनी राज्य-सरकारला अहवालित केले पाहिजे आणि त्या सरकारने निवडून आलेल्या नगर-सदस्यांमधून उपाध्यक्षाची नेमणूक केली पाहिजे.

[९] अध्यक्षाच्या खुषीने उपाध्यक्षाने उपाध्यक्षपद, जोपर्यंत ज्याने उपाध्यक्ष म्हणून नेमणूक केली आहे ते अध्यक्षपद कोणत्याही कारणावरून रिकामे झाले नाही किंवा उपाध्यक्षपदाचा त्याने राजीनामा दिला नाही किंवा कोणत्याही कारणास्तव निवडून आलेले नगरसदस्यत्वाचे संपुष्टन झाले नाही तोपर्यंत, धारण केले पाहिजे.

अध्यक्षाच्या पदाचा सत्रकाल

५२. अध्यक्षाच्या पदाचा सत्रकाल निवडून आलेल्या नगरसदस्यांच्या पदा-बरोबरच संपुष्टात आला पाहिजे.



भाष्य

जे कौन्सिलर म्हणून निवडून आलेले आहेत किंवा निवडून आल्याचे समजले जावे असे आहेत, त्या कौन्सिलरांनी त्यांच्यामधून त्यांच्यापैकी एकास प्रेसिडेण्ट म्हणून निवडून द्यावे अशी तरतूद या कलमात आहे. मात्र को-ऑप्टेड कौन्सिलर जे आहेत त्यांना प्रेसिडेण्टच्या निवडणुकीत मत देण्याचा अधिकार नाही. जोपर्यंत प्रेसिडेण्ट आणि व्हाइस प्रेसिडेण्ट म्हणून अधिकारपदावर आरूढ झालेले नाहीत तोपर्यंत को-ऑप्टेड म्हणून कोणी को-ऑप्शन पदावर आरूढ होऊ शकत नाही. अशीच तरतूद या कायद्यात आहे. प्रेसिडेण्टची निवडणूक म्युनिसिपालिटीच्या सार्वत्रिक निवडणुकीतील मतदारांनी करावी की ज्यांची नावे कलम ११ च्या तरतुदीनुसार तयार केलेल्या मतदारांच्या यादीत मतदार म्हणून समाविष्ट आहेत, त्यांनी. जो या मतदारयादीत मतदार म्हणून अर्हत आहे अशा प्रत्येकाला प्रेसिडेण्ट म्हणून निवडणूक लढविण्याचा हक्क आहे. मात्र कलम १५ च्या तरतुदीप्रमाणे उमेदवारीस तो मतदार अर्हत असला पाहिजे आणि कलम १६ च्या तरतुदीप्रमाणे उमेदवारी करण्यास तो अनर्हत ठरलेला नसावा.

जर प्रेसिडेण्टच्या निवडणुकीत कोणी प्रेसिडेण्ट म्हणून निवडून आला नाही तर पुन्हा निवडणूक घेतली पाहिजे आणि अशी पुन्हा निवडणूक घेऊनही फेरनिवडणुकीत कोणी प्रेसिडेण्ट म्हणून निवडून आला नाही तर मात्र राज्यसरकारने प्रेसिडेण्टच्या पदावर आरूढ होण्यास अर्हत असणाऱ्या कोणासही प्रेसिडेण्ट म्हणून नियुक्त करावे– नॉमिनेट करावे.

निवडून आलेल्या प्रेसिडेण्टने जे निवडून आलेले कौन्सिलर आहेत, त्यांतून एखाद्या कौन्सिलरची व्हाइस प्रेसिडेण्ट म्हणून नेमणूक केली पाहिजे. जोपर्यंत प्रेसिडेण्टशी त्याचे मतभेद होत नाहीत अथवा मतभेद विकोपाला जात नाहीत तोपर्यंतच व्हाइस प्रेसिडेण्टच्या पदावर व्हाइस प्रेसिडेण्ट म्हणून नेमणूक केलेल्या व्यक्तीस राहता येते. व्हाइस प्रेसिडेण्टची नेमणूक करण्याचा अधिकार प्रेसिडेण्टला आहे, तद्वतच त्यावरून दूर करण्याचा अधिकारही प्रेसिडेण्टला आहे.

महाराष्ट्र शासनाने म्युनिसिपालिटीच्या निवडणुकीचे नियम तयार केले आहेत, तेच नियम प्रेसिडेण्टच्या निवडणुकीला लागू आहेत. हे तयार केलेले नियम "महाराष्ट्र म्युनिसिपालिटीज् इलेक्शन रूल्स १९६६" या नावाने महाराष्ट्र सरकारच्या राजपत्रात प्रसिद्ध झाले आहेत (M. G. G. PART IV-B-EX-22-11-1966-1079).

या नियमात दुरुस्ती झाली असून ते दुरुस्त सुधारित नियमही राजपत्रात प्रसिद्ध झाले आहेत (M. G. G. PART 14 GEN--EX-10-12-1973-81).

प्रेसिडेण्टच्या पदाचा सत्रकाल आणि कौन्सिलरच्या पदाचा सत्रकाल सारखा आहे. कौन्सिलरच्या पदाच्या सत्रकालाची तरतूद कलम ४० मध्ये आहे.

एखाद्या निवडून आलेल्या प्रेसिडेण्टने आपल्या पदाचा राजीनामा दिला तर प्रेसिडेण्टचे पद रिकामे होते. अशा रिक्ततेला CASUAL VACANCY–नैमित्तिक रिक्तता म्हणतात. यासंबंधीची चर्चा पुढे कलम ५३, ५४ आणि ५५ खालील भाष्यात केली आहे.

अध्यक्षाचा राजीनामा

५३. [१] कलेक्टरला राजीनामा लेखी सादर करून अध्यक्षाने पदातून मुक्त व्हावे.

[२] कलेक्टरला राजीनामा मिळताच तो परिणामित आणला गेला पाहिजे.

उपाध्यक्षाचा राजीनामा

५४. [१] अध्यक्षाला राजीनामा लेखी सादर करून उपाध्यक्षाने त्याचे पदातून मुक्त व्हावे.

[२] अध्यक्षाला राजीनामा मिळताच तो परिणामित आणला गेला पाहिजे.

भाष्य

प्रेसिडेण्ट आणि व्हाइस प्रेसिडेण्ट यांच्या राजीनाम्याशी संबंधित तरतुदी कलम ५३ ब ५४ यांत आहेत. राजीनामा प्रकृतीच्या अस्वास्थ्यास्तव देता येतो, तद्वतच बहुमताचे प्राबल्य संपुष्टात येते तेव्हाही देता येतो. बहुमताचे प्राबल्य संपल्याचे लक्षात येताच, पुढे आपल्याविरुद्ध अविश्वासाचा ठराव मंजूर होईपर्यंत थांबण्यापेक्षा राजीनामा देणे चांगले. पण काही वेळा परिस्थिती अशीही निर्माण होते की अविश्वासाच्या ठरावाला धैर्याने समोर जाणे पसंत करावे लागते. अविश्वासाचा ठराव मंजूर झाल्यावर अथवा कार्यक्षमता संशयास्पद झाल्यावर जर राजीनामा दिला नाही तर पदावरून हुसकून लावणे काही परिस्थितीत भाग पडते. अशी परिस्थिती व तत्संबंधीची चर्चा पुढे कलम ५५ चे खाली दिली आहे.

अध्यक्षाला काढून टाकणे

५५. [१] जर नगरसदस्य मंडळाला वाटले तर नगरसदस्यांच्या सभेमध्ये एकूण नगरसदस्यांच्या–निवडून घेतलेले नगरसदस्य सोडून–संख्येच्या दोन तृतीयांशापेक्षा कमी नाही अशा बहुमताने ठराव मंजूर करून अध्यक्ष म्हणून अध्यक्षाला संपुष्टात आणले पाहिजे.

[२] एकूण संख्येच्या एक द्वितीयांशापेक्षा कमी नाही अशा नगरसदस्यांच्या–यातून निवडून घेतलेले नगरसदस्य वगळून–स्वाक्षरीने अशी विशेष सभा बोलाविण्याची मागणी केली पाहिजे आणि ती कलेक्टरकडे पाठविली पाहिजे.

[३] पोट कलम (२) खालील मागणी नोटीस मिळाल्यापासून दहा दिवसांत कलेक्टरने नगरसदस्य मंडळाची विशेष सभा बोलावली पाहिजे.

परंतु असे की, जेव्हा विशेष सभा कलेक्टर बोलावील तेव्हा त्याने अध्यक्षाला कळविले पाहिजे.

[४] (अ) ठरावाचा विचार करण्यासाठी पोट कलम (१) खालील सभेचे अध्यक्षपद कलेक्टरकडे किंवा यासंबंधात त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे राहील, पण त्याला मताचा हक्क राहणार नाही.

(ब) अशा सभेला उपस्थित असणाऱ्या, निवडून घेतलेल्या नगरसदस्यांना मताचा हक्क राहणार नाही.

[५] (अ) पोट कलम (१) खाली अध्यक्षपद संपुष्टात आल्यावर, असे अध्यक्षपद संपुष्टात आल्या तारखेपासून सात दिवसांत सदस्यमंडळाच्या बरखास्तीबद्दल त्यांने राज्यसरकारला लेखी अर्ज करावा, की ज्या प्रकरणी त्या सरकारने कार्यालयीन राजपत्रात आदेश प्रसिद्ध करून सदस्यमंडळ बरखास्त केले पाहिजे. असा आदेश काढल्यावर सदस्यमंडळाची आणि अध्यक्षाची नवी निवडणूक घेतली पाहिजे आणि अशा आदेशात स्पष्ट केलेल्या तारखेस सदस्यमंडळ पुनर्रचित झाले पाहिजे. नवीन सदस्यमंडळाच्या नगरसदस्यांनी – अध्यक्षासह या कायद्यात काहीही नमूद असले तरी, बरखास्त केलेले नगरसदस्यांचे सदस्यमंडळ जोपर्यंत पदावर राहिले असते तावत्कालपर्यंत पद धारण केले पाहिजे जसे ते सदस्यमंडळ बरखास्त झाले नाही असे.

(ब) सदर (अ) मध्ये स्पष्ट केलेल्या कालावधीत जर अध्यक्ष सदस्य मंडळाच्या बरखास्तीबद्दल अर्ज करण्यास चुकेल, तर राज्यसरकारने कार्यालयीन राजपत्रात आज्ञा प्रसिद्ध करून, अशा आज्ञेत स्पष्ट केलेल्या कालावधीत अध्यक्षाच्या पदाची नवी निवडणूक घेण्याचा आदेश दिला पाहिजे.

परंतु असे की, सदस्य मंडळाच्या पुनर्रचनेसाठी स्पष्ट केलेली तारीख किंवा अध्यक्षाच्या निवडणुकीसाठी स्पष्ट केलेला कालावधी, राज्यसरकारने कार्यालयीन राजपत्रात आदेश प्रसिद्ध करून, त्या आदेशात कारणे स्पष्ट नमूद करून वेळोवेळी वाढवावा. कसेही असले तरी वाढविलेली तारीख किंवा कालावधी, प्रथमतः स्पष्ट केलेल्या तारखेपासून किंवा कालावधीपासून एकूण सहा महिन्यांपेक्षा जास्त किंवा त्यापलीकडे पुढे ढकलता कामा नये.

[६] सदस्य मंडळाच्या विरोधामुळे, जर अध्यक्षास असे वाटले की आपले कर्तव्य बजाविण्यास आपण असमर्थ आहोत, तर त्याने त्याचे पदातून मुक्त व्हावे आणि पुनर्निवडणूक आकांक्षावी. जर पुनर्निवडणुकीत तो पुन्हा निवडून आला तर, तो किंवा इतर कोणीही अध्यक्ष म्हणून निवडून आला तर, त्या दुसऱ्या इसमाने, पुनर्निवडणुकीच्या किंवा निवडणुकीच्या, जसे असेल तसे, तारखेपासून सात दिवसांत

सदस्यमंडळाचा अध्यक्ष वगळून बरखास्तीसाठी राज्यसरकारला अर्ज करावा. अशा प्रकरणी राज्यसरकारने कार्यालयीन राजपत्रात आज्ञा प्रसिद्ध करून सदस्यमंडळ बरखास्त करावे. अशी आज्ञा काढल्यावर सदस्यमंडळाची, अध्यक्ष सोडून नवी निवडणूक घेऊन त्या आज्ञेत स्पष्ट केले असेल त्या तारखेस सदस्यमंडळ पुनर्रचित केले पाहिजे. अध्यक्ष नवीन सदस्यमंडळाचा अध्यक्ष निवडला असे समजणेत येईल. नवीन सदस्यमंडळाच्या नगरसदस्यांनी अध्यक्ष समाविष्ट, या कायद्यात काहीही नमूद असले तरी, बरखास्त झालेल्या सदस्य मंडळाच्या नगरसदस्यांनी, जसे काही बरखास्त झाले नाहीत असे, जावत्काळपर्यंत पद धारण केले असते तावत्काळपर्यंत फक्त पद धारण केले पाहिजे.

[७] पोट कलम (५) (अ) किंवा पोट कलम (६) खाली सदस्यमंडळाचे बरखास्तीनंतर, अध्यक्षाचे संबंधात पोट कलम (६) यातील अन्यथा तरतुदीरक्षित, कलम ३१६ मध्ये स्पष्ट केलेल्या परिणामी हमी आणि बरखास्त सदस्यमंडळाची कर्तव्ये बजावण्यासाठी आणि शक्तीचा वापर करण्यासाठी नेमलेल्या इसमाने किंवा इसमांनी, राज्यसरकार ठरवील असा नगरपालिका निधीमधून मोबदला घेतला पाहिजे.

[८] कोणत्याही कारणामुळे जर अध्यक्षाचे पद रिकामे झाले तर मुख्याधिकारी यांनी कलेक्टरला अहवालित केले पाहिजे आणि नवीन अध्यक्षाची निवडणूक किंवा नियुक्ती होईपर्यंत अध्यक्षाची कर्तव्ये आणि शक्ती कलेक्टरने किंवा कलेक्टरने नेमले असेल अशा दुसऱ्या अधिकाऱ्याने बजावावी आणि वापरावी. कलेक्टरने नेमणूक केलेल्या कोणाही अधिकाऱ्यास, कलेक्टर ठरवील तो मोबदला नगरपालिका निधीतून मिळाला पाहिजे.

[९] पोट कलम (४) मध्ये नमूद असलेल्या कोणत्याही सभेत उपस्थित असणाऱ्या को-ऑप्टेड नगरसंस्था सदस्यांना, अध्यक्षाला काढून टाकण्यासंबंधित असणाऱ्या कोणत्याही ठरावात मतदान करण्याचा हक्क नाही.

५५. (अ) कलम ५१ अ आणि ५५ च्या तरतुदींना बाधा न आणता, राज्य-सरकारने अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांना, ते त्यांचे कर्तव्य बजावीत असताना गैरवर्तन केल्यास किंवा निष्काळजीपणा केल्यास किंवा त्यांचे कर्तव्य बजावण्यास ते असमर्थ असल्यास किंवा कोणत्याही अप्रतिष्ठित कृतीबद्दल दोषी ठरल्यास, त्याच्या पदावरून काढावे आणि अशा तऱ्हेने काढून टाकलेल्या अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष, जसे असेल तसे, नगरसंस्था सदस्यांच्या उर्वरित काळासाठी फेरनिवडणुकीस किंवा फेरनेमणुकीस पात्र असणार नाही.

परंतु असे की, अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांस, खुलासा सादर करण्याची संधी दिल्याशिवाय त्याला त्याच्या पदावरून काढता येणार नाही.

(१९८१ साली या कायद्यात दुरुस्ती करण्यात आली असून कलम ५५ (५) पूर्वी होते त्याऐवजी वरील मजकूर त्यात घालण्यात आला व ५५ अ हे कलम नवीन घालण्यात आले ते वर दिले आहे).

भाष्य

प्रेसिडेण्टच्या पदाचे संपुष्टन खालील कारणांवरून होऊ शकते.

मृत्यूमुळे,

राजीनाम्यामुळे,

कौन्सिलरांनी बहुमताने मंजूर केलेल्या अविश्वासाच्या ठरावामुळे,

विनापरवाना गैरहजर राहिल्याच्या कारणावरून

कामाशी संबंधित असलेल्या गैरवर्तनावरून.

मागे कलम ४२ खालील भाष्यात यासंबंधीची चर्चा झालेली आहे. प्रेसिडेण्ट हा प्रथम कौन्सिलर व नंतर प्रेसिडेण्ट आहे. कलम ४२, ज्याला कौन्सिलरच्या पदावरून काढून टाकले आहे, तो जरी प्रेसिडेण्ट असला तरी प्रेसिडेण्ट पदावरूनही त्याला बाजूला व्हावे लागते. (श्रीमती प्रेमलता वि. कृष्णा गोयल, १९६८ अलाहाबाद लॉ जर्नल १०४०).

या कलमात 'TOTAL NUMBER OF COUNCILLORS' असे शब्द पहिल्याच पोट कलमात ठराव मंजूर करण्याच्या संदर्भात आहेत. या कौन्सिलरांच्या एकूण संख्येतून को-ऑप्टेड कौन्सिलरांची संख्या वजा करावयाची व उरलेले कौन्सिलर, ती एकूण कौन्सिलरांची संख्या हे या पोट कलम (१) मध्ये स्पष्ट केले आहे. को-ऑप्टेड कौन्सिलरला कलम ५५ च्या पोट कलम (४) च्या तरतुदीप्रमाणे मतदानाचा हक्क, या कलमानुसार भरणाऱ्या खास मीटिंगमध्ये नाही.

TOTAL NUMBER OF COUNCILLORS – कौन्सिलरांची एकूण संख्या, हे शब्द या कायद्यातील कलमे १९ (२), ६३ (१), ६५ (२), ८१ (२), ८१ (९) (अ) (i) व (ii), ८१ (१५) व कलम १८७ च्या परंतुकेत आले आहेत. या शब्दांतून दोन अर्थ निघतात व त्यातून निश्चित निर्णय घेताना कोणता अर्थ तेथे अभिप्रेत असावा याबद्दल विचार करावा लागतो. एक अर्थ असा, की–

> जेव्हा मीटिंग चालू असते व मतदानाचा प्रसंग उद्भवतो तेव्हा उपस्थित असतील अशा कौन्सिलरांची एकूण संख्या

दुसरा अर्थ असा की,

> जेव्हा मीटिंग चालू असते व मतदानाचा प्रसंग उद्भवतो तेव्हा केवळ उपस्थित आहेत अशाच केवळ कौन्सिलरांची एकूण संख्या नव्हे, तर पटावर असणाऱ्या सर्व – उपस्थित, अनुपस्थित व रिक्तजागेचाही – कौन्सिलरांची एकूण संख्या.

या कायद्यातील कलम २ (४९) मध्ये हे शब्द आहेत. त्यातील व्याख्या अशी की, "इलेक्टेड, को-ऑप्टेड, नॉमिनेटेड अशा सर्व कौन्सिलरांची एकूण संख्या –" पण या कलमात तो अर्थ अभिप्रेत नाही. या कलमाच्या व्याप्तीत एकूण कौन्सिलरांच्या संख्येत को-ऑप्टेड कौन्सिलरांचा समावेश करता येत नाही. "कौन्सिल" या शब्दाच्या व्याप्तीला पूर्तता तेव्हा येते की जेव्हा कायद्यातील तरतुदीनुसार–इलेक्टेड, को-ऑप्टेड व नॉमिनेटेड अशा सर्वांची नियत केलेली संख्या पूर्ण होते तेव्हा–कोणीही अनुपस्थित नाही व एकही जागा रिकामी नाही– (जागा रिकामी याचा केवळ शाब्दिक अर्थ अभिप्रेत नाही तर आशयांकित अर्थ अभिप्रेत आहे.) या कलमाच्या पोट कलम (१) प्रमाणे, कलम ९ प्रमाणे संबंधित कौन्सिलमध्ये नियत केलेल्या एकूण कौन्सिलर पदांची संख्या (को-ऑप्टेड वगळून) की जे मतदानास पात्र आहेत ते, उपस्थित असलेले, असा अर्थ अभिप्रेत आहे.

अविश्वासाचा ठराव मंजूर होणे म्हणजे,

ज्या पदाच्या संदर्भात ठरावाचा संबंध पोहोचतो त्या पदाचे संपुष्टन होणे, आणि त्या पदाची ती जागा रिक्त होणे.

लोकशाही पद्धतीत निवडून येणारांची, निवडून आले होते त्यांची व निवडून आले आहेत अशांच्या एकूण संख्यागणनेत FLUCTUATING आणि FLUID अशा दोन इंग्लिश शब्दांचा वापर 'अस्थिर' व 'प्रवाही' – नित्य नव्या संख्येने दृश्यमान होणारे, अशा अर्थाने केला जातो. (नामदेवराव वि. धुलाजी, १९६९ महाराष्ट्र लॉ जर्नल ७४).

अविश्वासाचा ठराव याचा अर्थच असा की पदावरून हुसकावून लावण्याचा ठराव. असा ठराव ज्या मीटिंगमध्ये चर्चेला घ्यावयाचा असेल ती मीटिंग कलेक्टरच्या अध्यक्षतेखाली भरली पाहिजे, किंवा यासंबंधात कलेक्टरने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली–प्राधिकृत केल्याचे लेखी असणे आवश्यक आहे–असा ठराव चर्चेला घ्यावा असे आधी एक द्वितीयांश कौन्सिलरांनी–को-ऑप्टेड सोडून–बहुमताने ठरवावे लागते. तसे कलेक्टरला बहुमताने ठरवल्याचे कळवावे लागते व तो मिळाल्या तारखेपासून दहा दिवसांत कलेक्टरने त्यासाठी मीटिंग बोलावली पाहिजे. (बोलावली पाहिजे; भरविली पाहिजे असे नाही.) ज्या प्रेसिडेण्टविरुद्ध तो ठराव चर्चेला घ्यावयाचा असेल त्या प्रेसिडेण्टपदावर असणाऱ्या व्यक्तीला कलेक्टरने त्याची लेखी जाणीव आगाऊ दिली पाहिजे आणि ठराव मंजूर झाल्या तारखेपासूनच त्या पदावरील त्याचा हक्क संपुष्टात येतो. अशा संपुष्टनानंतर सात दिवसांच्या आत कौन्सिलच्या बरखास्तीबद्दल राज्य सरकारला संबंधित प्रेसिडेण्टने अर्ज करून विनंती केली पाहिजे. प्रेसिडेण्टच्या पदाचे संपुष्टन म्हणजे संपूर्ण कौन्सिलचे संपुष्टन असा अर्थ या कलमात ५५(५) (अ) यात असावा. कौन्सिल बरखास्त केल्याचे राजपत्रात प्रसिद्ध करून संबंधित म्युनिसिपालिटीची निवडणूक घेऊन निवडून

आलेल्या कौन्सिलरांच्या कौन्सिलची पुनर्रचना करावी लागते.

उत्तर प्रदेश टाऊन एरिया ॲक्ट १९१४च्या कलम ८–अ यातील तरतुदीप्रमाणे, ज्या चेअरमनला राजीनामा देण्याची इच्छा असेल त्याने तो डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटला सादर केला पाहिजे आणि त्याने तो स्वीकारल्याची माहिती मिळाल्यापासून चेअरमन-पद रिक्त झाल्याचे समजले जावे. यातील शब्दरचनेवरून असा बोध होतो की राजीनामा परिणामित (EFFECTIVE) केव्हा होतो की जेव्हा तो स्वीकारला जाईल तेव्हापासून. राजीनामा पाठविला आणि राजीनामा स्वीकारला यांमध्ये जो कालावधी जाईल त्या कालावधीत चेअरमनच्या पदाचे संपुष्टन झाल्याचे समजले जाता कामा नये असे अलाहाबाद हायकोर्टाचे म्हणणे आहे (बोहारीलाल पालीवाल वि. डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट, बुलंदशहर १९५६ अलाहाबाद लॉ जर्नल ४२१). जर राजीनामा सशर्त असेल तर तो स्वीकारण्याचा प्रश्न, शर्तीसंबंधी विचार केल्या-नंतर उद्भवतो. मात्र मागे घेतला जावा अशी तरतूद नाही असे याच प्रकरणात हायकोर्टाने नमूद केले आहे.

अशीच तरतूद राजस्थान ॲक्ट १९४९ मध्ये आहे व त्याखालील निकालपत्रातील निर्णयही वरीलप्रमाणेच आहे. (शमसुद्दीन वि. स्टेट ऑफ राजस्थान, ए. आय. आर. १९५२ राजस्थान ५३).

उत्तर प्रदेश म्युनिसिपालिटीज ॲक्ट १९४६ च्या कलम ४७–अ (१) (अ) मध्ये अविश्वासाच्या ठरावासंबंधीची तरतूद आहे. बोर्डाने ठराव मंजूर करून प्रेसिडेण्टला तो कळवावा आणि प्रेसिडेण्टने हा ठराव कळाल्यापासून तीन दिवसांत (रामगोपाल गुप्ता वि. स्टेट १९६९ अलाहाबाद लॉ जर्नल २३१)–

राजीनामा तरी दिला पाहिजे; किंवा

राज्य सरकारकडे, कारणांसह दुसरे बोर्ड नेमण्याबद्दल दाद मागितली पाहिजे.

थोड्याशा फरकाने अशीच तरतूद या कायद्याच्या कलम ५५ मध्ये आहे. त्या कायद्यात SUPERSEDE हा शब्द आहे. या एका शब्दातील व्यापकता अशी की जे आहे ते बाजूला करून त्या जागी दुसरे आणा. महाराष्ट्र म्युनिसिपालिटीज् ॲक्ट १९६५ च्या कलम ५५(५) मध्ये DISSOLUTION हा शब्द आहे. यात व्यापकता नाही. बरखास्ती एवढाच अर्थ आहे. उत्तर प्रदेशच्या कायद्यानुसार प्रेसिडेण्ड, पहिले बरखास्त करा व त्या जागी दुसरे आणा असे सांगू शकतो आणि या कायद्यानुसार प्रेसिडेण्ट फक्त बरखास्त करा एवढेच सांगू शकतो. इतका फरक SUPERSEDE आणि DISSOLUTION या शब्दातील अर्थात आहे.

या कायद्याच्या या कलमातील तरतुदीप्रमाणे कौन्सिलरांनी बहुमताने अविश्वासाचा ठराव मंजूर केल्यावर प्रेसिडेण्टपदाचे संपुष्टन होते. असा ठराव मंजूर करण्यासाठी प्रेसिडेण्टला पदावरून का काढावे अशी कारणे नमूद करावीत किंवा केली पाहिजेत, असा कटाक्ष यात आहे असे दिसत नाही. असा ठराव मंजूर

करण्यापूर्वी, असा ठराव का मंजूर करू नये, याची कारणे दाखविण्याची संधी प्रेसिडेण्टला द्यावी किंवा दिली पाहिजे अशीही तरतूद यात आहे असे दिसत नाही. या कायद्यातील अनेक ठिकाणी अशी कारणे दाखविण्याची संधी संबंधिताला द्यावी असे नमूद आहे पण तेच नेमके या कलमाच्या तरतुदीत नाही. या उणीवेचा अर्थ असा करता येणार नाही, की ही उणीव दुर्लक्षित किंवा निर्हेतुक आहे. जे कायद्याच्या कलमात नाहीच ते असे दुर्लक्षित किंवा निर्हेतुक असल्याचे मानून कोर्टाला तशा निर्वाळ्यावर निर्णय देण्याचा मुळीच अधिकार नाही असे बॉम्बे हायकोर्टाने स्पष्ट मत व्यक्तविले आहे. (रामकृष्ण गंगाराम राठी वि. किसन झिंगारी मडके, ए. आय. आर. १९७१ बॉम्बे ३०५).

या कलमाच्या पोट कलम (१)च्या अखेरीस SO DECIDES असे शब्द आहेत. ऑक्स्फर्ड डिक्शनरीमध्ये या शब्दाचा अर्थ देताना असे विश्लेषण केले आहे, की जे तंटयाचे आहे, जो मुद्दा / मुद्याचे आहे, ते ठरले SETTLED निश्चित केले. एका बाजूला यश देणे, निकाल देणे, ठरविणे. हे लक्षात घेतल्यास या कलमातील SO DECIDES शब्दावरून असा बोध होतो की एकूण कौन्सिलरांच्या बहुमताने असे ठरले/ठरविले. पूर्ण चर्चा करून/साधकबाधक चर्चा करून असे किंवा तसे ठरते. इतकी व्यापकता या ठिकाणी योजलेल्या या शब्दात नाही.

या कलमाच्या मथळ्यात REMOVAL असा शब्द आहे. REMOVE या शब्दाचा शब्दकोषातील अर्थ असा आहे –

TAKE OFF OR AWAY FROM PLACE OCCUPIED
व्यापलेल्या / असलेल्या जागेवरून बाजूस करणे.

CONVEY TO ANOTHER PLACE – दुसऱ्या जागेवर बसविणे.

CHANCE IN SITUATION OF – परिस्थितीत बदल घडविणे.

GET RID OF – पासून मुक्त करणे.

DISMISS – बडतर्फ करणे.

TO WITHDRAW – माघार घेणे.

लोकशाहीत, विहित पद्धतीने बहुमताने पदावरून बाजूस सारणे याचा अर्थ बाजूस सारले, ते कलंकित होते म्हणून बाजूस सारले किंवा बाजूस सारले म्हणजे कलंकित केले/झाले असा घेतला जात नाही. बहुमताची इच्छा एवढाच अर्थ त्यातून घेतला जातो. अशा बहुमताच्या इच्छेमागे काही कारणे, काही पार्श्वभूमी असलीच पाहिजे, ती विशद केलीच पाहिजे असे लोकशाही पद्धतीत कटाक्षित नसते. मात्र, कायद्यात जर कारणाची आवश्यकता नमूद केलेली असेल तर कायद्याचा मान राखलाच पाहिजे. अशा कारणाची आवश्यकता आहे असे या कलमात नमूद नाही.

या कलमात १९८१ साली दुरुस्ती करण्यात आली व कलम ५५ अ नव्हते ते घालण्यात आले. त्या नवीन दुरुस्तीप्रमाणे प्रेसिडेण्ट किंवा व्हाइस प्रेसिडेण्ट यास

काढून टाकण्यापूर्वी खुलासा सादर करण्याची संधी द्यावी असे नमूद केले आहे.

जेव्हा राज्यसरकार किंवा सरकारातील विहित अधिकारी एखाद्या कौन्सिलरवर अशा प्रकारची कारवाई करण्याचे ठरवील तर तत्पूर्वी त्या संबंधितास त्याबद्दल खुलासा विचारणे व खुलासा सादर करण्यास संधी देणे हे न्यायोचित आहे. नव्याने दुरुस्त केलेल्या या तरतूदी, उत्तर प्रदेश म्युनिसिपालिटिज् ॲक्ट १९१६ च्या कलम ४० (४) मध्ये आहेत.

नियोजित कारवाई काढून टाकण्याची असो, निलंबित करण्याची असो अथवा ताकीद देण्याची असो, खुलासा ऐकून घेतल्याशिवाय अशी कारवाई करणे हे नैसर्गिक न्यायतत्त्वाशी विसंगत कृती ठरते. काढून का टाकू नये, निलंबित का करू नये अथवा दोषी का ठरवू नये, याची कारणे दाखवा अशी विचारणा त्याचेकडे केली पाहिजे. (अब्दुल लतीफ नोमाजी वि. कमिशनर गोरखपूर, १९६७ अलाहाबाद लॉ जर्नल ४३१).

"खुलाशाची संधी" या शब्दातील अर्थ स्पष्ट करताना, (मोहरसिंग वि. प्रेसिडेण्ट नोटिफाईड एरिया, १९५६ अलाहाबाद लॉ जर्नल ७५९) मा. न्यायमूर्तींनी असे म्हटले आहे, की खुलाशाची संधी या शब्दाच्या आशयात नैसर्गिक न्यायाच्या सर्व रास्त तत्त्वांचे अनुकरण केले पाहिजे इतकी व्यापकता आहे. असे अनुकरण केले गेले नाही तर सर्व कारवाई नियमबाह्य अतएव रद्द ठरते. (मुजीबुल हसन वि. कमिशनर रोहीलखंड, अलाहाबाद लॉ जर्नल १०२२).

पदावरून काढून टाकण्याची कारवाई राज्यसरकारने सार्वजनिक हितासाठी केली पाहिजे. सार्वजनिक हिताकडे दुर्लक्ष करून केलेली कारवाई राज्यघटनेच्या आर्टिकल-प्रमाणे त्याचेवर अन्याय करणारी ठरेल असे सुप्रीम कोर्टाचे मत आहे. (रामदयाळ वि. पंजाब राज्य, ए. आय. आर. १९६२ सु. को. १५१८). याच प्रकरणात सुप्रीम कोर्टाने 'सार्वजनिक हित' या शब्दातील आशय स्पष्ट केला आहे.

सुधारित कलमात "गैरवर्तनाचे कारणाबरून" असा उल्लेख आहे. गैरवर्तन शब्दाचा वापर क्रिमिनल प्रोसीजर कोडच्या कलम १९७ मध्ये केला आहे. येथे प्रेसिडेण्ट/व्हाइस प्रेसिडेण्टच्या कर्तव्याशी संबंधित व निगडित असणारी आक्षेपित कृत्ये म्हणजे प्रेसिडेण्टचे व्हाइस/प्रेसिडेण्टचे गैरवर्तन असा मर्यादित अर्थ आहे. (माताजोग डुबे वि. एच. सी. बहारी, ए. आय. आर. १९५६ सु. को. ४४). जेव्हा लोकसेवकाविरुद्ध त्याच्या गैरवर्तनाचा आक्षेप घेण्यात येतो, तेव्हा बचाव पक्षाचा बचाव जर असा असेल, "मी केले ते, मी जे जनसेवेचे पद धारण करीत आहे त्या पदाचे कर्तव्य म्हणून केले" तर त्याच्यावर न्यायालयात खटला भरता येणार नाही अथवा भरणे असेल तर त्याच्या वरिष्ठ खातेप्रमुखाची आगाऊ परवानगी घेणे आवश्यक असते. (अमरीक सिंग वि. पेप्सु राज्य, ए. आय. आर. १९५५ सु. को. ३०९) या परवानगीच्या संदर्भात थोडी अधिक चर्चा केल्यास वावगे ठरणार नाही.

अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष हे इंडियन पीनल कोडच्या कलम २१ च्या व्याप्तीप्रमाणे 'जनसेवक' आहेत आणि म्हणून क्रिमिनल प्रोसीजर कोडच्या कलम १९७ च्या तरतुदीप्रमाणे, खटला भरण्यापूर्वी पूर्वपरवानगीचा विचार यांच्या बाबतीत करणे आवश्यक आहे. कलम १९७ च्या व्याप्तीप्रमाणे **जे राज्यसरकारने नेमलेले** आणि **राज्यसरकार ज्यांना काढू शकेल** अशांच्या बाबतीतच फक्त पूर्वपरवानगीची आवश्यकता असते. महाराष्ट्र म्युनिसिपालिटीज् ॲक्टच्या तरतुदीप्रमाणे अध्यक्षाच्या पदावर असणारी व्यक्ती निवडणुकीच्या चाकोरीतून निवडून आलेली असते, तर उपाध्यक्षाच्या पदावर असणारी व्यक्ती प्रथम कौन्सिलर म्हणून निवडून आलेली व नंतर अध्यक्षाने नेमणूक केल्यावरून उपाध्यक्ष म्हणून पद धारण करीत असते. या कायद्यातील तरतुदीप्रमाणे त्यांना त्यांच्या पदावरून काढण्यासाठी राज्यसरकार सक्षम अधिकारी नाही म्हणून या पदावर काम करीत असताना, कर्तव्याशी संबंधित कृत्याबद्दल त्यांच्यावर खटला भरणे असेल तर त्यासाठी राज्यसरकारच्या पूर्वपरवानगीची आवश्यकता नाही. (विश्वास मोहन वि. महादू, ए. आय. आर. १९६४ बॉम्बे १९१; श्रीपाल वि. मन्मथनाथ कुमार, ए. आय. आर. १९६० राजस्थान १७६; इब्राहिम वि. राज्य, ए. आय. आर. १९५९ म्हैसूर २३३). जरी पूर्वपरवानगीची आवश्यकता आहे असे गृहीत धरले तरी, क्रिमिनल प्रोसीजर कोड कलम १९७ च्या व्याप्तीत अशी शब्दरचना आहे की, खटला दाखल करण्याचे वेळी जो जनसेवक असेल त्याचे बाबतीत हे आवश्यक आहे, जो जनसेवक होता पण खटला दाखल करावयाचा तेव्हा तो जनसेवक नसेल तर त्याच्यासाठी पूर्वपरवानगीची आवश्यकता नसते. आता यात थोडा बदल झाला आहे. जनसेवक असताना जे आक्षेपित कृत्य केले असेल त्यासाठी खटला भरावयाचा असल्यास, खटला दाखल करावयाच्या वेळी जनसेवक नसला तरीही त्याच्यासाठी पूर्वपरवानगीची आवश्यकता आहे. (एम्परर वि. पी. ए. जोशी, ए. आय. आर. १९४८ बॉम्बे २४८; प्रसादचंद्र बानर्जी वि. एम्परर, ए. आय. आर. १९४३ कलकत्ता ५२७; एस. ए. वेंकटरामन वि. राज्य, ए. आय. आर. १९५८ सु. को. १०७). ज्या कृत्याबद्दल खटला भरावयाचा असेल ते कृत्य निःसंशयपणे अध्यक्ष/उपाध्यक्षाच्या पदावर असताना घडलेले असते, पण खटला दाखल करण्याच्या वेळी ते त्या पदावर नसतात म्हणून त्यांच्या बाबतीत पूर्वपरवानगी घेण्याच्या प्रश्नात संभ्रम उत्पन्न होतो.

परवानगीशिवाय, अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांच्या गैरहजेरीचे परिणाम

५६. [१] नगरपालिका क्षेत्रातून प्रत्येक अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष स्वतः होऊन गैरहजर राहील–

(अ) सदस्यमंडळाने गैरहजर राहणेस त्यास मंजुरी नसताना एका वेळी तीन महिन्यांपेक्षा अधिक कालावधीसाठी; किंवा

(ब) सदस्यमंडळाने रजा मंजूर केलेली असो किंवा नसो, वर्षाचे कालावधीत एकूण सहापेक्षा अधिक महिन्यांसाठी;

तर अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष, यांचे जसे असेल तसे, पद संपुष्टात येईल.

[२] एक वर्षात सहापेक्षा अधिक कालावधीसाठी पोट कलम (१) चे सदर (अ) खाली रजा मंजूर करता कामा नये. जेव्हा उपाध्यक्षास रजा मंजूर केली जाईल तेव्हा अध्यक्षाने रजा मंजूर केल्या तारखेपासून सात दिवसांत दुसऱ्या निवडून आलेल्या सदस्याची, उपाध्यक्षाची सर्व कर्तव्ये बजावण्यासाठी आणि सर्व शक्तींचा वापर करण्यासाठी, अशी रजा मंजूर केली असेल त्या मुदतीसाठी, नेमणूक केली पाहिजे.

[३] प्रत्येक प्रकरणी, या कलमाखाली अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष, अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष म्हणून संपुष्टात आल्याचे ठरविणारा सक्षम अधिकारी कलेक्टर राहील. कलेक्टरने, त्याचेकडे मतदाराने अर्ज केल्यावरून किंवा स्वतः होऊन निर्णय घ्यावा. असा निर्णय संबंधित अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष, मुख्याधिकारी आणि अर्जदार, कोणी असल्यास, त्यांना कळविला पाहिजे. जोपर्यंत जागा रिकामी झाल्याचा निर्णय कलेक्टरने घेतला नाही किंवा असा निर्णय वर तरतुदील्याप्रमाणे कळविला गेला नाही तोपर्यंत अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष, अध्यक्ष म्हणून किंवा उपाध्यक्ष म्हणून, जसे असेल तसे, संपुष्टात येता कामा नये.

परंतु असे की सुनावणीची रास्त संधी दिल्याशिवाय या कलमाखाली कलेक्टरने अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांचेविरुद्ध आदेश काढता कामा नये.

[४] कलेक्टरच्या निर्णयाने व्यथित झालेल्या कोणीही इसमाने, असा आदेश मिळालेल्या तारखेपासून पंधरा दिवसांचे कालावधीत राज्य सरकारला आवाहन करावे आणि अशा आवाहनाचा राज्य सरकारचा निर्णय अंतिम राहील.

अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांनी त्यांच्या पदाचे हस्तांतरण करणे

५७. [१] नवीन अध्यक्षाच्या निवडणुकीनंतर, मावळत्या अध्यक्षाने त्याच्या पदाचे हस्तांतरण नवीन अध्यक्षाला केले पाहिजे.

[२] प्रत्येक अध्यक्षाने, ज्याने पदाचा राजीनामा दिला आहे, किंवा ज्याला पदावरून काढून टाकले आहे किंवा नवीन अध्यक्षाचे निवडणुकीव्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणावरून ज्याच्या पदाचे संपुष्टन झाले आहे, त्याने कलेक्टरला किंवा यासंबंधात कलेक्टरने नेमणूक केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याला, त्याच्या पदाचे हस्तांतरण केले पाहिजे.

[३] प्रत्येक उपाध्यक्षाने, ज्याच्या उपाध्यक्षपदाचे कोणत्याही कारणासाठी संपुष्टन झाले आहे, त्याने अध्यक्षाला त्याच्या पदाचे हस्तांतरण केले पाहिजे आणि जर अध्यक्षाचे पद रिकामे असेल, तर कलेक्टरला किंवा यासंबंधात कलेक्टरने

नेमलेल्या कोणाही अधिकाऱ्याला त्याने त्याच्या पदाचे हस्तांतरण केले पाहिजे.

[४] पोट कलम (१), (२) किंवा (३) खाली आवश्यक असल्याप्रमाणे जर कोणा अध्यक्षाने किंवा उपाध्यक्षाने त्याच्या पदाचे हस्तांतरण करणेस नकार दिला, तर कलेक्टरने लेखी आज्ञेने, पदाचे हस्तांतरण करण्यास आदेश द्यावा आणि सदस्य मंडळाचे सर्व कागद आणि मालमत्ता, काही असल्यास, अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष म्हणून त्याच्या ताब्यात असतील ती, पोट कलम (१), (२) किंवा (३) जसे असेल तसे, यात स्पष्ट केलेल्या इसमाला हस्तांतरण केले पाहिजे आणि ताबडतोब अशा आदेशाचे पालन केले पाहिजे.

[५] पोट कलम (४) खाली ज्याला आदेश दिला आहे अशा कोणी अध्यक्षाने किंवा उपाध्यक्षाने जर आदेशाचे पालन केले नाही तर दोषसिद्धीनंतर, एक महिन्या-पर्यंतच्या सत्रवाढीपर्यंतच्या साध्या कैदेची किंवा दोनशे रुपयांपर्यंत दंडाची किंवा दोन्ही, शिक्षा केली पाहिजे.

अध्यक्षाची कामे

५८. [१] या कायद्याच्या तरतुदी आणि या कायद्याखाली तयार केलेले कोणतेही नियम आणि उपविधी यांचे अधीन सदस्यमंडळाच्या अध्यक्षाने –

(अ) रास्त कारणाने प्रतिबंध केला नसल्यास, सदस्यमंडळाच्या सर्व सभांचे अध्यक्षपदी राहिले पाहिजे आणि अशा सभांचे कामकाज नियमान्वित केले पाहिजे.

(ब) सदस्य मंडळाच्या अर्थ आणि कार्यकारी प्रशासन यांवर लक्ष ठेवले पाहिजे.

(ब-ब) उपाध्यक्षाची नेमणूक केली पाहिजे.

(क) अशी कार्यकारी कर्तव्ये बजावणे किंवा या कायद्याने किंवा कायद्याखाली किंवा प्रचलित काळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखाली त्यास दिलेल्या अशा शक्तींचा वापर केला पाहिजे.

(ड) सदस्यमंडळाचे सर्व अधिकारी आणि नोकर यांच्या कार्यकारी प्रशासनाच्या बाबतीत आणि सदस्यमंडळाशी संबंधित अशा लेखा आणि दप्तर या बाबतीतील सर्व कृती आणि कार्ये यावर नियंत्रण आणि पर्यवेक्षण करणे; आणि

(ई) राज्य सरकारला किंवा संचालकाला किंवा कलेक्टरला किंवा वेळोवेळी राज्य सरकारने प्राधिकृत केले असेल अशा इतर कोणाही सरकारी अधिकाऱ्याला, नियमाने विहित केले असतील असे अहवाल, विवरण पत्रे किंवा दप्तरनोंदी सादर केल्या पाहिजेत किंवा राज्यसरकार, संचालक, कलेक्टर किंवा असा अधिकारी ज्या कोणत्याही वेळी मागेल त्या वेळी त्यास दिल्या पाहिजेत.

[२] अध्यक्षाने, आणीबाणीचे प्रकरणी, कार्यप्रवृत्तीचा किंवा कोणतेही कार्य थांबविण्याचा किंवा कोणतीही कृती करीत असताना की ज्यास सदस्यमंडळाच्या मंजुरीची आवश्यकता आहे आणि तुरंत कार्यकारण किंवा त्याचे मताने सेवेसाठी किंवा सार्वजनिक सुरक्षेसाठी जे आवश्यक आहे असे कृत्य करताना दिग्दर्शन करावे आणि अशा कार्यप्रवरणासाठी किंवा असे कृत्य करीत असताना होणारा खर्च नगरपालिका निधीतून करण्यास आदेश द्यावा.

परंतु असे, की –

(अ) कोणतेही विशिष्ट काम करण्यास किंवा कोणतेही विशिष्ट काम करावयाच्या कृतीस प्रतिबंध करण्याच्या सदस्य मंडळाच्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन होईल असे या कलमाखालील कोणतेही कृत्य त्याने करता कामा नये.

(ब) या कलमाखाली केलेल्या कारवाईचा अहवाल ताबडतोब त्याच्या कारणांसह अनुक्रमे स्थायी समिती आणि सदस्यमंडळ यांच्या नंतरच्या सभेला त्याने दिला पाहिजे.

उपाध्यक्षाची कामे

५९. [१] सदस्य मंडळाच्या उपाध्यक्षाची खालील कर्तव्ये राहतील –

(अ) अध्यक्षाचे गैरहजेरीत आणि रास्त कारणाने प्रतिबंध केला नसल्यास, सदस्य मंडळाच्या सभांचे अध्यक्षपदी राहिले पाहिजे.

(ब) × × × × ×

(क) अध्यक्ष वेळोवेळी त्यास प्रतिनियुक्त करील अशी अध्यक्षाची कर्तव्ये बजावणे आणि शक्तीचा वापर करणे,

(ड) अध्यक्षाचे गैरहजेरीत अध्यक्षाची कर्तव्ये बजावणे आणि अध्यक्षांच्या शक्तींचा वापर करणे.

[२] उपाध्यक्ष, सदस्यमंडळ जसे ठरवील अशा कोणत्याही एका विषय नियामक समितीचा पदसिद्ध अध्यक्ष (चेअरमन) राहील.

६०. अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांची पदे एकदम रिक्त होणे –

अध्यक्षास मानधन किंवा व्यय-भत्ता आणि नगरसदस्यांना सभा-भत्ता

६१. सदस्यमंडळास वाटल्यास, त्यांनी, यासंबंधात केलेल्या नियमांचे अधीन, अध्यक्षास मानधन तरी, किंवा व्यय-भत्ता तरी खाली स्पष्ट केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक नसेल असा दिला पाहिजे –

नगरपालिका क्षेत्राचा वर्ग	दरमहाचा मानधनाचा कमाल दर	व्यय-भत्त्याचा दरसालचा कमाल दर
अ	रु. ५००–००	रु. १५००–००
ब	रु. ३५०–००	रु. १०००–००
क	रु. २००–००	रु. ७५०–००

[२] प्रत्येक नगरसदस्याला अध्यक्ष समाविष्ट – सदस्यमंडळाने सदस्य मंडळाच्या, स्थायी समितीच्या, विषय नियामक समितीच्या किंवा विशेष समितीच्या प्रत्येक सभेला, कमाल रु. ५०–००चे अधीन सभा-भत्ता रु. १४–०० दिला पाहिजे.

स्पष्टीकरण – कोणत्याही दिवशी जर नगरसदस्याला एकापेक्षा अधिक सभेला उपस्थित राहणे भाग पडेल तर त्या दिवशी जसा तो एका सभेला हजर राहिला असताना घेईल तितका सभा-भत्ता घेण्यास तो पात्र राहील.

[३] कलम १६ किंवा ४४ यात काहीही नमूद असले तरी वरीलप्रमाणे कोणत्याही मानधनाची, व्यय-भत्त्याची, किंवा सभा-भत्त्याची मिळकत नगरसदस्य म्हणून होणेस किंवा राहण्यास अनर्हत ठरता कामा नये.

(परिस्थितीनुसार वेळोवेळी रकमेत फेरफार केला जातो.)

नगरपालिका आणि निवडणुका

यांशी संबंधित असणारे

नियम

महाराष्ट्र नगरपालिका (पालिका सदस्य स्वीकृत करणे) नियम, १९६७

महाराष्ट्र नगरपालिका (पालिका सदस्य स्वीकृत करणे) नियम, १९६७

[कलम ३२१ (२) आणि कलमे ९ (१), ४८ आणि ५१ (७) अन्वये]

अधिसूचनांची सूची

अनुक्रमांक (१)	विभागाचे नाव (२)	अधिसूचनेचा क्रमांक (३)	अधिसूचनेचा दिनांक (४)	महाराष्ट्र शासन राजपत्रातील प्रसिद्धी			शेरा (८)
				भाग (५)	दिनांक (६)	पृष्ठ क्र. (७)	
१	नगरविकास, आरोग्य व गृहनिर्माण विभाग.	यूएमआर-११६५-५४८०६-यूएनआय-चार	१ मार्च १९६७	चार-ब असाधारण	१ मार्च १९६७	१०१ ११०	मुख्य नियम
२	नगरविकास, आरोग्य व गृहनिर्माण विभाग.	यूएमआर-११६७-एकीकरण-चार	३ ऑक्टोबर १९६९	एक-अ असाधारण	३ ऑक्टोबर १९६९	६८	सुधारणा
३	नगरविकास, आरोग्य व गृहनिर्माण विभाग.	एएमआर-१०७०-३५६२०-एन	२६ मे १९७१	एक-अ असाधारण	२६ मे १९७१		दुसरी सुधारणा
४	नगरविकास, आरोग्य व गृहनिर्माण विभाग.	एएमआर-१३७४. ७०५३८-एन	१३ डिसेंबर १९७४	एक-अ असाधारण	१३ डिसेंबर १९७४		सुधारणा

नगरविकास, आरोग्य व गृहनिर्माण विभाग

सचिवालय, मुंबई–३२, दिनांक १ मार्च १९६७

महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५

क्रमांक यूएमआर – ११६५–५४८०६–यूएनआय–चार – महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०) याच्या कलम ३२१, पोट-कलम (२) आणि कलम ९ पोट-कलम (१), कलम ४८ व ५१, पोट-कलम (७) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व शक्तींचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, पुढील नियम करीत आहे. हे नियम उक्त कलम ३२१ पोट-कलम (३) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे पूर्वी प्रसिद्ध करण्यात आले होते :–

१. **संक्षिप्त नाव** – या नियमास महाराष्ट्र नगरपालिका (पालिका सदस्य स्वीकृत करणे) नियम, १९६७, असे म्हणता येईल.

२. **व्याख्या** – संदर्भानुसार अन्यथा अपेक्षित नसेल तर, या नियमात –

(अ) "अधिनियम" म्हणजे महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५;

(ब) "चालू राहणारा उमेदवार" म्हणजे निवडून न आलेला आणि कोणत्याही ठरवून दिलेल्या वेळी मतदानातून वगळण्यात न आलेला कोणताही उमेदवार;

(क) "मोजणी" म्हणजे –

(i) उमेदवारासाठी नोंद केलेल्या पहिल्या पसंतीक्रमाच्या मोजणीत अंतर्भूत असलेली सर्व कार्यवाही, किंवा

(ii) निर्वाचित उमेदवारांच्या अधिक मतांच्या हस्तांतरणात अंतर्भूत असलेली सर्व कार्यवाही, किंवा

(iii) वगळलेल्या उमेदवारांच्या मतांच्या एकूण मूल्याच्या हस्तांतरणात अंतर्भूत असलेली सर्व कार्यवाही;

(ड) "निःशेषित पत्रिका" म्हणजे विद्यमान उमेदवारासाठी ज्यावर पुढील पसंतीक्रम नमूद केलेला नाही अशी मतपत्रिका, परंतु पुढील कारणासाठी ही पत्रिका निःशेषित झाल्याचे समजण्यात येईल –

(i) दोन किंवा अधिक उमेदवारांची नावे, मग ते चालू राहणारे असोत किंवा नसोत, एकाच आकड्याने चिन्हांकित केली असतील आणि पसंतीक्रमात लगेच नंतरची असतील त्याबाबतीत,

(ii) पसंतीक्रमात लगेच नंतरचा असलेल्या उमेदवाराचे नाव, मग तो विद्यमान असो किंवा नसो, मतपत्रिकेवरील इतर कोणत्याही

आकडयानंतर लगेच येणाऱ्या आकडयाने चिन्हांकित करण्यात आले असेल त्याबाबतीत;

(ई) "प्रथम पसंतीक्रम" म्हणजे उमेदवाराच्या नावापुढे लिहिलेला १ हा आकडा; "दुसरा पसंतीक्रम" म्हणजे उमेदवाराच्या नावापुढे लिहिलेला २ हा आकडा; "तिसरा पसंतीक्रम" म्हणजे उमेदवाराच्या नावापुढे लिहिलेला ३ हा आकडा आणि त्याचप्रमाणे त्यापुढील आकडे;

(फ) कोणत्याही उमेदवाराच्या संबंधात "मूळ मत" म्हणजे अशा उमेदवारासाठी ज्यावर प्रथम पसंतीक्रम नोंदण्यात आला अशा मतपत्रिकेवरील मत;

(ग) "पीठासीन प्राधिकारी" म्हणजे नगरपालिकेच्या ज्या सभेत पालिका-सदस्य स्वीकृत करून घ्यावयाचे असतील त्या सभेच्या अध्यक्षपदी असणारा अध्यक्ष, उपाध्यक्ष किंवा कोणताही पालिका-सदस्य;

(ह) "कलम" म्हणजे अधिनियमाचे कलम;

(आय) "अधिक (मते)" म्हणजे कोणत्याही उमेदवाराची मूळ आणि हस्तांतरित मतांची संख्या, नियम ११ अनुसार गणना केलेल्या मतसंख्येपेक्षा ज्या संख्येने अधिक असेल ती संख्या;

(जे) कोणत्याही उमेदवाराच्या संबंधात "हस्तांतरित मत" म्हणजे, अशा उमेदवाराच्या नावावर ज्याचे मूल्य किंवा ज्याच्या भागाचे मूल्य जमा करण्यात आले आहे आणि ज्या मतपत्रिकेवर अशा उमेदवारासाठी दुसरा किंवा नंतरचा पसंतीक्रम नोंदण्यात आला आहे त्या मतपत्रिकेवरून घेण्यात आलेले मत;

(के) "शेषित (unexhausted) पत्रिका" म्हणजे ज्यावर विद्यमान उमेदवारासाठी पुढील पसंतीक्रम नमूद केला असेल अशी मतपत्रिका;

(ल) या नियमांत वापरलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना अनुक्रमे अधिनियमात नेमून दिल्याप्रमाणेच अर्थ असतील.

३. नामनिर्देशने भरणे – [१] ज्या सभेत पालिका-सदस्य स्वीकृत करावयाचे असतील त्या नगरपालिकेच्या सभेसाठी निश्चित केलेल्या दिवसाच्या लगतपूर्वीच्या कामाच्या दिवशी दुपारी बारा वाजल्यानंतरची नसेल अशा वेळी, कोणत्याही निर्वाचित पालिका सदस्यास, या नियमांस जोडलेल्या नमुन्यातील नामनिर्देशन पत्र यथोचितरीत्या भरून आणि प्रस्तावित करणारा म्हणून स्वत:ची स्वाक्षरी करून ते मुख्य अधिकाऱ्याकडे पाठवून, स्वीकृत करून घेण्यासाठी योग्य असलेल्या कोणत्याही व्यक्तीस उमेदवार म्हणून नामनिर्देशित करता येईल. त्यातील प्रतिज्ञापनावर उमेदवाराकडून स्वाक्षरी करण्यात येईल.

[२] नामनिर्देशन पत्र मिळाल्यानंतर, मुख्य अधिकारी त्यावर यथोचितरीत्या पृष्ठांकन करील.

[३] या नियमातील कोणत्याही गोष्टीमुळे कोणत्याही उमेदवारास एकापेक्षा अधिक नामनिर्देशन पत्रांद्वारे नामनिर्दिष्ट केले जाण्यास प्रतिबंध होणार नाही.

४. नामनिर्देशनांची छाननी आणि उमेदवारी मागे घेणे – [१] स्वीकृत करून घेण्याच्या कार्यवाहीच्या प्रारंभी, पीठासीन प्राधिकारी मुख्य अधिकाऱ्याकडून आलेल्या सर्व नामनिर्देशन पत्रांची छाननी करील आणि त्यावर आपल्या निर्णयाची नोंद करील. भरीव स्वरूपाचा नसेल अशा कोणत्याही दोषांकरिताच केवळ, पीठासीन प्राधिकारी कोणतेही नामनिर्देशन पत्र फेटाळणार नाही. कोणतेही नामनिर्देशन पत्र पीठासीन प्राधिकाऱ्याकडून फेटाळण्यात आले असेल त्याबाबतीत तो अशा रीतीने ते फेटाळण्याच्या त्याच्या कारणांचा सारांश लेखी नमूद करील. त्यानंतर तो, त्याच्या मते नामनिर्देशित केले जाण्यास विधिग्राह्य असतील अशा उमेदवारांची नावे, त्यांना प्रस्तावित करणाऱ्या व्यक्तींच्या नावांसह, सभेस वाचून दाखवील.

[२] मुख्य अधिकाऱ्याकडे ज्याचे नामनिर्देशन पत्र पाठवण्यात आले असेल अशा कोणत्याही उमेदवारास, स्वीकृत करण्यासाठीच्या कार्यवाहीच्या प्रारंभापासून ते उमेदवारी मागे घेण्याचा कालावधी संपेपर्यंत सभेस हजर राहता येईल.

[३] कोणत्याही उमेदवारास, त्याने स्वाक्षरित केलेल्या लेखी नोटिशीद्वारे त्याची उमेदवारी मागे घेता येईल आणि विधिग्राह्य रीतीने नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची नावे वाचण्याच्या वेळेपासून पंधरा मिनिटांच्या आत पीठासीन प्राधिकाऱ्याकडे पाठविता येईल. अशी नोटीस व्यक्तिशः उमेदवाराकडून किंवा त्याबाबतीत त्याने प्राधिकृत केलेल्या, त्यास प्रस्तावित करणाऱ्या व्यक्तीकडून देण्यात येईल.

[४] अशी नोटीस पाठवणाऱ्या किंवा पाठवण्यास कारणीभूत होणाऱ्या कोणत्याही उमेदवारास ती रद्द करण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

(५) पीठासीन प्राधिकारी, नाव मागे घेण्याच्या नोटिशीच्या खरेपणाबद्दल आणि ती देणाऱ्या व्यक्तीच्या ओळखीबद्दल खात्री झाल्यावर, सभेस हजर असलेल्या पालिका-सदस्यांना ज्यांनी उमेदवारी मागे घेतली त्या उमेदवारांची नावे वाचून दाखवील.

५. स्वीकृत करून घेण्यासाठीची कार्यवाही – [१] ज्यांनी आपली उमेदवारी मागे घेतलेली नाही अशा विधिग्राह्य रीतीने नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची संख्या ही स्वीकृत करून घ्यावयाच्या व्यक्तींच्या संख्येइतकी किंवा त्याहून कमी असेल त्याबाबतीत, पीठासीन प्राधिकारी अशा सर्व उमेदवारांना यथोचितरीत्या स्वीकृत करून घेतल्याचे ताबडतोब जाहीर करील आणि उरलेला/उरलेले पालिका-सदस्य (कोणताही किंवा कोणतेही असल्यास) हे त्यानंतरच्या कोणत्याही सभेत स्वीकृत करून घेता येतील.

[२] ज्यांनी आपली उमेदवारी मागे घेतली आहे अशा विधिग्राह्य रीतीने

नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची संख्या ही स्वीकृत करून घ्यावयाच्या व्यक्तींच्या संख्येपेक्षा अधिक असल्यास, सभेत उपस्थित असलेल्या पालिकासदस्यांना यात यापुढे विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने व्यक्तींना स्वीकृत करून घेण्यासाठी कार्यवाही करता येईल किंवा पीठासीन प्राधिकाऱ्याने तसे ठरविल्यास सभा लांबणीवर टाकता येईल आणि लांबणीवर टाकलेल्या सभेमध्ये ही स्वीकृती करून घेता येईल.

[३] व्यक्तींची स्वीकृती ही एकलसंक्रमणीय मताद्वारे प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या पद्धतीने करण्यात येईल आणि निर्वाचित पालिकासदस्यांनी या प्रयोजनासाठी करावयाचे मतदान हे गुप्त मतदान पद्धतीने करण्यात येईल. पीठासीन प्राधिकारी, सभेतील प्रत्येक निर्वाचित पालिका-सदस्यास पुढील नमुन्यात तयार केलेली मतपत्रिका देईल :–

मतपत्रिका

..... नगरपालिका

ज्यांनी आपली उमेदवारी मागे घेतली नाही अशा स्वीकृतीसाठीच्या पसंतीक्रम विधिग्राह्य रीतीने नामनिर्देशित केलेल्या व्यक्तींचे नाव

१. ....

२. ....

३. ....

४. ....

इत्यादि.

दिनांक : पीठासीन प्राधिकाऱ्याची स्वाक्षरी

(अ) निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांची नावे ही ज्यांना आडनावे आहेत अशा उमेदवारांची आडनावे व इतर उमेदवारांची विशेष नावे यावरून ठरविण्यात आलेल्या वर्णानुक्रमानुसार मतपत्रिकेवर लावण्यात येतील. मतपत्रिकेतील तपशील आणि अनुसरावयाचा वर्णानुक्रम हा, कार्यवृत्त ठेवण्यासाठी अधिनियमाच्या कलम ८१, खंड (१२) अन्वये नगरपालिकेने जी भाषा स्वीकारली आहे त्या भाषेत असेल.

(ब) प्रत्येक मतपत्रिकेवर पीठासीन प्राधिकारी सही करील.

६. मतदानाची पद्धती – [१] प्रत्येक निर्वाचित पालिका सदस्यास, पालिका-सदस्य म्हणून स्वीकृत करावयाच्या व्यक्तींची संख्या लक्षात न घेता फक्त एकच मत असेल.

[२] प्रत्येक पालिका-सदस्य, आपले मत देताना –

(अ) त्याच्या मतपत्रिकेवरील प्रथमतः त्याला ज्यास मत द्यावयाचे असेल त्या उमेदवाराच्या नावापुढील जागेत १ हा आकडा लिहील; आणि

(ब) त्यास, त्याच्या पसंतीक्रमानुसार इतर उमेदवारांच्या नावापुढेही २ आकडा, किंवा २ आणि ३ हे आकडे किंवा २, ३ आणि ४ हे आकडे किंवा तसेच आकडे लिहिता येतील.

७. मतदान पद्धती – [१] मतपत्रिका मिळाल्यानंतर लगेच पालिका-सदस्य –

(अ) मतदानकेंद्राकडे जाईल;

(ब) नियम ६, पोट-नियम (२) अनुसार आपले मत नमूद करील;

(क) आपण कोणाला मतदान केले हे दिसणार नाही अशा रीतीने मतपत्रिकेची घडी घालील;

(ड) घडी केलेली मतपत्रिका मतपेटीत टाकील.

[२] प्रत्येक पालिका-सदस्य अनावश्यक विलंब न लावता आपले मत देईल, आणि मतदानकेंद्र सोडील.

[३] कोणत्याही पालिका-सदस्यास दुसरा पालिका-सदस्य आत असताना मतदानकेंद्रात प्रवेश करण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

[४] जर निरक्षरत्व, अंधत्व अथवा इतर अपंगत्व या कारणामुळे नियम ६, पोट-कलम (२) अनुसार एखादा मतदार मतपत्रिका वाचण्यास अथवा त्याचे मत त्यावर नोंदविण्यास असमर्थ असेल तर, असे निरक्षरत्व, अंधत्व अथवा अपंगत्व याबाबत खात्री करून घेतल्यावर, मतदान केंद्राध्यक्ष ज्याचे वय एकवीस वर्षांपेक्षा कमी नसेल व जो मतपत्रिका वाचण्यास व तीवर मतदाराच्या वतीने, आणि मतदाराच्या इच्छेनुसार, मताची नोंद करण्यास समर्थ असेल असा सोबती मतदाराला स्वतःच्या बरोबर नेण्यास आणि आवश्यक असेल तर मतदान गुप्त ठेवण्यासाठी मतपत्रिकेची घडी घालण्यास व मतपत्रिका मतपेटीत टाकण्यास परवानगी देईल.

परंतु, नगरपालिकेच्या त्याच दिवशीच्या बैठकीत, कोणाही व्यक्तीला एकापेक्षा जास्त मतदारांचा सोबती म्हणून काम करण्यास परवानगी दिली जाणार नाही.

आणखी असे की, या नियमान्वये कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही दिवशी मतदाराचा सोबती म्हणून काम करण्यास परवानगी देण्याअगोदर, अशा व्यक्तीने, मतदाराच्या वतीने नोंदलेले मत आपल्यातर्फे गुप्त ठेवण्यात येईल व त्या दिवशी

इतर कोणत्याही मतदाराचा सोबती म्हणून आपण अगोदर काम केलेले नाही असे घोषित करणे आवश्यक असेल.

मतदान केंद्राध्यक्ष मतदाराचा सोबती जेव्हा तशा प्रकारची विनंती करील तेव्हा, मत नोंदविण्याबाबतच्या सूचना सोबत्यास स्पष्ट करून सांगेल.

मतदान केंद्राध्यक्ष या नियमान्वयेच्या अशा सर्व प्रकरणांची नोंद, पुढील नमुन्यात ठेवील –

निरक्षर, अंध व अपंग मतदारांची यादी

[नियम ७ (४) पहा]

दिनांक सन १९ रोजी घेण्यात आलेल्या बैठकीत सभासद स्वीकृत करण्यासाठी निवडणूक.

पालिका-सदस्याचे पूर्ण नाव	सोबत्याचे पूर्ण नाव	सोबत्याचा पत्ता	सोबत्याची सही

दिनांक मतदान केंद्राध्यक्षाची सही

मतपत्रिकांची छाननी – [१] मतदान झाल्यानंतर लगेच, पीठासीन प्राधिकारी, उपस्थित असलेल्या पालिका–सदस्यांच्या उपस्थितीत मतपेटीतून काढलेल्या मतपत्रिकांची छाननी करील आणि ज्या मतपत्रिका तो फेटाळील त्यावर " फेटाळण्यात आली " असे पृष्ठांकन करून व त्यावर त्याची कारणे देऊन त्यातून, त्यास विधिग्राह्य वाटतील अशा मतपत्रिका वेगळ्या करील.

[२] (अ) ज्यावर १ आकडा नाही अशी; किंवा

(ब) ज्यावर १ आकडा एकापेक्षा अधिक उमेदवारांच्या पुढे लिहिण्यात आला आहे किंवा तो अशा तऱ्हेने लिहिला आहे की तो कोणत्या उमेदवारासाठी आहे याबद्दल शंका निर्माण होईल अशी; किंवा

(क) ज्यावर एकाच उमेदवाराच्या नावापुढे १ आकडा आणि काही इतर आकडे लिहिले आहेत अशी; किंवा

(ड) ज्यावर असे एखादे चिन्ह किंवा लिखाण आहे की, ज्यायोगे मत देणाऱ्या पालिका–सदस्याची ओळख पटू शकेल अशी –

मतपत्रिका अवैध असेल.

९. **विधिग्राह्य मतपत्रिका पुडक्यात बांधण्याची व्यवस्था** – विधिअग्राह्य असलेल्या मतपत्रिका बाद केल्यानंतर पीठासीन प्राधिकारी –

(अ) प्रत्येक उमेदवारासाठी नमूद केलेल्या प्रथम पसंतीक्रमानुसार, उरलेल्या मतपत्रिका पुडक्यात बांधण्याची व्यवस्था करील;

(ब) प्रत्येक पुडक्यातील मतपत्रिका व एकूण मतपत्रिका मोजील व त्याची नोंद करील;

(क) प्रत्येक उमेदवाराच्या खाती त्याच्या पुडक्यातील पत्रिकांचे मूल्य (आकडा) जमा करील.

१०. फक्त एकच व्यक्ती स्वीकृत करून घ्यावयाची असेल त्याबाबतीत मतांची मोजणी – [१] पालिका-सदस्य म्हणून एकच व्यक्ती स्वीकृत करून घ्यावयाची असेल अशा कोणत्याही निवडणुकीच्या वेळी प्रत्येक मोजणीच्या वेळी प्रत्येक विधिग्राह्य मतपत्रिकेचे मूल्य १ हे समजण्यात येईल आणि निवडणुकीतील उमेदवारास निवडून देण्यास निश्चित करण्यासाठी पुरेसे असलेले नियत प्रमाण पुढीलप्रमाणे ठरविण्यात येईल :–

(अ) नियम ९, खंड (क) अन्वये सर्व उमेदवारांच्या खाती जमा असलेले मूल्य (मतसंख्या) मिळवून;

(ब) एकूण बेरजेला २ ने भागून; आणि

(क) बाकी, कोणतीही असल्यास, लक्षात न घेता भागाकारात १ मिळवून, येईल ती संख्या हे नियतप्रमाण असेल.

[२] पहिल्या किंवा त्यानंतरच्या कोणत्याही गणनेच्या शेवटी, कोणत्याही उमेदवाराच्या मतपत्रिकेचे एकूण मूल्य हे निश्चित प्रमाणाइतके किंवा त्याहून अधिक असेल किंवा विद्यमान उमेदवार हा एकच असेल तर, उमेदवार निवडून आला असल्याचे जाहीर करण्यात येईल.

[३] कोणत्याही गणनेच्या शेवटी, कोणताही उमेदवार निवडून आल्याचे जाहीर करण्यात आले नाही तर, पीठासीन प्राधिकारी :–

(अ) त्या टप्प्यापर्यंत ज्याच्या नावे कमीत कमी मूल्य (मते) जमा असेल त्या उमेदवारास मतनोंदणीतून वगळील;

(ब) त्याच्या पुडक्यातील व लहान पुडक्यातील सर्व मतपत्रिकांची तपासणी करील, विद्यमान उमेदवारांसाठी त्यावर नमूद केलेल्या नंतरच्या उपलब्ध पसंतीक्रमानुसार छोट्या पुडक्यात शेषित (unexhausted) कागद लावील, अशा प्रत्येक छोट्या पुडक्यातील कागदांची गणना करील आणि ज्याच्यासाठी असा पसंतीक्रम नमूद करण्यात आला असेल अशा उमेदवारांच्या नावे जमा करील, त्या उमेदवाराकडे ते छोटे पुडके हस्तांतरित करील आणि सर्व शेषित (unexhausted) कागदांचे एक

वेगळे छोटे पुडके तयार करील; आणि

(क) अशा हस्तांतरणानंतर आणि जमेनंतर विद्यमान उमेदवारांपकी कोणालाही निश्चित प्रमाणात मते मिळाली किंवा नाही ते पाहील.

[४] पोट-नियम (३), खंड (अ) अन्वये एखादा उमेदवार वगळण्याच्या वेळी, दोन किंवा अधिक उमेदवारांच्या नावे समान मूल्य असेल आणि मतनोंदणीसाठी ते अगदी खालच्या क्रमांकावर असतील तर, ज्यासाठी कमीत कमी मूळ मते नोंदण्यात आली असतील त्यास वगळण्यात येईल आणि हा क्रमांकही दोन किंवा अधिक उमेदवारांच्या बाबतीत समान असेल तर पीठासीन अधिकारी, त्यांच्यापैकी कोणास वगळावे हे चिठ्ठ्या टाकून ठरवील.

११. एकापेक्षा अधिक व्यक्तींना स्वीकृत करावयाचे असेल तेव्हा मतांच्या निश्चित प्रमाणाची खात्री करून घेणे – पालिका-सदस्य म्हणून एकापेक्षा अधिक व्यक्तींना स्वीकृत करून घ्यावयाचे असेल अशा प्रत्येक निवडणुकीत प्रत्येक विधिग्राह्य मतपत्रिकेस १०० इतके मूल्य आहे असे समजण्यात येईल आणि निवडणुकीतील उमेदवारास निवडून देण्यास निश्चित करण्यासाठी पुरेशी मते ही पुढीलप्रमाणे ठरविण्यात येतील :–

(अ) नियम ९, खंड (क) अन्वये सर्व उमेदवारांच्या खाती जमा असलेले मूल्य मिळवून;

(ब) पालिका-सदस्य म्हणून स्वीकृत करावयाच्या व्यक्तींच्या संख्येमध्ये १ हा आकडा मिळवून त्या संख्येने एकूण मतसंख्येला भागून; आणि

(क) बाकी, कोणतीही असल्यास, लक्षात न घेता भागाकारात १ मिळवून, येईल ती संख्या हे निश्चित प्रमाण असेल.

१२. सर्वसाधारण सूचना – नियम १३ ते १७ च्या उपबंधांचे पालन करताना, पीठासीन प्राधिकारी सर्व अपूर्णांकांकडे दुर्लक्ष करील आणि मतनोंदणीतून अगोदरच निवडून आलेल्या किंवा वगळण्यात आलेल्या उमेदवारांसाठी नमूद केलेले सर्व पसंतीक्रम लक्षात घेणार नाही.

१३. निश्चित प्रमाणानुसार निवडून आलेले उमेदवार – वगळलेल्या उमेदवाराच्या पुडक्याच्या किंवा छोटचा पुडक्याच्या गणनेच्या किंवा हस्तांतरणाच्या शेवटी, उमेदवाराच्या नावे असलेले मतपत्रिकांचे मूल्य हे निश्चित प्रमाणाइतके किंवा त्याहून अधिक असेल तर, उमेदवार निवडून आल्याचे जाहीर करण्यात येईल.

१४. अधिक झालेल्या (मतांचे) हस्तांतरण – [१] कोणत्याही गणनेच्या शेवटी उमेदवाराच्या नावे असलेल्या मतपत्रिकांचे मूल्य हे निश्चित प्रमाणाहून अधिक असेल तर, या नियमाच्या उपबंधानुसार उमेदवाराच्या मतपत्रिकेवर दर्शविण्यात आलेल्या विद्यमान उमेदवाराकडे निर्वाचित पालिका-सदस्यांच्या पसंतीक्रमानुसार नंतरचा असल्याप्रमाणे अधिक मते हस्तांतरित करण्यात येतील.

[२] जर एकापेक्षा अधिक उमेदवारांकडे अधिक मते असतील तर, जास्तीत जास्त अधिक मते ही प्रथम विचारात घेण्यात येतील आणि इतर मते परिमाणानुसार विचारात घेण्यात येतील.

परंतु असे की, पहिल्या गणनेनंतर उरणारी शिल्लक मते ही दुसऱ्या गणनेनंतर येणाऱ्या शिलकेपूर्वी विचारात घेण्यात येतील आणि त्याच पद्धतीने इतरही मते विचारात घेण्यात येतील.

[३] वाटप करावयाची शिलकी मते ही एकापेक्षा अधिक असतील आणि दोन किंवा अधिक शिलकी मते समान असतील तर, प्रत्येक उमेदवाराची मूळ मते लक्षात घऊन ज्यासाठी अधिक मूळ मते नमूद करण्यात आली त्या उमेदवाराच्या शिलकी मतांचे प्रथम वाटप करण्यात येईल, आणि त्यांच्या मूळ मतांचे मूल्य समान असेल त्याबाबतीत पीठासीन प्राधिकारी, कोणत्या उमेदवाराच्या शिलकीचे प्रथम वाटप करावे हे चिठ्ठया टाकून ठरवील.

[४] (अ) कोणत्याही उमेदवाराची हस्तांतरित करावयाची शिल्लक ही फक्त मूळ मतांतीलच असेल तर, त्या उमेदवाराच्या मालकीच्या पुडक्यातील सर्व मतपत्रिकांची पीठासीन प्राधिकारी तपासणी करील, त्यावरील नंतरच्या पसंतीक्रमानुसार छोटया पुडक्यातील शेषित (unexhausted) मतांची विभागणी करील आणि निःशेषित मतपत्रिकांचे एक वेगळे छोटे पुडके तयार करील.

(ब) प्रत्येक छोटया पुडक्यातील पत्रिकांच्या मूल्याची आणि सर्व शेषित (unexhausted) पत्रिकांच्या मूल्याची तो खात्री करून घेईल.

(क) शेषित (unexhausted) पत्रिकांचे मूल्य शिलकीइतके किंवा त्याहून कमी असल्यास, ज्याची शिल्लक मते हस्तांतरित करावयाची त्या उमेदवारास ती ज्या मूल्याने मिळाली त्या मूल्याने त्या सर्व शेषित (unexhausted) पत्रिका हस्तांतरित करील.

(ड) शेषित पत्रिकांचे मूल्य शिलकीपेक्षा अधिक असल्यास तो, शेषित पत्रिकांची छोटी पुडकी हस्तांतरित करील आणि ज्या मूल्याने प्रत्येक पत्रिका हस्तांतरित करावयाची ते मूल्य, शिलकीला शेषित पत्रिकांच्या एकूण संख्येने भागून मिळविण्यात येईल.

[५] कोणत्याही उमेदवाराची हस्तांतरित करावयाची शिल्लक मते ही हस्तांतरित तसेच मूळ मतांतील असतील त्याबाबतीत पीठासीन प्राधिकारी, उमेदवाराकडे शेवटी हस्तांतरित केलेल्या छोटया पुडक्यातील सर्व पत्रिकांची पुन्हा तपासणी करील, त्यावर नमूद केलेल्या नंतरच्या पसंतीक्रमानुसार छोटया पुडक्यातील शेषित पत्रिकांची विभागणी करील आणि पोट-नियम (४) मध्ये छोटया पुडक्यांच्या संबंधी उपबंधित केलेल्या रीतीनेच छोटया पुडक्यांवर कार्यवाही करील.

[६] प्रत्येक उमेदवाराकडे हस्तांतरित केलेल्या पत्रिका छोट्या पुडक्याच्या स्वरूपात, अशा उमेदवाराच्या पूर्वीच असलेल्या पत्रिकांमध्ये टाकण्यात येतील.

[७] निर्वाचित उमेदवाराच्या या नियमान्वये हस्तांतरित न केलेल्या पुडक्यातील व छोट्या पुडक्यातील सर्व पत्रिका अंतिमरीत्या निकालात काढलेल्या म्हणून वेगळ्या ठेवण्यात येतील.

१५. मतनोंदणीत सर्वांत शेवटी असलेल्या उमेदवारांना वगळणे – [१ [यात यापूर्वी उपबंधित केलेल्या रीतीनें सर्व शिलकी मते हस्तांतरित केल्यानंतर निर्वाचित उमेदवारांची संख्या आवश्यक संख्येहून कमी असल्यास, पीठासीन प्राधिकारी, मतनोंदणीत शेवटी असलेल्या उमेदवारास वगळील आणि त्याच्या शेषित मतपत्रिकांची त्यावर नमूद केलेल्या नंतरच्या पसंतीक्रमानुसार विद्यमान उमेदवारांमध्ये वाटणी करील आणि कोणत्याही निःशेषित मतपत्रिका अंतिमरीत्या निकालात काढलेल्या म्हणून वेगळ्या ठेवण्यात येतील.

[२] वगळलेल्या उमेदवारांची मूळ मते असलेल्या मतपत्रिका प्रथम हस्तांतरित करण्यात येतील. प्रत्येक मतपत्रिकेचे हस्तांतरणमूल्य शंभर असेल.

[३] वगळलेल्या उमेदवाराची हस्तांतरित मते असणाऱ्या मतपत्रिका ह्या त्यानंतर, ज्या क्रमाने व मूल्याने त्या मिळविल्या त्या क्रमाने व मूल्याने हस्तांतरित करण्यात येतील.

[४] असे प्रत्येक हस्तांतरण हे स्वतंत्र हस्तांतरण समजण्यात येईल, पण स्वतंत्र गणना समजण्यात येणार नाही.

[५] मतपत्रिकांच्या हस्तांतरणाने, उमेदवारास मिळालेल्या मतांचे मूल्य कोटच्याइतके किंवा त्याहून अधिक झाल्यास, त्यानंतर गणना पूर्ण करण्यात येईल. परंतु त्याच्याकडे आणखी कोणत्याही मतपत्रिका हस्तांतरित करण्यात येणार नाहीत.

[६] या नियमाद्वारे निर्देशित केलेली कार्यपद्धती, कोटच्याप्रमाणे उमेदवाराच्या निवडणुकीद्वारा किंवा यात यानंतर उपबंधित केलेल्या रीतीनें अशा उमेदवाराची स्वीकृती होईपर्यंत, मतनोंदणीत सर्वांत कमी मते असलेल्या एका उमेदवारास प्रथम व त्यानंतर त्याच्यापेक्षा अधिक मते असलेल्या उमेदवारांना एकानंतर एक याप्रमाणे क्रमाक्रमानें वगळण्यात येईल.

[७] एखाद्या उमेदवारास वगळणे कोणत्याही वेळी आवश्यक होईल आणि दोन किंवा अधिक उमेदवाराच्या मतांचे मूल्य समान असेल आणि मतनोंदणीत ते सर्वांत शेवटी असतील तर, प्रत्येक उमेदवाराची आणि ज्यासाठी किमान मूळ मते नोंदवण्यात आली अशा उमेदवाराची मूळ मते लक्षात घेऊन त्यास वगळण्यात येईल, आणि त्यांच्या मूळ मतांचे मूल्य समान असेल तर, ज्या मोजणीच्या वेळी, या उमेदवारांच्या मतांचे मूल्य समान नव्हते, अशा अगोदरच्या मोजणीच्या वेळी ज्याच्या मतांचे मूल्य सर्वांत कमी होते अशा उमेदवारास वगळण्यात येईल.

[८] मतनोंदणीत दोन किंवा अधिक उमेदवारांना सर्वांत कमी मते असतील आणि सर्व मोजण्यांच्या वेळी प्रत्येकाच्या मतांचे मूल्य समान असेल तर, पीठासीन प्राधिकारी, कोणत्या उमेदवारास वगळावयाचे ते चिठ्ठ्या टाकून ठरवील.

१६. **शेवटची रिक्त पदे भरणे** –[१] कोणत्याही मोजणीच्या शेवटी विद्यमान उमेदवारांची संख्या, न भरलेल्या रिक्त पदांच्या संख्येइतकी कमी झाल्यास विद्यमान उमेदवार निवडून आल्याचे जाहीर करण्यात येईल.

[२] कोणत्याही मोजणीच्या शेवटी एकच पद रिक्त राहील आणि कोणाही एका उमेदवाराच्या मतपत्रिकांचे मूल्य हे हस्तांतरित न केलेल्या कोणत्याही शिलकीसह इतर विद्यमान उमेदवाराच्या मतपत्रिकांच्या मूल्याहून अधिक असेल, त्याबाबतीत तो उमेदवार निवडून आल्याचे जाहीर करण्यात येईल.

[३] कोणत्याही मोजणीच्या शेवटी एकच पद रिक्त राहील आणि त्या ठिकाणी दोनच विद्यमान उमेदवार असतील आणि त्यातील प्रत्येकाच्या मतांचे मूल्य समान असेल आणि कोणतीही शिल्लक हस्तांतरित करणे शक्य असणार नाही त्याबाबतीत, त्यांपैकी कोणास वगळण्यात यावे हे पीठासीन प्राधिकारी चिठ्ठ्या टाकून ठरवील आणि पूर्वोक्त रीतीने त्यास वगळल्यानंतर इतर उमेदवार निवडून आल्याचे जाहीर करील.

१७. **पुनर्मोजणीची तरतूद** –[१] सभेस उपस्थित असलेल्या कोणत्याही पालिका-सदस्यास मतांची मोजणी चालू असताना कोणत्याही वेळी, मतांच्या (शिल्लक किंवा इतर) हस्तांतरणाच्या प्रारंभापूर्वी किंवा ते पूर्ण झाल्यानंतर, पीठासीन प्राधिकाऱ्यास कोणत्याही किंवा सर्व उमेदवारांच्या मतपत्रिकांची (शेवटी कार्यवाही करावयाचे असलेले पूर्वहस्तांतरणाच्या वेळी वेगळे ठेवलेले मतपत्रिका नसतील असे) पुनर्तपासणी आणि पुनर्मोजणी करण्यासाठी विनंती करता येईल आणि पीठासीन प्राधिकारी तदनुसार त्यांची तावडतोब पुर्नतपासणी आणि पुनर्मोजणी करील.

[२] पीठासीन प्राधिकारी, त्याच्या स्वेच्छानिर्णयानुसार, पूर्वीच्या मोजणीच्या अचुकतेबद्दल त्याची खात्री झाली नसेल अशा कोणत्याही बाबतीत मतांची एकदा किंवा एकाहून जास्त वेळा पुनर्मोजणी करील.

परंतु असे की, या पोट-नियमांतील कोणत्याही गोष्टीमुळे, त्याच मतांची एकापेक्षा अधिक वेळा मोजणी करणे हे पीठासीन प्राधिकाऱ्यास बंधनकारक होणार नाही.

१८. **निकाल जाहीर करणे** – मोजणी पूर्ण झाल्यानंतर पीठासीन प्राधिकारी ताबडतोब निवडणुकीचा निकाल जाहीर करील.

१९. **निकाल प्रसिद्ध करणे** – या नियमान्वये कोणतेही उमेदवार स्वीकृत करून घेतल्याचे यथोचितरीत्या जाहीर करण्यात येईल. त्याबाबतीत अशा स्वीकृत केलेल्या पालिका-सदस्यांची नावे शक्य तितक्या लवकर, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध

करण्यासाठी राष्ट्रपतीकडून जिल्हाधिकाऱ्यास कळविण्यात येतील.

२०. आकस्मिकरीत्या रिक्त होणारी पदे – एखाद्या पालिका-सदस्याचे पद रिक्त झाल्यास ते रिक्त पद भरण्यासाठी या नियमांचे उपबंध योग्य त्या फेरफारासह लागू होतील.

पालिका-सदस्य म्हणून स्वीकृत करून घेण्यासाठी नामनिर्देशन पत्राचा नमुना

(नियम ३ पहा)

१. नगरपालिकेचे नाव ... .

२. (आडनाव, कोणतेही असल्यास, प्रथम लिहून) उमेदवाराचे संपूर्ण नाव ....

३. उमेदवाराच्या निवासस्थानाचा संपूर्ण पत्ता ... .

४. उमेदवाराचे वय ... .

५. उमेदवार पुरुष/स्त्री आहे ते ... .

६. उमेदवाराचा मतदारयादीतील क्रमांक ... .

७. सार्वजनिक आरोग्य, स्थानिक स्वराज्य, शिक्षण किंवा कामगार कल्याण या क्षेत्रांतील उमेदवाराच्या विशेष ज्ञानाचा किंवा प्रत्यक्ष अनुभवाचा तपशील ....

८. (आडनाव, कोणतेही असल्यास, प्रथम लिहून) नाव सुचविणाऱ्या व्यक्तीचे संपूर्ण नाव. .. ..

९. नाव सुचविणाऱ्या व्यक्तीच्या निवासस्थानाचा संपूर्ण पत्ता .....

.....

दिनांक ....

नाव सुचविणाऱ्या व्यक्तीची सही

उमेदवाराने करावयाचे प्रतिज्ञा-पत्र

मी, उपरिनिर्दिष्ट उमेदवार,.....नगरपालिकेचा पालिका-सदस्य म्हणून स्वीकृत करून घेण्याच्या नामनिर्देशन पत्रास माझी संमती देत आहे.

दिनांक .....

....

उमेदवाराची सही

मुख्य अधिकाऱ्याचे पृष्ठांकन

नामनिर्देशन पत्राचा क्रमांक .....हे नामनिर्देशन पत्र मला..... रोजी.....वाजता.....येथे असलेल्या माझ्या कार्यालयात .....(प्रस्तावकाचे नाव) यांनी आणून दिले.

.....

दिनांक ..... मुख्य अधिकाऱ्याची सही

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,
पी. एन. पळणिटकर,
शासनाचे उपसचिव.

महाराष्ट्र नगरपालिका (अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या निवडणुका) नियम, १९६७

[कलमे १७ आणि ५१ व कलम ३२१ (२) खालील]

अधिसूचनांची सूची

अ. नं.	विभागाचे नाव	अधिसूचनेचा क्रमांक	अधिसूचनेचा दिनांक	महाराष्ट्र शासन राजपत्रातील प्रसिद्धी			शेरा
				भाग	दिनांक	पृष्ठ क्रमांक	
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)
१	नगरविकास, आरोग्य व गृहनिर्माण विभाग	यूएमआर–१०६६–एकीकरण–चार	२० जून १९६७	चार–ब, असाधारण	२० जून १९६७	१३६० ते १३६५	मुख्य नियम
२	वरीलप्रमाणे ...	यूएमआर–१०६९–एकीकरण–चार	२६ नोव्हेंबर १९६९	एक–अ, असाधारण	२६ नोव्हेंबर १९६९	७८	सुधारणा
३	वरीलप्रमाणे ...	एमएमआर–१३१३/७९७७६–ए–एक	१० डिसेंबर १९७३	एक–अ, असाधारण	१० डिसेंबर १९७३	८१–८८	हे नियम, नियम ३८ द्वारे निरसित करण्यात आले आहेत. पहा, शासकीय अधिसूचना, नगरविकास, आरोग्य व गृहनिर्माण विभाग, क्रमांक एमएमआर – १३७३ / ७९७७६ – ए – एक, दिनांक १० डिसेंबर १९७३.

नगरविकास, आरोग्य व गृहनिर्माण विभाग

सचिवालय, मुंबई–३२, दिनांक २० जून १९६७

महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५

क्रमांक यूएमआर-१०६६-एकीकरण-चार–महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०) याच्या कलम ३२१, पोट-कलम (२) व कलमे १७ व ५१ याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या आणि त्याबाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व शक्तींचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, खालील नियम करीत आहे. उक्त कलम ३२१ पोट-कलम (३) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, ते यापूर्वीच प्रसिद्ध करण्यात आले होते :–

नियम

१. **संक्षिप्त नाव** – या नियमास, महाराष्ट्र नगरपालिका (अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या निवडणुका) नियम, १९६७, असे म्हणता येईल.

२. **व्याख्या** – संदर्भावरून अन्यथा अर्थ लावणे आवश्यक नसेल तर, या नियमात–

(अ) "अधिनियम" म्हणजे महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४.);

(ब) "नमुना" म्हणजे या नियमांसोबत जोडलेला नमुना;

(क) "पीठासीन प्राधिकारी" म्हणजे जिल्हाधिकारी किंवा त्याने अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या निवडणुकीसाठी बोलाविलेल्या सभेत अध्यक्ष म्हणून काम करण्यासाठी कलम ५१ च्या पोट-कलम (३) अन्वये नियुक्त केलेला अधिकारी,

(ड) "कलम" म्हणजे अधिनियमाचे कलम.

३. **अध्यक्षाच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशने दाखल करणे** – [१] अध्यक्षाच्या निवडणुकीसाठी जेव्हा जिल्हाधिकारी पालिका-सदस्यांची विशेष सभा बोलावील तेव्हा, तो, सभेसाठी निश्चित केलेली तारीख, वेळ आणि ठिकाण याबद्दलची एक नोटीस प्रत्येक पालिका-सदस्याला पाठविण्याची व्यवस्था करील. अशा नोटिशीमध्ये, ज्या अधिकाऱ्याकडे नामनिर्देशन पत्रे देण्यात येतील तो अधिकारीपण विनिर्दिष्ट करण्यात येईल. अशा रीतीने निश्चित केलेल्या तारखेच्या लगत मागील दिवशी, दुपारपूर्वी कोणत्याही वेळी पालिका सदस्यास, नमुना १ मधील नामनिर्देशन पत्र पूर्ण केल्यावर व नाव सुचविणारा म्हणून, त्यावर स्वत: सही केल्यानंतर ते, उक्त अधिकाऱ्याच्या स्वाधीन करून, निवडणुकीसाठी दुसऱ्या पालिका-सदस्यास नामनिर्देशित करता येईल.

[२] कोणतेही नामनिर्देशन पत्र सादर करण्यात आल्यावर उक्त अधिकारी, नामनिर्देशन पत्र सादर केल्याची तारीख व वेळ नमूद करणारे प्रमाणपत्र स्वाक्षरित करील आणि त्यावर त्याचा अनुक्रमांक नमूद करील.

[३] पोट-नियम (१) अन्वये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या वेळेपूर्वी, उक्त अधिकाऱ्याकडे जे आले नसेल असे कोणतेही नामनिर्देशन पत्र त्याच्याकडून नाकारण्यात येईल.

[४] उक्त अधिकाऱ्याला वेळेच्या आत मिळालेली सर्व नामनिर्देशनपत्रे, सभेला प्रारंभ होण्यापूर्वी त्याच्याकडून पीठासीन प्राधिकाऱ्याला देण्यात येतील किंवा जर तो स्वत:च पीठासीन प्राधिकारी असेल तर तो, ती पत्रे छाननीसाठी म्हणून सभेत आणील.

४. एकापेक्षा अधिक नसतील इतके उमेदवार पालिका-सदस्यांनी, नामनिर्दिष्ट करणे – कोणताही पालिका-सदस्य, नियम ३ अन्वये, अध्यक्षपदासाठी एकाहून अधिक उमेदवारांस नामनिर्दिष्ट करणार नाही.

परंतु, एखाद्या पालिका-सदस्याने, उक्त पदासाठी एकाहून अधिक उमेदवार नामनिर्दिष्ट केले असतील तर नियम ३ च्या पोट-कलम (१) अन्वये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या अधिकाऱ्यास, जे नामनिर्देशन पत्र प्रथम मिळाले असेल तेच, फक्त छाननीकरिता म्हणून विचारात घेतले जाईल.

५. नामनिर्देशनपत्रांची छाननी – सभेच्या प्रारंभानंतर, पीठासीन प्राधिकारी नियम ३ अन्वये त्यास मिळालेल्या सर्व नामनिर्देशन पत्रांची छाननी करील, आणि तो, त्याच्या मते जे यथोचितरीत्या नामनिर्देशित करण्यात आले असतील अशा पालिका-सदस्यांची नावे व ती ज्यांनी सुचविली असतील त्या पालिका-सदस्यांची नावे, उपस्थित पालिका-सदस्यांस वाचून दाखवील.

६. उमेदवारी मागे घेणे – [१] निकटपूर्ववर्ती नियमान्वये यथोचितरीत्या नामनिर्देशित करण्यात आलेल्या पालिका-सदस्यांची नावे वाचून दाखविण्यात आल्यानंतर पंधरा मिनिटांच्या आत, कोणत्याही उमेदवारास, स्वत: सही केलेल्या व पीठासीन प्राधिकाऱ्यास दिलेल्या लेखी नोटिशीद्वारे आपली उमेदवारी मागे घेता येईल.

[२] अशी नोटीस, स्वत: उमेदवारास जातीने किंवा उमेदवाराने जिला याबाबतीत लेखी प्राधिकृत केले असेल अशा त्याचे नाव सुचविणाऱ्या व्यक्तीमार्फत देता येईल.

[३] आपली उमेदवारी मागे घेण्याबाबत पोट-नियम (१) अन्वये जिने नोटीस दिली असेल अशा कोणत्याही व्यक्तीस, नोटीस रद्द करण्यास परवानगी दिली जाणार नाही.

[४] पीठासीन प्राधिकारी, उमेदवारी मागे घेण्यासंबंधीच्या नोटिशीच्या खरेपणाबद्दल आणि ती देणाऱ्या व्यक्तीच्या ओळखीबाबत खात्री पटल्यानंतर,

(अशा सभेत) उपस्थित असलेल्या पालिका-सदस्यांस, उमेदवारी मागे घेणाऱ्या उमेदवारांची नावे वाचून दाखवील.

७. निवडणुकीची कार्यपद्धती – [१] कोणतीही उमेदवारी मागे घेण्यात आली असेल तर ती मागे घेण्यात आल्यानंतर, यथोचितरीत्या नामनिर्देशित करण्यात आलेला एकच उमेदवार असेल तर तो अध्यक्ष म्हणून यथोचितरीत्या निवडून आल्याचे जाहीर करण्यात येईल.

[२] जर एकाहून अधिक उमेदवार यथोचितरीतीनें नामनिर्देशित करण्यात आले असतील तर, पालिका-सदस्य, गुप्तमतदान पद्धतीनुसार अध्यक्षाची निवड करण्याच्या कामास सुरुवात करतील.

[३] (अ) पोट-नियम (२) च्या प्रयोजनांसाठी पीठासीन प्राधिकारी नमुना २ मध्ये मतपत्रिका तयार करण्याची व्यवस्था करील.

(ब) मतपत्रिकेवर, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची नावे, आडनावे असणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत आडनावानुसार व इतर उमेदवारांच्या बाबतीत मूळ नावानुसार वर्णानुक्रमे लावण्यात येतील. मतपत्रिकेतील तपशील व अनुसरावयाचा वर्णानुक्रम हा, अधिनियमाच्या कलम ८१, खंड (१२) अन्वये नगरपालिकेने, कार्यवृतांसाठी ज्या भाषेचा स्वीकार केला असेल त्या भाषेत असेल.

[४] मतपत्रिकेवर पीठासीन प्राधिकारी सही करील आणि ती, मतदानाचा हक्क असलेल्या प्रत्येक पालिका-सदस्यास देण्यात येईल.

[५] प्रत्येक पालिका-सदस्य त्याला ज्या उमेदवाराला मत द्यावयाचे असेल त्याच्या नावापुढे फुलीचे चिन्ह (×) करील, आपण दिलेले मत दिसू नये म्हणून मतपत्रिकेची घडी करील आणि घडी केलेली मतपत्रिका, सभेच्या ठिकाणी त्या कारणाकरिता ठेवलेल्या, फट असलेल्या पेटीत टाकील. मतदार मतपत्रिकेवर सही करणार नाही किंवा ज्याजोगे त्याची ओळख पटेल अशी कोणतीही खूण त्यावर करणार नाही.

[६] (अ) मतपत्रिका म्हणून वापर करता येणार नाही अशा रीतीने ज्याने आपल्या मतपत्रिकेचा अनवधानाने वापर केला असेल त्या पालिका-सदस्यास, उक्त मतपत्रिका पीठासीन प्राधिकाऱ्यास परत केल्यावर आणि अनवधानतेबद्दल अशा प्राधिकाऱ्याची खात्री करून दिल्यानंतर, दुसरी मतपत्रिका घेता येईल आणि अशा रीतीने परत करण्यात आलेल्या मतपत्रिकेवर, पीठासीन प्राधिकाऱ्याकडून "खराब रद्द करण्यात आलेली" असे त्यावर लिहिण्यात येईल.

(ब) खंड (अ) अन्वये रद्द करण्यात आलेल्या सर्व मतपत्रिका वेगळ्या पाकिटात ठेवण्यात येतील.

[७] (अ) जर मतदार अशिक्षित असेल किंवा अंधत्वामुळे त्यास मतपत्रिकेवर फुली करणे शक्य नसेल तर पीठासीन प्राधिकारी मतदाराच्या इच्छेनुसार मतपत्रिकेवर मत नमूद करील.

(ब) खंड (अ) अन्वये काम करीत असताना पीठासीन प्राधिकारी शक्य असेल तेवढी गुप्तता राखील.

[८] पीठासीन प्राधिकारी उपस्थित असलेल्या पालिका-सदस्यांसमोर पेटी उघडील आणि मुख्य अधिकाऱ्याच्या किंवा तो नियुक्त करील अशा इतर व्यक्तींच्या मदतीने, मतमोजणी करील.

[९] पीठासीन प्राधिकारी, जी कोणतीही मतपत्रिका –

(अ) चिन्हांकित नसेल,

(ब) जीवर एकाहून अधिक नावापुढे फुलीचे चिन्ह काढण्यात आले असेल,

(क) जीवरील खुणा अनिश्चित असतील,

(ड) जीवर सही असेल किंवा अशी खूण किंवा असे लिखाण करण्यात आले असेल की त्यामुळे, त्याच्या मते, मतदाराची ओळख पटू शकेल,

तर ती नाकारील.

[१०] दोन किंवा अधिक उमेदवार निवडणूक लढवीत असतील त्याबाबतीत, ज्या उमेदवारास सर्वांत अधिक विधिग्राह्य मते देण्यात आली असतील तो उमेदवार निवडून आल्याचे जाहीर करण्यात येईल. जर समान मते पडतील तर, कलम ५१, पोट कलम ४ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे चिठ्ठ्या टाकून निर्णय करण्यात येईल.

८. निवडणूक न झाल्यास सभा स्थगित करून पुन्हा भरविण्याची शक्ती – जर कोणत्याही कारणामुळे, अध्यक्षाच्या निवडीसाठी बोलाविण्यात आलेल्या सभेत, अध्यक्षाची निवड होऊ शकली नाही तर, पीठासीन प्राधिकारी, सभा स्थगित करील आणि अशा रीतीने स्थगित करण्यात आलेली सभा, निवडणुकीचे काम पूर्ण करण्यासाठी म्हणून दुसऱ्या दिवशी त्याच वेळी भरवील.

९. उपाध्यक्षाची निवडणूक – या नियमाचे उपबंध, आवश्यक त्या फेरफारांसह पुढील फेरबदलास अधीन राहून उपाध्यक्षाच्या निवडणुकीच्या बाबतीतही लागू असतील :–

जेव्हा अध्यक्ष व उपाध्यक्ष या दोहोंची निवडणूक एकाच सभेत व्हावयाची असेल तेव्हा :–

(अ) अध्यक्षाच्या नामनिर्देशन पत्रांची छाननी व त्यानंतरच्या निवडणुकीच्या सर्व इतर अवस्थांचे कामकाज प्रथम करण्यात येईल आणि नंतर उपाध्यक्षाची निवडणूक होईल;

(ब) जर एखाद्या उमेदवाराच्या वतीने, अध्यक्ष तसेच उपाध्यक्ष म्हणून निवड होण्यासाठी नामनिर्देशन पत्रे दाखल करण्यात आली असतील तर आणि

असा उमेदवार अध्यक्ष म्हणून निवडून आल्याचे पूर्वीच जाहीर करण्यात आले असेल तर उपाध्यक्ष म्हणून निवड होण्यासाठीचे त्याचे नामनिर्देशन पत्र मागे घेण्यात आल्याचे मानण्यात येईल.

नमुना १

नामनिर्देशन पत्र

[नियम ३, पोट-नियम (१) पहा]

.....नगरपालिकेच्या *अध्यक्ष/*उपाध्यक्ष या पदासाठी निवडणूक.

मी याद्वारे.....नगरपालिकेच्या *अध्यक्ष/*उपाध्यक्षाच्या पदावरील निवडणुकीसाठी, उमेदवार म्हणून.....यांना नामनिर्देशित करीत आहे.

उमेदवाराचे पूर्ण नाव.....

उमेदवाराचा डाकेचा पूर्ण पत्ता.....

ज्या वॉर्डातून उमेदवार पालिका-सदस्य म्हणून निवडून आला असेल त्या वॉर्डाचे नाव .....

नाव सुचविणाऱ्या व्यक्तीचे पूर्ण नाव..... .....

दिनांक..... (नाव सुचविणाऱ्या व्यक्तीची सही)

उमेदवाराचे प्रतिज्ञापन

मी, याद्वारे, या नामनिर्देशनास अनुमती देतो व सूचित करतो की, निवडून आल्यास.....नगरपालिकेचा *अध्यक्ष/*उपाध्यक्ष म्हणून काम करण्यास मी तयार आहे.

दिनांक..... (उमेदवाराची सही)

(नामनिर्देशन पत्रे स्वीकारण्यासाठी नेमण्यात आलेल्या अधिकाऱ्याने भरवावयाचे)

नामनिर्देशन पत्राचा अनुक्रमांक .....

हे नामनिर्देशन पत्र *उमेदवाराचे नाव सुचविणाऱ्याने/*उमेदवाराने..... (दिनांक) रोजी..... (वेळ) वाजता माझ्या स्वाधीन केले.

दिनांक..... (अधिकाऱ्याची सही)

---

*लागू नसलेला मजकूर खोडावा.

महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम, १९६६

[कलम ३२१ (२) व कलम १७ (२) (अ) ते (क्यू) याखालील अधिसूचनांची सूची]

अ. नं.	विभागाचे नाव	अधिसूचनेचा क्रमांक	अधिसूचनेचा दिनांक	महाराष्ट्र शासन राजपत्रातील प्रसिद्धी			शेरा
				भाग	दिनांक	पृष्ठ क्र.	
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)
१	नगरविकास, आरोग्य व गृहनिर्माण विभाग	यूएमआर–१०६५–एकीकरण–चार	२२ नोव्हेंबर, १९६६	चार–ब, असाधारण	२२ नोव्हेंबर १९६६	१,०२९ ते १,०६८	मुख्य नियम
२	वरीलप्रमाणे	यूएमआर–१०६७/एकीकरण–चार	१३ एप्रिल, १९६७	वरीलप्रमाणे	१३ एप्रिल १९६७	६४४ ते ६४५	सुधारणा
३	वरीलप्रमाणे	वरीलप्रमाणे	२६ एप्रिल, १९६७	वरीलप्रमाणे	२६ एप्रिल १९६७	१,०३२ ते १,०३३	वरीलप्रमाणे
४	वरीलप्रमाणे	वरीलप्रमाणे	१६ ऑक्टोबर, १९६९	एक–अ, असाधारण	१६ ऑक्टोबर १९६९	७० ते७१	वरीलप्रमाणे
५	वरीलप्रमाणे	यूएमआर–१०६७/५८२८०–एकीकरण–चार	५ जून, १९७०	वरीलप्रमाणे	५ जून १९७०	६०	वरीलप्रमाणे
६	वरीलप्रमाणे	एमयूएन(एम)–२४६९/३९५३२– एन	१३ मार्च, १९७२	एक–अ, असाधारण	३० मार्च १९७२	३३	सुधारणा

७	वरीलप्रमाणे	एमएमआर–१३७१/ २७०८६(अ)–एन	२८ मार्च १९७२	असाधारण	३० मार्च १९७२	२९	वरीलप्रमाणे
८	वरीलप्रमाणे	एमएमआर–१३७१/ ४४७३१–एन	१३ जुलै १९७२	एक–अ, साधारण	२० जुलै १९७२	८४	वरीलप्रमाणे
९	वरीलप्रमाणे	एमएमआर–१०७१/ ५०७७२–एन	१६ नोव्हेंबर १९७३	असाधारण	१३ नोव्हेंबर १९७३	७३	वरीलप्रमाणे
१०	वरीलप्रमाणे	एमएमआर–१३७३/ ७९७७६–ए–१	१० डिसेंबर १९७३	एक–अ, असाधारण	१० डिसेंबर १९७३	८१–८८	वरीलप्रमाणे
११	वरीलप्रमाणे	एमएमआर–१३७३/ ए–१	२५ जानेवारी १९७४	एक–अ, असाधारण	२५ जानेवारी १९७४	५	वरीलप्रमाणे
१२	वरीलप्रमाणे	एमएमआर–१३७३/ ७२३५९(अ)–एन	२२ ऑगस्ट १९७४	वरीलप्रमाणे	२२ ऑगस्ट १९७४	४८	वरीलप्रमाणे
१३	वरीलप्रमाणे	एमएमआर–१३७४/ ३३७१५–एन	६ नोव्हेंबर १९७४	वरीलप्रमाणे	६ नोव्हेंबर १९७४	६५	वरीलप्रमाणे

आणि

महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम, १९६६ (सुधारणा) आणि विधिग्राह्य करणे व **महाराष्ट्र शासन राजपत्र,** भाग चार, दिनांक ८ डिसेंबर १९६७ यामध्ये प्रसिद्ध केलेला महाराष्ट्र नगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९६७ (सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७).

नमुना २

मतपत्रिका

[नियम ७, पोट-नियम (३) पहा]

'..... नगरपालिका

*अध्यक्ष/*उपाध्यक्ष या पदावरील निवडणुकीसाठी यथोचितरीत्या नामनिर्देशित करण्यात आलेल्या व निवडणूक लढविणाऱ्या पालिका-सदस्यांची नावे

नाव (१)	फुली करण्यासाठी जागा (२)
१.	
२.	
३.	
४.	

इत्यादी

दिनांक .....-- (पीठासीन प्राधिकाऱ्याची सही)

*लागू नसलेला मजकूर खोडावा.

नगरविकास, आरोग्य व गृहनिर्माण विभाग

सचिवालय, मुंबई, दिनांक २२ नोव्हेंबर १९६६

महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५

क्रमांक यू एम आर १०६५-एकीकरण-चार – महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०) याचे कलम १७, पोट-कलम (२), खंड (अ) ते (क्यू) आणि कलम ३२१, पोट-कलम (२) अन्वये महाराष्ट्र शासनास प्रदान करण्यात आलेल्या आणि त्यास त्या बाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व शक्तींचा वापर करून महाराष्ट्र शासन, याद्वारे, पुढील नियम करीत आहे. ते, उक्त कलम ३२१ च्या पोट-कलम (३) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत –

१. संक्षिप्त नाव व प्रारंभ – [१] या नियमास महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम, १९६६ असे म्हणता येईल.

[२] ते ताबडतोब अमलात येतील.

२. व्याख्या – संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या नियमात –

(अ) "अधिनियम" म्हणजे, महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०);

(ब) "नमुना" म्हणजे, या नियमांना जोडलेला नमुना;

(ब–ब) "अध्यक्ष" म्हणजे महाराष्ट्र नगरपालिका (निवडणूक विधीत सुधारणा व निवडणुका आणखी पुढे ढकलणे) अध्यादेश, १९७३ (सन १९७३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक चौदा) याद्वारे दाखल करण्यात आलेल्या कलम ५१ च्या उपबंधास अनुसरून निवडावयाचा किंवा निवडलेला नगरपालिकेचा अध्यक्ष;

(क) "कलम" म्हणजे, अधिनियमाचे कलम.

३. मतदारांच्या याद्या ठेवणे – [१] मुख्य अधिकारी, कलम ११, पोट-कलम (६) अन्वये तयार केलेल्या मतदारांच्या प्रत्येक यादीची एक अधिप्रमाणित प्रत तीत कोणताही फेरफार न करता ठेवील.

[२] मतदारांच्या उक्त याद्या, नगरपालिकेच्या तिजोरीत किंवा सुरक्षित कपाटात कुलूप लावून ठेवण्यात येतील, आणि सदरहू तिजोरीची किंवा सुरक्षित कपाटाची किल्ली जवळ ठेवण्याचे काम जो अधिकारी करीत असेल असा अधिकारी उक्त याद्या सुरक्षित रीतीने ठेवण्यासाठी जबाबदार राहील.

४. निवडणुकीचे निरनिराळे टप्पे ठरविणे – [१] सार्वत्रिक निवडणूक घेण्याच्या प्रयोजनार्थ जिल्हाधिकारी, प्रसंगानुसार आवश्यक असेल त्याप्रमाणे, योग्य असेल त्याप्रमाणे, नमुना १ मधील किंवा नमुना १ अ मधील आदेशाद्वारे, निवडणुकीच्या

सर्व किंवा कोणत्याही टप्प्यांसाठी तारखा, वेळ व जागा पुढीलप्रमाणे नेमून देईल किंवा पुन्हा नेमून देईल –

(अ) नामनिर्देशन करण्याची शेवटची तारीख, वेळ व ठिकाण;

(ब) नामनिर्देशनांची छाननी करण्याची तारीख, वेळ व ठिकाण. अशी तारीख ही, नामनिर्देशन करण्यासाठी नेमलेल्या शेवटच्या तारखेपासून तिसऱ्या दिवसानंतरची नसेल, व अशी तारीख ही नंतरच्या आदेशान्वये पुन्हा नेमून देण्यात आली असेल त्या बाबतीत, अशी तारीख ही अशा नंतरच्या आदेशाच्या तारखेनंतर पाचव्या दिवसानंतरची नसेल;

(क) उमेदवारी मागे घेण्याची शेवटची तारीख अशी तारीख असेल की, जी नामनिर्देशनांच्या छाननीच्या तारखेपासून किंवा त्यासाठी पुन्हा नेमून दिलेल्या तारखेपासून पंधरा दिवसांनंतरची आणि पाचव्या दिवसापेक्षा अगोदरची नसेल, आणि उमेदवारी मागे घेण्याची अशी तारीख व निवडणुकीचे नंतरचे टप्पे हे नंतरच्या आदेशाद्वारे पुन्हा नेमून देण्यात आले असतील त्याबाबतीत उमेदवारी मागे घेण्याची अशी तारीख ही, अशा नंतरच्या आदेशाच्या तारखेनंतर पंधरा दिवसांनंतरची आणि पाच दिवसांपेक्षा अगोदरची नसेल;

(ड) आवश्यक असल्यास, ज्या तारखेस किंवा तारखांना मतदान घेण्यात येईल ती तारीख किंवा तारखा, अशा असतील की, अशी तारीख किंवा अशा तारखांपैकी पहिली तारीख ही, उमेदवारी मागे घेण्याच्या अखेरच्या तारखेपासून किंवा त्यासाठी पुन्हा नेमून दिलेल्या अखेरच्या तारखेपासून बाराव्या दिवसापेक्षा अगोदरची नसेल, आणि निवडणुकीचे आधीचे टप्पे पूर्ण करण्यात आले असतील आणि आवश्यक असल्यास, ज्या तारखेस किंवा तारखांना मतदान घेण्यात येईल ती तारीख किंवा तारखानंतरच्या आदेशान्वये पुन्हा नेमून देण्यात आलेली असेल किंवा नेमून देण्यात आलेल्या असतील त्या बाबतीत, मतदानाची अशी तारीख किंवा अशा तारखांपैकी पहिली तारीख ही, अशा नंतरच्या आदेशाच्या तारखेनंतर बाराव्या दिवसापेक्षा अगोदरची नसेल. प्रत्येक बाबतीत अशा रीतीने नेमून दिलेल्या किंवा पुन्हा नेमून दिलेल्या तारखेस किंवा तारखांस ज्या वेळेमध्ये मतदान घेण्यात येईल, ती वेळ विनिर्दिष्ट करण्यात येईल.

परंतु, अशी तारीख किंवा तारखा, ज्या नगरपालिकेची किंवा अध्यक्षाच्या पदाची निवडणूक घ्यावयाची असेल अशा नगरपालिकेच्या सदस्यांचा किंवा यथास्थिती अध्यक्षाचा पदावधी संपण्याच्या तारखेपूर्वी २ महिन्यांपेक्षा अगोदरच्या आणि (या अधिनियमान्वये घेण्यात येणारी पहिली निवडणूक सोडून) असा पदावधी संपण्याच्या तारखेपूर्वी ६ दिवसांपेक्षा उशिराच्या असणार नाहीत;

(ई) मतमोजणीची तारीख किंवा तारखा, वेळ व ठिकाण; आणि

(फ) निवडणुकींच्या इतर टप्प्यांसाठी तारखा, वेळ व ठिकाणे.

[२] जिल्हाधिकारी पोट-नियम (१) अन्वये कोणताही आदेश देईल त्या बाबतीत, तो –

(अ) आदेश हा निवडणुकीच्या सर्व टप्प्यांसाठी तारखा नेमून देण्याबद्दल किंवा पुन्हा नेमून देण्याबद्दल असेल तर – उमेदवारांच्या नामनिर्देशनासाठी निश्चित केलेल्या शेवटच्या तारखेपूर्वी, दहा दिवसांपेक्षा कमी नसेल अशा मुदतीत;

(ब) आदेश हा मतदान घेण्यासाठी असलेली तारीख पुन्हा नेमून देण्याबद्दल असेल तर – मतदान घेण्यासाठी निश्चित केलेल्या सुधारित तारखेपूर्वी बारा दिवसांपेक्षा कमी नसेल अशा मुदतीत,

(क) आदेश हा नामनिर्देशन पत्रांच्या छाननीसाठी किंवा (मतदानाच्या तारखेव्यतिरिक्त) नंतरच्या टप्प्यांपैकी कोणत्याही टप्प्यासाठी असलेली तारीख पुन्हा नेमून देण्याबद्दल असेल तर – निवडणुकीच्या पुढील टप्प्यासाठी निश्चित केलेल्या सुधारित तारखेपूर्वी पाच दिवसांपेक्षा कमी नसेल अशा मुदतीत –

असा आदेश, अधिनियमाच्या कलम ३२६, पोट-कलम (२), खंड (अ) व (क) मध्ये तरतूद केलेल्या रीतीने, सार्वजनिक नोटीस म्हणून प्रसिद्ध करण्याची व जेथे स्थानिक वृत्तपत्रे असतील तेथे त्याशिवाय अशा एका किंवा अनेक वृत्तपत्रांत प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करील. जिल्हाधिकारी अशा आदेशाच्या मराठी प्रती नगरपालिकेच्या कार्यालयामध्ये आणि नगरपालिकेच्या क्षेत्रातील योग्य वाटेल अशा इतर ठळक ठिकाणी लावून, आणि त्यास योग्य वाटेल अशा इतर रीतीने उक्त आदेश प्रसिद्ध करवून निवडणुकीच्या कार्यक्रमास मोठ्या प्रमाणावर प्रसिद्धी देण्याची व्यवस्था करील.

[३] निर्वाचन अधिकाऱ्याच्या, कोणत्याही प्रभागातील निवडणुकीच्या किंवा यथास्थिती अध्यक्षाच्या पदाच्या निवडणुकीच्या संबंधातील नामनिर्देशन पत्र स्वीकारणाऱ्या किंवा ते नाकारणाऱ्या निर्णयाविरुद्ध, नियम १५ अन्वये अपील सादर करण्यात आले असेल त्या बाबतीत, अशा निवडणुकीच्या संबंधातील उमेदवारी मागे घेण्यासाठीची सुधारित शेवटची तारीख ही, अशा अपिलाचा ज्या तारखेस निर्णय देण्यात आला असेल त्या तारखेनंतरचा तिसरा दिवस असेल. मतदान घेणे आवश्यक असेल व त्यासाठी पोट-नियम (१) अन्वये नेमलेली तारीख पूर्वीच होऊन गेलेली असेल किंवा उमेदवारी मागे घेण्यासंबंधातील सुधारित शेवटच्या तारखेनंतरच्या बाराव्या दिवसाहून अगोदरची असेल तर, जिल्हाधिकारी, ज्या तारखेस मतदान घेण्यात येईल अशी सुधारित तारीख (ही तारीख उमेदवारी मागे घेण्या-

साठीच्या सुधारित शेवटच्या तारखेनंतरच्या बाराव्या दिवसाहून अगोदरची नसेल) नेमील आणि उक्त निवडणुकीच्या संबंधात मतमोजणीसाठी सुधारित तारीख नेमील. पोट-नियम (१) अन्वयें मूळ आदेश ज्या रीतीने प्रसिद्ध करण्यात आला असेल त्याच रीतीनुसार असा आदेश प्रसिद्ध करण्यात येईल.

[४-अ] **राष्ट्रीय किंवा राज्य दुखवटचाच्या कालावधीत निवडणुका पुढे ढकलणे** – [१] नामनिर्देशन करण्यासाठी नेमण्यात आलेली शेवटची तारीख ही, शासनाने राष्ट्रीय किंवा राज्य दुखवटचाचा कालावधी म्हणून घोषित केलेल्या कालावधीत येत असेल तर, जिल्ह्याधिकारी निवडणूक कार्यक्रम पुढे ढकलील व असा कालावधी संपल्यानंतर निवडणुकीच्या निरनिराळ्या टप्प्यांचा प्रारंभ होईल अशा-रीतीने, मग नामनिर्देशनासाठी नेमून दिलेली शेवटची तारीख सार्वजनिक सुटी म्हणून घोषित केलेली असो वा नसो, नवीन तारखा नेमून देईल.

[२] जर असा दुखवटचाचा कालावधी, नामनिर्देशनांच्या छाननीसाठी किंवा उमेदवारी मागे घेण्यासाठी नेमून दिलेल्या शेवटच्या तारखेस सुरू होत असेल तर, अशी कोणतीही तारीख पुढे ढकलण्यात येणार नाही, परंतु निवडणुकीच्या नंतरच्या टप्प्यांच्या तारखांचे जिल्हाधिकाऱ्याकडून पुनरीक्षण करण्यात येईल. हेतू हा की, दुखवटचाचा कालावधी संपल्यानंतर, निवडणुकीच्या उक्त टप्प्यांचा प्रारंभ होईल.

[३] मतदानासाठी किंवा मतमोजणीसाठी नेमण्यात आलेल्या कोणत्याही तारखेस अशा दुखवटचाच्या कालावधीचा प्रारंभ होत असेल आणि मतदानास किंवा मतमोजणीस पूर्वीच सुरुवात झाली असेल तेव्हा, यथास्थिती, मतदान किंवा मत-मोजणी ही पुढे ढकलण्यात येणार नाही. परंतु इतर बाबतीत, जिल्हाधिकाऱ्याकडून उक्त तारखांचे पुनरीक्षण करण्यात येईल. हेतू हा की, दुखवटचाचा कालावधी समाप्त झाल्यानंतर निवडणुकीचे उक्त टप्पे येतील.

५. निर्वाचन अधिकारी आणि सहायक निर्वाचन अधिकारी यांची नेमणूक – [१] जिल्हाधिकारी, योग्य असेल त्याप्रमाणे नमुना एक किंवा नमुना एक-अ मधील आदेशाद्वारे नगरपालिकेच्या मुख्य अधिकाऱ्याची किंवा इतर कोणत्याही अधिकाऱ्याची या नियमाखालील कोणत्याही निवडणुकीच्या भागाच्या संबंधात निर्वाचन अधिकारी म्हणून नेमणूक करील.

[२] (अ) जिल्हाधिकाऱ्यास, आवश्यक वाटेल तर, नगरपालिकेच्या किंवा शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्याची, कोणत्याही निर्वाचन अधिकाऱ्यास त्याची कामे पार पाडण्यामध्ये साहाय्य करण्यासाठी सहायक निर्वाचन अधिकारी म्हणून नेमणूक करता येईल.

(ब) निर्वाचन अधिकाऱ्याच्या नियंत्रणास अधीन राहून, सहायक निर्वाचन अधिकारी, निर्वाचन अधिकाऱ्याच्या कामांपैकी सर्व किंवा कोणतीही कामे पार पाडण्यास सक्षम असेल.

परंतु, नामनिर्देशन पत्रांची छाननी करणे किंवा मतमोजणी करणे याच्याशी संबंधित असलेल्या आपल्या कामांपैकी कोणतेही काम पार पाडण्यास, निर्वाचन अधिकारी अपरिहार्य अशा परिस्थितीमुळे असमर्थ झाला असेल तर, कोणताही सहायक निर्वाचन अधिकारी उक्त कामांपैकी कोणतेही काम पार पाडणार नाही.

६. निर्वाचन अधिकारी या संज्ञेत, निर्वाचन अधिकाऱ्याची कामे पार पाडणाऱ्या सहायक निर्वाचन अधिकाऱ्याचा समावेश असणे – नियम ५, पोट-नियम (२)च्या उपबंधास अधीन राहून, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या नियमात ज्या ठिकाणी निर्वाचन अधिकाऱ्याचा उल्लेख येईल त्या ठिकाणी सहायक निर्वाचन अधिकाऱ्यासंबंधीचा उल्लेख समाविष्ट आहे असे समजण्यात येईल.

७. निर्वाचन अधिकाऱ्याचे सर्वसाधारण कर्तव्य – या नियमांन्वये तरतूद करण्यात आलेल्या रीतीने कोणत्याही निवडणुकीच्या वेळी, निवडणुकीचे कामकाज परिणामक्षमरीत्या चालविण्यासाठी आवश्यक असतील अशी सर्व कामे व गोष्टी करणे हे निर्वाचन अधिकाऱ्याचे सर्वसाधारण कर्तव्य असेल.

८. मतदानकेंद्रे – निर्वाचन अधिकारी, ज्या प्रभागात निवडणूक घ्यावयाची असेल अशा प्रत्येक प्रभागासाठी पुरेशा मतदानकेंद्रांची तरतूद करील आणि मतदानाच्या तारखेपूर्वी सात दिवसानंतरची नसेल अशा तारखेपर्यंत मतदानकेंद्रे दर्शविणारी व ज्या क्षेत्रांसाठी अशा मतदानकेंद्राची व्यवस्था करण्यात आली असेल ती क्षेत्रे (ज्यांचा यात यापुढे " मतदान क्षेत्र " असा उल्लेख करण्यात आला आहे) दर्शविणारी एक यादी प्रसिद्ध करील.

९. मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांची नेमणूक – [१] निर्वाचन अधिकारी, प्रत्येक मतदानकेंद्रासाठी एक मतदान केंद्राध्यक्षाची आणि अशा मतदान केंद्राध्यक्षास साहाय्य करण्यासाठी त्यास आवश्यक वाटतील अशा एक किंवा अनेक मतदान अधिकाऱ्यांची नेमणूक करील. परंतु तो निवडणुकीत किंवा निवडणुकीच्या संबंधात एखाद्या उमेदवाराने किंवा त्याच्या वतीने कामावर लावलेल्या किंवा अन्यथा त्याच्यासाठी काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीची नेमणूक करणार नाही.

परंतु, एखादा मतदान अधिकारी मतदानकेंद्रात गैरहजर असेल तर, मतदान केंद्राध्यक्षास मतदान अधिकाऱ्याच्या गैरहजेरीत मतदान अधिकारी म्हणून काम करण्यासाठी, अशा मतदानकेंद्रात उपस्थित असलेल्या कोणत्याही व्यक्तीची नेमणूक करता येईल आणि त्याप्रमाणे तो निर्वाचन अधिकाऱ्यास कळवील. मात्र अशा रीतीने नेमलेली व्यक्ती ही निवडणुकीत किंवा निवडणुकीच्या संबंधात एखाद्या उमेदवाराने किंवा त्याच्या वतीने कामावर लावलेली किंवा अन्यथा त्याच्यासाठी काम करणारी व्यक्ती असता कामा नये.

[२] मतदान अधिकारी, त्यास मतदान केंद्राध्यक्षाने तसा निदेश दिला असेल तर, या नियमान्वये मतदान केंद्राध्यक्षाची सर्व किंवा कोणतीही कामे पार पाडील.

[३] आजारपणामुळे किंवा इतर अपरिहार्य कारणामुळे मतदान केंद्राध्यक्षास मतदानकेंद्रात गैरहजर राहणे भाग पडले असेल तर त्याच्या अशा गैरहजेरीच्या कोणत्याही प्रसंगी त्याची कामे पार पाडण्यासाठी ज्यास निर्वाचन अधिकाऱ्याने प्राधिकृत केले असेल असा मतदान अधिकारी अशी कामे पार पाडील.

[४] संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या नियमात मतदान केंद्राध्यक्षासंबंधी केलेल्या उल्लेखात पोट-नियम (२) किंवा यथास्थिती पोट-नियम (३) अन्वये कोणतेही काम पार पाडण्यास जिला प्राधिकृत करण्यात आले आहे अशा, उक्त काम पार पाडणाऱ्या कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो असे मानण्यात येईल.

१०. मतदान केंद्राध्यक्षाचे सर्वसाधारण कर्तव्य–मतदानकेंद्रात सुव्यवस्था राखणे आणि मतदानाचे काम सुरळीत चालू ठेवणे हे मतदान केंद्राध्यक्षाचे सर्वसाधारण कर्तव्य असेल.

११. नियंत्रण – निर्वाचन अधिकारी, सहायक निर्वाचन अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी आणि या नियमाशी संबंधित असलेल्या कोणत्याही बाबतीत नेमलेल्या इतर सर्व व्यक्ती जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्देशाखाली व देखरेखीखाली काम करतील.

१२. उमेदवाराचे नामनिर्देशन–[१] या अधिनियमाच्या उपबंधान्वये कोणतीही जागा भरण्यासाठी निवड केली जाण्यास जी कोणतीही व्यक्ती पात्र असेल अशा व्यक्तीस अशी जागा भरण्यासाठी निवडणुकीचा उमेदवार म्हणून नामनिर्दिष्ट करता येईल.

[२] प्रत्येक नामनिर्देशन पत्र हे योग्य असेल त्याप्रमाणे नमुना २ मध्ये किंवा नमुना २-अ मध्ये असेल. ते कोणत्याही मतदाराने मागणी केली असता निर्वाचन अधिकाऱ्याकडून त्यास पुरविण्यात येईल. उमेदवाराने योग्यरीत्या भरलेल्या आणि त्याने व अध्यक्षाच्या पदाच्या निवडणुकीच्या संबंधात नाव सुचविणारा म्हणून नगरपालिका मतदारांच्या यादीतील मतदाराने, आणि इतर निवडणुकांच्या बाबतीत, नाव सुचविणारा म्हणून प्रभागाच्या मतदाराने सही केलेले नामनिर्देशन पत्र (दोन प्रती) उमेदवार, नियम ४ च्या पोट-नियम (१) अन्वये नेमलेल्या तारखेस किंवा त्या तारखेपूर्वी तदन्वये निर्दिष्ट केलेल्या वेळी व ठिकाणी, स्वत: होऊन किंवा त्याचे नाव सुचविणाऱ्या व्यक्तीमार्फत निर्वाचन अधिकाऱ्याकडे पाठवील.

[३] कलम १२ च्या पोट-कलम (१) अन्वये मत देण्यास पात्र असलेल्या आणि उमेदवारास ज्या प्रभागाकरिता नामनिर्दिष्ट करण्यात आले असेल अशा प्रभागातील मतदारांच्या यादीत जिचे नाव नमूद करण्यात आले असेल अशा कोणत्याही व्यक्तीस नाव सुचविणारा म्हणून सही करता येईल. नाव सुचविणारा म्हणून नमुना २ मधील नामनिर्देशन पत्रावर ती अशा एकापेक्षा अधिक नामनिर्देशन पत्रांवर सह्या करणार नाही. तिने तसे केल्यास, प्रथम मिळालेल्या नामनिर्देशन

पत्राखेरीज अशा रीतीने सह्या केलेली सर्व नामनिर्देशन पत्रे, नियम १३, पोट-नियम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अवैध ठरतील. तथापि जर नामनिर्देशन पत्रांवर निरनिराळ्या नाव सुचविणाऱ्या व्यक्तींनी सह्या केलेल्या असतील तर, त्याच उमेदवारास त्याच प्रभागातील निवडणुकीसाठी एकापेक्षा अधिक नामनिर्देशन पत्रांद्वारे नामनिर्दिष्ट करता येईल.

परंतु, अशा निवडणुकीसाठी, कोणत्याही उमेदवाराकडून किंवा त्याच्या वतीने, चारपेक्षा जास्त नामनिर्देशन पत्रे सादर करण्यात येणार नाहीत किंवा निर्वाचन अधिकाऱ्याकडून ती स्वीकारली जाणार नाहीत.

[३ अ] अध्यक्षपदाच्या निवडणुकीच्या बाबतीत कलम ११ अन्वये तयार केलेल्या नगरपालिका मतदारांच्या यादीत जिचे नाव समाविष्ट करण्यात आले आहे अशा कोणत्याही व्यक्तीस, नमुना २-अ मधील नामनिर्देशन पत्रावर नाव सुचविणारा म्हणून सही करता येईल आणि त्यानंतर पोट-नियम (३)चे उपबंध आवश्यक त्या फेरफारांसह लागू होतील.

[४] ज्या प्रभागामध्ये अनुसूचित जातींकरिता किंवा अनुसूचित जमातींकरिता जागा राखून ठेवण्यात आली असेल अशा प्रभागाच्या बाबतीत, विशिष्ट अनुसूचित जातीचा किंवा अनुसूचित जमातीचा सदस्य असलेल्या उमेदवाराने ती जात किंवा जमात निर्दिष्ट करणारे प्रतिपादन आपल्या नामनिर्देशन पत्रात समाविष्ट केलेले नसेल तर, असा उमेदवार ती राखीव जागा भरण्यासाठी निवडला जाण्यास पात्र आहे असे मानण्यात येणार नाही.

[५] पोट-नियम (२)अन्वये नामनिर्देशन पत्र मिळाल्यावर, निर्वाचन अधिकारी, ते नामनिर्देशन पत्र स्वाधीन करणाऱ्या व्यक्तीस अशा नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यासाठी निश्चित केलेला दिवस, वेळ व ठिकाण कळवील आणि तो अशा नामनिर्देशन पत्रावर त्याच्या अनुक्रमांकाची नोंद करून त्यावर, ज्या तारखेस व ज्या वेळी ते त्याच्या स्वाधीन करण्यात आले असेल ती तारीख व वेळ नमूद करणारे एक प्रमाणपत्र नमूद करील व त्यावर आपली सही करील. त्यानंतर निर्वाचन अधिकारी नामनिर्देशन पत्राच्या पावतीवर व योग्य असेल त्याप्रमाणे नमुना ३ मधील किंवा नमुना ३-अ मधील नामनिर्देशन पत्राच्या छाननीच्या नोटिशीवर सही करील व ती, नामनिर्देशन पत्र सादर करणाऱ्या व्यक्तीस देईल. निर्वाचन अधिकारी, नामनिर्देशन पत्र मिळाल्यावर शक्यतो लवकर, नामनिर्देशन पत्राच्या भाग अ च्या (खऱ्या) प्रतीसह नामनिर्देशन पत्राची एक नोटीस, आपल्या कार्यालयातील एखाद्या ठळक जागी लावण्याची व्यवस्था करील.

[६] जेव्हा दोन किंवा त्याहून अधिक प्रभागांमध्ये एकाच वेळी किंवा एकाच सुमारास निवडणुका घ्यावयाच्या असतील, त्या बाबतीत एकच व तीच व्यक्ती

अर्हताप्राप्त असेल तर त्या व्यक्तीस उक्त प्रभागांपैकी सर्व किंवा कितीही प्रभागांमध्ये निवडणुकीसाठी नामनिर्देशन करता येईल.

[७] अध्यक्षाचे पद व पालिका-सदस्याचे पद या दोन्हींसाठी एकाच वेळी किंवा एकाच सुमारास, एका किंवा अधिक प्रभागांतून निवडणुका व्हावयाच्या असतील तेव्हा, एकच व्यक्ती, ती अर्हताप्राप्त असेल तर, एका किंवा त्याहून अधिक प्रभागांतून अध्यक्ष व पालिका-सदस्य या दोन्ही पदांच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशित करता येईल.

१३. नामनिर्देशन पत्रांची छाननी करणे – [१] उमेदवारांना, प्रत्येक उमेदवाराच्या नाव सुचविणाऱ्या एका व्यक्तीला व प्रत्येक उमेदवाराने योग्यरीत्या लेखी प्राधित केलेल्या प्रत्येकी एका अन्य व्यक्तीला नियम ४ अन्वये नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळी व ठिकाणी उपस्थित राहता येईल. परंतु याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीला उपस्थित राहता येणार नाही आणि निर्वाचन अधिकारी, नियम १२, पोट-नियम (२) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, त्याच्या स्वाधीन करण्यात आलेल्या, सर्व उमेदवारांच्या नामनिर्देशन पत्रांची तपासणी करण्यास त्यांना सर्व वाजवी सोयी उपलब्ध करून देईल.

[२] निर्वाचन अधिकारी, अशा नामनिर्देशन पत्रांची तपासणी करील आणि कोणत्याही नामनिर्देशन पत्रासंबंधी जे कोणतेही आक्षेप घेण्यात येतील त्या सर्व आक्षेपांसंबंधी निर्णय देईल आणि त्यास, अशा आक्षेपावरून किंवा स्वतः होऊन जी कोणतीही संक्षिप्त चौकशी करणे आवश्यक वाटेल ती संक्षिप्त चौकशी केल्यानंतर पुढीलपैकी कोणत्याही कारणांवरून कोणतेही नामनिर्देशन नामंजूर करता येईल, ती कारणे अशी :–

(अ) उमेदवारास या अधिनियमांखालील निवडणुकीसाठी पात्र ठरविण्यात आलेले किंवा अपात्र ठरविण्यात आले आहे;

(ब) उमेदवारास नामनिर्दिष्ट करण्यासाठी नाव सुचविणाऱ्यास पात्र ठरविण्यात आलेले नाही;

(क) अधिनियमाच्या उपबंधांपैकी कोणत्याही उपबंधाचे किंवा या नियमान्वये विहित केलेल्या तरतुदीचे अनुपालन करण्यास कसूर करण्यात आलेली आहे.

(ड) उमेदवार किंवा यथास्थिती नाव सुचविणारा हा अशा उमेदवाराचा किंवा नाव सुचविणाऱ्याचा मतदान क्रमांक म्हणून नामनिर्देशन पत्रात ज्या व्यक्तीचा मतदान क्रमांक निर्दिष्ट करण्यात आला असेल ती व्यक्ती नाही;

(ई) उमेदवार किंवा नाव सुचविणारा याची नामनिर्देशन पत्रावरील सही ही खरी सही नाही किंवा ती फसवणुकीने मिळवण्यात आलेली आहे.

[३] ज्या नामनिर्देशन पत्राच्या बाबतीत कोणतीही नियमबाह्य गोष्ट झाली नसेल अशा दुसऱ्या नामनिर्देशन पत्राद्वारे उमेदवारास योग्यरीत्या नामनिर्दिष्ट केले असेल तर, एखाद्या नामनिर्देशन पत्राच्या संबंधात झालेल्या कोणत्याही नियम-बाह्यतेच्या कारणावरून कोणत्याही उमेदवाराचे नामनिर्देशन नामंजूर करण्यास पोट-नियम (२), खंड (क), (ड) किंवा (ई) यातील कोणत्याही उपबंधानुसार प्राधिकार देण्यात आला आहे असे समजण्यात येणार नाही.

[४] भरीव स्वरूपाचा नसेल अशा कोणत्याही दोषावरून निर्वाचन अधिकारी कोणतेही नामनिर्देशन पत्र नामंजूर करणार नाही.

[५] निर्वाचन अधिकारी नियम ४, पोट-नियम (१), खंड (ब) याअन्वये छाननी करण्यासाठी नेमलेल्या तारखेस छाननी करण्याचे काम चालू करील आणि छाननी करण्याच्या कामास दंग्यामुळे किंवा उघड अशा हिंसात्मक कृत्यामुळे किंवा निर्वाचन अधिकाऱ्याच्या आवाक्याबाहेरील कारणांमुळे व्यत्यय आला नसेल किंवा अडथळा निर्माण झाला नसेल तर, निर्वाचन अधिकारी असे छाननीचे काम पुढे ढकलण्यास परवानगी देणार नाही.

परंतु निर्वाचन अधिकाऱ्याने कोणताही आक्षेप घेतला असेल किंवा इतर कोणत्याही व्यक्तीने असा आक्षेप उपस्थित केला तर, त्या बाबतीत संबंधित उमेद-वारास दुसऱ्या दिवसाच्या आत अशा आक्षेपाचे खंडन करण्यासाठी वेळ देता येईल. आणि ज्या तारखेपर्यंत असे कामकाज पुढे ढलकण्यात आले असेल त्या तारखेस निर्वाचन अधिकारी आपल्या निर्णयाची नोंद करील.

[६] निर्वाचन अधिकारी, प्रत्येक नामनिर्देशन पत्रावर, ते स्वीकारण्यात आले आहे किंवा नामंजूर करण्यात आले आहे यासंबंधीच्या आपल्या निर्णयाचे पृष्ठांकन करील आणि नामनिर्देशन नामंजूर करण्यात आले असेल, तर, अशा रीतीने नामनिर्देशन नामंजूर केल्याबद्दल तो आपल्या कारणांचे संक्षिप्त निवेदन लेखी नमूद करील.

[७] उमेदवारास किंवा त्याचे नाव सुचविणाऱ्यास अनर्हत ठरविण्यात आले आहे असे सिद्ध झाले नसेल तर, या नियमाच्या प्रयोजनार्थ, मतदारांच्या यादीत केलेल्या नोंदीची प्रमाणित प्रत सादर केल्यास अशी प्रत, त्या नोंदीत नाव दाखल केलेल्या कोणत्याही मतदारास निवडणुकीत उभे राहण्याच्या किंवा नामनिर्देशन पत्रावर सही करण्याच्या हक्काबाबतचा निर्णायक पुरावा आहे असे समजण्यात येईल.

[८] सर्व नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यात आल्यावर आणि त्यांचा स्वीकार करण्यात आला आहे किंवा ती नामंजूर करण्यात आली आहेत याविषयीचा निर्णय नमूद केल्यानंतर ताबडतोब निर्वाचन अधिकारी, योग्य असेल त्याप्रमाणे नमुना ४ मध्ये किंवा नमुना ४–अ मध्ये विधिग्राह्य रीतीने नामनिर्दिष्ट केलेल्या उमेदवारांची यादी तयार करील. निर्वाचन अधिकारी, त्यानंतर अशी यादी आपल्या

सूचनाफलकावर लावील आणि अशा रीतीने ज्या तारखेस आणि ज्या वेळी अशी यादी लावण्यात आली असेल ती तारीख व वेळ नमूद करील.

१४. **अनामत ठेवणे** – [१] नामनिर्देशन पत्र स्वाधीन करण्यासाठी नेमलेल्या तारखेस किंवा त्यापूर्वी, प्रत्येक उमेदवार पालिका-सदस्याच्या पदासाठी आणि अध्यक्षाच्या पदासाठी निर्वाचन निर्णय अधिकाऱ्याकडे रोख अनुक्रमे पन्नास रुपये व दोनशे रुपये अनामत ठेवील किंवा अनामत ठेवण्याची व्यवस्था करील आणि अशा प्रकारे रक्कम अनामत ठेवल्याशिवाय, कोणताही उमेदवार योग्यरीत्या नामनिर्दिष्ट करण्यात आल्याचे समजले जाणार नाही.

परंतु, ज्या प्रभागामध्ये महिलांकरिता किंवा अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातींकरिता जागा राखून ठेवण्यात आली असेल अशा प्रभागात, असा उमेदवार यथास्थिती, महिला उमेदवार किंवा अनुसूचित जातीचा किंवा अनुसूचित जमातीचा उमेदवार असेल तर त्याने किंवा त्याच्या वतीने अशा रीतीने अनामत ठेवावयाची रक्कम, या नियमान्वये देय असलेल्या रकमेच्या २५ टक्क्यांइतकी असेल.

आणखी असे की, एखाद्या उमेदवारास एकापेक्षा अधिक नामनिर्देशन पत्रांद्वारे एकाच प्रभागातील निवडणुकीसाठी किंवा यथास्थिती, अध्यक्षाच्या पदाच्या निवडणुकीसाठी नामनिर्दिष्ट करण्यात आले असेल तर, या नियमांन्वये त्याने एकापेक्षा अधिक रकमा अनामत ठेवण्याची आवश्यकता असणार नाही.

[२] ज्या उमेदवाराने किंवा ज्याच्या वतीने पोट-नियम (१) मध्ये उल्लेखिलेली अनामत रक्कम ठेवण्यात आली असेल अशा उमेदवाराने या नियमांमध्ये निर्दिष्ट केलेल्या रीतीने व मुदतीत आपली उमेदवारी मागे घेतल्यास किंवा अशा कोणत्याही उमेदवाराचे नामनिर्देशन नाकारण्यात आले असल्यास, ज्या व्यक्तीने रक्कम अनामत ठेवली असेल त्या व्यक्तीस ती परत करण्यात येईल; आणि कोणताही उमेदवार मतदानास प्रारंभ होण्यापूर्वी मृत्यू पावल्यास त्याने अशी कोणतीही अनामत रक्कम ठेवली असेल तर ती त्याच्या वैध प्रतिनिधीस किंवा उमेदवाराने अशी अनामत रक्कम ठेवली नसल्यास ती ज्या व्यक्तीने ठेवली असेल त्या व्यक्तीस परत करण्यात येईल.

[३] उमेदवार निवडून आल्यानंतर निकाल जाहीर झाल्यावर शक्यतो लवकर, अशी अनामत रक्कम यथास्थिती, त्यास किंवा ज्या व्यक्तीने ती दिली असेल त्या व्यक्तीस परत करण्यात येईल.

[४] उमेदवार निवडून न आल्यास, त्यास मिळालेल्या विधिग्राह्य मतांची संख्या, सर्व उमेदवारांना मिळालेल्या विधिग्राह्य मतांच्या एकूण संख्येच्या एक अष्टमांशापेक्षा अधिक होत नसेल तर अनामत रक्कम नगरपालिकेकडे जमा होईल.

[५] अयशस्वी उमेदवाराच्या संबंधात भरण्यात आलेली अनामत रक्कम पोट-कलम (४) अन्वये जप्त करण्यात आली नसेल तर **शासकीय राजपत्रात**

निवडणुकीचा निकाल प्रसिद्ध करण्यात आल्यानंतर, शक्यतो लवकर, उक्त रक्कम ती देणाऱ्या व्यक्तीस परत करण्यात येईल.

१५. अपील – [१] नामनिर्देशन पत्र स्वीकारण्यात किंवा नाकारण्यात आल्याबद्दलच्या निर्वाचन अधिकाऱ्याच्या कोणत्याही निर्णयाविरुद्धचे अपील, यात तरतूद केल्याप्रमाणे, नगरपालिका क्षेत्र ज्या जिल्ह्यात येत असेल त्या जिल्ह्याच्या न्यायाधीशाकडे सादर करता येईल.

[२] नामनिर्देशन पत्राचा स्वीकार करण्याबाबत किंवा ते नामंजूर करण्याबाबत निर्वाचन अधिकाऱ्याने दिलेल्या निर्णयामुळे बाधा पोहोचलेल्या कोणत्याही उमेदवारास, विधिग्राह्य रीतीने नामनिर्दिष्ट केलेल्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून तीन दिवसांच्या आत, त्याविरुद्ध जिल्हा न्यायाधीशाकडे अपील करता येईल.

परंतु, अपील दाखल करण्यात आले असेल त्या बाबतीत असा उमेदवार, जिल्हा न्यायाधीशाकडे अपील दाखल केल्याच्या तारखेच्या लगतनंतरच्या दिवशी दुपारी ३ नंतरची नसेल अशा वेळी, निर्वाचन अधिकाऱ्यास अपिलाची नोटीस देईल.

[३] पोट-नियम (२)च्या परंतुकानुसार एक किंवा अधिक नोटिसा मिळाल्या असतील तर, निर्वाचन अधिकारी, विधिग्राह्य रीतीने नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्यात आल्याच्या तारखेपासून चार दिवस संपल्यानंतर त्वरित,–

(अ) प्रत्येक नोटिशीची एक प्रत, ज्यांच्या संबंधात नोटिसा मिळालेल्या आहेत अशा अपिलांची सुनावणी, त्याबाबत जिल्हा न्यायाधीश नियुक्त करील अशा तारखेस जी तारीख अशा प्रसिद्धीच्या तारखेनंतर दहा दिवसांच्या नंतरची नसेल, जिल्हा न्यायाधीशासमोर करण्यात येईल अशा अर्थाच्या नमुना ५ मधील सूचनेसह, आपल्या सूचना-फलकावर चिकटवून नोटिसा प्रसिद्ध करील.

(ब) प्रत्येक नोटिशीची एक प्रत, खंड (अ)मध्ये निर्दिष्ट केलेली सूचना आणि विधिग्राह्य रीतीने नामनिर्दिष्ट केलेल्या उमेदवारांची यादी जिल्हा न्यायाधीशाकडे पाठवील.

[३] (अ) नोटिशीच्या प्रती व लगत पूर्ववर्ती पोट-नियमांत उल्लेख करण्यात आलेली इतर कागदपत्रे मिळाल्यानंतर जिल्हा न्यायाधीश, त्याने, अपिलाच्या किंवा अपिलांच्या सुनावणीसाठी नियुक्त केलेला दिवस किंवा केलेले दिवस निर्वाचन अधिकाऱ्यास कळवील आणि तसेच असा दिवस/असे दिवस त्याच्या सूचना-फलकावर अधिसूचित करील. त्याचप्रमाणे निर्वाचन अधिकारी, जिल्हा न्यायाधीशाकडून त्यास अशी सूचना मिळाल्याबरोबर, अशा सूचनेची एक प्रत संबंधित पक्षांना यथास्थिती अपिलाच्या किंवा

अपिलांच्या सुनावणीसाठी नियुक्त केलेली तारीख किंवा तारखा यासंबंधी माहिती देण्यासाठी, त्यांच्या सूचना-फलकावर लावील.

[४] निर्वाचन अधिकारी, उमेदवाराने किंवा त्याच्या वतीने अर्ज करण्यात आल्यावर नामनिर्देशन पत्र स्वीकारण्यात किंवा नाकारण्यात आल्यावद्दलच्या निर्णयाची एक प्रत, त्या बाबतीत त्याने नमूद केलेल्या कारणांच्या विवरणासह, ताबडतोब अर्जदारास देईल.

[५] या नियमान्वये करावयाच्या प्रत्येक अपिलात, अपील करणारी व्यक्ती, निर्वाचन अधिकाऱ्याकडून ज्यांची नामनिर्देशने स्वीकारण्यात आली असतील अशा (स्वतः व्यतिरिक्त इतर) सर्व उमेदवारांना प्रतिवादी म्हणून सामील करून घेईल.

[६] पोट-नियम (३) व (३-अ) अन्वये निर्वाचन अधिकाऱ्याने सूचना-फलकावर लावलेल्या सूचना ह्या या नियमान्वये अपील सादर केल्याचे बाबतीत आणि ज्या तारखेस त्याचो जिल्हा न्यायाधीशापुढे सुनावणी सुरू करण्यात येईल त्या तारखेच्या बाबतीत पुरेशी नोटीस आहे असे समजण्यात येईल, आणि अपील करणाऱ्या व्यक्ती किंवा प्रतिवादी यांना इतर कोणत्याही प्रकारची नोटीस देण्याची आवश्यकता असणार नाही आणि अपिलांची अंतिम सुनावणी करण्यास उक्त तारीख ठरविण्यात आली आहे असे समजण्यात येईल. या नियमात तरतूद करण्यात आली असेल त्याशिवाय अपिलाच्या प्रयोजनासाठी जिल्हा न्यायाधीशाला दिवाणी न्यायालयाच्या कोणत्याही शक्तींचा वापर करता येईल.

[७] ह्या नियमान्वये आलेल्या प्रत्येक अपिलाची सुनावणी प्रत्येक दिवशी करण्यात येईल आणि जिल्हा न्यायाधीश असे अपील शक्य होईल तितक्या लवकर निकालात काढील आणि त्याचा निर्णय, ताबडतोब निर्वाचन अधिकाऱ्यास कळविण्यात येईल.

* * *

[९] कोणत्याही अपिलाची नोटीस, निर्वाचन अधिकाऱ्यास देण्यात आली असेल अशा प्रत्येक बाबतीत तो, जिल्हा न्यायाधीशाकडून पोट-नियम (७) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेली माहिती मिळाल्यावर आवश्यक असेल तर जिल्हा न्यायाधीशाच्या निर्णयास अनुसरून विधिग्राह्य रीतीने नामनिर्दिष्ट केलेल्या उमेदवाराच्या यादीची फेरतपासणी करून ती आपल्या सूचना-फलकावर चिटकवून, पुन्हा प्रसिद्ध करील.

[१०] या नियमान्वये जिल्हा न्यायाधीशाने अपिलावर दिलेला निर्णय आणि केवळ अशा निर्णयास अधीन राहून, निर्वाचन अधिकाऱ्याने एखाद्या उमेदवाराने नामनिर्देशन स्वीकारण्यासंबंधी किंवा नामंजूर करण्यासंबंधी दिलेला निर्णय, अखेरचा व निर्णायक असेल आणि त्यावर कोणत्याही न्यायालयात आक्षेप घेता येणार नाही.

[११] या नियमान्वये जिल्हा न्यायाधीशाकडे सादर करण्यात आलेल्या कोणत्याही अपिलाची, जिल्हा न्यायाधीशाकडून उक्त प्रकरण किंवा अशी प्रकरणे

सामान्यतः ज्याच्याकडे पाठविण्यात येत असतील अशा सहायक न्यायाधीशापेक्षा कमी दर्जाच्या नसलेल्या कोणत्याही न्यायाधीशाकडून चौकशी करता येईल व ते निकालात काढता येईल आणि या नियमामधील जिल्हा न्यायाधीशासंबंधीचा कोणताही उल्लेख हा, त्या वेळी, अशा न्यायाधीशासंबंधीचा उल्लेख आहे, असा त्याचा अर्थ लावण्यात येईल.

१६. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना निशाण्या नेमून देणे व त्यांची यादी प्रसिद्ध करणे – [१] या बाबतीत राज्य शासनाने **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे दिलेल्या अशा कोणत्याही सामान्य वा विशेष निदेशांस अधीन राहून निर्वाचन अधिकारी उमेदवारी मागे घेण्यासाठीच्या शेवटच्या दिवसानंतरच्या लगतच्या दिवशी, यापुढे दिलेल्या रीतीने, प्रत्येक उमेदवारास खालील निशाण्यांपैकी एक निशाणी नेमून देईल –

(१) गाय आणि वासरू,
(१-अ) चरखा चालविणारी स्त्री;
(२) झोपडी,
(३) कणीस व विळा,
(४) दिवा (दीप),
(५) हात (माणसाचा),
(६) × × ×
(७) कुदळ व फावडा,
(८) बैलगाडी,
(९) शिडी,
(१०) कोंबडा,
(११) झाड,
(१२) तारा,
(१३) फूल,
(१४) × × ×
(१५) हातोडा, कोयता व तारा,
(१६) धनुष्य आणि बाण.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३०३१
दा. क्र. २४१८४
जिवंध १७।४८४
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

परंतु निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या या नियमात निर्दिष्ट केलेल्या निशाण्यांच्या संख्येहून अधिक होईल तर, निर्वाचन अधिकाऱ्यास ज्याच्या नावे कोणतीही निशाणी नेमून देण्यात आली नसेल अशा कोणत्याही उमेदवाराच्या नावे कोणतीही इतर निशाणी नेमून देता येईल.

[२] एकापेक्षा अधिक उमेदवार एकाच निशाणीसाठी आपली पसंती दर्शवतील तर, निर्वाचन अधिकारी, संबंधित उमेदवारांना योग्य ती नोटीस दिल्यानंतर, त्या

उमेदवारांपैकी जे उमेदवार नेमलेल्या वेळी उपस्थित असतील त्यांच्या समक्ष चिठ्ठ्या टाकून त्या उमेदवारांपैकी कोणत्या उमेदवाराला कोणती निशाणी नेमून देण्यात येईल हे ठरवील.

[३] या नियमान्वये एखाद्या उमेदवाराला कोणतीही निशाणी नेमून देताना निर्वाचन अधिकाऱ्याने दिलेला निर्णय अंतिम असेल.

[४] त्यानंतर निर्वाचन अधिकारी, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करील. अशी यादी योग्य असेल त्याप्रमाणे नमुना ७-अ मध्ये असेल व त्यात आडनावे असलेल्या उमेदवारांच्या आडनावांच्या संदर्भात आणि इतर उमेदवारांच्या नावांच्या संदर्भात, वर्णनानुसार त्यांची नावे व नामनिर्देशन पत्रामध्ये दिल्याप्रमाणेचा त्यांचा पत्ता असेल. उपरोक्त तपशील आणि वर्णानुक्रम, हा कलम ८१, खंड (१२) अन्वये नगरपालिका कार्यवृत्ते ठेवण्यासाठी ज्या भाषेचा वापर करील त्याच भाषेत असेल.

१७. उमेदवारी मागे घेणे – [१] कोणत्याही उमेदवारास –

(अ) नियम ४, पोट-नियम (१) चा खंड (क) अन्वये नियुक्त केलेल्या दिवशी किंवा त्यापूर्वी नियम १५ अन्वये कोणतेही अपील सादर करण्यात आले नसेल आणि

(ब) अशा अपिलाचा निर्णय ज्या तारखेस करण्यास येईल त्या तारखेनंतर तिसऱ्या दिवशी किंवा त्यापूर्वी अपील करण्यात आले असेल त्या बाबतीत त्याने स्वाक्षरी केलेली लेखी नोटीस निर्वाचन अधिकाऱ्याच्या स्वाधीन करून आपली उमेदवारी मागे घेता येईल.

[२] अशी नोटीस, उमेदवारी मागे घेण्यासाठी पोट-नियम (१) अन्वये निश्चित केलेल्या शेवटच्या दिवशी दुपारी ३ वाजण्यापूर्वी निर्वाचन अधिकाऱ्याच्या स्वाधीन करण्यात येईल.

[३] अशी नोटीस, उमेदवारास जातीने किंवा उमेदवाराने या बाबतीत लेखी प्राधिकृत केलेल्या, त्याचे नाव सुचविणाऱ्यास किंवा निवडणूक अभिकर्त्यास देता येईल

[४] जिने पोट-नियम (१) अन्वये आपली उमेदवारी मागे घेण्याबद्दलची. नोटीस दिली असेल अशा कोणत्याही व्यक्तीस नोटीस रद्द करण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

[५] निर्वाचन अधिकारी उमेदवारी मागे घेतल्याबद्दलच्या नोटिशीची सत्यता व पोट-नियम (१) अन्वये ती स्वाधीन करणाऱ्या व्यक्तीची ओळख याविषयी खात्री पटल्यानंतर, आपल्या कार्यालयातील सूचना-फलकावर नोटीस चिकटविण्याची व्यवस्था करील.

१८. निवडणूक प्रतिनिधीची नियुक्ती व अशी नियुक्ती रद्द करणे– [१] निवडणूक प्रतिनिधीची नियुक्ती करण्याची उमेदवाराची इच्छा असेल तर अशी नियुक्ती,

पोट-नियम (३) च्या उपबंधास अधीन राहून, योग्य असेल त्याप्रमाणे नमुना ८ मध्ये किंवा नमुना ८–अ मध्ये करण्यात येईल व तो नमुना नामनिर्देशन पत्र देण्याच्या वेळी किंवा निवडणुकीपूर्वी कोणत्याही वेळी निर्वाचन अधिकाऱ्याच्या स्वाधीन करता येईल.

[२] उमेदवाराने स्वाक्षरी केलेले लेखी निवेदन निर्वाचन अधिकाऱ्याच्या स्वाधीन करून अशा उमेदवारास, निवडणूक प्रतिनिधीची नियुक्ती, कोणत्याही वेळी, रद्द करता येईल. अशा रीतीने रद्द केलेली नियुक्ती ही ज्या तारखेस अशी नियुक्ती रद्द करण्यासंबंधीचे निवेदन निर्वाचन अधिकाऱ्याच्या स्वाधीन करण्यात आले असेल त्या तारखेपासून अमलात येईल. निवडणूक प्रतिनिधीची नियुक्ती अशा रीतीने रद्द करण्यात आली असेल किंवा निवडणुकीच्या मुदतीपूर्वी किंवा अशा मुदतीत निवडणूक प्रतिनिधी मरण पावला असेल त्या प्रसंगी, पोट-नियम (१) च्या उपबंधानुसार, उमेदवारास नवीन निवडणूक प्रतिनिधीची नियुक्ती करता येईल.

[३] नगरपालिकेच्या कोणत्याही निवडणुकीत निवडून येण्यासाठी जिला कलम २१, पोट-कलम (११) अन्वये त्या त्या वेळी अपात्र ठरविण्यात आले असेल अशा कोणत्याही व्यक्तीस, जोपर्यंत ती अपात्र राहण्याचे चालू असेल तोपर्यंत, निवडणूक प्रतिनिधी म्हणून नियुक्त करण्यात येणार नाही.

१९. मतदान प्रतिनिधीची नियुक्ती – [१] ज्या निवडणुकीत मतदान घेणे असेल अशा एखाद्या निवडणुकीसाठी, निवडणूक लढविणाऱ्या कोणत्याही उमेदवारास किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीस, प्रत्येक मतदानकेंद्रासाठी, अशा उमेदवाराचे मतदान प्रतिनिधी म्हणून एका प्रतिनिधीची व दोन साहाय्यकारी प्रतिनिधींची नियुक्ती करता येईल. अशी नियुक्ती, योग्य असेल त्याप्रमाणे नमुना ९ किंवा ९–अ मधील लेखी पत्राद्वारे करता येईल. अशा पत्राच्या दोन प्रती असतील व त्यावर उमेदवाराची किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीची सही असेल.

[२] उमेदवार किंवा त्याचा निवडणूक प्रतिनिधी अशा नियुक्ती पत्राची दुसरी प्रत मतदान प्रतिनिधीच्या स्वाधीन करील व मतदान प्रतिनिधी, मतदान घेण्यासाठी निश्चित केलेल्या तारखेस, अशी दुसरी प्रत मतदान केंद्राध्यक्षास सादर करील आणि त्याच्या समक्ष, अशा पत्रात समाविष्ट असलेल्या प्रतिज्ञा-पत्रकावर सही करील. मतदान केंद्राध्यक्ष त्यास सादर करण्यात आलेली दुसरी प्रत आपल्या अभिरक्षेत ठेवून घेईल. कोणत्याही मतदान प्रतिनिधीने त्या पोट-नियमांच्या उपबंधांचे पालन केले नसेल तर, त्यास मतदानकेंद्रात कोणतेही काम करण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

२०. मतमोजणी प्रतिनिधीची नियुक्ती – [१] निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवारास किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीस, नमुना ९ मधील पत्राद्वारे, अशा उमेदवारांचे मतमोजणी प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी चारहून अधिक असणार

नाहीत इतके प्रतिनिधी नियुक्त करता येतील. अशा पत्राच्या दोन प्रती असतील व त्यावर उमेदवाराने किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीने सही केलेली असेल. परंतु, अध्यक्षाच्या पदाच्या निवडणुकीच्या बाबतीत, निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवारास किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीस, संचालक याबाबतीत देईल अशा सामान्य किंवा विशेष निदेशांस अधीन राहून, उमेदवाराने किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीने सही केलेल्या नमुना ९-अ मधील लेखी पत्राद्वारे अशा उमेदवाराचे मतमोजणी प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी सोळापेक्षा अधिक नसतील इतक्या प्रतिनिधींची नेमणूक करता येईल.

[२] मतमोजणीस सुरुवात होण्यापूर्वी, उमेदवार किंवा त्याचा निवडणूक प्रतिनिधी, पोट-नियम (१) यात उल्लेखिलेले नेमणुकीसंबंधीचे पत्र, निर्वाचन अधिकाऱ्याकडे पाठवून अशा मतमोजणी प्रतिनिधीच्या नियुक्तीबाबत त्या निर्वाचन अधिकाऱ्यास नोटीस देईल.

[३] तसेच उमेदवार किंवा त्याचा निवडणूक प्रतिनिधी अशा नियुक्तीच्या पत्राची दुसरी प्रत मतमोजणी प्रतिनिधीच्या स्वाधीन करील आणि मतमोजणी प्रतिनिधी, मतमोजणीसाठी निश्चित केलेल्या तारखेस, अशी दुसरी प्रत निर्वाचन अधिकाऱ्यापुढे सादर करील व त्याच्या समक्ष अशा पत्रात समाविष्ट असलेल्या प्रतिज्ञा-पत्रकावर सही करील. निर्वाचन अधिकारी त्यास अशा रीतीने सादर करण्यात आलेली दुसरी प्रत आपल्या अभिरक्षेत ठेवील. कोणत्याही मतमोजणी प्रतिनिधीने या पोट-नियमाच्या उपबंधाचे पालन केले नसेल तर, त्यास मतमोजणी करण्यासाठी निश्चित केलेल्या ठिकाणी कोणतेही काम पार पाडण्याची परवानगी देण्यात येणार नाही.

२१. मतदान प्रतिनिधीची नियुक्ती रद्द करणे किंवा तो मरण पावणे – [१] उमेदवारास, त्याने सही करून सादर केलेल्या लेखी निवेदनाद्वारे, मतदानास सुरुवात होण्यापूर्वी कोणत्याही वेळी मतदान प्रतिनिधीची नियुक्ती रद्द करता येईल.

[२] (अ) मतदानास सुरुवात होण्यापूर्वी, सात दिवसांहून कमी नाही इतक्या अगोदर नियुक्ती रद्द करण्यात आली असेल त्या बाबतीत, असे निवेदन निर्वाचन अधिकाऱ्यापुढे सादर करण्यात येईल.

(ब) इतर कोणत्याही बाबतीत, असे निवेदन, निर्वाचन अधिकाऱ्याकडे किंवा ज्या मतदानकेंद्राच्या ठिकाणी काम करण्यासाठी अशा मतदान प्रतिनिधीची नियुक्ती करण्यात आली असेल त्या मतदानकेंद्राच्या केंद्राध्यक्षाकडे सादर करण्यात येईल.

[३] मतदान समाप्त होण्यापूर्वी एखाद्या उमेदवाराचा मतदान प्रतिनिधी मरण पावला तर –

(अ) मतदानास सुरुवात होण्यापूर्वी सात दिवसांहून कमी नसेल इतक्या अगोदर

असा मृत्यू घडून आला असेल त्या बाबतीत, उमेदवार किंवा त्याचा निवडणूक प्रतिनिधी त्याबाबत निर्वाचन अधिकाऱ्यास ताबडतोब लेखी कळवील, आणि

(ब) इतर कोणत्याही बाबतीत, उमेदवार किंवा त्याचा निवडणूक प्रतिनिधी अशा मृत्यूबाबत निर्वाचन अधिकाऱ्यास किंवा ज्या मतदानकेंद्राच्या ठिकाणी काम करण्यासाठी त्या मतदान प्रतिनिधीची नियुक्ती केली होती त्या मतदानकेंद्राच्या केंद्राध्यक्षास ताबडतोब लेखी कळवील.

[४] जेव्हा जेव्हा पोट-नियम (१) किंवा (२) अन्वये निर्वाचन अधिकाऱ्यास कोणतेही निवेदन किंवा प्रतिवृत्त मिळेल, तेव्हा तेव्हा तो असे निवेदन किंवा यथास्थिती प्रतिवृत्त ज्या मतदानकेंद्राच्या ठिकाणी काम करण्यासाठी अशा मतदान प्रतिनिधीची नेमणूक केली होती त्या मतदानकेंद्राच्या केंद्राध्यक्षाकडे ताबडतोब पाठवील.

[५] जेव्हा पोट-नियम (१) अन्वये एखाद्या मतदान प्रतिनिधीची नियुक्ती रद्द करण्यात आली असेल किंवा मतदान समाप्त होण्यापूर्वी अशा मतदान प्रतिनिधीचा मृत्यू झाला असेल तेव्हा, उमेदवारास किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीस मतदान बंद करण्यात येण्यापूर्वी कोणत्याही वेळी, नियम १९, पोट-नियम (१)च्या उपबंधानुसार एखाद्या नवीन मतदान प्रतिनिधीची नेमणूक करता येईल.

परंतु, नवीन मतदान प्रतिनिधीच्या नेमणुकीसंबंधी पाठवावयाचे नेमणूकपत्र हे–

(अ) अशी नेमणूक, मतदान घेण्यास सुरुवात होण्यापूर्वी सात दिवसांहून कमी नाही इतक्या अगोदर केली असेल त्या बाबतीत, निर्वाचन अधिकाऱ्यास देण्यात येईल, आणि

(ब) इतर कोणत्याही बाबतीत, ते निर्वाचन अधिकाऱ्यास किंवा ज्या मतदानकेंद्रावर काम करण्यास अशा नवीन मतदान प्रतिनिधीची नेमणूक केली असेल त्या मतदानकेंद्राच्या केंद्राध्यक्षास देण्यात येईल.

[६] नियम १९, पोट-नियम (२) चे उपबंध हे ज्याप्रमाणे नियम १९, पोट-नियम (१)अन्वये नेमलेल्या मतदान प्रतिनिधीच्या संबंधात लागू होतात त्याप्रमाणेच ते, पोट-नियम (५) अन्वये नेमलेल्या मतदान प्रतिनिधीच्या संबंधात लागू होतील.

२२. मतमोजणी प्रतिनिधीची नेमणूक रद्द करणे किंवा तो मरण पावणे – [१] मतमोजणीस प्रारंभ होण्यापूर्वी कोणत्याही वेळी उमेदवारास, त्याने सही केलेल्या लेखी प्रतिज्ञा-पत्रकाद्वारे, मतमोजणी प्रतिनिधीची नेमणूक रद्द करता येईल. असे प्रतिज्ञापत्र निर्वाचन अधिकाऱ्यास देण्यात येईल.

[२] जर मतमोजणी पूर्ण होण्यापूर्वी उमेदवाराचा मतमोजणी प्रतिनिधी मरण पावेल तर उमेदवार किंवा त्याचा निवडणूक प्रतिनिधी निर्वाचन अधिकाऱ्यास अशा मृत्यूबाबत ताबडतोब लेखी कळवील.

[३] पोट-नियम (१) अन्वये मतमोजणी प्रतिनिधीची नेमणूक रद्द करण्यात आली असेल किंवा मतमोजणी पूर्ण होण्यापूर्वी मतमोजणी प्रतिनिधी मरण पावला असेल तर, उमेदवारास किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीस नियम २०, पोट-नियम (१) मध्ये घालून दिलेल्या रीतीने नवीन मतमोजणी प्रतिनिधी नेमता येईल.

[४] नियम २०, पोट-नियम (२) व (३) चे उपबंध हे ज्याप्रमाणे नियम २०, पोट-नियम (१) अन्वये नेमलेल्या मतमोजणी प्रतिनिधीच्या संबंधात लागू होतात त्याप्रमाणे ते पोट-नियम (३) अन्वये नेमलेल्या मतमोजणी प्रतिनिधीच्या संबंधात लागू होतील.

२३. मतदानापूर्वी उमेदवार मरण पावणे – निवडणूक लढविणारा उमेदवार जर मरण पावला आणि त्याच्या मृत्यूचे वृत्त निर्वाचन अधिकाऱ्यास मतदानास प्रारंभ होण्यापूर्वी मिळाले तर, निर्वाचन अधिकारी, उमेदवाराच्या मृत्यूबाबत त्याची खात्री झाल्यानंतर, ज्या प्रभागाच्या निवडणुकीसाठी मृत व्यक्ती उमेदवार होती त्या प्रभागाच्या संबंधात किंवा यथास्थिती ज्या अध्यक्षाच्या पदाच्या निवडणुकीसाठी मृत व्यक्ती उमेदवार होती त्या निवडणुकीच्या संबंधात मतदानासंबंधी प्रत्यादेश देईल व ती गोष्ट जिल्हाधिकाऱ्याला कळवील आणि अशा प्रभागाच्या निवडणुकीच्या संबंधातील किंवा यथास्थिती अध्यक्षाच्या पदाच्या निवडणुकीच्या संबंधातील सर्व कामकाज सर्व बाबतीत, नवीन निवडणूक असल्याप्रमाणे नव्याने सुरू करण्यात येईल.

परंतु –

[१] मतदानासंबंधी प्रत्यादेश देण्याच्या वेळी जी व्यक्ती विधिग्राह्य रीतीने नामनिर्देशित केलेली उमेदवार होती अशा व्यक्तीच्या बाबतीत आणखी नाम-निर्देशनाची आवश्यकता असणार नाही; आणि

[२] मतदानासंबंधी प्रत्यादेश देण्यापूर्वी जिने नियम १७ अन्वये आपली उमेदवारी मागे घेतल्याबद्दलची नोटीस दिली असेल अशी कोणतीही व्यक्ती, मतदानासंबंधी असा प्रत्यादेश दिल्यानंतर, निवडणुकीकरिता उमेदवार म्हणून नाम-निर्दिष्ट केली जाण्यास अपात्र असणार नाही.

२४. बिनविरोध निवडणूक – [१] कोणत्याही प्रभागात किंवा यथास्थिती अध्यक्षाच्या पदाच्या निवडणुकीसाठी एकाच उमेदवाराने नामनिर्देशन पत्र भरले असेल व त्याचे नामनिर्देशन पत्र स्वीकारण्यात आले असेल तर, निर्वाचन अधिकारी असा उमेदवार योग्यरीत्या निवडून आल्याचे ताबडतोब जाहीर करील.

[२] कोणत्याही प्रभागात किंवा यथास्थिती अध्यक्षाच्या पदाच्या निवडणुकी-साठी अनेक नामनिर्देशन पत्रांपैकी फक्त एकच नामनिर्देशन पत्र स्वीकारण्यात आले असेल व नियम १५ अन्वये कोणतेही अपील दाखल करण्यात आले नसेल किंवा अशा रीतीने दाखल केलेले अपील किंवा दाखल केलेली अपिले योग्यरीत्या फेटाळण्यात आली असतील तर, निर्वाचन अधिकारी, ज्या उमेदवाराचे नामनिर्देशन

पत्र स्वीकारले असेल असा उमेदवार योग्यरीत्या निवडून आल्याचे जाहीर करील.

२५. लढविलेल्या निवडणुका – नियम २४ मध्ये अंतर्भाव होणाऱ्या बाबींव्यतिरिक्त इतर बाबतींत मतदान घेण्यात येईल.

२६. निवडणुकीतील मतनोंदणीची रीत – लढविलेल्या प्रत्येक निवडणुकीत, यात यापुढे दिलेल्या रीतीने, गुप्त मतदान पद्धतीने, मते देण्यात येतील.

२७. मतपेटी – प्रत्येक मतपेटी ही, जिल्हाधिकारी मान्य करील अशा नमुन्याची व रंगाची असेल. तिची बांधणी अशी असेल की, तिच्यामध्ये मतपत्रिका घालता येतील परंतु तिचे कुलूप उघडल्याशिवाय व मोहोर तोडल्याशिवाय तिच्यामधून त्या बाहेर काढता येणार नाहीत.

२८. मतपत्रिका – [१] प्रत्येक मतपत्रिका योग्य असेल त्याप्रमाणे नमुना १० मध्ये किंवा नमुना १०-अ मध्ये असेल.

[२] नियम १६ अन्वये प्रसिद्ध करण्यात आलेल्या, निवडणुकीतील (निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या यादीत) उमेदवारांची नावे ज्या क्रमाने असतील त्याच क्रमाने ती मतपत्रिकेवर दाखविण्यात येतील.

[३] जर दोन किंवा अधिक उमेदवार एकच नाव धारण करीत असतील तर त्यांचा व्यवसाय किंवा राहण्याचे ठिकाण लिहून किंवा इतर कोणत्याही रीतीने त्यांच्यात फरक करण्यात येईल.

२९. मतदानकेंद्रावरील व्यवस्था – [१] प्रत्येक मतदानकेंद्राच्या बाहेर प्रामुख्याने दिसतील अशा प्रकारे खालील गोष्टी प्रदर्शित करण्यात येतील :–

(अ) ज्या मतदान क्षेत्रातील मतदारांना त्या मतदानकेंद्रात आणि अशा मतदानकेंद्रात एकाहून अधिक मतदान मंडप (बूथ) असतील तर, अशा मतदान मंडपांपैकी प्रत्येक मतदान मंडपात मत देण्याचा अधिकार असेल ते मतदान क्षेत्र आणि अशा कोणत्याही मतदान मंडपांसाठी वाटून देण्यात आलेल्या मतदारांचे वर्णन निर्दिष्ट करणारी एक नोटीस; आणि

(ब) नियम १६ अन्वये प्रसिद्ध केलेल्या निवडणुकीतील (निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या यादीत) अशा उमदवारांची नावे ज्या भाषेत किंवा ज्या भाषांमध्ये व ज्या क्रमाने आढळून येत असतील त्याच भाषेतील किंवा भाषांमधील व त्याच क्रमाने, प्रत्येक उमेदवाराचे नाव आणि त्याबरोबरच त्या नियमान्वये अशा प्रत्येक उमेदवाराला नेमून देण्यात आलेल्या चिन्हाचे वर्णन असणारी दुसरी नोटीस.

[२] निर्वाचन अधिकारी प्रत्येक मतदानकेंद्रात ज्या ठिकाणी मतदार दृष्टिआड राहून आपली मते नोंदवू शकतील अशा एक किंवा अनेक कक्षांची (ज्याचा या नियमात "मतदान कक्ष" असा निर्देश केला आहे) तरतूद करण्याची व्यवस्था करील.

[३] निर्वाचन अधिकारी प्रत्येक मतदानकेंद्रात पुरेशा मतपेटचा, मतपत्रिका, ज्या मतदान क्षेत्रातील किंवा क्षेत्रांमधील मतदारास अशा मतदानकेंद्रात मत देण्याचा अधिकार असेल त्या मतदान क्षेत्राच्या किंवा क्षेत्रांच्या मतदारांच्या यादीच्या प्रती, मतपत्रिकांवर अधिकृत ठसा उमटविण्यासाठी साधने आणि मतदारांना मतपत्रिकेवर खूण करण्यासाठी आवश्यक असलेल्या वस्तू पुरवील. तसेच निर्वाचन अधिकारी अशा मतदानकेंद्रात मतदान घेण्यासाठी आवश्यक असतील अशी इतर साधने व सामग्री-देखील प्रत्येक मतदानकेंद्रास पुरवील.

३०. मतदानकेंद्रात प्रवेश – मतदान केंद्राध्यक्ष कोणत्याही एका वेळी मतदान-केंद्रात प्रवेश द्यावयाच्या मतदारांची संख्या नियमित करील आणि त्यात खालील व्यक्तींखेरीज इतर कोणत्याही व्यक्तींना प्रवेश देणार नाही –

(अ) मतदान अधिकारी;
(ब) निवडणुकीच्या संबंधात कामावर हजर असलेले लोकसेवक;
(क) जिल्हाधिकाऱ्याने किंवा निर्वाचन अधिकाऱ्याने प्राधिकृत केलेली व्यक्ती;
(ड) उमेदवार, त्यांचे निवडणूक प्रतिनिधी व नियम १९ च्या उपबंधांना अधीन राहून प्रत्येक उमेदवाराचा एक मतदान प्रतिनिधी;
(ई) मतदाराच्या सोबत असलेले कडेवरील मूल;
(फ) जो मदतीशिवाय हालचाल करू शकत नाही अशा आंधळचा किंवा अपंग मतदारासोबत असलेली एक व्यक्ती; आणि
(ग) मतदारास ओळखण्याकरिता निर्वाचन अधिकारी किंवा मतदान केंद्राध्यक्ष कामावर लावील अशी इतर व्यक्ती.

३१. मतदानासाठी मतपेटचा तयार करणे – [१] मतपेटचा सुरक्षित करण्या-करिता जेव्हा कागदी मोहोर उपयोगात आणली असेल तेव्हा मतदान केंद्राध्यक्ष त्या प्रयोजनार्थ ठेवलेल्या जागेत त्या कारणासाठी तरतूद केलेली कागदी मोहोर लावील. तसेच तो अशा कागदी मोहोरेवर आपली सही करील व उमेदवारांपैकी किंवा अशा उमेदवारांच्या निवडणूक किंवा मतदान प्रतिनिधींपैकी जे तेथे हजर असतील व ज्यांना त्यांच्या सह्या करण्याची इच्छा असेल अशा उमेदवारांची किंवा त्यांच्या निवडणूक किंवा मतदान प्रतिनिधींची त्यावर सही घेईल. त्यानंतर मतपत्रिका मतपेटीत टाकण्यासाठी असलेली फट उघडी राहील अशा रीतीने ती मतपेटी सुरक्षित व मोहोरबंद करील.

[२] मतपेटी सुरक्षित करण्यासाठी कागदी मोहोर वापरण्याची आवश्यकता नसेल तेव्हा, मतपेटीत मतपत्रिका टाकण्यासाठी फट उघडी राहील अशा रीतीने मतदान केंद्राध्यक्ष मतपेटी सुरक्षित व मोहोरबंद करील आणि हजर असलेल्या उमेदवारांची किंवा त्यांच्या निवडणूक किंवा मतदान प्रतिनिधींची तशी इच्छा असेल तर अशा पेटीतील जागेवर त्यांना आपली मोहोर लावण्याची परवानगी देईल.

[३] मतदानकेंद्रात वापरण्यात येणाऱ्या प्रत्येक मतपेटीला आतील व बाहेरील दोन्ही बाजूंना पुढील गोष्टी नमूद केलेली खूण चिठ्ठी लावण्यात येईल –

(अ) प्रभागाचा अनुक्रमांक कोणताही असल्यास व त्याचे नाव;

(ब) मतदानकेंद्राचा अनुक्रमांक व नाव;

(क) मतपेटीचा अनुक्रमांक (हा मतदानाच्या शेवटी मतपेटीच्या फक्त बाहेरील खूण चिठ्ठीवर भरावयाचा); आणि

(ड) मतदानाची तारीख.

[४] मतदानास प्रारंभ होण्याच्या लगतपूर्वी, मतदान केंद्राध्यक्ष, अशा केंद्रामध्ये उपस्थित असतील अशा उमेदवारांना, त्यांच्या निवडणूक प्रतिनिधींना किंवा मतदान प्रतिनिधींना आणि उपस्थित असलेल्या इतर सर्व व्यक्तींना मतपेटी रिकामी असल्याचे व पोट-नियम (३)मध्ये उल्लेख केलेली खूण चिठ्ठी त्यावर लावली असल्याचे दाखवील.

[५] त्यानंतर मतपेटी बंद, मोहोरबंद व सुरक्षित करण्यात येईल आणि ती मतदान केंद्राध्यक्ष व मतदान प्रतिनिधी यांच्या पूर्णपणे दृष्टीसमोर राहील अशा ठिकाणी ठेवण्यात येईल.

३२. स्त्री मतदारासाठी सोयी – [१] जेव्हा एखादे मतदानकेंद्र स्त्रिया व पुरुष या दोन्ही मतदारांकरिता असेल तेव्हा त्यामध्ये त्यांना वेगवेगळ्या गटांनी आळी-पाळीने प्रवेश देण्यासंबंधी मतदान केंद्राध्यक्षास निर्देश देता येईल.

[२] निर्वाचन अधिकाऱ्यास किंवा मतदान केंद्राध्यक्षास एखाद्या मतदानकेंद्रात स्त्री मतदारांना साहाय्य करण्यासाठी व तसेच सर्वसाधारणपणे स्त्री मतदारांच्या संबंधातील मतदान घेण्यासाठी मतदान केंद्राध्यक्षास साहाय्य करण्यासाठी आणि विशेषतः तशी आवश्यकता निर्माण झाल्यास कोणत्याही स्त्री मतदाराची झडती घेण्यात मदत करण्यासाठी मदतनीस म्हणून काम करण्यास एखाद्या स्त्रीची नेमणूक करता येईल.

३३. मतदारांची ओळख पटविणे – [१] मतदान केंद्राध्यक्षास, मतदानकेंद्रात मतदारांची ओळख पटविण्याच्या कामात मदत करण्यासाठी किंवा मतदान घेण्यात त्यास इतर प्रकारे साहाय्य करण्यासाठी त्यास योग्य वाटतील अशा व्यक्ती कामावर लावता येतील.

[२] ज्या वेळी मतदानकेंद्रात मतदार प्रवेश करील त्या वेळी मतदान केंद्राध्यक्ष किंवा या बाबतीत त्याने प्राधिकृत केलेला मतदान अधिकारी त्या मतदाराचे नाव व इतर तपशील, मतदारांच्या यादीतील संबंधित नोंदीशी ताडून पाहील व त्यानंतर त्या मतदाराचा अनुक्रमांक, नाव व इतर तपशील पुकारील.

[३] मतपत्रिका मिळण्याचा एखाद्या व्यक्तीचा हक्क ठरविताना मतदान केंद्राध्यक्ष किंवा यथास्थिती मतदान अधिकारी ज्याच्यासंबंधी एखादी नोंद केलेली

आहे तो मतदार म्हणजेच ही व्यक्ती होय अशी त्याची खात्री झाली असल्यास, मतदाराच्या यादीतील अशा नोंदीमधील केवळ लेखनदोषाकडे किंवा छपाईच्या चुकांकडे दुर्लक्ष करील.

३४. ओळखीबाबत आक्षेप घेणे – [१] आपण अमूक एक मतदार आहोत असा दावा सांगणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या ओळखीबाबत, कोणत्याही उमेदवारास, निवडणूक प्रतिनिधीस किंवा मतदान प्रतिनिधीस, प्रत्यक्ष आक्षेपाबद्दल दोन रुपयांची रोख रक्कम मतदान केंद्राध्यक्षाकडे प्रथम अनामत ठेवून, आक्षेप घेता येईल.

[२] अशा प्रकारे रक्कम अनामत ठेवल्यानंतर मतदान केंद्राध्यक्ष –

(अ) जिच्यासंबंधी आक्षेप घेण्यात आला आहे अशा व्यक्तीस तोतयेगिरीबद्दल होणाऱ्या शिक्षेसंबंधी ताकीद देईल;

(ब) मतदारांच्या यादीतील संबंधित नोंद पूर्णपणे वाचून दाखवील व त्या नोंदीत उल्लेखिलेली व्यक्ती तीच आहे काय असे तिला विचारील;

(क) योग्य असेल त्याप्रमाणे नमुना ११ मधील किंवा नमुना ११–अ मधील आक्षेपित मतांच्या यादीत तिचे नाव व पत्ता नमूद करील;
आणि

(ड) उक्त यादीत तिला तिची सही करण्यास भाग पाडील.

[३] त्यानंतर मतदान केंद्राध्यक्ष अशा आक्षेपाबद्दल संक्षिप्त चौकशी करील व त्यास त्या कारणाकरिता :–

(अ) आक्षेप घेणाऱ्या व्यक्तीस आपला आक्षेप सिद्ध करण्यासाठी पुरावा दाखल करण्यास व जिच्यासंबंधी आक्षेप घेण्यात आला असेल त्या व्यक्तीस आपली ओळख पटविण्यास पुरावा दाखल करण्यास भाग पाडता येईल;

(ब) जिच्यासंबंधी आक्षेप घेण्यात आला असेल त्या व्यक्तीस तिची ओळख पटवून घेण्यासाठी आवश्यक असे कोणतेही प्रश्न विचारण्यात येतील व शपथेवर त्यांची उत्तरे देण्यास तिला भाग पाडता येईल; व

(क) जिच्यासंबंधी आक्षेप घेण्यात आला असेल त्या व्यक्तीस व साक्षीपुरावा देण्यास पुढे येणाऱ्या कोणत्याही इतर व्यक्तीस शपथ देवविता येईल.

[४] चौकशी केल्यानंतर आक्षेप सिद्ध झाला नाही असे मतदान केंद्राध्यक्षास वाटले तर, तो आक्षेप घेण्यात आलेल्या व्यक्तीस मत देण्याची परवानगी देईल; आणि आक्षेप सिद्ध झाला आहे असे त्यास वाटले तर तो, जिच्यासंबंधी आक्षेप घेण्यात आला असेल त्या व्यक्तीस मत देण्यास प्रतिबंध करील.

[५] घेण्यात आलेला आक्षेप हा निष्कारण घेण्यात आला आहे किंवा तो सद्भावनापूर्वक घेतलेला नाही असे मतदान केंद्राध्यक्षाचे मत असेल तर, तो पोट-नियम (१) अन्वये ठेवलेली अनामत रक्कम नगरपालिकेकडे जमा करण्याचा

निदेश देईल आणि इतर कोणत्याही बाबतीत चौकशी संपल्यानंतर तो ती रक्कम आक्षेप घेणाऱ्या व्यक्तीस परत करील.

३५. तोतयेगिरीविरुद्ध संरक्षक उपाययोजना – [१] मतदारांच्या तोतयेगिरीस प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने ज्या मतदाराची ओळख पटल्याबद्दल मतदान केंद्राध्यक्षाची किंवा यथास्थिती मतदान अधिकाऱ्याची खात्री झाली असेल असा प्रत्येक मतदार, आपली डावी तर्जनी मतदान केंद्राध्यक्षास किंवा मतदान अधिकाऱ्यास तपासू देईल आणि तीवर पक्क्या शाईची खूण करू देईल.

[२] जर कोणताही मतदार पोट-नियम (१) अनुसार आपली डावी तर्जनी तपासू देण्यास किंवा तीवर खूण करू देण्यास नकार देईल किंवा त्याच्या डाव्या तर्जनीवर अशी खूण अगोदरच करण्यात आलेली असेल किंवा ती शाईची खूण नाहीशी करण्याच्या उद्देशाने तो कोणतीही गोष्ट करील तर त्यास कोणतीही मतपत्रिका दिली जाणार नाही किंवा मत देण्यास परवानगी दिली जाणार नाही.

[३] मतदाराच्या डाव्या तर्जनीसंबंधीचा या नियमातील कोणताही निर्देश हा जर मतदाराला डावी तर्जनी नसेल तर त्या बाबतीत त्याच्या डाव्या हाताच्या इतर कोणत्याही बोटासंबंधीचा निर्देश आहे असे समजले जाईल आणि त्यास डाव्या हाताची सर्वच बोटे नसतील त्या बाबतीत, तो त्याच्या उजव्या हाताच्या तर्जनीसंबंधीचा किंवा इतर कोणत्याही बोटासंबंधीचा निर्देश आहे असे समजले जाईल आणि त्यास दोन्ही हाताची बोटे नसतील त्या बाबतीत त्याच्या असलेल्या डाव्या किंवा उजव्या बाहूच्या अग्रभागासंबंधीचा निर्देश आहे असे समजले जाईल.

३६. मतपत्रिका देणे – [१] मतदानास सुरुवात होण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेपूर्वी कोणत्याही मतदारास मतपत्रिका देण्यात येणार नाही.

[२] मतदान बंद होण्याच्या वेळी मतदानकेंद्रावर जे मतदार हजर असतील अशा मतदारांव्यतिरिक्त इतर कोणत्याही मतदारास मतदान बंद करण्याकरिता निश्चित केलेल्या वेळेनंतर कोणतीही मतपत्रिका देण्यात येणार नाही. (हजर असतील) अशा मतदारांना मतदानाची वेळ संपल्यानंतरही मत नोंदण्यास परवानगी देण्यात येईल.

[३] मतदारास मतपत्रिका देण्यापूर्वी, अशा प्रत्येक मतपत्रिकेवर जिल्हाधिकारी निर्देश देईल असा विशिष्ट खुणेचा ठसा उठविण्यात येईल.

[४] मतदारास मतपत्रिका देतेवेळी, मतदान अधिकारी तिचा अनुक्रमांक तो नोंदविण्यासाठी वेगळचा ठेवलेल्या मतदारांच्या यादीच्या प्रतीमधील मतदारासंबंधीच्या नोंदीसमोर नमूद करील.

[५] पोट-नियम (४) मध्ये जी तरतूद केली असेल ती खेरीजकरून, मतदानकेंद्रामधील कोणतीही व्यक्ती विशिष्ट मतदाराला दिलेल्या मतपत्रिकेचा अनुक्रमांक टिपून घेणार नाही.

३७. मतदानाची कार्यपद्धती – [१] मतपत्रिका मिळाल्यानंतर, मतदार ताबडतोब –

(अ) मतदान कक्षांपैकी एका कक्षात जाईल;

(ब) तेथे मतपत्रिकेवर, त्याला ज्या उमेदवारास मत देण्याची इच्छा असेल त्या उमेदवाराच्या निशाणीवर किंवा निशाणीजवळ, त्या कारणाकरिता पुरविण्यात आलेल्या साधनाने खूण करील;

(क) आपले मत गुप्त राखण्यासाठी मतपत्रिकेची घडी करील;

(ड) आवश्यक वाटल्यास, मतपत्रिकेवरील विशिष्ट खूण मतदान केंद्राध्यक्षास दाखवील;

(ई) घडी केलेली मतपत्रिका मतपेटीत टाकील; आणि

(फ) मतदानकेंद्रातून निघून जाईल.

[२] प्रत्येक मतदार, निष्कारण विलंब न लावता मतदान करील.

[३] दुसरा मतदार मतदान कक्षामध्ये असताना कोणत्याही मतदारास तेथे प्रवेश देण्यात येणार नाही.

३८. अंध किंवा अपंग मतदाराची मतनोंदणी – [१] अंधत्वामुळे किंवा इतर शारीरिक अपंगत्वामुळे एखादा मतदार मतपत्रिकेवरील निशाणी ओळखण्यास किंवा तीवर खूण करण्यास असमर्थ असेल तर, मतदान केंद्राध्यक्ष मतदाराच्या इच्छेनुसार, मतपत्रिकेवर मत नोंदवील व मत गुप्त राखण्यासाठी मतपत्रिकेची घडी करून ती मतपेटीत टाकील.

[२] या नियमान्वये काम करताना मतदान केंद्राध्यक्ष शक्य असेल तेवढी गुप्तता राखील. अशा प्रत्येक प्रसंगाची तो थोडक्यात नोंद ठेवील, परंतु कोणतेही मत कोणत्या रीतीने देण्यात आले हे तिच्यात सूचित करणार नाही.

३९. खराब झालेल्या व परत केलेल्या मतपत्रिका – [१] ज्या कोणत्याही मतदाराने अनावधानाने आपली मतपत्रिका अशा रीतीने वापरली असेल की, मतपत्रिका म्हणून तिचा सोयीस्कर रीतीने वापर करणे शक्य नसेल तर त्या मतदाराने ती मतपत्रिका केंद्राध्यक्षाकडे परत केल्यावर व आपल्या अनावधानामुळे ही गोष्ट घडली अशी त्याची खात्री पटविल्यावर, त्याला दुसरी मतपत्रिका देता येईल, आणि अशा रीतीने परत केलेल्या मतपत्रिकेवर " खराब झालेली–रद्द केलेली " असा शेरा मतदान केंद्राध्यक्ष लिहील.

[२] मतपत्रिका मिळाल्यानंतर एखाद्या मतदाराने तिचा उपयोग न करण्याचे ठरविले तर तो ती मतदान केंद्राध्यक्षाकडे परत करील, आणि अशा रीतीने परत केलेल्या मतपत्रिकेवर " परत केलेली–रद्द केलेली " असा शेरा मतदान केंद्राध्यक्ष लिहील.

[३] पोट-नियम (१) किंवा पोट-नियम (२) अन्वये रद्द केलेल्या सर्व

मतपत्रिका, एका वेगळ्या पाकिटात ठेवण्यात येतील.

४०. प्रदत्त मते – [१] आपण अमुक एक विशिष्ट मतदार आहोत असे सांगून एखादी व्यक्ती मतदान करून गेल्यावर जर आणखी एक व्यक्ती आपणच तो अमुक एक विशिष्ट मतदार आहोत असे सांगून मतपत्रिकेची मागणी करील तर, मतदान केंद्राध्यक्षाने, तिची ओळख पटविण्याबद्दल विचारलेल्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे दिल्यानंतर, तिला या नियमांच्या पुढील उपबंधास अधीन राहून इतर कोणत्याही मतदाराप्रमाणे त्याच रीतीने (याच नियमात यापुढे "प्रदत्त मतपत्रिका" असा उल्लेख केलेल्या) मतपत्रिकेवर खूण करण्याचा हक्क असेल.

[२] अशी प्रत्येक व्यक्ती प्रदत्त मतपत्रिका तिला देण्यात येण्यापूर्वी, योग्य असेल त्याप्रमाणे नमुना १२ मधील किंवा नमुना १२-अ मधील यादीतील तिच्या संबंधीच्या नोंदीसमोर आपल्या नावाची सही करील.

[३] प्रदत्त मतपत्रिका ही मतदानकेंद्रावर वापरण्यात येणाऱ्या इतर मतपत्रिकांसारखीच असेल, मात्र–

(अ) ती मतदानकेंद्रावर वापरण्याकरिता देण्यात आलेल्या मतपत्रिकांच्या गठ्ठ्यातील अनुक्रमानुसार शेवटची मतपत्रिका असेल, आणि

(ब) तिच्या मागील बाजूवर "प्रदत्त मतपत्रिका" अशा शब्दात मतदान केंद्राध्यक्षाने स्वत:च्या हस्ताक्षरात पृष्ठांकन करून आपली सही केलेली असेल.

[४] मतदान कक्षात प्रदत्त मतपत्रिकेवर खूण केल्यानंतर व तिची घडी केल्यानंतर मतदार ती मतपेटीत न टाकता मतदान केंद्राध्यक्षाकडे देईल. मतदान केंद्राध्यक्ष ती मतपत्रिका त्या कारणाकरिता खास राखून ठेवलेल्या एका पाकिटात ठेवील.

४१. मतदान बंद करणे – [१] नियम ४ अन्वये, त्या बाबतीत ठरविण्यात आलेल्या वेळी मतदान केंद्राध्यक्ष मतदानकेंद्र बंद करील व त्यानंतर तो कोणत्याही मतदारास मतदानकेंद्रात प्रवेश देणार नाही.

परंतु, मतदानकेंद्र बंद होण्यापूर्वी तेथे हजर असलेल्या सर्व मतदारांना आपली मते देण्यास परवानगी देण्यात येईल.

[२] मतदानकेंद्र बंद होण्यापूर्वी एखादा मतदार तेथे हजर होता किंवा कसे असा कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास मतदान केंद्राध्यक्ष त्याबाबत निर्णय देईल, आणि त्याचा निर्णय अंतिम असेल.

४२. मतदानानंतर मतपेटचा मोहोरबंद करणे – [१] मतदान बंद झाल्याबरोबर व्यवहार्य असेल तितक्या लवकर केंद्राध्यक्ष, कोणत्याही उमेदवारांच्या किंवा त्यांच्या निवडणूक किंवा मतदान प्रतिनिधींच्या समक्ष, ते हजर असतील तर मतपेटीची फट बंद करील आणि फट बंद करण्याकरिता मतपेटीला कोणतीही यांत्रिक कळ नसेल त्या बाबतीत तो ती फट मोहोरबंद करील व हजर असलेल्या

कोणत्याही मतदान प्रतिनिधीस देखील त्याची मोहोर लावण्यात परवानगी देईल.

[२] त्यानंतर मतपेटी मोहोरबंद करून ती सुरक्षित करण्यात येईल.

[३] पहिली मतपेटी भरल्यामुळे जेव्हा दुसऱ्या मतपेटीचा उपयोग करणे आवश्यक होईल त्या बाबतीत दुसऱ्या मतपेटीचा उपयोग करण्यापूर्वी पोट नियम (१) व (२) यांत तरतूद केल्याप्रमाणे पहिली मतपेटी बंद करून मोहोरबंद व सुरक्षित करण्यात येईल.

४३. मतपत्रिकांचा हिशेब – मतदान संपल्यावर, मतदान केंद्राध्यक्ष योग्य असेल त्याप्रमाणे नमुना १३ मध्ये किंवा नमुना १३–अ मध्ये मतपत्रिकांचा हिशेब तयार करील व तो एका वेगळ्या पाकिटात ठेवून त्यावर 'मतपत्रिकांचा हिशेब' हे शब्द लिहील.

४४. इतर पाकिटे मोहोरबंद करणे – [१] मतदान केंद्राध्यक्ष त्यानंतर पुढील गोष्टींची निरनिराळी पाकिटे तयार करील :–

(अ) मतदारांच्या यादीची खुणा केलेली प्रत;

(ब) न वापरलेल्या मतपत्रिका;

(क) रद्द केलेल्या मतपत्रिका;

(ड) प्रदत्त मतपत्रिका असलेले पाकीट व प्रदत्त मतपत्रिकांची यादी;

(ई) आक्षेपित मतांची यादी; आणि

(फ) निर्वाचन अधिकाऱ्याच्या निदेशानुसार मोहोरबंद पाकिटात ठेवावयाची इतर कोणतीही कागदपत्रे.

[२] असे प्रत्येक पाकीट मतदान केंद्राध्यक्षाची आणि हजर असलेल्या मतदान प्रतिनिधींपैकी ज्यांची त्यावर आपली मोहोर लावण्याची इच्छा असेल त्यांची मोहोर लावून मोहोरबंद करण्यात येईल.

४५. मतपेट्या, पाकिटे इत्यादी निर्वाचन अधिकाऱ्याकडे पाठविणे – [१] त्यानंतर मतदान केंद्राध्यक्ष निर्वाचन अधिकारी निदेश देईल अशा ठिकाणी पुढील वस्तू निर्वाचन अधिकाऱ्याच्या स्वाधीन करील किंवा स्वाधीन करण्याची व्यवस्था करील :–

(अ) मतपेट्या;

(ब) मतपत्रिकांचा हिशेब;

(क) नियम ४४ मध्ये उल्लेखिलेली मोहोरबंद केलेली पाकिटे; आणि

(ड) मतदानाच्या वेळी वापरलेली इतर सर्व कागदपत्रे.

[२] मतमोजणी सुरू होईपर्यंत निर्वाचन अधिकारी सर्व मतपेट्या, पाकिटे व इतर कागदपत्रे यांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी व त्यांच्या सुरक्षित अभिरक्षेसाठी पुरेशी व्यवस्था करील.

४६. आणीबाणीच्या परिस्थितीत मतदान तहकूब करणे – [१] एखाद्या निवड-

णुकीच्या वेळी कोणत्याही मतदानकेंद्रावरील मतदानाच्या कामकाजात कोणत्याही दंग्यामुळे किंवा उघड हिंसात्मक कृत्यांमुळे व्यत्यय किंवा अडथळा आल्यास किंवा एखाद्या निवडणुकीच्या वेळी, कोणत्याही नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा इतर कोणत्याही पुरेशा कारणामुळे कोणत्याही मतदानकेंद्रात मतदान घेणे शक्य न झाल्यास, निर्वाचन अधिकारी किंवा अशा मतदानकेंद्राचा मतदान केंद्राध्यक्ष, नंतर ठरविण्यात येईल अशा तारखेपर्यंत मतदान तहकूब करण्यात आल्याचे जाहीर करील आणि मतदान केंद्राध्यक्षाने अशा रीतीने मतदान तहकूब केले असेल तर तो संबंधित निर्वाचन अधिकाऱ्यास त्याबाबत ताबडतोब कळवील.

[२] पोट-नियम (१) अन्वये जेव्हा मतदान तहकूब करण्यात येईल तेव्हा, निर्वाचन अधिकारी ती परिस्थिती जिल्हाधिकाऱ्यास ताबडतोब कळवील आणि जिल्हाधिकारी शक्य तितक्या लवकर ज्या दिवशी मतदान पुन्हा सुरू होईल तो दिवस ठरवील आणि मतदान कोणत्या मतदानकेंद्रात व कोणत्या वेळांच्या दरम्यान घेण्यात येईल ते ठरवील. अशा रीतीने तहकूब करण्यात आलेले मतदान पूर्ण होईपर्यंत, निर्वाचन अधिकारी अशा निवडणुकीतील मतांची मोजणी करणार नाही.

[३] वर सांगितलेल्या प्रत्येक बाबतीत, जिल्हाधिकारी पोट-नियम (२) अन्वये ठरविलेली मतदानाची तारीख, ठिकाण व वेळ, नियम ४ मध्ये नमूद केलेल्या रीतीने प्रसिद्ध करील आणि मूळ मतदानास लागू असलेले या नियमाचे उपबंध योग्य त्या फेरफारांसह, या नियमान्वये घेतलेल्या नवीन मतदानासही लागू होतील.

४७. मतदान तहकूब केल्यानंतरची कार्यपद्धती – [१] नियम ४६ अन्वये एखाद्या मतदानकेंद्रातील मतदान तहकूब झाले असेल तर, नियम ४ अन्वये त्या बाबतीत ठरविलेल्या वेळी मतदान बंद झाले होते असे समजून, नियम ४२ ते ४५ (दोन्ही धरून) यांचे उपबंध, व्यवहार्य असेल तेथवर लागू होतील.

[२] तहकूब केलेले मतदान नियम ४६, पोट-नियम (२) अन्वये पुन्हा सुरू होईल तेव्हा, अशा रीतीने तहकूब करण्यात आलेल्या मतदानात ज्यांनी अगोदर मतदान केले असेल अशा मतदारांना पुन्हा मतदान करण्याची परवानगी देण्यात येणार नाही.

[३] ज्या मतदानकेंद्रात असे तहकूब केलेले मतदान घेण्यात येईल त्या मतदान केंद्राच्या मतदान केंद्राध्यक्षास निर्वाचन अधिकारी मतदारांच्या यादीची खुणा केलेली प्रत असलेले मोहोरबंद पाकीट व एक नवीन मतपेटी पुरवील.

[४] मतदान केंद्राध्यक्ष मोहोरबंद पाकीट, हजर असलेल्या मतदान प्रतिनिधींच्या समक्ष उघडील आणि तहकूब केलेल्या मतदानाच्या वेळी मतदारांना दिलेल्या मत-पत्रिकांचे अनुक्रमांक नमूद करण्यासाठी खुणा केलेली मतदारांच्या यादीची प्रत वापरील.

[५] नियम २६ ते ४५ (दोन्ही धरून) यांचे उपबंध हे ज्याप्रमाणे अशा

रीतीने मतदान तहकूब करण्यापूर्वीच्या मतदानाच्या संबंधात लागू होतात त्याप्रमाणेच ते तहकूब केलेले मतदान पुन्हा घेण्याच्या संबंधात लागू होतील.

४८. मतपेट्यांचा नाश इत्यादी झाल्याच्या बाबतीत नव्याने मतदान घेणे – [१] कोणत्याही निवडणुकीत जर –

(अ) एखाद्या मतदानकेंद्रावर वापरण्यात आलेली कोणतीही मतपेटी मतदान केंद्राध्यक्षांच्या किंवा निर्वाचन अधिकाऱ्याच्या ताब्यातून बेकायदेशीरपणे काढून घेण्यात आली, किंवा ती अपघाताने किंवा हेतूपूर्वक नष्ट करण्यात आली किंवा गहाळ झाली, किंवा मतदानकेंद्रावरील मतदानाचा निकाल निश्चित ठरविणे अशक्य होईल इतक्या प्रमाणात तिची नासधूस करण्यात आली किंवा तिच्यात ढवळाढवळ करण्यात आली, किंवा

(ब) मतदानकेंद्रावरील कार्यपद्धतीत, जिच्यामुळे मतदानावर अनिष्ट परिणाम होण्याची शक्यता असेल अशी कोणतीही चूक किंवा नियमबाह्य गोष्ट घडली असेल तर, निर्वाचन अधिकारी ती गोष्ट ताबडतोब जिल्हाधिकाऱ्यास कळवील.

[२] त्यानंतर, जिल्हाधिकारी सर्व महत्त्वाची परिस्थिती विचारात घेऊन एकतर –

(अ) त्या मतदानकेंद्रावरील मतदान निरर्थक असल्याचे जाहीर करील, त्या मतदानकेंद्रावर नव्याने मतदान घेण्यासाठी एखादा दिवस ठरवील व वेळ निश्चित करील आणि अशा रीतीने ठरविलेला दिवस व निश्चित केलेली वेळ त्यास योग्य वाटेल अशा रीतीने अधिसूचित करील किंवा

(ब) त्या मतदानकेंद्रावरील नवीन मतदानाच्या निकालाचा निवडणुकीच्या निकालावर कोणत्याही प्रकारे परिणाम होणार नाही किंवा कार्यपद्धतीतील चूक किंवा नियमबाह्यता महत्त्वाची नाही याबद्दल त्याची खात्री झाली तर, निवडणुकीच्या पुढील कामकाजाकरिता व निवडणूक पूर्ण करण्याकरिता त्यास योग्य वाटतील असे निदेश निर्वाचन अधिकाऱ्यास देईल.

[३] या अधिनियमाचे व त्याअन्वयें केलेले कोणतेही नियम किंवा आदेश याचे उपबंध ज्याप्रमाणे मूळ मतदानास लागू होतात त्याप्रमाणे ते अशा प्रत्येक नव्याने घेतलेल्या मतदानासही लागू होतील.

४९. मतमोजणी – ज्यात मतदान घेण्यात आले असेल अशा प्रत्येक निवडणुकीत निर्वाचन अधिकाऱ्याकडून किंवा त्याच्या देखरेखीखाली व त्याच्या निदेशानुसार मतमोजणी करण्यात येईल आणि निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवारास, त्याच्या निवडणूक प्रतिनिधीस व मतमोजणी प्रतिनिधीस मतमोजणीच्या वेळी हजर राहण्याचा हक्क असेल.

५०. मतमोजणीसाठी ठरविलेल्या जागेत प्रवेश – [१] निर्वाचन अधिकारी

पुढील व्यक्तींखेरीज इतर सर्व व्यक्तींना मतमोजणीसाठी ठरविलेल्या जागेत प्रवेश देणार नाही :–

(अ) मतमोजणीच्या कामात त्यास सहाय्य करण्यासाठी तो नेमील अशा व्यक्ती;

(ब) जिल्हाधिकाऱ्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्ती;

(क) निवडणुकीच्या संबंधात कामावर हजर असलेले लोकसेवक, आणि

(ड) उमेदवार, त्यांचे निवडणूक प्रतिनिधी व मतमोजणी प्रतिनिधी.

[२] जिला, उमेदवाराने किंवा उमेदवाराच्या वतीने, निवडणुकीत किंवा निवडणुकीच्या संबंधात कामावर लावले असेल किंवा जी इतर प्रकारे उमेदवाराकरिता निवडणुकीत किंवा निवडणुकीसंबंधाने काम करीत असेल अशा कोणत्याही व्यक्तीस पोट-नियम (१), खंड (अ) अन्वये नेमण्यात येणार नाही.

[३] कोणत्या मतमोजणी प्रतिनिधीने किंवा प्रतिनिधींनी मतमोजणीच्या कोणत्या विशिष्ट टेबलाकडे किंवा मतमोजणीच्या टेबलांच्या गटाकडे लक्ष ठेवले पाहिजे ते निर्वाचन अधिकारी ठरवील.

[४] जी व्यक्ती मतमोजणी चालू असताना स्वतः गैरवर्तन करील किंवा निर्वाचन अधिकाऱ्याचे विधिसंमत निदेश पाळण्यात कसूर करील अशा कोणत्याही व्यक्तीस जेथे मतमोजणीचे काम चालू असेल अशा जागेतून निर्वाचन अधिकाऱ्याने या बाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून बाहेर घालविण्यात येईल.

५१. मतदानाची गुप्तता राखणें – निर्वाचन अधिकारी मतमोजणीस सुरुवात करण्यापूर्वी, तेथे हजर असलेल्या व्यक्तींना कलम २९ च्या तरतुदी वाचून दाखवील.

५२. मतपेट्यांची छाननी व त्या उघडणें – [१] निर्वाचन अधिकारी –

(i) एकापेक्षा अधिक मतदानकेंद्रांवर वापरण्यात आलेली मतपेटी किंवा मतपेट्या एकाच वेळी उघडील किंवा उघण्याची व्यवस्था करील; व

(ii) अध्यक्ष व पालिकासदस्य यांच्या निवडणुकीसंबंधातील मतपत्रिकांची दोन गटांत विभागणी करवून मोजणी करवून घेईल आणि योग्य असेल त्याप्रमाणे त्यांची नमुना १३, भाग दोन मध्ये किंवा नमुना १३–अ मध्ये नोंद करवील.

[१–अ] उपरोक्तप्रमाणे नोंदलेल्या अशा मतपत्रिकांची एकूण संख्या व नमुना १३ किंवा यथास्थिती १३–अ च्या बाब ६ अनुसार मतपेटीतील मतपत्रिकांची एकूण संख्या यांमधील विसंगतीचीसुद्धा, कोणतीही असेल तर नमुना १३ भाग दोन मध्ये किंवा यथास्थिती नमुना १३–अ मध्ये नोंद घेण्यात येईल.

[२] मतमोजणीच्या टेबलावर कोणतीही मतपेटी उघडण्यापूर्वी, त्या टेबलाजवळ हजर असलेल्या मतमोजणी प्रतिनिधींना कागदी मोहोर किंवा तिला लावण्यात

आली असेल अशी इतर मोहोर तपासू देण्यात येईल आणि ती जशीच्या तशी असल्याबद्दलची खात्री करून घेऊ देण्यात येईल.

[३] कोणत्याही मतपेटीत खरोखरीच ढवळाढवळ करण्यात आलेली नाही याविषयी निर्वाचन अधिकारी स्वतःची खात्री करून घेईल.

[४] कोणत्याही मतपेटीत खरोखरीच ढवळाढवळ करण्यात आली आहे अशी निर्वाचन अधिकाऱ्याची खात्री झाली तर, तो त्या मतपेटीत असलेल्या मतपत्रिका मोजणार नाही आणि त्या मतदानकेंद्राच्या बाबतीत नियम ४८ यात घालून दिलेली कार्यपद्धती अनुसरील.

५३. मतपत्रिकांची छाननी करणे व त्या नाकारणे – [१] प्रत्येक मतपेटीतून काढलेल्या मतपत्रिकांचे सोयीस्कर असे गठ्ठे तयार करण्यात येतील व त्यांची छाननी करण्यात येईल.

[२] निर्वाचन अधिकारी पुढील कारणास्तव मतपत्रिका नाकारील –

(अ) ज्यामुळे मतदाराची ओळख पटू शकेल अशी कोणतीही खूण किंवा मजकूर मतपत्रिकेवर असेल; किंवा

(ब) तिच्यावर कोणतेही मत नोंदण्यात आले नसेल; किंवा

(क) तिच्यावर एकाहून अधिक उमेदवारांना मते देण्यात आली असतील; किंवा

(ड) मत दर्शविणारी तिच्यावर केलेली खूण ही, कोणत्या उमेदवारास मत दिले आहे याविषयी शंका उत्पन्न होईल, अशा रीतीने करण्यात आली असेल; किंवा

(ई) ती मतपत्रिका बनावट असेल; किंवा

(फ) ती खरीखुरी मतपत्रिका असल्याचे निश्चितपणे सिद्ध करता येणार नाही इतक्या प्रमाणात तिची नासधूस झाली असेल किंवा ती खराब झाली असेल; किंवा

(ग) त्या मतपत्रिकेवर, त्या मतदानकेंद्रात वापरण्यासाठी अधिकृत केलेल्या मतपत्रिकांचे अनुक्रमांक किंवा यथास्थिती त्यांचा नमुना याहून वेगळा अनुक्रमांक असेल किंवा ती वेगळ्या नमुन्याची असेल; किंवा

(ह) त्या मतपत्रिकेवर, नियम ३६, पोट-नियम (३) च्या उपबंधानुसार जी खूण असणे आवश्यक आहे ती खूण केलेली नसेल :

परंतु –

(i) खंड (ग) किंवा (ह) मध्ये नमूद केलेला असा कोणताही दोष, मतदान केंद्राध्यक्षाने किंवा मतदान अधिकाऱ्याने केलेल्या कोणत्याही चुकीमुळे किंवा त्याने एखादी गोष्ट न केल्यामुळे उत्पन्न झाला आहे अशी निर्वाचन अधिकाऱ्याची खात्री झाली असेल तर, केवळ अशा दोषाच्या कारणास्तव ती मतपत्रिका नाकारण्यात येणार नाही.

(ii) ज्या प्रकारे मतपत्रिकेवर खूण केली असेल त्यावरून विशिष्ट उमेदवारासच मत देण्याचा इरादा स्पष्टपणे दिसून येत असेल तर मत दर्शविणारी खूण अस्पष्ट आहे किंवा एकाहून अधिक वेळा खूण केली आहे, केवळ ह्याच कारणास्तव ती मतपत्रिका नाकारण्यात येणार नाही.

[३] पोट-नियम (२) अन्वये कोणतीही मतपत्रिका नाकारण्यापूर्वी, निर्वाचन अधिकारी हजर असलेल्या प्रत्येक मतमोजणी प्रतिनिधीस, मतपत्रिकेची तपासणी करण्याची वाजवी संधी देईल. परंतु त्यास ती मतपत्रिका किंवा इतर कोणतीही मतपत्रिका हाताळण्याची परवानगी देणार नाही.

[४] निर्वाचन अधिकारी, त्याने नाकारलेल्या प्रत्येक मतपत्रिकेवर 'आर' हे अक्षर आणि मतपत्रिका नाकारण्याची कारणे थोडक्यात आपल्या हस्ताक्षरात किंवा रबराच्या ठशाच्या सहाय्याने नमूद करील.

[५] ह्या नियमान्वये नाकारण्यात आलेल्या सर्व मतपत्रिका एका गठ्ठ्यात बांधून ठेवण्यात येतील.

५४. मतमोजणी – [१] नियम ५३ अन्वये ज्या नाकारण्यात आलेल्या नाहीत अशा मतपत्रिका मोजण्यासाठी घेण्यात येतील.

[२] प्रत्येक उमेदवाराच्या नावे नोंदण्यात आलेली मते नियम ५०, पोट-नियम (१), खंड (अ) अन्वये निर्वाचन अधिकाऱ्यास सहाय्य करण्यासाठी नियुक्त केलेल्या व्यक्तीच्या मदतीने मोजण्यात येतील.

[३] मोजणी ही, या बाबतीत संचालकाकडून देण्यात येतील अशा, कोणतेही असल्यास, सर्वसाधारण किंवा विशेष निदेशांच्या अधीन असेल;

परंतु –

(i) प्रदत्त मतपत्रिका असलेले कोणतेही पाकीट उघडण्यात येणार नाही व अशी कोणतीही मतपत्रिका मोजण्यात येणार नाही, व

(ii) सर्व प्रभागांच्या बाबतीत नियम ५३, पोट-नियम (१) अन्वये तयार केलेली अध्यक्षीय निवडणुकीसंबंधातील मतपत्रिकांची पुडकी, मतपत्रिकांची छाननी करण्यापूर्वी प्रथम एकत्र मिसळण्यात येतील.

[४] पालिका-सदस्यांच्या निवडणुकीसाठी एका मतदानकेंद्रावर वापरण्यात आलेल्या सर्व मतपेटयांमधील सर्व मतपत्रिकांची मोजणी पूर्ण करण्यात आल्यानंतर, निर्वाचन अधिकारी, नमुना १४ मधील निकालपत्रात त्याची नोंद करील व तपशील जाहीर करील. त्यानंतर, विधिग्राह्य मतपत्रिकांचे एकत्र पुडके बांधण्यात येईल व ते नाकारण्यात आलेल्या मतपत्रिकांच्या पुडक्यांसोबत परंतु, वेगळ्या पाकिटात ठेवण्यात येईल. त्या पाकिटावर पुढील तपशिलाची नोंद करण्यात आल्यानंतर ते मोहोरबंद करण्यात येईल :–

(अ) नगरपालिकेचे नाव;

(ब) प्रभागाचे नाव व क्रमांक आणि त्यासमोर मतदानकेंद्राचे नाव व क्रमांक; व

(क) मतमोजणीची तारीख.

[५] अध्यक्षीय निवडणुकीसाठी नगरपालिका क्षेत्रातील सर्व प्रभागांमध्ये वापरण्यात आलेल्या सर्व मतपेट्यांमध्ये असलेल्या सर्व मतपत्रिकांची मोजणी पूर्ण करण्यात आल्यानंतर, निर्वाचन अधिकारी, नमुना १४-अ मधील निकालपत्रात तत्संबंधीची नोंद करील व तपशील जाहीर करील. त्यानंतर, विधिग्राह्य मतपत्रिकांचे एकत्र पुडके बांधण्यात येईल व ते नाकारण्यात आलेल्या मतपत्रिकांच्या पुडक्यांसोबत परंतु, वेगळ्या पाकिटात ठेवण्यात येईल. त्या पाकिटावर पुढील तपशिलाची नोंद करण्यात आल्यानंतर ते मोहोरबंद करण्यात येईल.

(अ) नगरपालिकेचे नाव; व

(ब) मतमोजणीची तारीख.

५५. मतमोजणी सतत चालू ठेवणे – निर्वाचन अधिकारी मतमोजणीचे काम, व्यवहार्य असेल तेथवर सतत चालू ठेवील आणि मतमोजणीचे काम स्थगित करावयाचे असेल अशा कोणत्याही मधल्या कालावधीत, मतपत्रिका पाकिटे व निवडणुकीसंबंधीची इतर कागदपत्रे यावर स्वतःची मोहोर लावून आणि ज्या उमेदवारांची किंवा निवडणूक प्रतिनिधींची किंवा मतमोजणी प्रतिनिधीची आपली मोहोर लावण्याची इच्छा असेल अशा उमेदवाराची, निवडणूक प्रतिनिधींची किंवा मतमोजणी प्रतिनिधीची मोहोर लावून ती मोहोरबंद करून ठेवील, आणि मधल्या कालावधीत त्यांच्या सुरक्षित अभिरक्षेसंबंधी पुरेशी खबरदारी घेतली जाईल अशी व्यवस्था करील.

५६. नव्याने मतदान घेण्यात आल्यानंतर, मतमोजणी पुन्हा सुरू करणे – [१] नियम ४८ अन्वये नव्याने मतदान घेण्यात आल्यावर निर्वाचन अधिकारी ते मतदान पूर्ण झाल्यानंतर जिल्हाधिकारी ठरवील अशा व ज्याबाबत उमेदवारांना व त्यांच्या निवडणूक प्रतिनिधींची अगोदरच नोटीस देण्यात आली असेल अशा तारखेस, वेळी व ठिकाणी, मतमोजणी पुन्हा सुरू करील.

[२] नियम ५३ व ५४ चे उपबंध शक्य असेल तेथवर अशा पुढे चालू केलेल्य मतमोजणीस लागू असतील.

५७. फेरमतमोजणी – मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर निर्वाचन अधिकारी योग्य असेल त्याप्रमाणे नमुना १४ मधील किंवा नमुना १४-अ मधील निकालपत्रात, प्रत्येक उमेदवारास मिळालेल्या मतांची एकूण संख्या नमूद करील व ती जाहीर करील.

[२] अशा रीतीने जाहीर करण्यात आल्यानंतर, उमेदवारास किंवा त्याच्या अनुपस्थितीत त्याच्या निवडणूक प्रतिनिधीस, पूर्वी मतमोजणी करण्यात आलेल्या सर्व किंवा कोणत्याही मतपत्रिकांची फेरमोजणी करण्याबद्दल निर्वाचन अधिकाऱ्या

कडे अर्ज करता येईल व त्यानें ज्या कारणासाठी, अशा फेरमोजणीसाठी अर्ज केला असेल ती कारणे उक्त अर्जात नमूद करील.

[३] असा अर्ज करण्यात आल्यानंतर निर्वाचन अधिकारी उक्त गोष्टींचा निर्णय करील आणि त्यास अशा अर्जास, संपूर्णतः किंवा अंशतः परवानगी देता येईल किंवा जर त्यास उक्त अर्ज निरर्थक किंवा गैरवाजवी असल्याचे दिसून आले तर तो संपूर्णतः नाकारता येईल.

[४] निर्वाचन अधिकाऱ्याचा, पोट-नियम (३) खालील प्रत्येक निर्णय हा लेखी असेल आणि त्यामध्ये त्याबद्दलची कारणे नमूद करण्यात येतील.

[५] जर निर्वाचन अधिकारी पोट-नियम (३) अन्वये अर्जास संपूर्णतः किंवा अंशतः परवानगी देण्याचे ठरवील तेव्हा तो –

(अ) आपल्या निर्णयानुसार मतपत्रिकांची पुन्हा मोजणी करील.

(ब) अशा फेरमोजणीनंतर आवश्यक असेल त्या मर्यादेपर्यंत योग्य असेल त्याप्रमाणे नमुना १४ मधील किंवा नमुना १४-अ मधील निकालपत्रात सुधारणा करील; आणि

(क) अशा रीतीने त्याने केलेल्या सुधारणा जाहीर करील.

[६] पोट-नियम (१) किंवा पोट-नियम (५) अन्वये, प्रत्येक उमेदवारास मिळालेली एकूण मते जाहीर करण्यात आल्यानंतर निर्वाचन अधिकारी योग्य असेल त्याप्रमाणे, नमुना १४ मधील किंवा नमुना १४–अ मधील निकालपत्र पुरे करून त्यावर सही करील आणि त्यानंतर फेरमोजणीसाठी कोणताही अर्ज दाखल करून घेण्यात येणार नाही.

परंतु, मतमोजणी पूर्ण होण्याचे वेळी उपस्थित असणारे उमेदवार व निवडणूक प्रतिनिधी यांना पोट-नियम (२) अन्वये प्रदान करण्यात आलेला अधिकार अंमलात आणण्यासाठी वाजवी संधी देण्यात येईपर्यंत मतमोजणीचे काम पूर्ण झाल्यावर या पोट-नियमाखालील कोणतीही उपाययोजना करण्यात येणार नाही.

५८. समसमान मते – मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर कोणत्याही उमेदवारांना समसमान मते पडल्याचे आढळून आल्यास आणि उक्त उमेदवारांपैकी कोणत्याही उमेदवारास एक जादा मत दिल्यामुळे तो निवडून आल्याचे घोषित होण्यास पात्र ठरत असल्यास, निर्वाचन अधिकारी उक्त उमेदवाराबाबत चिठ्ठ्या टाकून ताबडतोब निर्णय घेईल आणि ज्याच्या नावे चिठ्ठी निघेल त्या उमेदवारास एक जादा मत मिळाले आहे असे समजून पुढील कार्यवाहीस सुरुवात करील.

५९. निकाल जाहीर करणें – निर्वाचन अधिकारी, त्यानंतर ज्या उमेदवारास सर्वांत अधिक विधिग्राह्य मते मिळाली असतील तो उमेदवार निवडून आल्याचे जाहीर करील आणि योग्य असेल त्याप्रमाणे नमुना १५ मधील किंवा नमुना १५-अ मधील निवडणूक विवरण पुरे करील व ते प्रमाणित करील आणि त्याच्या सही

केलेल्या प्रती शक्यतो लवकर जिल्हाधिकाऱ्याकडे पाठवील.

६०. निवडणुकीसंबंधीच्या कागदपत्रांची अभिरक्षा – निर्वाचन अधिकारी नियम ४४ मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेली पाकिटे आणि निवडणुकीसंबंधीची इतर सर्व कागदपत्रे ही त्याच्या अभिरक्षेत ठेवील.

६१. निवडणूकविषयक कागदपत्रे सादर करणे व त्यांची तपासणी – [१] (अ) वापरण्यात न आलेल्या मतपत्रिकांची पाकिटे;

(ब) वापरण्यात आलेल्या मतपत्रिकांची पाकिटे – मग त्या मतपत्रिका विधिग्राह्य असोत, प्रदत्त किंवा नाकारण्यात आलेल्या असोत;

(क) मतदारांच्या यादीच्या खुणा केलेल्या प्रतीची पाकिटे;

निर्वाचन अधिकाऱ्याच्या अभिरक्षेत असताना, उघडण्यात येणार नाहीत आणि सक्षम न्यायालयाच्या आदेशावाचून कोणतीही व्यक्ती, किंवा प्राधिकारी उक्त पाकिटातील मजकुराची तपासणी करणार नाही किंवा ती त्याच्यापुढे सादर करण्यात येणार नाहीत.

[२] निवडणुकीसंबंधातील इतर सर्व कागदपत्रे लोकांना पाहण्यासाठी खुली असतील.

६२. निवडणूकविषयक कागदपत्रांची विल्हेवाट लावणे – [१] नियम ६१, पोट-नियम (१) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेली पाकिटे एक वर्षपर्यंत ठेवण्यात येतील आणि त्यानंतर, राज्य शासनाने किंवा सक्षम न्यायालयाने तद्विरुद्ध कोणताही निदेश दिला असल्यास त्यास अधीन राहून ती नष्ट करण्यात येतील.

[२] निवडणुकीसंबंधातील इतर सर्व कागदपत्रे ही, ती ज्या मतदार प्रभागासंबंधी असतील त्या प्रभागासाठी घेण्यात येणारी पुढील सार्वत्रिक निवडणूक संपेतोपर्यंत, राखून ठेवण्यात येतील आणि त्यानंतर ती राज्य शासनाने किंवा सक्षम न्यायालयाने तद्विरुद्ध कोणताही निदेश दिला असल्यास त्यास अधीन राहून नष्ट करण्यात येतील.

६३. प्रसंगोपात रिकाम्या झालेल्या जागा – एखाद्या पालिका-सदस्याचे पद रिकामे झाल्याबद्दल मुख्य अधिकाऱ्याकडून कलम ४८ च्या पोट-कलम (२) अनुसार किंवा अध्यक्षाचे पद रिकामे झाल्याबद्दल कलम ५५ च्या पोट-कलम (८) अनुसार केलेले प्रतिवृत्त जिल्हाधिकाऱ्याकडे येईल त्या वेळी [जिल्हाधिकारी ते पद प्रसंगोपात रिकामे झाले आहे याबद्दल पडताळणी करून व स्वत:ची त्याबद्दल खात्री करून घेऊन], ते पद भरण्यासाठी सोयीप्रमाणे शक्य तितक्या लवकर पोट-निवडणूक घेण्यासाठी [एक तारीख निश्चित करील] आणि त्यानंतर या नियमाचे उपबंध योग्य त्या फेरफारांसह त्या पोट-निवडणुकीस लागू होतील.

६४. नगरपालिका निवडणुकीच्या संबंधातील खर्च – अधिनियमान्वये घ्यावयाच्या कोणत्याही निवडणुकीच्या संबंधातील खर्च नगरपालिका निधीतून नगरपालिकेमार्फत देय असेल.

नमुना १

[नियम ४ आणि ५ पहा]

जिल्हाधिकारी, जिल्हा ..... यांचे कार्यालय

आदेश

क्रमांक ..... महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम, १९६६ यातील नियम ४ आणि ५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून मी, ...

जिल्ह्याचा जिल्हाधिकारी, यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ १ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या मतदार प्रभागामधून ..... नगरपालिकेसाठी घेण्यात येणाऱ्या निवडणुकीच्या संबंधात, पुढील नेमणुका व तारखा निश्चित करीत आहे :–

(अ) स्तंभ २ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या निर्वाचन अधिकाऱ्याचे किंवा सहाय्यक निर्वाचन अधिकाऱ्याचे नाव (स्तंभ १ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रभागासमोर निर्दिष्ट करण्यात आलेले नाव, ज्याचा यापुढे " प्रभागासमोरील " असा उल्लेख करण्यात आला आहे.

(ब) स्तंभ ३ मध्ये (प्रभागासमोर) विनिर्दिष्ट करण्यात आलेली तारीख व वेळ नामनिर्देशन पत्रे भरण्यासाठी अखेरची तारीख व वेळ असेल;

(क) स्तंभ ४ मध्ये (प्रभागासमोर) विनिर्दिष्ट करण्यात आलेली तारीख व वेळ नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्याची तारीख व वेळ असेल;

(ड) स्तंभ ५ मध्ये (प्रभागासमोर) विनिर्दिष्ट करण्यात आलेली तारीख ही विधिग्राह्य रीतीने नामनिर्देशित करण्यात आलेल्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्याची तारीख असेल;

(ई) वगळण्यात आला;

(फ) वगळण्यात आला;

(ग) स्तंभ ८ मध्ये (प्रभागासमोर) विनिर्दिष्ट करण्यात आलेली तारीख ही उमेदवारी मागे घेण्याची अखेरची तारीख असेल;

(ह) स्तंभ ९ मध्ये (प्रभागासमोर) विनिर्दिष्ट करण्यात आलेली तारीख ही निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करावयाची तारीख असेल;

(आय) स्तंभ १० मध्ये (प्रभागासमोर) विनिर्दिष्ट करण्यात आलेली तारीख किंवा तारखा आणि वेळ या मतदान ज्या तारखेस किंवा तारखांना आणि ज्या वेळात घ्यावयाचे असेल ती तारीख/त्या तारखा व वेळ असेल/असतील;

अनुसूची

१	२	३
१	प्रभागाचे (वॉर्डाचे) नाव किंवा क्रमांक	
२	निवडिलेल्या अधिकाऱ्याची किंवा सहाय्यक निवडिलेल्या अधिकाऱ्याची नावे.	
३	नामनिर्देशन पत्रे सादर करण्याची शेवटची तारीख व वेळ.	
४	नामनिर्देशन पत्रांच्या छाननीची तारीख व वेळ.	
५	विधिग्राह्य रीतीने नामनिर्देशन करण्यात आलेल्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्याची तारीख.	
६	वगळण्यात आला	अपील प्राधिकाऱ्याचे नाव, पदनाम, पत्ता*
७	वगळण्यात आला	अपील करण्याची शेवटची तारीख*
८	उमेदवारी मागे घेण्याची शेवटची तारीख.	
९	निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्याची तारीख.	
१०	मतदान जर तारखेस किंवा तारखांस आणि जर बेळी घेण्यात येईल तो तारीख किंवा तारखा व वेळ.	
११	मतमोजणीची तारीख व वेळ.	
१२	नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्याचे आणि ती माघे घेण्यासाठी अखेरचे ठिकाण.	
१३	मतमोजणीचे ठिकाण	
४		
५		

* टीप – निर्वाचन अधिकाऱ्याच्या, नामनिर्देशन पत्र स्वीकारणाऱ्या किंवा नाकारणाऱ्या निर्णयाविरुद्ध अपील प्राधिकाऱ्याकडे अपील करण्याच्या शेवटच्या तारखेसाठी महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम, १९६९ यातील नियम १५ पहा.

तारीख :

ठिकाण :

.....चा जिल्हाधिकारी

* हा मजकूर शासकीय अधिसूचना, नगरविकास आरोग्य व गृहनिर्माण विभाग, क्रमांक एमएमआर १३७१/५०७७२-एन, दिनांक १६ नोव्हेंबर १९७३ द्वारे सुधारण्यात आला.

(ज) स्तंभ ११ मध्ये (प्रभागासमोर) विनिर्दिष्ट करण्यात आलेली तारीख व वेळ ही मतमोजणीची तारीख व वेळ असेल;

(के) स्तंभ १२ मध्ये (प्रभागासमोर) विनिर्दिष्ट करण्यात आलेली जागा ही नामनिर्देश पत्रांची छाननी करण्याची व ती मागे घेण्यासाठी असलेली जागा असेल;

(एल) स्तंभ १३ मध्ये (प्रभागासमोर) विनिर्दिष्ट करण्यात आलेली जागा मतमोजणी संबंधीची जागा असेल.

नमुना १–अ

[नियम ४ व ५ पहा]

जिल्हाधिकारी, जिल्हा.....यांचे कार्यालय

आदेश

क्रमांक.....महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम, १९६६ यांतील नियम ४ आणि ५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून, मी, ...जिल्ह्याचा जिल्हाधिकारी याद्वारे, ... नगरपालिकेच्या अध्यक्षाच्या पदाच्या निवडणुकीच्या संबंधात पुढील नेमणुका करीत आहे :–

(अ) .....यास निर्वाचन अधिकारी म्हणून आणि / किंवा .....यास / यांस सहाय्यक निर्वाचन अधिकारी म्हणून;

(ब) ..... ही नामनिर्देशन करण्याची अखेरची तारीख व वेळ असेल;

(क) ..... ही नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्याची तारीख व वेळ असेल;

(ड) ..... ही विधिग्राह्य रीतीने नामनिर्देशित करण्यात आलेल्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्याची तारीख असेल;

(ई) ..... ही उमेदवारी मागे घेण्याची अखेरची तारीख असेल;

(फ) ..... ही निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्याची तारीख असेल;

(ग) ..... ही / ह्या मतदान ज्या दिवशी व ज्या वेळात घेण्यात येईल, त्याची / त्याच्या तारीख / तारखा व वेळ असेल;

(ह) ..... ही मतमोजणीची तारीख व वेळ असेल;

(आय) ..... हे नामनिर्देशन पत्रांच्या छाननीचे व ती मागे घेण्याचे ठिकाण असेल;

(ज) ..... हे मतमोजणीचे ठिकाण असेल.

टीप – निर्वाचन अधिकाऱ्याच्या, नामनिर्देशन पत्र स्वीकारणाऱ्या किंवा नाकारणाऱ्या निर्णयाविरुद्ध अपील प्राधिकाऱ्याकडे अपील करण्याच्या शेवटच्या तारखेसाठी, महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम, १९६६ यांतील नियम ५५ पहा.

तारीख : जिल्हाधिकाऱ्याची सही

नमुना २

[नियम १२ (२) पहा]

नामनिर्देशन पत्र

भाग–अ

..... नगरपालिकेची निवडणूक

(पुढील मजकूर नाव सुचविणाऱ्याने भरावयाचा)

मी, याद्वारे ..... यांस, ...

(नाव व क्रमांक)

प्रभागातून निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून नामनिर्दिष्ट करीत आहे.

उमेदवाराचे नाव ... ...

वडिलांचे/पतीचे नाव ... ...

वय ... ...

उमेदवाराचा डाकेचा पूर्ण पत्ता ... ...

राखीव जागा असणाऱ्या प्रभागात, उमेदवार ज्या जातीचा किंवा जमातीचा असेल त्या जातीचा किंवा जमातीचा तपशील.

ज्या प्रभागातील मतदारांच्या यादीत उमेदवाराचे नाव मतदार म्हणून नमूद करण्यात आले असेल त्या प्रभागाचे नाव किंवा क्रमांक.

ज्या प्रभागात मतदार म्हणून उमेदवाराचे नाव नमूद करण्यात आले असेल अशा उपरिनिर्दिष्ट प्रभागाच्या मतदार यादीतील उमेदवाराचा अनुक्रमांक.

नाव सुचविणाऱ्या व्यक्तीचे नाव ... ...

प्रभागाच्या मतदार यादीतील, नाव सुचविणाऱ्याचा अनुक्रमांक.

तारीख : नाव सुचविणाऱ्याची सही

उमेदवाराचे प्रतिज्ञापन

मी, याद्वारे, सूचित करतो की, निवडून आल्यास पालिका-सदस्य म्हणून काम करण्यास मी तयार आहे.

तारीख : उमेदवाराची सही

[भाग–ब]

अनुसूचित जातीच्या किंवा अनुसूचित जमातीच्या उमेदवाराने द्यावयाचे अतिरिक्त प्रतिज्ञापन –

मी, याद्वारे जाहीर करतो की, महाराष्ट्र राज्याच्या संबंधात जी* अनुसूचित जात/*अनुसूचित जमात आहे अशा अनुसूचित *जातीचा/*जमातीचा मी सदस्य आहे.

दिनांक : उमेदवाराची सही

निशाणीच्या निवडीसंबंधी प्रतिज्ञापन

मी, याद्वारे जाहीर करतो की, –

(अ) मला या निवडणुकीत ..... पक्षाने पुरस्कृत केले आहे.

(ब) माझ्या निवडणुकीसाठी मी ज्या निशाण्यांची निवड केली आहे त्या निशाण्या, अग्रतेच्या क्रमानुसार, पुढे दर्शविण्यात आल्या आहेत :–

(१)
(२)
(३)

दिनांक : उमेदवाराची सही

टीप – उमेदवारास कोणत्याही राजकीय पक्षाने पुरस्कृत केले नसल्यास बाब (अ) खोडावी. कोणत्याही पक्षाने पुरस्कृत केलेले असो वा नसो, बाब (ब) मध्ये प्रत्येक उमेदवाराने तीन निशाण्या दर्शवाव्यात.

नामनिर्देशन पत्राचा अनुक्रमांक .....

हे नामनिर्देशन पत्र, *उमेदवाराने/*उमेदवाराचे नाव सुचविणाऱ्याने, दिनांक ..... रोजी ..... वाजता माझ्या कार्यालयात माझ्या स्वाधीन केले.

दिनांक : निर्वाचन अधिकाऱ्याची सही

नामनिर्देशन पत्र स्वीकारल्याबद्दल किंवा ते नाकारल्याबद्दल निर्वाचन अधिकाऱ्याचा निर्णय

मी, या नामनिर्देशन पत्राची, महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम, १९६६ याच्या नियम १३ अनुसार, तपासणी केली आहे आणि त्याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :–

दिनांक : निर्वाचन अधिकाऱ्याची सही

---

*आवश्यक नसेल तो मजकूर खोडावा.

नमुना २-अ

[नमुना १२ (२) पहा]

नामनिर्देशन पत्र

भाग-अ

..... नगरपालिकेच्या अध्यक्षाच्या पदासाठी निवडणूक

(पुढील मजकूर नाव सुचविणाऱ्याने भरावयाचा)

मी, याद्वारे ..... यांस, अध्यक्षाच्या पदाच्या निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून नामनिर्दिष्ट करीत आहे.

उमेदवाराचे नाव .....

वडिलांचे/पतीचे नाव .....

वय .....

उमेदवाराचा डाकेचा पूर्ण पत्ता .....

ज्या प्रभागातील मतदारांच्या यादीत उमेदवाराचे नाव मतदार म्हणून नमूद करण्यात आले असेल त्या प्रभागाचे नाव किंवा क्रमांक.

ज्या प्रभागात मतदार म्हणून उमेदवाराचे नाव नमूद करण्यात आले असेल अशा उपरिनिर्दिष्ट प्रभागाच्या मतदार यादीतील उमेदवाराचा अनुक्रमांक

नाव सुचविणाऱ्या व्यक्तीचे नाव आणि ज्या प्रभागातील मतदारांच्या यादीत नाव सुचविणाऱ्या व्यक्तीचे नाव मतदार म्हणून नमून करण्यात आले असेल त्या प्रभागाचे नाव किंवा क्रमांक

उपरिनिर्दिष्ट प्रभागाच्या मतदार यादीतील नाव सुचविणाऱ्या व्यक्तीचा अनुक्रमांक

दिनांक :

नाव सुचविणाऱ्या व्यक्तीची सही

उमेदवाराचे प्रतिज्ञापन

मी, याद्वारे सूचित करतो की, निवडून आल्यास अध्यक्ष म्हणून काम करण्यास मी तयार आहे.

दिनांक :

उमेदवाराची सही

भाग–ब

निशाणीच्या निवडीसंबंधी प्रतिज्ञापन

मी, याद्वारे जाहीर करतो की · · · · · · · · ·

(अ) मला या निवडणुकीत · · · · · · · · · पक्षाने पुरस्कृत केले आहे;

(ब) माझ्या निवडणुकीसाठी मी ज्या निशाण्यांची निवड केली आहे त्या निशाण्या, अग्रतेच्या क्रमानुसार पुढे दर्शविण्यात आल्या आहेत –

(१)
(२)
(३)

दिनांक : उमेदवाराची सही

टीप – उमेदवारास कोणत्याही राजकीय पक्षाने पुरस्कृत केले नसल्यास बाब (अ) खोडावी. कोणत्याही पक्षाने पुरस्कृत केलेले असो वा नसो, बाब (ब) मध्ये प्रत्येक उमेदवार तीन निशाण्या दर्शवील.

नामनिर्देशनाचा अनुक्रमांक · · · · · · · · ·

हे नामनिर्देशन पत्र $\frac{\text{*उमेदवाराने}}{\text{*नाव सुचविणाऱ्या व्यक्तीने}}$ (दिनांक) · · · · · · · · · ·

रोजी · · · · · · वाजता माझ्या कार्यालयात माझ्या स्वाधीन केले.

दिनांक : निर्वाचन अधिकाऱ्याची सही

नामनिर्देशन पत्र स्वीकारल्याबद्दल किंवा ते नाकारल्याबद्दल निर्वाचन अधिकाऱ्याचा निर्णय.

मी, या नामनिर्देशन पत्राची, महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ याच्या नियम १३ अनुसार तपासणी केली आहे आणि त्याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :–

दिनांक : निर्वाचन अधिकाऱ्याची सही

● ●

नमुना ३

[नियम १२ (५) पहा]

नामनिर्देशन पत्र मिळाल्याबद्दलची पावती आणि त्याच्या छाननीची नोटीस

(नामनिर्देशन पत्र सादर करणाऱ्या व्यक्तीस द्यावयाची)

नामनिर्देशन पत्राचा अनुक्रमांक ..... नगरपालिकेच्या ..... प्रभागातील निवडणुकीसाठी असलेले उमेदवार ..... यांचे नामनिर्देशन पत्र ..... रोजी ..... वाजता *उमेदवाराने / *उमेदवाराचे नाव सुचविणाऱ्या व्यक्तीने माझ्या कार्यालयात, माझ्या स्वाधीन केले.

सर्व नामनिर्देशन पत्रांची छाननी, ... वाजता ..... 'रोजी ..... ठिकाणी करण्यात येईल.

दिनांक :

निर्वाचन अधिकाऱ्याची सही

---

* आवश्यक नसेल तो मजकूर खोडावा.

नमुना ३–अ

[नियम १२ (५) पहा]

नामनिर्देशन पत्र मिळाल्याबद्दलची पावती आणि त्याच्या छाननीची नोटीस

(नामनिर्देशन पत्र सादर करणाऱ्या व्यक्तीस द्यावयाची)

नामनिर्देशन पत्राचा अनुक्रमांक .....

..... नगरपालिकेच्या अध्यक्षाच्या पदाच्या निवडणुकीसाठी असलेले उमेदवार ..... यांचे नामनिर्देशन पत्र ..... रोजी ..... वाजता *उमेदवाराने/*उमेदवाराचे नाव सुचविणाऱ्या व्यक्तीने माझ्या कार्यालयात. माझ्या स्वाधीन केले.

सर्व नामनिर्देशन पत्रांची छाननी ..... वाजता दिनांक ..... रोजी ..... (ठिकाण) येथे करण्यात येईल.

दिनांक .....

निर्वाचन अधिकाऱ्याची सही

नमुना ४

[नियम १३ (८) पहा]

विधिग्राह्य रीतीने नामनिर्दिष्ट केलेल्या उमेदवारांची यादी

..... नगरपालिकेसाठी ..... प्रभागातील निवडणूक

(नाव व क्रमांक)

अनुक्रमांक	उमेदवाराचे नाव	उमेदवाराचा पत्ता
१	२	३
१		
२		
३		
४		
वगैरे		

ठिकाण :

दिनांक :

निर्वाचन अधिकारी

*आवश्यक नसेल तो मजकूर खोडावा.

नमुना ४-अ

[नियम १३ (८) पहा]

विधिग्राह्य रीतीने नामनिर्दिष्ट केलेल्या उमेदवारांची यादी

..... नगरपालिकेच्या अध्यक्षाच्या पदासाठी निवडणूक

अनुक्रमांक	उमेदवाराचे नाव	उमेदवाराचा पत्ता
१	२	३
१		
२		
३		
४		
वगैरे		

ठिकाण :

दिनांक :

निर्वाचन अधिकारी

नमुना ५

[नियम १५ (३) (अ) पहा]

नामनिर्देशन पत्र स्वीकारणाऱ्या किंवा नाकारणाऱ्या निर्णयाविरुद्धच्या अपिलांच्या सुनावणीची सूचना

मी, याद्वारे महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम, १९६६ याचा नियम १५, पोट-नियम (२) अन्वये मला मिळालेल्या नोटिसा प्रसिद्ध करीत आहे आणि, ज्या अपिलांच्या नोटिसा मिळाल्या आहेत अशा अपिलांच्या बाबतीत, जिल्हा न्यायाधीश नेमील अशा तारखेस किंवा तारखांस, उक्त जिल्हा न्यायाधीशासमोर त्यांच्या सुनावणीस प्रारंभ होईल असे कळवीत आहे. अशी तारीख ही अशा (नोटिसांच्या) प्रसिद्धीच्या तारखेपासून दहाव्या दिवसानंतरची असणार नाही.

निर्वाचन अधिकारी

दिनांक :

मिळालेल्या प्रत्येक नोटिशीची एक प्रत व विधिग्राह्य रीतीने नामनिर्देशित करण्यात आलेल्या उमेदवारांची यादी यासह ..... जिल्हा न्यायाधीश याजकडे प्रत सादर अग्रेषित. त्यांना याद्वारे विनंती करण्यात येते की, यथास्थिती अपिलाच्या / अपिलांच्या सुनावणीसाठी त्यांनी नेमलेली / नेमलेल्या तारीख / तारखा खाली सही करणाऱ्याला क्रमांक एमएमआर–१३७३–७९७७६–ए–१ त्वरित कळवाव्यात.

● ●

नमुना ६

[* * *]

नमुना ७

[नियम १६ (४) पहा]

निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी आणि त्यांना देण्यात आलेली निशाणी

. . . . . नगरपालिकेसाठी . . . . . प्रभागातील निवडणूक

अनुक्रमांक	उमेदवाराचे नाव	उमेदवाराचा पत्ता	उमेदवारास देण्यात आलेली निशाणी
१			
२			
३			
४			
इत्यादी			

ठिकाण :

निर्वाचन अधिकारी

दिनांक :

नमुना ७-अ

[नियम १६ (४) पहा]

निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी आणि त्यांना देण्यात आलेली निशाणी

अनुक्रमांक	उमेदवाराचे नाव	उमेदवाराचा पत्ता	उमेदवारास देण्यात आलेली निशाणी
१			
२			
३			
४			
इत्यादी			

ठिकाण :

दिनांक : निर्वाचन अधिकारी

नमुना ८

[नियम १८ (१) पहा]

निवडणूक प्रतिनिधींची नेमणूक

..... नगरपालिकेसाठी ..... प्रभागातील निवडणूक निर्वाचन अधिकारी,

..... नगरपालिका क्षेत्र

यांस,

वरील निवडणुकीतील उमेदवार, मी ..... राहणार ..... याद्वारे श्री. ..... राहणार ..... यांची या तारखेपासून वरील निवडणुकीतील माझा निवडणूक प्रतिनिधी म्हणून नेमणूक करीत आहे.

ठिकाण : उमेदवाराची सही

दिनांक :

वरील नेमणुकीस माझी अनुमती आहे.

ठिकाण :

दिनांक : निवडणूक प्रतिनिधीची सही

नमुना ८-अ

[नियम १८ (१) पहा]

निवडणूक प्रतिनिधींची नेमणूक

..... नगरपालिकेच्या अध्यक्षाच्या पदासाठी निवडणूक.

निर्वाचन अधिकारी,

..... नगरपालिका क्षेत्र यांस,

वरील निवडणुकीतील उमेदवार, मी ..... राहणार ..... याद्वारे श्री. ..... राहणार ..... याची, या तारखेपासून वरील निवडणुकीतील माझा निवडणूक प्रतिनिधी म्हणून नेमणूक करीत आहे.

ठिकाण : उमेदवाराची सही

दिनांक :

वरील नेमणुकीस माझी अनुमती आहे.

ठिकाण : निवडणूक प्रतिनिधीची सही

दिनांक :

● ●

नमुना ९

[नियम १९ व २० पहा]

मतदान/मतमोजणी प्रतिनिधीची नेमणूक

..... नगरपालिकेसाठी ..... प्रभागातील निवडणूक

*निर्वाचन अधिकारी, ... मतदानकेंद्र

*मतदान केंद्राध्यक्ष,

यांस,

मी, ... *उमेदवार/*प्रस्तुत निवडणुकीतील उमेदवार ..... यांचा निवडणूक प्रतिनिधी, याद्वारे, ... यांची,

मतदानकेंद्र क्रमांक ..... यातील
मतदान मंडप क्रमांक ..... येथे
*मतदान प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी / *मतमोजणीसाठी निश्चित केलेल्या ठिकाणी नेमणूक करीत आहे.
मतमोजणी प्रतिनिधी म्हणून हजर राहण्यासाठी

ठिकाण :

दिनांक :

*उमेदवाराची/*निवडणूक प्रतिनिधीची सही

*वरील पर्यायांपैकी लागू असेल तोच पर्याय ठेवावा.

मी, असा *मतदान / *मतमोजणी प्रतिनिधी म्हणून काम करण्याचे मान्य करतो.

ठिकाण :

दिनांक :

*निर्वाचन अधिकारी, / *मतदान केंद्राध्यक्ष, या समक्ष स्वाक्षरी करावयाचे *मतदान / *मतमोजणी प्रतिनिधीचे प्रतिज्ञापन

मी, याद्वारे असे जाहीर करतो की, वरील निवडणुकीत मी महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ किंवा तदन्वये केलेले नियम याद्वारे जी गोष्ट निषिद्ध ठरविण्यात आली असेल अशी कोणतीही गोष्ट करणार नाही.

दिनांक :

*मतदान / *मतमोजणी प्रतिनिधीची सही

माझ्या समक्ष सही केली.

दिनांक :

* निर्वाचन अधिकारी / * मतदान केंद्राध्यक्ष

• •

नमुना ९-अ

[नियम १९ व २० पहा]

मतदान / मतमोजणी प्रतिनिधीची नेमणूक

. . . . . नगरपालिकेच्या अध्यक्षाच्या पदासाठी निवडणूक.

* निर्वाचन अधिकारी, ... मतदानकेंद्र,
* मतदान केंद्राध्यक्ष,

यांस,

मी, ... *उमेदवार / *प्रस्तुत निवडणुकीतील उमेदवार. . . . . यांचा निवडणूक प्रतिनिधी, याद्वारे, ... यांची, मतदानकेंद्र . . . क्रमांक. . . . . यातील

*मतदान मंडप क्रमांक. . . . . येथे मतदान प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी _____ यांची नेमणूक
*मतमोजणीसाठी निश्चित केलेल्या ठिकाणी मतमोजणी प्रतिनिधी म्हणून हजर राहण्यासाठी.

करीत आहे.

ठिकाण :

*उमेदवाराची / *निवडणूक प्रतिनिधीची सही

दिनांक :

---

*वरील पर्यायांपैकी लागू असेल तोच पर्याय ठेवावा.

मी, असा $\frac{\text{* मतदान}}{\text{* मतमोजणी}}$ प्रतिनिधी म्हणून काम करण्याचे मान्य करतो.

ठिकाण :

दिनांक :

* निर्वाचन अधिकारी / * मतदान केंद्राध्यक्ष, या समक्ष स्वाक्षरी करावयाचे $\frac{\text{* मतदान}}{\text{* मतमोजणी}}$ प्रतिनिधीचे प्रतिज्ञापन.

मी, याद्वारे, असे जाहीर करतो की, वरील निवडणुकीत मी, महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ किंवा तदन्वये केलेले नियम याद्वारे जी गोष्ट निषिद्ध ठरविण्यात आली असेल अशी कोणतीही गोष्ट करणार नाही.

दिनांक :

* मतदान / * मतमोजणी प्रतिनिधीची सही

माझ्या समक्ष सही केली.

दिनांक :

* निर्वाचन अधिकारी / * मतदान केंद्राध्यक्ष

• •

नमुना १०

[नियम २८ पहा]

मतपत्रिका

..... नगरपालिकेची ..... प्रभागातील निवडणूक

उमेदवाराचे नाव (१)	देण्यात आलेली निशाणी (२)

टीप – प्रत्येक मतपत्रिकेचा अनुक्रमांक दर्शनी भागाच्या वरील कोपऱ्यावर देण्यात येईल.

*वरील पर्यायांपैकी लागू असेल तोच पर्याय ठेवावा.

नमुना १०–अ

[नियम २८ पहा]

मतपत्रिका

..... नगरपालिकेच्या अध्यक्षाच्या पदासाठी निवडणूक

उमेदवाराचे नाव (१)	देण्यात आलेली निशाणी (२)

टीप – प्रत्येक मतपत्रिकेचा अनुक्रमांक दर्शनी भागाच्या वरील कोपऱ्यावर देण्यात येईल.

नमुना ११

[नियम ३४ पहा]

आक्षेपित मतांची यादी

..... नगरपालिकेची ..... प्रभागातील निवडणूक मतदानकेंद्र .....

मतदानकेंद्राचा क्रमांक, कोणताही असल्यास .....

नोंदीचा अनुक्रमांक (१)	मतदाराचे नाव (२)	मतदारांच्या यादीतील अनुक्रमांक (३)	मतदाराची सही किंवा अंगठ्याचा ठसा व त्याचा पत्ता (४)	ओळख पटवून देणारा असल्यास त्याचे नाव (५)

आक्षेप घेणाऱ्या व्यक्तीचे नाव (६)	अनामत ठेवलेली रक्कम (७)	मतदान केंद्राध्यक्षाचा प्रत्येक बाबतीतील आदेश (८)	अनामत रक्कम परत देण्यात येईल तेव्हा आक्षेप घेणाऱ्या व्यक्तीची उक्त रक्कम मिळाल्याबद्दलची सही (९)

दिनांक :

मतदान केंद्राध्यक्षाची सही

नमुना ११-अ

[नियम ३४ पहा]

आक्षेपित मतांची यादी

. . . . . नगरपालिकेच्या अध्यक्षाच्या पदासाठी निवडणूक.

मतदानकेंद्र . . . . . .

मतदानकेंद्राचा क्रमांक, कोणताही असल्यास . . . . . .

नोंदीचा अनुक्रमांक (१)	मतदाराचे नाव (२)	मतदारांच्या यादीतील अनुक्रमांक (३)	मतदाराची सही किंवा अंगठ्याचा ठसा व त्याचा पत्ता (४)	ओळख पटवून देणारा असल्यास त्याचे नाव (५)

आक्षेप घेणाऱ्या व्यक्तीचे नाव (६)	अनामत ठेवलेली रक्कम (७)	मतदान केंद्राध्यक्षाचा प्रत्येक बाबतीतील आदेश (८)	अनामत रक्कम परत देण्यात येईल तेव्हा आक्षेप घेणाऱ्या व्यक्तीची उक्त रक्कम मिळाल्याबद्दलची सही (९)

दिनांक :

मतदान केंद्राध्यक्षाची सही

नमुना १२

[नियम ४० पहा]

प्रदत्त मतांची यादी

..... नगरपालिकेची ..... प्रभागातील निवडणूक

मतदानकेंद्र .....

मतदानकेंद्राचा क्रमांक, कोणताही असल्यास .....

नोंदीचा अनुक्रमांक (१)	मतदाराचे नाव (२)	मतदारांच्या यादीतील मतदाराचा अनुक्रमांक (३)	मतदाराचा पत्ता (४)

प्रदत्त मतपत्रिकेचा अनुक्रमांक (५)	ज्या व्यक्तीने पूर्वीच मतदान केले असेल अशा व्यक्तीस दिलेल्या मतपत्रिकेचा अनुक्रमांक (६)	मत देणाऱ्याची सही किंवा अंगठ्याचा ठसा (७)

दिनांक :

मतदान केंद्राध्यक्षाची सही

नमुना १२-अ

[नियम ४० पहा]

प्रदत्त मतांची यादी

..... नगरपालिकेच्या अध्यक्षाच्या पदासाठी निवडणूक.

मतदानकेंद्र .....

मतदानकेंद्राचा क्रमांक, कोणताही असल्यास, ...

नोंदीचा अनुक्रमांक	मतदाराचे नाव	मतदारांच्या यादीतील मतदाराचा अनुक्रमांक	मतदाराचा पत्ता
(१)	(२)	(३)	(४)

प्रदत्त मतपत्रिकेचा अनुक्रमांक	ज्या व्यक्तीने पूर्वीच मतदान केले असेल अशा व्यक्तीस दिलेल्या मतपत्रिकेचा अनुक्रमांक	मत देणाऱ्याची सही किंवा अंगठ्याचा ठसा
(५)	(६)	७

दिनांक :

न. ...१३

मतदान केंद्राध्यक्षाची सही

नमुना १३

[नियम ४३ पहा]

भाग एक

मतपत्रिकांचा हिशेब

..... नगरपालिकेची ..... प्रभागातील निवडणूक.

मतदानकेंद्र .....

अनुक्रमांक एकूण संख्या

१. मतदानकेंद्रातील किंवा मतदानकेंद्रात एकाहून अधिक मंडप (बूथ) असतील तर प्रत्येक मंडपातील केंद्राध्यक्षास मिळालेल्या मतपत्रिकांची संख्या
२. मतदारांना दिलेल्या मतपत्रिकांची संख्या ... .
३. परत केलेल्या, न वापरण्यात आलेल्या मतपत्रिकांची संख्या ...
४. रद्द करण्यात आलेल्या मतपत्रिकांची संख्या ... ...
५. वापरलेल्या प्रदत्त मतपत्रिकांची संख्या ... ...
६. मतपेटचातील मतपत्रिकांची संख्या ... ...

दिनांक : मतदान केंद्राध्यक्षाची सही

भाग दोन

सुरुवातीच्या मोजणीचा निकाल

१. मतदानकेंद्रावर वापरण्यात आलेल्या मतपेटीत (पेटचांत) आढळून आलेल्या मतपत्रिकांची एकूण संख्या.
२. भाग एक मधील बाब ६ व भाग दोन मधील बाब १ अनुसार मतपेटीतील मतपत्रिकांच्या संख्येतील विसंगती, कोणतीही असल्यास.

दिनांक : मतमोजणी पर्यवेक्षकाची सही .....

निर्वाचन अधिकाऱ्याची सही .....

टीप – जर मतदानकेंद्रात एकाहून अधिक मतदान मंडप असतील तर अशा प्रत्येक मतदान मंडपाचे बाबतीत, या नमुन्यानुसारचे हिशेब, या हिशेबासह जोडण्यात येतील.

नमुना १३-अ

[नियम ४३ पहा]

भाग एक

मतपत्रिकांचा हिशेब

..... नगरपालिकेच्या अध्यक्षाच्या पदासाठी निवडणूक

मतदानकेंद्र .....

	अनुक्रमांक एकूण संख्या
१. मतदानकेंद्रातील किंवा मतदानकेंद्रात एकाहून अधिक मंडप (बूथ) असतील तर प्रत्येक मंडपातील केंद्राध्यक्षास मिळालेल्या मतपत्रिकांची संख्या.	
२. मतदारांना दिलेल्या मतपत्रिकांची संख्या	
३. परत केलेल्या, न वापरण्यात आलेल्या मतपत्रिकांची संख्या	
४. रद्द करण्यात आलेल्या मतपत्रिकांची संख्या	
५. वापरलेल्या प्रदत्त मतपत्रिकांची संख्या	
६. मतपेटयातील मतपत्रिकांची संख्या	

दिनांक : मतदान केंद्राध्यक्षाची सही

भाग दोन

सुरुवातीच्या मोजणीचा निकाल

१. मतदानकेंद्रावर वापरण्यात आलेल्या मतपेटीत (पेटयांत) आढळून आलेल्या मतपत्रिकांची एकूण संख्या.	
२. भाग एकमधील बाब ६ व भाग दोन मधील बाब १ अनुसार मतपेटीतील मतपत्रिकांच्या संख्येतील विसंगती, कोणतीही असल्यास.	

दिनांक : मतमोजणी पर्यवेक्षकाची सही .....

निर्वाचन अधिकाऱ्याची सही .....

टीप – जर मतदानकद्रात एकाहून अधिक मतदान मंडप असतील तर अशा प्रत्येक मतदान मंडपाचे बाबतीत, या नमुन्यानुसारचे हिशेब, या हिशेबासह जोडण्यात येतील.

नमुना १४

[नियम ५४ व ५७ पहा]

निकालपत्र

..... नगरपालिकेची ..... प्रभागातील निवडणूक

मतदानकेंद्र		मिळालेल्या विधिग्राह्य मतांची संख्या				मतसंख्या			प्रदत्त मतांची संख्या	शेरा
अनुक्रमांक	नाव	अ ला	ब ला	क ला	इत्यादी ला	विधिग्राह्य मते	नाकारलेली मते	मतदानकेंद्रातील एकूण मते		
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)	(११)

मतदानकेंद्रात नोंदलेली एकूण मतसंख्या

ठिकाण :

दिनांक :

निर्वाचन अधिकारी

नमुना १४-अ

[नियम ५४ व ५७ पहा]

निकालपत्र

. . . . . नगरपालिकेच्या अध्यक्षाच्या पदासाठी निवडणूक.

भाग एक

प्रभागाचे नाव किंवा क्रमांक	मतदानकेंद्र क्रमांक	मतपेटीत (पेट्यांत) आढळून आलेली एकूण मते	प्रदत्त मतांची संख्या
(१)	(२)	(३)	(४)
१.			
२.			
३.			
एकूण	...		

भाग दोन

फेरी	मिळालेल्या विधिग्राह्य मतांची संख्या — अ ला, ब ला, क ला, ड ला इत्यादींना	एकूण विधिग्राह्य मते	नाकारलेल्या मतपत्रिकांची संख्या	विधिग्राह्य व नाकारलेली एकूण मते
पहिली फेरी . . .				
दुसरी फेरी . . .				
तिसरी फेरी इत्यादी				
एकूण . . .				

ठिकाण :

दिनांक :

निर्वाचन अधिकारी

नमुना १५

[नियम ५९ पहा]

निवडणूक विवरण

..... नगरपालिकेची ..... प्रभागातील निवडणूक

१९.....

अनुक्रमांक (१)	उमेदवाराचे नाव (२)	उमेदवारास मिळालेल्या विधिग्राह्य मतांची संख्या (३)
१		
२		
३		
४		
वगैरे		
	विधिग्राह्य मतांची एकूण संख्या ...	
	विधिअग्राह्य मतांची एकूण संख्या ...	
	प्रदत्त मतांची एकूण संख्या ...	

मी जाहीर करतो की,

नाव .....

पत्ता .....

हे रीतसर निवडून आले आहेत.

ठिकाण :

दिनांक :

निर्वाचन अधिकाऱ्याची सही

नमुना १५-अ

[नियम ५९ पहा]

निवडणूक विवरण

..... नगरपालिकेच्या अध्यक्षाच्या पदासाठी निवडणूक

..... १९ .....

अनुक्रमांक (१)	उमेदवाराचे नाव (२)	उमेदवारास मिळालेल्या विधिग्राह्य मतांची संख्या (३)
१		
२		
३		
४		

इत्यादी

विधिग्राह्य मतांची एकूण संख्या .....

विधिअग्राह्य मतांची एकूण संख्या .....

प्रदत्त मतांची एकूण संख्या .....

मी जाहीर करतो की,

नाव .....

पत्ता .....

हे, रीतसर निवडून आले आहेत.

ठिकाण :

दिनांक : निर्वाचन अधिकाऱ्याची सही

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,
पी. एन. पळणिटकर
शासनाचे उपसचिव

महाराष्ट्र नगरपालिका (पालिकासदस्यांना करासंबंधी विशेष नोटीस काढणे) नियम, १९६७

[कलम ४५ (२) सहकलम ३२१ (२) खालील]

अधिसूचनांची सूची

अ. नं.	विभागाचे नाव	अधिसूचनेचा क्रमांक	अधिसूचनेचा दिनांक	महाराष्ट्र शासन राजपत्रातील प्रसिद्धी			शेरा
				भाग	दिनांक	पृष्ठ क्रमांक	
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)
१	नगरविकास, आरोग्य व गृहनिर्माण विभाग	यूएमआर–१५६७/ एकीकरण चार	२५ मे १९६७	चार–ब, असाधारण	२५ मे १९६७	१२४३ ते १२४४	मुख्य नियम

नगरविकास, आरोग्य व गृहनिर्माण विभाग

सचिवालय, मुंबई, दिनांक २५ मे १९६७

महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५

क्रमांक यूएमआर–१५६७–एकीकरण–चार–महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०) याच्या कलम ३२१ चे पोट-कलम (२) व कलम ४५ चे पोट-कलम (२) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा व त्यास त्या बाबतीत समर्थ करणाऱ्या इतर सर्व शक्तींचा वापर करून, महाराष्ट्र शासन, पूर्वप्रसिद्धीनंतर याद्वारे पुढील नियम करीत आहे :–

नियम

१. **संक्षिप्त नाव** – या नियमास महाराष्ट्र नगरपालिका (पालिका-सदस्यांना करासंबंधी विशेष नोटीस काढणे) नियम, १९६७ असे म्हणता येईल.

२. **कलम ४५ च्या पोट-कलम (२) अन्वये काढावयाच्या विशेष नोटिशीचा नमुना** –महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०) यातील कलम ४५ च्या पोट-कलम (२) अन्वये, मुख्य अधिकाऱ्याने काढावयाची विशेष नोटीस, या नियमांना जोडण्यात आलेल्या नमुन्यात असेल.

नमुना

विशेष नोटिशीचा नमुना कलम ४५, पोट-कलम (२) खालील

(नियम २ पहा)

श्री. अ. ब. ..... पालिका-सदस्य / उपाध्यक्ष / अध्यक्ष, ... नगरपालिका, राहणार ..... यांस

आपल्याला नोटीस देण्यात येत आहे की, महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०) याच्या कलम १५१ अन्वये आपल्यावर मागणी नोटीस बजावण्यात आली असूनही, आपण खाली विनिर्दिष्ट केलेला व आपल्याकडून ..... नगरपालिकेला देणे असलेला

कर, उक्त कर देय झाल्याच्या तारखेपासून दोन महिन्यांच्या आत, ... १९ ..... च्या पहिल्या तारखेस भरण्यात कसूर केली आहे :–

कराचे नाव (१)	कराची रक्कम (२)	कर ज्या तारखेपासून देय झाला आहे ती तारीख (३)
	रुपये	

कराची एकूण देय रक्कम रुपये .....

महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०) याचे कलम ४५, पोट-कलम (२) याच्या उपबंधांस अनुसरून, आपल्याकडून देय असलेली उक्त रक्कम रुपये ....., ही विशेष नोटीस पाठवल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत भरण्यास आपणास याद्वारे फर्माविण्यात येत आहे.

आज दिनांक :

(सही) .....

मुख्य अधिकारी

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,
पी. एन. पळणिटकर
शासनाचे उपसचिव

• •

महाराष्ट्र नगरपालिका (संरक्षित पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याबाबतच्या योजनांच्या अटी व शर्ती) नियम, १९७०

[कलम ५० (४) सहकलम ३२१ (२) खालील]

अधिसूचनांची सूची

अ. क्र.	विभागाचे नाव	अधिसूचनेचा क्रमांक	अधिसूचनेचा दिनांक	महाराष्ट्र शासन राजपत्रातील प्रसिद्धी			शेरा
				भाग	दिनांक	पृष्ठ क्रमांक	
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)
१	नगरविकास, आरोग्य व गृहनिर्माण विभाग.	यूएमए– १०६६/ ७२७२८ एकीकरण-चार.	५ सप्टेंबर १९७०.	एक-अ, असाधारण	५ सप्टेंबर १९७०	९९	मुख्य नियम

महाराष्ट्र नगरपालिका (विषय समित्यांच्या निवडणुका) नियम, १९६६

महाराष्ट्र नगरपालिका (विषय समित्यांच्या निवडणुका) नियम, १९६६

[कलमे ६३ (२) (ब) आणि (३) व ६४ (दोन) (ब) यांसह कलम ३२१ (२) खालील]

अधिसूचनांची सूची

अ. क्र.	विभागाचे नाव	अधिसूचनेचा क्रमांक	अधिसूचनेचा दिनांक	महाराष्ट्र शासन राजपत्रातील प्रसिद्धी			शेरा
				भाग	दिनांक	पृष्ठ कमांक	
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)
१	नगरविकास, आरोग्य व गृहनिर्माण विभाग	यूएमआर–१९६६/ एकीकरण–चार	१० जून १९६६	चार–ब, असाधारण	१० जून १९६६	४४१ ते ४५०	मुख्य नियम
२	वरीलप्रमाणे	यूएमआर–१९६७/ एकीकरण–चार	१६ सप्टेंबर १९६७	वरीलप्रमाणे	१७ सप्टेंबर १९६७	१७४७ ते १७४८	सुधारणा
३	वरीलप्रमाणे	वरीलप्रमाणे	१४ ऑक्टोबर १९६९	वरीलप्रमाणे	१४ ऑक्टोबर १९६९	८९६ ते ८९७	वरील-प्रमाणे
४	वरीलप्रमाणे	एएमआर–१०७०/ ३५६१९–चार	८ एप्रिल १९७१	एक–अ, असाधारण	८ एप्रिल १९७१	३०	वरील-प्रमाणे

नगरविकास, आरोग्य व गृहनिर्माण विभाग

सचिवालय, मुंबई, दिनांक १० जून १९६६

महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५

क्रमांक यूएमआर–१९६६–एकीकरण–चार –महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०) यांच्या कलम ३२१, पोट-कलम (२) आणि कलम ६३, पोट-कलम (३), खंड (ब) आणि पोट-कलम (३) व कलम ६४, खंड (दोन), उप-खंड (ब) याअन्वये प्रदान केलेल्या शक्तींचा व महाराष्ट्र शासनास त्या बाबतीत समर्थ करणाऱ्या इतर सर्व शक्तींचा वापर करून महाराष्ट्र शासन पूर्वप्रसिद्धीनंतर याद्वारे पुढील नियम करीत आहे :–

१. **संक्षिप्त नाव** – या नियमांना महाराष्ट्र नगरपालिका (विषय समित्यांच्या निवडणुका) नियम, १९६६ असे म्हणता येईल.

२. **व्याख्या** – या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,

(अ) "अधिनियम" म्हणजे, महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५;

(ब) "चालू राहणारा उमेदवार" म्हणजे, निवडून न आलेला आणि कोणत्याही ठरवून दिलेल्या वेळी मतदानातून वगळण्यात न आलेला कोणताही उमेदवार;

(क) "मोजणी" म्हणजे,

(i) उमेदवारांकरिता नोंद केलेल्या पहिल्या पसंतीक्रमाच्या मोजणीत अंतर्भूत असलेली सर्व कामे, किंवा

(ii) निर्वाचित उमेदवाराच्या अधिक मतांच्या हस्तांतरणात अंतर्भूत असलेली सर्व कामे, किंवा

(iii) वगळलेल्या मतांच्या एकूण मूल्याच्या हस्तांतरणात अंतर्भूत असलेली सर्व कामे;

(ड) "निःशेषित पत्रिका" म्हणजे, चालू राहणाऱ्या उमेदवाराकरिता ज्यावर पुढील पसंतीक्रम नमूद केलेला नाही अशी मतपत्रिका, परंतु पुढील कारणांसाठी ही पत्रिका निःशेषित झाल्याचे समजण्यात येईल :–

(i) दोन किंवा अधिक उमेदवारांची–मग ते चालू राहणारे असोत किंवा नसोत–नावे एकाच आकडयाने चिन्हांकित करण्यात आली असतील आणि पसंतीक्रमात लगेच नंतरची असतील, किंवा

(ii) पसंतीक्रमात लगेच नंतरच्या असलेल्या उमेदवाराचे नाव–मग तो चालू राहणारा असो किंवा नसो–मतपत्रिकेवरील इतर कोणत्याही

आकडयानंतर लगेच येणाऱ्या आकडयाने किंवा दोन किंवा अधिक आकडयांनी चिन्हांकित केले असेल;

(ई) "प्रथम पसंतीक्रम" म्हणजे, उमेदवाराच्या नावासमोर लिहिलेला १ हा आकडा; "दुसरा पसंतीक्रम" म्हणजे उमेदवाराच्या नावासमोर लिहिलेला २ हा आकडा; "तिसरा पसंतीक्रम" म्हणजे, उमेदवाराच्या नावासमोर लिहिलेला ३ हा आकडा आणि त्याचप्रमाणे त्यापुढील आकडे;

(फ) कोणत्याही उमेदवाराच्या संबंधात "मूळ मत" म्हणजे जिच्यावर अशा उमेदवारासाठी प्रथम पसंतीक्रम नोंदण्यात आला असेल अशा मतपत्रिकेवरील मत;

(ग) "पीठासीन प्राधिकारी" म्हणजे, विषय समित्यांच्या किंवा स्थायी समित्यांच्या निवडणुका नगरपालिकेच्या ज्या सभेमध्ये घ्यावयाच्या असतील त्या सभेच्या अध्यक्षस्थानी असलेला अध्यक्ष, उपाध्यक्ष किंवा कोणताही पालिका-सदस्य;

(ह) "कलम" म्हणजे अधिनियमाचे कलम;

(आय) "विषय समिती" म्हणजे 'अ', 'ब' किंवा 'क' वर्ग नगरपालिकेची विषय समिती;

(जे) "अधिक (मते)" म्हणजे, कोणत्याही उमेदवाराच्या मूळ आणि हस्तांतरित मतांचे एकूण मूल्य ठरीव प्रमाणापेक्षा ज्या संख्येने अधिक होत असेल ती संख्या;

(के) कोणत्याही उमेदवाराच्या संबंधात "हस्तांतरित मत" म्हणजे, ज्याचे मूल्य किंवा ज्याच्या मूल्याचा भाग अशा उमेदवाराच्या नावावर जमा करण्यात आला असेल आणि ज्या मतपत्रिकेवर अशा उमेदवारामुळे दुसरा किंवा नंतरचा पसंतीक्रम नोंदण्यात आला असेल अशा मतपत्रिकेवरून घेण्यात आले असेल असे मत;

(ल) "शेषित (अन्-एक्झॉस्टेड) पत्रिका" म्हणजे, चालू राहणाऱ्या उमेदवारासाठी जिच्यावर पुढील पसंतीक्रम नमूद केला असेल अशी मतपत्रिका;

(म) या नियमांमध्ये वापरलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, अधिनियमात त्यांना अनुक्रमे जे अर्थ नेमून दिलेले असतील तेच अर्थ असतील.

३. विषय समितीच्या निवडणुकीसाठी सभा – 'अ' किंवा 'ब' वर्ग नगरपालिकेच्या बाबतीत, कलम ६३, पोट-कलम (२), खंड (ब) अन्वये घेतलेल्या आणि 'क' वर्ग नगरपालिकेच्या बाबतीत कलम ६५, पोट-कलम (४), खंड (क) अन्वये घेतलेल्या, विषय समित्यांच्या पहिल्या निवडणुकीव्यतिरिक्त, विषय समित्यांच्या नंतरच्या सर्व निवडणुकी, विषय समित्यांच्या सदस्यांचा पदावधी

संपण्याच्या पूर्वी एक आठवडयापेक्षा उशिराची नसेल अशा तारखेस त्या प्रयोजनासाठी बोलावलेल्या, नगरपालिकेच्या विशेष सभेमध्ये घेण्यात येतील.

४. **नामनिर्देशने भरणे** – [१] नगरपालिकेच्या ज्या सभेमध्ये, विषय समितीच्या किंवा समित्यांच्या निवडणुका घ्यावयाच्या असतील त्या सभेसाठी निश्चित केलेल्या वेळेपूर्वी दोन तासांपेक्षा कमी नसेल अशा वेळी कोणत्याही पालिका-सदस्यास, योग्य प्रकारे भरलेले व नाव सुचविणारी व्यक्ती म्हणून त्याने स्वतः सही केलेले, या नियमांना जोडलेल्या नमुना १ मधील नामनिर्देशन पत्र मुख्य अधिकाऱ्याच्या स्वाधीन करता येईल. नमुन्यातील नामनिर्देशनावर उमेदवार सही करील.

[२] नामनिर्देशन पत्र मिळाल्यावर मुख्य अधिकारी नमुना १ मधील पृष्ठांकन योग्यरीत्या भरील.

[३] या नियमांमधील कोणत्याही गोष्टीमुळे कोणत्याही उमेदवारास एकापेक्षा अधिक नामनिर्देशन पत्रांद्वारे नामनिर्देशित केले जाण्यास प्रतिबंध होणार नाही.

५. **नामनिर्देशनांची छाननी** – [१] सभेच्या प्रारंभी, पीठासीन प्राधिकारी पूर्ववर्ती नियमांन्वये मुख्य अधिकाऱ्यांच्या स्वाधीन केलेल्या नामनिर्देशन पत्रांची छाननी करील आणि आपला निर्णय त्यावर नमूद करील. जर कोणतेही नामनिर्देशन नामंजूर करण्यात आले तर तो ते नामंजूर करण्यासंबंधीच्या त्याच्या कारणांचे एक संक्षिप्त निवेदन लेखी नमूद करील. त्यानंतर तो त्याच्या मते वैध रीतीने नामनिर्देशित करण्यात आलेल्या उमेदवारांची नावे व त्यांचे नाव सुचविणाऱ्या व्यक्तींची नावे सभेस वाचून दाखवील. कोणत्याही उमेदवारास पीठासीन प्राधिकाऱ्याने दिलेल्या लेखी नोटिशीद्वारे आपली उमेदवारी मागे घेता येईल.

[२] भरीव स्वरूपाचा नसेल असा कोणताही दोष असल्याच्या कारणावरून पीठासीन प्राधिकारी कोणतेही नामनिर्देशन नामंजूर करणार नाही.

६. **निवडणुकीची कार्यपद्धती** – [१] ज्यांनी आपली उमेदवारी मागे घेतली नसेल अशा, वैध रीतीने नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची संख्या निवडून द्यावयाच्या व्यक्तींच्या संख्येइतकी किंवा तिच्यापेक्षा कमी असेल तर पीठासीन प्राधिकारी असे सर्व उमेदवार यथोचितरीत्या निवडून आल्याचे ताबडतोब जाहीर करील व उर्वरित व्यक्तींची निवडणूक कोणत्याही नंतरच्या सभेमध्ये करता येईल.

[२] ज्यांनी आपली उमेदवारी मागे घेतली नसेल अशा, वैध रीतीने नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची संख्या भरावयाच्या रिक्त पदांच्या संख्येपेक्षा अधिक असेल तर सभेमध्ये उपस्थित असलेले पालिका सदस्य यात यापुढे विहित केलेल्या रीतीने उमेदवारांच्या निवडणुकीस सुरुवात करतील.

[३] एकलसंक्रमणीय मताद्वारे प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या पद्धतीने निवडणूक घेण्यात येईल. त्यासाठी गुप्त मतदान पद्धतीने मतदान होईल. पीठासन प्राधिकारी

सभेस उपस्थित असलेल्या प्रत्येक पालिका-सदस्यास पुढील नमुन्यात तयार केलेली मतपत्रिका पुरवील :–

मतपत्रिका

. . . . . नगरपालिका

. . . . . समितीची निवडणूक

वैध रीतीने नामनिर्देशित केलेल्या आणि ज्यांनी आपली उमेदवारी मागे घेतली नसेल अशा उमेदवारांची नावे	पसंतीक्रम
१.	. . . . .
२.	. . . . .
३.	. . . . .
४.	. . . . .

इत्यादी

दिनांक : पीठासीन प्राधिकाऱ्याची सही

(अ) निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची नावे ही, ज्यांना आडनावे आहेत अशा उमेदवारांची आडनावे व इतर उमेदवारांची विशेष नावे यावरून ठरविण्यात आलेल्या वर्णक्रमानुसार मतपत्रिकेवर लावण्यात येतील.

मतपत्रिकेतील तपशील आणि अनुसरावयाचा वर्णक्रम हा, कार्यवृत्त ठेवण्यासाठी अधिनियमाच्या कलम ८१, खंड (१२) अन्वये नगरपालिकेने जी भाषा स्वीकारली आहे त्या भाषेत असेल.

(ब) प्रत्येक मतपत्रिकेवर पीठासीन प्राधिकारी सही करील.

७. मतदान पद्धती – [१] प्रत्येक पालिका-सदस्यास, भरावयाच्या जागांची संख्या लक्षात न घेता, निवडणुकीसाठी फक्त एकच मत असेल.

[२] प्रत्येक पालिका-सदस्य, आपले मत देताना –

(अ) त्याच्या मतपत्रिकेवरील, प्रथमतः त्याला ज्यास मत द्यावयाचे असेल त्या मतदाराच्या नावापुढील जागेत १ हा आकडा लिहील; आणि

(ब) त्यास, त्याच्या पसंतीक्रमानुसार इतर उमेदवारांच्या नावापुढेही २ हा आकडा, किंवा २ आणि ३ हे आकडे किंवा २, ३ आणि ४ हे आकडे आणि पुढील आकडे लिहिता येतील आणि तो पत्रिकेची घडी घालून ती मतपेटीत टाकील.

[३] (अ) मतदार निरक्षरता, अंधत्व किंवा इतर प्रकारचे अंपगत्व या कारणांमुळे मतपत्रिका वाचण्यास किंवा पोट-नियम (२) ला अनुसरून मत नोंदण्यास असमर्थ असेल तर, मतदान केंद्राध्यक्ष, अशी निरक्षरता, अंधत्व किंवा इतर प्रकारचे अपंगत्व याबद्दल खात्री करून घेतल्यावर, मतदारास, एकवीस वर्षांपेक्षा कमी नसेल असा मतपत्रिका वाचता येणारा आणि मतदाराच्या वतीने व त्याच्या इच्छेनुसार मतनोंदणी करू शकेल आणि आवश्यक असेल तर मतदान, गुप्त ठेवण्याच्या हेतूने, मतपत्रिकेची घडी करून, ती मतपेटीत टाकू शकेल असा, मदतनीस घेण्यास मतदारास परवानगी देईल.

परंतु, कोणत्याही मतदानकेंद्रावर, त्याच दिवशी, एकापेक्षा अधिक मतदारांचा मदतनीस म्हणून काम करण्यास, कोणत्याही व्यक्तीस परवानगी देण्यात येणार नाही.

आणखी असे की, ह्या पोट-नियमान्वये कोणत्याही दिवशी मतदाराचा मदतनीस म्हणून कोणत्याही व्यक्तीस काम करण्यास परवानगी देण्यापूर्वी, उक्त व्यक्तीस, मतदाराच्या वतीनें तिने नमूद केलेले मत गुप्त ठेवण्यात येईल आणि तिने त्या दिवशी कोणत्याही मतदानकेंद्रावर इतर कोणत्याही मतदाराचा मदतनीस म्हणून काम केलेले नाही अशा अर्थाचे प्रतिपादन करून देणे आवश्यक असेल.

(ब) मतदान केंद्राध्यक्ष, या नियमाखालील अशा सर्व प्रकरणांची नोंद, नमुना २ मध्ये ठेवील.

(क) मतदान केंद्राध्यक्ष, मतदाराच्या मदतनीसाने त्यास तशी विनंती केल्यास मत नोंदविण्यासंबंधीच्या सूचना त्यास स्पष्ट करून सांगेल.

८. **मतपत्रिकांची छाननी** – [१] मतदान झाल्यानंतर लगेच, पीठासीन प्राधिकारी, उपस्थित असलेल्या पालिका–सदस्यांच्या उपस्थितीत मतपेटीतून काढलेल्या मतपत्रिकांची छाननी करील आणि ज्या मतपत्रिका तो फेटाळील त्यावर "फेटाळण्यात आली" असे पृष्ठांकन करून व त्यावर त्याची कारणे देऊन त्यातून, त्यास वैध वाटतील अशा मतपत्रिका वेगळ्या करील.

[२] (अ) ज्यावर १ आकडा नाही अशी; किंवा

(ब) ज्यावर १ आकडा एकापेक्षा अधिक उमेदवारांच्या नावांपुढे लिहिण्यात आला आहे किंवा तो अशा तऱ्हेने लिहिला आहे की तो कोणत्या उमेदवारासाठी आहे याबद्दल शंका निर्माण होईल अशी; किंवा

(क) ज्यावर एकाच उमेदवाराच्या नावापुढे १ आकडा आणि काही इतर आकडे लिहिले आहेत अशी; किंवा

(ड) ज्यावर असे एखादे चिन्ह किंवा लिखाण आहे की ज्यायोगे मत देणाऱ्या पालिका-सदस्याची ओळख पटू शकेल अशी –

मतपत्रिका अवैध असेल.

९. वैध मतपत्रिका पुडक्यात बांधण्याची व्यवस्था – अवैध असलेल्या मतपत्रिका बाद केल्यानंतर पीठासीन प्राधिकारी –

(अ) प्रत्येक उमेदवारासाठी नमूद केलेल्या प्रथम पसंतीक्रमानुसार, उरलेल्या मतपत्रिका पुडक्यात बांधण्याची व्यवस्था करील;

(ब) प्रत्येक पुडक्यातील मतपत्रिकांची संख्या मोजील व एकूण संख्या नमूद करील; आणि

(क) प्रत्येक उमेदवाराच्या नावावर त्याच्या पुडक्यातील पत्रिकांचे मूल्य (आकडा) जमा करील.

१०. फक्त एकच जागा भरावयाची असेल त्या बाबतीत मतांची मोजणी – [१] फक्त एकच जागा भरावयाची असेल अशा कोणत्याही निवडणुकीच्या वेळी, प्रत्येक मतमोजणीच्या वेळी प्रत्येक वैध मतपत्रिकेचे मूल्य १ हे समजण्यात येईल आणि निवडणुकीतील उमेदवारास निवडून देण्यास निश्चित करण्यासाठी पुरेसे असलेले नियत प्रमाण पुढीलप्रमाणे ठरविण्यात येईल :–

(अ) नियम ९, खंड (क) अन्वये सर्व उमेदवारांच्या नावावर जमा असलेले मूल्य (मतसंख्या) मिळवून;

(ब) एकूण बेरजेला २ ने भागून; आणि

(क) बाकी, कोणतीही असल्यास, ती लक्षात न घेता भागाकारात १ मिळवून, येईल ती संख्या; हे नियत प्रमाण असेल.

[२] पहिल्या किंवा त्यानंतरच्या कोणत्याही मोजणीच्या शेवटी, कोणत्याही उमेदवाराच्या मतपत्रिकेचे एकूण मूल्य हे नियत प्रमाणाइतके किंवा त्याहून अधिक असेल किंवा चालू राहणारा उमेदवार हा एकच असेल तर उमेदवार निवडून आला असल्याचे जाहीर करण्यात येईल.

[३] कोणत्याही मोजणीच्या शेवटी, कोणताही उमेदवार निवडून आल्याचे जाहीर करण्यात आले नाही तर, पीठासीन प्राधिकारी,–

(अ) त्या टप्प्यापर्यंत ज्याच्या नावे कमीत कमी मूल्य (मते) जमा असेल त्या उमेदवारास मतनोंदणीतून वगळील;

(ब) त्याच्या पुडक्यातील व लहान पुडक्यांतील सर्व मतपत्रिकांची तपासणी करील, चालू राहणाऱ्या उमेदवारांसाठी त्यांवर नमूद केलेल्या नंतरच्या उपलब्ध पसंतीक्रमानुसार छोटया पुडक्यात शेषित पत्रिका लावील, अशा प्रत्येक छोटया पुडक्यातील पत्रिकांची संख्या मोजील व ती संख्या ज्याच्यासाठी असा पसंतीक्रम नमूद करण्यात आला असेल अशा उमेदवाराच्या नावावर जमा करील, त्या उमेदवाराकडे ते छोटे पुडके हस्तांतरित करील आणि सर्व शेषित पत्रिकांचे एक वेगळे छोटे पुडके तयार करील; आणि –

(क) अशा हस्तांतरणानंतर आणि जमेनंतर, चालू राहणाऱ्या उमेदवारांपैकी कोणालाही नियत प्रमाणात मते मिळाली किंवा नाही ते पाहील.

[४] पोट-नियम (३), खंड (अ) अन्वये एखादा उमेदवार वगळावयाचा असेल तेव्हा जर दोन किंवा अधिक उमेदवारांच्या नावे समान मूल्य असेल आणि ते मत-नोंदणीत सर्वांत खालच्या क्रमांकावर असतील तर ज्याच्या नावावर कमीत कमी मूळ मते नोंदण्यात आली असतील त्या उमेदवारास वगळण्यात येईल आणि ही संख्या देखील दोन किंवा अधिक उमेदवारांच्या बाबतीत समान असेल तर पीठासीन प्राधिकारी, त्यांच्यापैकी कोणास वगळावे हे चिठ्ठ्या टाकून ठरवील.

११. एकापेक्षा अधिक जागा भरावयाच्या असतील तेव्हा मतांच्या निश्चित प्रमाणाची खात्री करून घेणे – एकापेक्षा अधिक उमेदवारांना निवडावयाचे असेल अशा कोणत्याही निवडणुकीत प्रत्येक वैध मतपत्रिकेस १०० इतके मूल्य आहे असे समजण्यात येईल आणि निवडणुकीमध्ये उमेदवाराचे निवडून येणे निश्चित करण्या-साठी पुरेसे असणारे नियत प्रमाण हे पुढीलप्रमाणे ठरविण्यात येईल :–

(अ) नियम ९, खंड (क) अन्वये सर्व उमेदवारांच्या नावावर जमा असलेले मूल्य मिळवून;

(ब) भरावयाच्या जागांच्या संख्येमध्ये १ हा आकडा मिळवून त्या संख्येने एकूण मतसंख्येला भागून; आणि

(क) बाकी कोणतीही असल्यास, ती लक्षात न घेता भागाकारात १ मिळवून येईल ती संख्या हे नियत प्रमाण असेल.

१२. सर्वसाधारण सूचना – नियम १३ ते १७ च्या उपबंधाचे पालन करताना, पीठासीन प्राधिकारी सर्व अपूर्णांकांकडे दुर्लक्ष करील आणि अगोदरच निवडून आलेल्या किंवा मतदानातून वगळलेल्या उमेदवारांसाठी नमूद केलेले सर्व पसंतीक्रम लक्षात घेणार नाही.

१३. नियत प्रमाणानुसार निवडून आलेले उमेदवार – वगळलेल्या उमेदवाराच्या पुडक्याच्या किंवा छोटया पुडक्याच्या मोजणीच्या शेवटी किंवा हस्तांतरणाच्या शेवटी, उमेदवाराच्या नावे असलेले मतपत्रिकांचे मूल्य हे नियत प्रमाणाइतके किंवा त्याहून अधिक असेल तर, उमेदवार निवडून आल्याचे जाहीर करण्यात येईल.

१४. अधिक झालेल्या (मतांचे) हस्तांतरण – [१] कोणत्याही मोजणीच्या शेवटी, उमेदवारांच्या नावे असलेल्या मतपत्रिकांचे मूल्य हे नियत प्रमाणाहून अधिक असेल तर, या नियमाच्या उपबंधांनुसार, उमेदवाराच्या मतपत्रिकेवर दर्शविण्यात आलेल्या, चालू राहणाऱ्या उमेदवाराकडे, मत देणाऱ्या व्यक्तीच्या पसंतीक्रमानुसार नंतरचा असल्याप्रमाणे अधिक मते हस्तांतरित करण्यात येतील.

[२] जर एकापेक्षा अधिक उमेदवारांकडे अधिक मते असतील, तर, जास्तीत

जास्त अधिक मते ही प्रथम विचारात घेण्यात येतील आणि इतर मते परिमाणानुसार विचारात घेण्यात येतील :

परंतु असे की, पहिल्या मोजणीनंतर उरणारी अधिक मते ही दुसऱ्या मोजणीनंतर येणाऱ्या अधिक मतांपूर्वी विचारात घेण्यात येतील आणि त्याच पद्धतीने त्यानंतरही मते विचारात घेण्यात येतील.

[३] वाटप करावयाची, अधिक झालेली मते ही एकापेक्षा अधिक असतील आणि अधिक झालेली दोन किंवा जास्त मते समान असतील तर प्रत्येक उमेदवाराची मूळ मते लक्षात घेऊन ज्यासाठी अधिक मूळ मते नमूद करण्यात आली त्या उमेदवाराच्या अधिक मतांचे प्रथम वाटप करण्यात येईल; आणि त्यांच्या मूळ मतांचे मूल्य समान असेल त्या बाबतीत पीठासीन प्राधिकारी, कोणत्या उमेदवाराच्या अधिक झालेल्या मतांचे प्रथम वाटप करावे हे चिठ्ठ्या टाकून ठरवील.

[४] (अ) कोणत्याही उमेदवाराची, हस्तांतरित करावयाची, अधिक झालेली मते ही फक्त मूळ मतांतीलच असतील तर, त्या उमेदवाराच्या पुडक्यातील सर्व मतपत्रिकांची पीठासीन प्राधिकारी तपासणी करील, शेषित (unexhausted) पत्रिकांवर नोंद केलेल्या नंतरच्या पसंतीक्रमानुसार त्या पत्रिकांची छोट्या पुडक्यांमध्ये विभागणी करील आणि निःशेषित पत्रिकांचे एक स्वतंत्र छोटे पुडके तयार करील.

(ब) प्रत्येक छोट्या पुडक्यातील पत्रिकांच्या मूल्याची आणि सर्व शेषित (unexhausted) पत्रिकांच्या मूल्याची खात्री करून घेईल.

(क) शेषित पत्रिकांचे मूल्य अधिक झालेल्या मतांइतके किंवा त्याहून कमी असल्यास, ज्याची अधिक मते हस्तांतरित करावयाची त्या उमेदवारास ती ज्या मूल्याने मिळाली त्या मूल्याने त्या सर्व शेषित पत्रिका हस्तांतरित करील.

(ड) शेषित पत्रिकांचे मूल्य अधिक झालेल्या मतांपेक्षा अधिक असल्यास, तो शेषित पत्रिकांची पुडकी हस्तांतरित करील आणि ज्या मूल्याने प्रत्येक पत्रिका हस्तांतरित करावयाची ते मूल्य, अधिक मतांना शेषित पत्रिकांच्या एकूण संख्येने भागून मिळविण्यात येईल.

[५] कोणत्याही उमेदवाराची, हस्तांतरित करावयाची, अधिक झालेली मते ही, हस्तांतरित तसेच मूळ मतांतील असतील त्या बाबतीत पीठासीन प्राधिकारी, उमेदवाराकडे शेवटी हस्तांतरित केलेल्या छोट्या पुडक्यातील सर्व पत्रिकांची पुन्हा तपासणी करील, शेषित पत्रिकांची, त्यावर नमूद केलेल्या नंतरच्या पसंतीक्रमानुसार विभागणी करील आणि नंतर, पोट-नियम (४) मध्ये निर्देश केलेल्या छोट्या पुडक्यांच्या बाबतीत उपबंधित केलेल्या रीतीनेच त्या छोट्या पुडक्यांवर कार्यवाही करील.

[६] प्रत्येक उमेदवाराकडे हस्तांतरित केलेल्या पत्रिका छोट्या पुडक्याच्या स्वरूपात, अशा उमेदवाराच्या पूर्वीच असलेल्या पत्रिकांमध्ये टाकण्यात येतील.

[७] निर्वाचित उमेदवाराच्या, पुडक्यातील किंवा छोट्या पुडक्यातील सर्व पत्रिका अंतिम कार्यवाही केलेल्या म्हणून वेगळ्या ठेवण्यात येतील.

१५. मतनोंदणीत सर्वांत शेवटी असलेल्या उमेदवारांना वगळणे –[१] यात यापूर्वी उपबंधित केलेल्या रीतीने सर्व अधिक मते हस्तांतरित केल्यानंतर, निर्वाचित उमेदवारांची संख्या आवश्यक संख्येहून कमी असल्यास, पीठासीन प्राधिकारी, मतनोंदणीत शेवटी असलेल्या उमेदवारास वगळील आणि त्याच्या शेषित पत्रिकांची, त्यावर नमूद केलेल्या नंतरच्या पसंतीक्रमानुसार चालू राहणाऱ्या उमेदवारांमध्ये वाटणी करील आणि कोणत्याही निःशेषित पत्रिका अंतिम कार्यवाही केलेल्या म्हणून वेगळ्या ठेवण्यात येतील.

[२] वगळलेल्या उमेदवारांची मूळ मते असलेल्या पत्रिका प्रथम हस्तांतरित करण्यात येतील; प्रत्येक पत्रिकेचे हस्तांतरण मूल्य शंभर इतके असेल.

[३] वगळलेल्या उमेदवारांची हस्तांतरित मते असणाऱ्या पत्रिका या त्यानंतर, ज्या क्रमाने व मूल्याने ती मते त्या उमेदवाराने मिळविली त्या क्रमाने व मूल्याने हस्तांतरित करण्यात येतील.

[४] असे प्रत्येक हस्तांतरण हे स्वतंत्र हस्तांतरण समजण्यात येईल; परंतु ते स्वतंत्र मोजणी म्हणून समजण्यात येणार नाही.

[५] पत्रिकांच्या हस्तांतरणामुळे उमेदवारास मिळालेल्या मतांचे मूल्य नियत प्रमाणाइतके किंवा त्याहून अधिक झाल्यास त्या वेळी चालू असलेली गणना पूर्ण करण्यात येईल; परंतु त्याच्याकडे आणखी कोणत्याही पत्रिका हस्तांतरित करण्यात येणार नाहीत.

[६] या नियमाद्वारे निदेशित केलेली कार्यपद्धती, नियत प्रमाणानुसार उमेदवाराची निवड होऊन किंवा यात यानंतर उपबंधित केलेल्या रीतीने अशी रिकामी जागा भरण्यात येईपर्यंत, मतनोंदणीत सर्वांत कमी मते असलेल्या एका उमेदवारास प्रथम व त्यानंतर त्याच्यापेक्षा अधिक मते असलेल्या उमेदवारांना एकानंतर एक याप्रमाणे क्रमाक्रमाने वगळण्यात येईल.

[७] एखाद्या उमेदवारास वगळणे कोणत्याही वेळी आवश्यक होईल आणि दोन किंवा अधिक उमेदवारांच्या मतांचे मूल्य समान असेल आणि मतनोंदणीत ते सर्वांत शेवटी असतील तर, प्रत्येक उमेदवाराची मूळ मते विचारात घेण्यात येतील आणि ज्याच्यासाठी सर्वांत कमी मूळ मते नोंदण्यात आली असतील अशा उमेदवारास वगळण्यात येईल; आणि जर त्या उमेदवारांच्या मूळ मतांची मूल्ये समान असतील तर, ज्या सर्वांत आधीच्या मोजणीच्या वेळी या उमेदवारांची मूल्ये समान नव्हती अशा मोजणीमध्ये ज्याचे मूल्य सर्वांत कमी होते अशा उमेदवारास वगळण्यात येईल

[८] मतनोंदणीत दोन किंवा अधिक उमेदवारांना सर्वांत कमी मते असतील आणि सर्व मोजण्यांच्या वेळी प्रत्येकाच्या मतांचे मूल्य समान असेल तर, पीठासीन प्राधिकारी कोणत्या उमेदवारास वगळायचे ते चिठ्ठ्या टाकून ठरवील.

१६. शेवटच्या रिकाम्या जागा भरणे – [१] कोणत्याही मोजणीच्या शेवटी, चालू राहणाऱ्या उमेदवारांची संख्या न भरलेल्या रिकाम्या जागांच्या संख्येइतकी कमी झाल्यास चालू राहणारे उमेदवार निवडून आल्याचे जाहीर करण्यात येईल.

[२] कोणत्याही मोजणीच्या शेवटी केवळ एक जागा रिकामी राहील आणि कोणत्याही एका उमेदवाराच्या पत्रिकांचे मूल्य हे हस्तांतरित न केलेल्या कोणत्याही अधिक मतांसह इतर सर्व चालू राहणाऱ्या उमेदवारांच्या पत्रिकांच्या एकूण मूल्यापेक्षा अधिक होत असेल त्या बाबतीत, तो उमेदवार निवडून आल्याचे जाहीर करण्यात येईल.

[३] कोणत्याही मोजणीच्या शेवटी केवळ एक जागा रिकामी राहील आणि चालू राहणारे उमेदवार केवळ दोन असतील व त्यांच्यापैकी प्रत्येकाच्या मतांचे मूल्य समान असेल व कोणतीही अधिक होणारी मते हस्तांतरित करणे शक्य असणार नाही त्या बाबतीत, त्यांच्यापैकी कोणास वगळण्यात यावे हे पीठासीन प्राधिकारी चिठ्ठ्या टाकून ठरवील; आणि तो त्या उमेदवारास पूर्वोक्त रीतीने वगळल्यानंतर दुसरा उमेदवार निवडून आल्याचे जाहीर करील.

१७. पुनर्मोजणीची तरतूद – [१] कोणत्याही उमेदवारास, मतांची मोजणी चालू असताना मतांच्या (अधिक होणाऱ्या किंवा इतर) कोणत्याही हस्तांतरणाच्या प्रारंभापूर्वी किंवा ते पूर्ण झाल्यानंतर, पीठासीन प्राधिकाऱ्यास सर्व किंवा कोणत्याही उमेदवारांच्या पत्रिकांची (कोणत्याही पूर्वीच्या हस्तांतरणाच्या वेळी अंतिमरीत्या कार्यवाही केलेल्या म्हणून वेगळ्या ठेवलेल्या पत्रिका नसतील अशा) पुनर्तपासणी आणि पुनर्मोजणी करण्यासाठी विनंती करता येईल आणि पीठासीन प्राधिकारी तदनुसार ताबडतोब त्यांची पुनर्तपासणी व पुनर्मोजणी करील.

[२] पीठासीन प्राधिकाऱ्यास, त्याच्या स्वेच्छानिर्णयानुसार, कोणत्याही पूर्वीच्या मोजणीच्या अचूकतेबद्दल त्याचे समाधान झाले नसेल अशा कोणत्याही बाबतीत मतांची एकदा किंवा एकाहून जास्त वेळा मोजणी करता येईल;

परंतु असे की, या पोट-नियमातील कोणत्याही गोष्टीमुळे त्याच मतांची एकापेक्षा अधिक वेळा पुनर्मोजणी करणे हे पीठासीन प्राधिकाऱ्यास बंधनकारक असणार नाही.

१८. निकाल जाहीर करणे – त्यानंतर पीठासीन प्राधिकारी विषय समित्यांवर निवडून आलेल्या उमेदवारांची यादी तयार करील, सर्व निर्वाचित सदस्यांची नावे वाचून दाखवील आणि यादीची एक प्रत नगरपालिकेच्या सूचना-फलकावर लावण्याचीदेखील व्यवस्था करील.

१९. परिणामस्वरूप किंवा आकस्मिकरीत्या रिकाम्या झालेल्या जागा भरणे – कलम ६३, पोट-कलम (३) अन्वयेच्या परिणामस्वरूप रिकाम्या जागांच्या संबंधातील निवडणुकींना किंवा कोणतीही आकस्मिकरीत्या रिकामी झालेली जागा भरण्यासाठी पूर्वगामी नियम योग्य त्या फेरफारांसह लागू होतील.

२०. स्थायी समित्यांच्या निवडणुका – पूर्वगामी नियम स्थायी समित्यांच्या संबंधातील निवडणुकींना योग्य त्या फेरफारांसह लागू होतील.

नमुना १

[नियम ४ पहा]

विषय समित्यांच्या किंवा स्थायी समितीच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशनाचा नमुना

१. नगरपालिकेचे नाव .....

२. उमेदवाराचे संपूर्ण नाव .....
(आडनावाने, कोणतेही असल्यास, सुरुवात करून)

३. उमेदवाराचा पत्ता .....

४. वय .....

५. स्त्री/पुरुष .....

६. ज्या समितीवर निवड व्हायची असेल ती समिती .....

७. नाव सुचविणाऱ्याचे संपूर्ण नाव व पत्ता .....

ठिकाण :

दिनांक : नाव सुचविणाऱ्याची सही

उमेदवाराचे प्रतिज्ञापत्र

मी, उपरिनामित उमेदवार, नगरपालिकेच्या .....समितींच्या निवडणुकीसाठी केलेल्या नामनिर्देशनास माझी संमती देत आहे.

उमेदवाराची सही

मुख्य अधिकाऱ्यांचे पृष्ठांकन

हे नामनिर्देशन पत्र ..... (नाव) यांनी ..... (दिनांक) रोजी ..... (वेळ) वाजता माझ्या स्वाधीन केले.

दिनांक : मुख्य अधिकाऱ्याची सही

नमुना २

[नियम ७ (३) (ब) पहा]

निरक्षर, अंध व अपंग मतदारांची यादी

..... नगरपालिकेच्या विषय समितीची निवडणूक

दिनांक ..... १९८ . रोजी ..... येथे घेतलेल्या सभेची तारीख

मतदाराचा भागक्रमांक व अनुक्रमांक	मतदाराचे संपूर्ण नाव	मदतनिसाचे संपूर्ण नाव	मदतनिसाचा पत्ता	मदतनिसाची सही

दिनांक :

मतदान केंद्राध्यक्षांची सही

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

बी. व्ही. लाड
शासनाचे उपसचिव

महाराष्ट्र नगरपालिका (कामकाज चालविणे) नियम, १९६६

[कलम ८१ (११), (१३) आणि (१९) यासह कलम ३२१ खालील]

अधिसूचनांची सूची

अ. नं.	विभागाचे नाव	अधिसूचनेचा क्रमांक	अधिसूचनेचा दिनांक	महाराष्ट्र शासन राजपत्रातील प्रसिद्धी			शेरा
				भाग	दिनांक	पृष्ठक्रमांक	
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)
१	नगरविकास, आरोग्य व गृहनिर्माण विभाग	यूएमआर१२६५–एकीकरण–चार	२१ जून १९६६	चार–ब, असाधारण	२१ जून १९६६	४६३ ते ४७७	मुख्य नियम
२	वरीलप्रमाणे	यूएमआर १२६७–एकीकरण–चार	१९ डिसेंबर १९६७	एक–अ, असाधारण	१९ डिसेंबर १९६७	८३	सुधारणा
३	वरीलप्रमाणे	यूएमआर-१२६७-२७३२१-एकीकरण–चार	२६ नोव्हेंबर १९६९	वरील-प्रमाणे	२६ नोव्हेंबर १९६९	७६	वरील-प्रमाणे

नगरविकास, आरोग्य व गृहनिर्माण विभाग

सचिवालय, मुंबई ३२, दिनांक २१ जून १९६६

महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५

क्रमांक यूएमआर–१२६५–एकीकरण–४ – महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०), याचे कलम, ३२१, पोट-कलम (२) व कलम ८१ चे खंड (११), (१३) व (१९) अन्वये प्रदान केलेल्या शक्तींचा व त्याबाबत शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व शक्तींचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे पूर्वप्रसिद्धीनंतर पुढील नियम करीत आहे –

१. संक्षिप्त नाव – या नियमांस महाराष्ट्र नगरपालिका (कामकाज चालविणे) नियम, १९६६ असे म्हणता येईल.

२. व्याख्या – संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या नियमांमध्ये –

(अ) "अधिनियम" म्हणजे, महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०);

(ब) "नमुना" म्हणजे, या नियमांना जोडलेला नमुना;

(क) "कलम" म्हणजे, अधिनियमाचे कलम.

३. सभेची नोटीस – [१] कलम ८१ च्या खंड (४) अन्वये भरणाऱ्या नगरपालिकेच्या सभेची प्रत्येक नोटीस नमुना 'अ' मध्ये असेल.

[[२] (कलम ८१, खंड (१४) मध्ये निर्दिष्ट केलेल्या सभेची नसेल) अशी प्रत्येक नोटीस नगरपालिका कार्यालयामध्ये लावून आणि त्याशिवाय ती पालिका-सदस्याच्या प्रत्यक्ष स्वाधीन करून किंवा देऊन किंवा प्रेषण प्रमाणपत्र (सर्टिफिकेट ऑफ पोस्टिंग) घेऊन साध्या डाकेने किंवा नोंदणी डाकेने त्याचा जो शेवटचा पत्ता माहीत असेल त्या पत्त्यावर पाठवून बजावता येईल.]

४. उपस्थिती नोंदवही – [१] पालिका-सदस्यांची नावे दर्शविणारी एक उपस्थिती नोंदवही नमुना 'ब' मध्ये ठेवण्यात येईल. ती, प्रत्येक सभेच्या सुरुवातीस सभागृहात ठेवण्यात येईल व सभेत उपस्थित असलेला प्रत्येक पालिका-सदस्य, सभागृहात प्रवेश केल्याबरोबर, उक्त नोंदवहीत त्याच्या नावासमोर आपली सही करील.

[२] जेव्हा एखादा पालिका-सदस्य आपली सही करण्यास असमर्थ होईल त्या बाबतीत त्यास इतर कोणत्याही पालिका-सदस्याच्या किंवा नगरपालिकेच्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या किंवा सेवकाच्या मदतीने नोंदवहीत आपल्या नावापुढे अंगठ्याचा ठसा उठविता येईल आणि असा अंगठ्याचा ठसा, पीठासीन प्राधिकाऱ्याने त्या बाबतीत अधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून योग्यरीत्या साक्षांकित करण्यात येईल.

५. कामकाजाचा क्रम – कलम ८१ च्या खंड (११)च्या उपबंधास अधीन राहून, प्रत्येक सभेसाठी कामकाजाचा क्रम, शक्य असेल तेथवर, पुढीलप्रमाणे लावण्यात येईल :–

(अ) नमुना 'क'चा भाग १ व भाग २ या अनुसार ठेवण्यात आलेले मागील सभेचे कार्यवृत्त कायम करणे;

(ब) पालिका-सदस्यांचे प्रश्न;

(क) सर्वसाधारण सभेने करावयाच्या निवडणुका व नेमणुका;

(ड) स्थायी समितीचे ठराव;

(ई) इतर कोणत्याही समित्यांचे ठराव;

(फ) शासन किंवा शासकीय अधिकाऱ्याकडून आलेला पत्रव्यवहार;

(ग) सभेमध्ये पार पाडावयाच्या कामकाजाचा भाग असेल अशा प्रस्तावांचा विचार;

(ह) सभेमध्ये पार पाडावयाचे इतर कोणतेही कामकाज.

६. सभापती किंवा उपसभापती याच्या अनुपस्थित पीठासीन प्राधिकारी – (सभेसाठी नेमलेल्या वेळी गणपूर्ती झालेली असेल आणि अध्यक्ष वेळेवर उपस्थित नसेल तर, उपाध्यक्षास आणि अशा ठिकाणी अध्यक्ष व उपाध्यक्ष दोघेही वेळेवर उपस्थित नसतील) तर कलम ८१ (६) च्या उपबंधास अधीन राहून सभेच्या ठिकाणी उपस्थित असलेल्या पालिका-सदस्यांपैकी एका पालिका-सदस्यास अध्यक्ष म्हणून निवडून देण्यात येईल :

परंतु –

(i) कामकाज सुरू झाल्यानंतर कोणत्याही वेळी अध्यक्ष सभेत उपस्थित झाला तर उपाध्यक्षाने किंवा अध्यक्षाचे काम चालविणारा पालिका-सदस्य अध्यक्षस्थान रिकामे करील व अध्यक्षाच्या अध्यक्षतेखाली सभा चालू ठेवण्यात येईल. आणि

(ii) कामकाज सुरू झाल्यानंतर उपाध्यक्ष सभेत उपस्थित झाला तर अध्यक्षाचे काम चालविणारा पालिका-सदस्य अध्यक्षस्थान रिकामे करील व उपाध्यक्षाच्या अध्यक्षतेखाली सभा चालू ठेवण्यात येईल.

७. हरकतीचा मुद्दा उपस्थित करणे – [१] कोणत्याही पालिका-सदस्यास कोणत्याही वेळी पीठासीन प्राधिकाऱ्याच्या निर्णयासाठी हरकतीचा मुद्दा सादर करता येईल; परंतु असे करताना तो आपले निवेदन मुद्दा सांगण्यापुरतेच मर्यादित करील.

[२] हरकतीच्या कोणत्याही मुद्यावर पीठासीन प्राधिकाऱ्याने दिलेला निर्णय अंतिम असेल.

[३] पीठासीन प्राधिकाऱ्याच्या संमतीवाचून हरकतीच्या कोणत्याही मुद्द्या-

वरील कोणत्याही चर्चेस परवानगी दिली जाणार नाही.

८. परत जागेवर बसणे – [१] पीठासीन प्राधिकाऱ्याने शांत राहण्यास सांगितलेला पालिका-सदस्य परत आपल्या जागेवर बसेल.

[२] एखादा पालिका-सदस्य भाषण करीत असताना जर कोणत्याही वेळी पीठासीन प्राधिकारी किंवा एखादा पालिका-सदस्य हरकतीचा मुद्दा उपस्थित करण्यास उभा राहिला तर भाषण करणारा पालिका-सदस्य ताबडतोब परत आपल्या जागेवर बसेल.

९. भाषणांचा कालावधी – पीठासीन प्राधिकाऱ्यास सभेपुढील कामकाजाची स्थिती व विषयाचे स्वरूप लक्षात घेऊन, कोणत्याही विषयावरील भाषणासाठी कालमर्यादा विहित करता येईल.

१०. भाषण करण्याची रीत [१] सभेपुढील कोणत्याही विषयावर बोलू इच्छिणारा पालिका-सदस्य आपल्या जागेवर उभा राहील आणि पीठासीन प्राधिकाऱ्याने सांगितल्यास तो पीठासीन प्राधिकाऱ्याला उद्देशून आपले अभिप्राय व्यक्त करील. जर त्यास तसे सांगितले नाही तर तो परत आपल्या जागेवर बसेल :

परंतु, जर एखादा पालिका-सदस्य आजारामुळे किंवा दुर्बलतेमुळे असमर्थ झाला असेल तर त्यास बसून सभेपुढे भाषण करण्याची पीठासीन प्राधिकाऱ्यास परवानगी देता येईल.

[२] एकाच वेळी एकाहून अधिक पालिका-सदस्य सभेपुढे भाषण करण्यास उभे राहिल्यास, प्रथम भाषण कोणी करावे हे पीठासीन प्राधिकारी ठरवील.

[३] पालिका-सदस्य आपले भाषण वाचून दाखविणार नाही; परंतु स्मृतीस उजाळा देण्यासाठी त्यास टिपणांचा उपयोग करता येईल.

११. सभेपुढे भाषण करण्याचा पीठासीन प्राधिकाऱ्याचा अधिकार – पीठासीन प्राधिकाऱ्यास वादविवादाच्या कोणत्याही अवस्थेत सभेपुढे भाषण करता येईल आणि असे भाषण करताना तो आपल्या जागेवर उभा राहील.

परंतु, जर पीठासीन प्राधिकारी आजारपणामुळे किंवा दुर्बलतेमुळे तसे करण्यास असमर्थ असेल तर त्यास बसून सभेपुढे भाषण करता येईल.

१२. भाषणातील अडथळा – जर एखादा पालिका-सदस्य भाषण करीत असताना, स्पष्टीकरण करण्याची किंवा भाषण करणाऱ्या पालिका-सदस्यांकडून कोणतेही स्पष्टीकरण किंवा माहिती मागण्याची दुसऱ्या पालिका-सदस्याची इच्छा असेल तर तो आपल्या जागेवर उभा राहील आणि पीठासीन प्राधिकाऱ्याने सांगितल्यास, स्पष्टीकरण देईल किंवा स्पष्टीकरण किंवा माहिती मागवील. पीठासीन प्राधिकाऱ्याने याप्रमाणे सांगितले नाही तर तो परत आपल्या जागेवर बसेल. भाषण करणारा पालिका-सदस्य परत आपल्या जागेवर बसल्याशिवाय, पीठासीन प्राधिकारी याप्रमाणे उभे राहणाऱ्या पालिका-सदस्यास भाषण करण्यास सांगणार नाही.

१३. पालिका-सदस्यांमधील संभाषण – कामकाजात अडथळा येईल किंवा भाषण करणाऱ्या पालिका-सदस्यांच्या भाषणात व्यत्यय येईल अशा रीतीने पालिका-सदस्यास आपापसात संभाषण करता येणार नाही.

१४. सभेतून बाहेर निघून जाणे – सभेचे कामकाज चालू असताना, सभेतून निघून जाण्याची इच्छा असलेला पालिका-सदस्य निघून जाण्याच्या निकटपूर्वी आपल्या जागेवर उठून उभा राहील व निघून जाण्याचा आपला इरादा पीठासीन प्राधिकाऱ्यास कळविण्यासाठी त्यास अभिवादन करील.

१५. प्रश्न – [१] पालिका-सदस्यांस, अधिनियमान्वये नगरपालिकेची कामे व कर्तव्ये यांच्याशी संबंधित असलेल्या बाबीसंबंधी अध्यक्षास किंवा स्थायी समितीच्या किंवा कोणत्याही विषय समितीच्या सभापतीस उद्देशून प्रश्न विचारता येतील.

[२] प्रश्न विचारणारा पालिका-सदस्य, प्रश्नाच्या प्रतीसह, त्याने सही किंवा अंगठ्याची निशाणी केलेली त्या प्रश्नाची नोटीस नगरपालिकेच्या ज्या सभेत त्या प्रश्नाचे उत्तर देण्यात येणार असेल त्या सभेच्या कमीत कमी पंधरा दिवस अगोदर मुख्य अधिकाऱ्यास देईल.

[३] पोट-नियम (५)च्या उपबंधास अधीन राहून, पीठासीन प्राधिकाऱ्यास, योग्य कारणासाठी वेळ वाढविणे योग्य वाटले तर, पालिका-सदस्यास त्या सभेत किंवा त्यानंतरच्या कोणत्याही सभेत तोंडी उत्तर मिळण्याचा हक्क असेल :

परंतु, पीठासीन प्राधिकाऱ्याच्या मते, तोंडी उत्तर देण्याजोग्या कोणत्याही प्रश्नाचे स्वरूप असे असेल की, त्याचे लेखी उत्तर देणे हेच अधिक उचित ठरेल तर, पीठासीन प्राधिकाऱ्यास त्या सभेत किंवा त्यानंतरच्या कोणत्याही सभेत अशा प्रश्नाचे उत्तर लेखी दिले पाहिजे, अशा निदेश देता येईल.

[४] त्या प्रश्नाचे उत्तर अध्यक्ष किंवा यथास्थिती, संबंधित सभापती देईल.

परंतु, मुख्य अधिकाऱ्यास पीठासीन प्राधिकाऱ्याच्या परवानगीने, अध्यक्षाच्या किंवा अशा सभापतीच्या वतीने कोणत्याही प्रश्नाचे उत्तर देता येईल.

[५] पीठासीन प्राधिकाऱ्यास,

(अ) ज्या प्रश्नाच्या बाबतीत, प्रश्न निर्दिष्ट करणारी पूर्ण पंधरा दिवसांची नोटीस मुख्य अधिकाऱ्यास देण्यात आली नसेल; किंवा

(ब) ज्या प्रश्नात मत प्रदर्शित करण्याची मागणी किंवा कायद्याच्या तात्त्विक प्रश्नाची किंवा काल्पनिक सिद्धान्ताची उकल करण्याची मागणी करण्यात आली असेल; किंवा

(क) कोणत्याही न्यायालयापुढे किंवा न्यायाधीकरणापुढे प्रलंबित असलेल्या कोणत्याही दाव्याशी किंवा कामकाजाशी जो संबंधित असेल, किंवा ज्या प्रश्नाचा प्रत्यक्षपणे संबंध असेल; किंवा

(ड) पालिका-सदस्यांच्या किंवा परिषदेकडे काम करीत असलेल्या किंवा

परिषदेने कामावर लावलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या किंवा कर्मचाऱ्याच्या, अधिकारी म्हणून किंवा लोकसेवक म्हणून असेल त्याव्यतिरिक्त, चारित्र्याशी, वर्तणुकीशी किंवा कामाशी संबंध असेल असा प्रश्न; किंवा

(ई) जो प्रश्न बदनामीकारक असेल किंवा सूचितार्थाने बदनामीकारक असेल किंवा ज्या प्रश्नामुळे कोणत्याही व्यक्तीच्या किंवा समाजाच्या वर्गाविरुद्ध वैयक्तिक चारित्र्यासंबंधीचा आरोप करण्यात येत असेल किंवा करण्याचे अभिप्रेत असेल; किंवा

(फ) ज्या प्रश्नामध्ये युक्तिवाद, अनुमाने, दोषारोप, उपरोधिक शब्दप्रयोग, विशेषणे किंवा बदनामीकारक मजकूर असेल; किंवा

(ग) नगरपालिका समितीचा संबंध नसलेल्या बाबीशी ज्या प्रश्नाचा संबंध असेल; किंवा

(ह) पीठासीन प्राधिकाऱ्याच्या मते जो प्रश्न निरर्थक, क्षुल्लक, त्रासदायक व क्षोभक असेल; किंवा

(आय) जो प्रश्न ज्या बाबी गुप्त स्वरूपाच्या आहेत अशा बाबींच्या संबंधात माहिती मिळविण्यासंबंधी असेल; किंवा

(ज) पीठासीन प्राधिकाऱ्यास किंवा नगरपालिकेच्या कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास विश्वासात घेऊन कळविलेल्या माहितीचा ज्यात अंतर्भाव असेल; किंवा

(के) प्रश्न सुगम होण्यासाठी अत्यंत आवश्यक नसेल असे कोणतेही नाव किंवा विधान ज्यात समाविष्ट असेल; किंवा

(ल) नगरपालिकेच्या सेवेतील अधिकाऱ्यांच्या किंवा सेवकांच्या तक्रारींचा समावेश असलेल्या वैयक्तिक सेवेच्या बाबीशी ज्या प्रश्नाचा संबंध असेल; किंवा

(म) जो प्रश्न अतिशय लांबलचक असेल; किंवा

(न) ज्या प्रश्नाचे पूर्वी उत्तर दिलेले असेल किंवा ज्यांची उत्तरे देण्याचे नाकारले असेल, प्रश्नांच्या विषयांची ज्यात पुनरावृत्ती करण्यात आली असेल;

अशा कोणत्याही प्रश्नास परवानगी नाकारता येईल :

परंतु, पीठासीन प्राधिकाऱ्यास, सुधारणा केलेल्या स्वरूपातील कोणत्याही प्रश्नास परवानगी देता येईल.

[६] कोणताही प्रश्न, पोट-नियम (५)च्या खंडांपैकी कोणत्याही खंडाखाली येतो किंवा नाही अशी कोणतीही शंका निर्माण झाल्यास, पीठासीन प्राधिकारी त्या मुद्यावर निर्णय देईल व त्याचा निर्णय अंतिम असेल.

[७] जर त्या प्रश्नात एखाद्या विधानाचा समावेश असेल तर त्या विधानाच्या

बिनचूकपणाबद्दल पालिका-सदस्य जबाबदार राहील.

[८] ह्या नियमाच्या उपबंधास अधीन राहून, ज्या प्रश्नास परवानगी नाकारण्यात आली नसेल असा प्रत्येक प्रश्न त्या दिवसाच्या प्रश्नांच्या यादीत दाखल करण्यात येईल आणि उपलब्ध वेळानुसार शक्य असेल तर, त्या यादीत त्याचा जो क्रम असेल त्या क्रमानुसार प्रत्येक प्रश्न चर्चेस घेण्यात येईल.

[९] प्रश्नाचे उत्तर देण्यात आल्यानंतर, कोणत्याही पालिका-सदस्यास, ज्या बाबतीत उत्तर देण्यात आले असेल अशा कोणत्याही बाबीसंबंधी आणखी माहिती काढण्याच्या कारणासाठी पुरवणी प्रश्न विचारता येतील :

परंतु, पीठासीन प्राधिकाऱ्याच्या मते, पुरवणी प्रश्नामुळे पोट-नियम (५)च्या उपबंधांपैकी कोणत्याही उपबंधाचा भंग होत असेल तर, त्यास कोणत्याही पुरवणी प्रश्नास परवानगी नाकारता येईल.

[१०] त्याच सभेत पुरवणी प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी पुरेशी माहिती उपलब्ध नाही अशी पीठासीन प्राधिकाऱ्याची खात्री झाली असेल तर, पीठासीन प्राधिकाऱ्यास, अशा प्रश्नाचे उत्तर नगरपालिकेच्या पुढील साधारण सभेत देण्यात यावे, असा निदेश देता येईल.

[११] कोणत्याही प्रश्नावर वादविवाद किंवा चर्चा करण्यास परवानगी दिली जाणार नाही.

[१२] मंजूर केलेले किंवा नामंजूर केलेले सर्व प्रश्न व त्यांना दिलेली उत्तरे, नोंदवहीच्या भाग तीन मधील नमुना 'क'मध्ये समाविष्ट करण्यात येतील.

१६. प्रस्तावाची ग्राह्यता – ज्या प्रस्तावात पुढील शर्तींचे पालन करण्यात आले नसेल, असा कोणताही प्रस्ताव ग्राह्य होणार नाही :–

(अ) तो स्पष्टपणे व मुद्देसूद भाषेत मांडलेला असेल व त्याद्वारे एक निश्चित मुद्दा उपस्थित करण्यात येईल;

(ब) त्यामध्ये युक्तिवाद, अनुमाने, उपरोधिक शब्दप्रयोग किंवा बदनामीकारक विधाने असणार नाहीत;

(क) त्यामध्ये पालिका-सदस्याच्या किंवा नगरपालिका परिषदेकडे कामावर असलेल्या किंवा तिने कामावर लावलेल्या एखाद्या अधिकाऱ्याच्या किंवा कर्मचाऱ्यांच्या, अधिकारी म्हणून किंवा लोकसेवक म्हणून असेल त्या-व्यतिरिक्त, वर्तणुकीचा किंवा चारित्र्याचा उल्लेख असणार नाही;

(ड) नियम २५, पोट-नियम (२), खंड (एक)मध्ये उल्लेख केला असेल अशा कोणत्याही बाबीशी त्याचा संबंध असणार नाही.

१७. प्रस्ताव कसा मांडावा – [१] अन्यथा स्पष्टपणे तरतूद केली नसेल तर, (तहकुबीसंबंधीची चर्चा समाप्त करण्यासंबंधीचा आणि तत्सम स्वरूपाचा औपचारिक प्रस्ताव नसलेला) प्रत्येक प्रस्ताव तो मांडण्यापूर्वी, नाव सुचविणारा त्यावर

आपली सही करून किंवा अंगठ्याचा ठसा उमटवून अध्यक्षाच्या किंवा मुख्य अधिकाऱ्याच्या स्वाधीन करील किंवा त्याच्याकडे लेखी पाठवील. जेव्हा प्रस्ताव अध्यक्षाच्या स्वाधीन केला असेल किंवा त्याच्याकडे पाठविला असेल तेव्हा त्याची एक प्रत मुख्य अधिकाऱ्याकडे पाठविण्यात येईल.

[२] कलम ८१, पोट-कलम (१०) च्या उपबंधास अधीन राहून, जो प्रस्ताव पोट-नियम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, सभेच्या तारखेपूर्वी निदान पंधरा दिवस आधी अध्यक्षास किंवा मुख्य अधिकाऱ्यास मिळाला नसेल असा कोणताही प्रस्ताव त्या सभेत चालविण्यात यावयाच्या कामकाजात समाविष्ट केला जाणार नाही :

परंतु, अध्यक्षास, विशिष्ट परिस्थितीत, लेखी नमूद करावयाच्या कारणास्तव जो कोणताही प्रस्ताव सभेच्या तारखेपूर्वी सात दिवसांपेक्षा कमी नाही इतके दिवस अगोदर मिळाला असेल असा प्रस्ताव कामकाजात समाविष्ट करता येईल.

[३] मुख्य अधिकाऱ्यास प्रस्ताव मिळाल्यानंतर, तो प्रस्ताव अधिनियमाच्या किंवा त्याअन्वये केलेल्या नियमांच्या किंवा उप-विधींच्या उपबंधांशी सुसंगत नाही किंवा त्या प्रस्तावामुळे नगरपालिका निधीतून खर्च करणे भाग पडेल व त्यासाठी आर्थिक मंजुरी मिळविण्यात आलेली नाही असे त्याचे मत असेल तर, मुख्य अधिकारी आपले अभिप्राय अध्यक्षाकडे पाठवील. प्रस्ताव नियमानुसार असेल तेव्हा मुख्य अधिकारी आर्थिक व प्रशासकीय दृष्टिकोनातून आवश्यक ती माहिती देऊन त्याचे संक्षिप्त टिपण तयार करील.

१८. अनुमोदन देणे – पीठासीन प्राधिकाऱ्याने सुचविलेल्या व ज्याला अनुमोदनाची आवश्यकता नाही अशा सुधारणेच्या प्रस्तावाशिवाय दुसरा कोणताही प्रस्ताव किंवा सुधारणा, ज्या पालिका-सदस्यास मत देण्याचा अधिकार असेल अशा पालिका-सदस्याने अनुमोदन दिल्याशिवाय, चर्चेस घेतली जाणार नाही.

१९. प्रस्ताव मांडणाऱ्या व्यक्तीच्या अनुपस्थितीतील तरतूद – ज्या पालिका-सदस्याने प्रस्तावाची नोटीस दिली तो पालिका-सदस्य अनुपस्थित असेल तर, मत देण्याचा अधिकार असलेल्या व त्याने लेखी अधिकृत केलेल्या इतर कोणत्याही पालिका-सदस्यास तो ठराव मांडता येईल.

२०. प्रस्ताव मागे घेणे – सूचना केलेला व अनुमोदन देण्यात आलेला कोणताही प्रस्ताव, ज्या पालिका-सदस्याने अनुमोदन दिले असेल त्या पालिका-सदस्याच्या संमतीने नाव सुचविणारास नगरपालिकेच्या परवानगीने मागे घेता येईल.

२१. एकदा मागे घेतलेला प्रस्ताव त्याच सभेत सुचविता येणार नाही – जो प्रस्ताव नियम २० अन्वये एकदा मागे घेण्यात आला असेल तो प्रस्ताव (सभा स्थगित केली असल्यास स्थगनोत्तर सभा धरून) त्याच सभेत पुन्हा मांडता येणार नाही.

२२. विवक्षित प्रस्तावावर मर्यादा – कलम ८१ च्या खंड (११) अन्वये

कोणत्याही बाबीची अग्रता सुचविण्याची नोटीस, मुख्य अधिकाऱ्यास सभेच्या प्रारंभापूर्वी देण्यात येईल आणि अशा कोणत्याही प्रस्तावावर चर्चा किंवा भाषण करण्यास परवानगी दिली जाणार नाही.

२३. प्रस्ताव पुढे ढकलण्याची सूचना – [१] कोणतीही बाब विचारात घेण्याचे लांबणीवर टाकण्यासंबंधीचा प्रस्ताव ती बाब विचारात घेतल्यानंतर कोणत्याही वेळी कोणत्याही पालिका-सदस्यास सुचविता येईल व अशा प्रस्तावास त्या बाबीसंबंधाने असलेल्या कोणत्याही प्रस्तावापेक्षा प्राधान्य राहील.

[२] पीठासीन प्राधिकाऱ्याने, प्रस्ताव मांडणाऱ्या व्यक्तीस स्पष्टीकरणात्मक संक्षिप्त निवेदन करण्याची परवानगी दिल्यानंतर, आणि त्या प्रस्तावास एकाहून अधिक नाहीत इतक्या पालिका-सदस्यांकडून विरोध झाला असेल तर, अधिक चर्चा न करता, तो प्रस्ताव मतास टाकण्यात येईल.

[३] कोणत्याही गोष्टीचा विचार लांबणीवर टाकण्यासंबंधीचा प्रस्ताव हा, पीठासीन प्राधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय, कोणत्याही गोष्टीवरील वादविवादात, एकापेक्षा अधिक वेळा करता येणार नाही.

२४. चर्चा – [१] एकदा प्रस्ताव किंवा सुधारणा मांडण्यात आल्यानंतर आणि त्यास अनुमोदन देण्यात आल्यानंतर, पीठासीन प्राधिकारी, असा प्रस्ताव किंवा सुधारणा सभेस वाचून दाखवील किंवा वाचून दाखविण्याची व्यवस्था करील; त्यानंतर तो प्रस्ताव किंवा सुधारणा सभेपुढे चर्चेसाठी आली असल्याचे समजण्यात येईल. असा प्रस्ताव किंवा सुधारणा मांडणाऱ्या व्यक्तीस, त्यानंतर प्रस्तावाच्या किंवा सुधारणेच्या पुष्टचर्थ भाषण करता येईल आणि अनुमोदन देणाऱ्या व्यक्तीस एक तर त्यावर आपले भाषण करता येईल किंवा त्यावरील चर्चेच्या नंतरच्या अवस्थेसाठी आपले भाषण राखून ठेवता येईल. इतर पालिका-सदस्यांना, अन्यथा जी कोणतीही तरतूद केलेली असेल ती खेरीजकरून, पीठासीन प्राधिकाऱ्याकडून ज्या क्रमाने त्यांना बोलविण्यात येईल त्या क्रमाने ते त्या प्रस्तावावर भाषण करतील.

[२] अधिनियमाच्या किंवा तदन्वये केलेल्या नियमांच्या किंवा उपविधींच्या उपबंधांशी असा प्रस्ताव विसंगत असेल किंवा त्यामुळे नगरपालिका निधीतून खर्च करावा लागणार असेल तर मुख्य अधिकाऱ्यास अशा प्रस्तावावर आपली मते मांडता येतील.

[३] ज्या पालिका-सदस्याने एखाद्या प्रस्तावावर सभेत एकदा भाषण केले असेल अशा कोणत्याही पालिका-सदस्यास त्यानंतर त्या प्रस्तावासंबंधी सुधारणा मांडता येणार नाही किंवा त्यास अनुमोदन देता येणार नाही किंवा त्यास अन्यथा त्या प्रस्तावावरील चर्चेत भाग घेता येणार नाही.

[४] सभेपुढे असलेल्या ज्या कोणत्याही गोष्टीत किंवा कलम १६, पोट-कलम (३) मध्ये वर्णन करण्यात आलेल्या ज्या कोणत्याही गोष्टीत पालिका-सदस्याचा

स्वत:चा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल अशा कोणत्याही गोष्टीत किंवा ज्यामध्ये त्याच्या पक्षकाराच्या पक्षकर्त्याचा किंवा इतर व्यक्तींचा व्यावसायिक हितसंबध असेल त्यास मत देता येणार नाही किंवा त्यासंबंधीच्या चर्चेत भाग घेता येणार नाही किंवा नियम १५ अन्वये कोणताही प्रश्न विचारता येणार नाही.

२५. वादविवादासंबंधी मर्यादा – [१] प्रत्येक भाषणातील मजकूर, भाषण ज्या प्रस्तावावर करण्यात येईल त्या प्रस्तावाशी सुसंबद्ध असेल.

[२] भाषण करीत असताना पालिका-सदस्य –

(i) ज्या कोणत्याही बाबीसंबंधाने भारताच्या कोणत्याही भागात क्षेत्राधिकार असलेल्या न्यायालयाकडून (कोणत्याही न्यायाधीकरणाचा समावेश करून) अभिनिर्णय होणार असेल अशा बाबीसंबंधी उल्लेख करणार नाही;

(ii) दुसऱ्या पालिका-सदस्यांविरुद्ध वैयक्तिक आरोप करणार नाही;

(iii) कोणत्याही बाबीसंबंधी नगरपालिकेकडून घेण्यात आलेल्या कोणत्याही निर्णयावर, अशा बाबीसंबंधी नवीन प्रस्ताव केला नसेल तर, त्यावर टीका करणार नाही;

(iv) क्षोभक किंवा बदनामीकारक शब्दांचा उपयोग करणार नाही;

(v) सभेच्या कामकाजात अडथळा आणण्याच्या दृष्टीने आपल्या भाषण करण्याच्या हक्काचा उपयोग करणार नाही;

(vi) नगरपालिकेने नेमलेल्या कोणत्याही समितीतील कामकाजाचा परिस्फोट करणार नाही; किंवा

(vii) (अ) अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांना पदावरून दूर करण्याकरिता कलम ५५, पोट-कलम (१) अन्वये मांडण्यात आलेल्या ठरावावर पीठासीन प्राधिकाऱ्याने दिलेला अधिनिर्णय, आदेश किंवा निदेश याखेरीज करून; आणि

(ब) पीठासीन प्राधिकाऱ्याच्या संमतीशिवाय पीठासीन प्राधिकाऱ्याच्या कोणत्याही अभिनिर्णयावर, आदेशावर किंवा निदेशावर चर्चा करणार नाही.

[३] (अ) पीठासीन प्राधिकारी किंवा ज्या पालिका-सदस्याने कोणत्याही अपमानकारक शब्दांना हरकत घेतली असेल असा पालिका-सदस्य एकतर तावडतोब किंवा ज्या सभासदाने असे अपमानकारक शब्द वापरले असतील त्या सभासदाच्या भाषणाच्या शेवटी "शब्दांची नोंद करून घेण्यात यावी" असा प्रस्ताव मांडील. त्याच्या प्रस्तावास संमती देण्यात आली असेल तर, पीठासीन प्राधिकारी शब्दांची नोंद करून घेण्यात यावी असा निदेश देईल.

(ब) ज्या पालिका-सदस्यांच्या शब्दांची नोंद करण्यात आली असेल तो पालिका-

सदस्य आदेशांचा भंग केल्याबद्दल दोषी असेल.

[४] जो पालिका-सदस्य असंबद्ध बोलण्याचे चालू ठेवील किंवा वादविवादातील त्याच्या स्वतःच्या युक्तिवादांची किंवा इतर पालिका-सदस्यांनी योजिलेल्या युक्तिवादांची कंटाळवाणी पुनरुक्ती करण्याचे चालू ठेवील किंवा जो पोट-नियम (१)च्या किंवा इतर कोणत्याही नियमाच्या उपबंधांचे जाणूनबुजून उल्लंघन करील त्या पालिका-सदस्यांच्या वर्तनाकडे सभेचे लक्ष वेधण्यात आल्यानंतर, पीठासीन प्राधिकाऱ्यास अशा पालिका-सदस्यांस आपले भाषण बंद करण्यासाठी निदेश देता येईल.

२६. स्थगित केलेल्या चर्चेस प्रारंभ – स्थगित केलेल्या चर्चेस पुन्हा सुरुवात करण्यात आल्यावर, चर्चा स्थगित करण्याच्या निकटपूर्वी जो पालिका-सदस्य सभेत भाषण करीत होता त्या पालिका-सदस्यास प्रथम भाषण करण्याचा हक्क असेल.

२७. पीठासीन प्राधिकाऱ्याची प्रस्ताव किंवा सुधारणा विभागण्याची शक्ती – कोणत्याही प्रस्तावात किंवा सुधारणेत अनेक मुद्यांचा अंतर्भाव होत असेल तेव्हा, पीठासीन प्राधिकाऱ्यास, तो प्रस्ताव किंवा ती सुधारणा विभागता येईल आणि त्याला योग्य वाटेल त्याप्रमाणे प्रत्येक मुद्दा किंवा कोणताही मुद्दा वेगवेगळ्या रीतीने मतदानास टाकता येईल.

२८. प्रस्तावाचे किंवा सुधारणांचे गट पाडणे – पीठासीन प्राधिकाऱ्यास सभेच्या विचारार्थ दोन किंवा अधिक प्रस्तावांचा किंवा सुधारणांचा एक गट करता येईल; परंतु, अशा प्रस्तावांचा किंवा सुधारणांचा वादविषय प्रामुख्याने एकच असेल.

२९. सुधारणा – [१] एखादा प्रस्ताव मांडण्यात आल्यानंतर आणि त्यास अनुमोदन देण्यात आल्यानंतर त्यासंबंधी सुधारणा सुचविता येतील.

[२] प्रत्येक सुधारणा प्रस्तावाशी सुसंबद्ध असेल आणि त्याद्वारे प्रास्ताविक फेरफार करता येईल, त्यात जादा मजकूर दाखल करता येईल किंवा त्यातून मजकूर वगळता येईल. परंतु कोणतीही सुधारणा, ही सभेपुढे असलेल्या प्रत्येक प्रस्तावाला सरळ नाकारणाऱ्या स्वरूपाची असणार नाही किंवा ती त्याच सभेत ज्या महत्त्वाच्या मजकुरास पूर्वीच नकार देण्यात आला होता अशा स्वरूपाची असणार नाही.

[३] सभेत एकाच वेळी कितीही सुधारणा मांडता येतील. परंतु, कोणत्याही पालिका-सदस्यास त्याच प्रस्तावावर एकापेक्षा अधिक सुधारणा सुचविता येणार नाहीत. आणि ज्या पालिका-सदस्याने कोणताही प्रस्ताव सुचविला असेल किंवा ज्याने त्यास अनुमोदन दिलेले असेल त्या कोणत्याही पालिका-सदस्यास त्या प्रस्तावावर सुधारणा सुचविता येणार नाही किंवा अशा सुधारणेस अनुमोदन देता येणार नाही.

[४] एखाद्या सुधारणेसंबंधी कोणतीही सुधारणा सुचविण्यात आली असेल

तेव्हा, ज्या सुधारणेची सुधारणा करण्याचे ठरविले असेल ती सुधारणा ही, ज्या-अन्वये ती सुधारण्याचे ठरविले असेल त्या सुधारणेची चर्चा चालू असेतोपर्यंत सभेपुढे मूळ प्रस्ताव असल्याचे समजण्यात येईल.

[५] वैकल्पिक सुधारणा सुचविण्यात येणार नाही.

[६] पीठासीन प्राधिकाऱ्याच्या मते जी कोणतीही सुधारणा निरर्थक असेल अशा सुधारणेस त्यास परवानगी नाकारता येईल.

[७] एखाद्या पालिका-सदस्याने उत्तर देण्याचा आपला हक्क बजाविल्यानंतर त्यास कोणतीही सुधारणा सुचविता येणार नाही.

३०. उत्तर देण्याचा अधिकार – मूळ प्रस्ताव मांडणाऱ्या व्यक्तीस, किंवा प्रस्ताव मांडणारी व्यक्ती आपला हक्क सोडून देईल तर (मुख्य प्रस्तावास) अनुमोदन देणाऱ्या व्यक्तीस त्या प्रस्तावावरील वादविवादाच्या शेवटी उत्तर देता येईल. परंतु उत्तरादाखल केलेल्या भाषणातील कोणत्याही महत्त्वाच्या संदिग्धतेसंबंधी स्पष्टी-करण करण्यासाठी पीठासीन प्राधिकाऱ्याने परवानगी दिली असेल ते खेरीज करून, उत्तर देण्यात आल्यानंतर त्याच प्रस्तावावर किंवा सुधारणेवर कोणत्याही इतर पालिका-सदस्यांस भाषण करता येणार नाही.

३१. वादविवाद समाप्ती – [१] प्रस्ताव केल्यावर, कोणत्याही वेळी कोणत्याही पालिका-सदस्यास ' आता प्रश्न मतास टाकावा ' असे सुचविता येईल आणि अशा प्रस्तावामुळे पुरेशा वादविवादाच्या अधिकाराचे उल्लंघन होईल असे पीठासीन प्राधिकाऱ्यास दिसून आले नाही तर, पीठासीन प्राधिकारी, कोणताही वादविवाद होऊ न देता ' आता प्रश्न मतास टाकावा ' असा प्रश्न ताबडतोब मांडील.

[१-अ] " आता प्रश्न मतास टाकावा " असा प्रस्ताव संमत झाला तर पीठासीन प्राधिकारी, नाव सुचवणारा किंवा अनुमोदक यास उत्तर देण्यासाठी मागील अनुवर्ती नियमान्वये अनुज्ञेय असेल असा अधिकार वापरण्याची परवानगी देऊन, आणखी वादविवाद होऊ न देता तद्नंतर प्रश्न मतास टाकील.

[२] चर्चासमाप्तीच्या प्रस्तावावर कोणताही वादविवाद होणार नाही.

[३] चर्चा समाप्तीसंबंधीचा प्रस्ताव फेटाळण्यात आला असेल तर त्यानंतर पंधरा मिनिटे होईपर्यंत तो पुन्हा मांडता येणार नाही.

३२. मूळ प्रस्ताव आणि सुधारणा यांवर मतदान – [१] एखाद्या प्रस्तावावरील चर्चा समाप्त झाल्यानंतर (नियम ३० अन्वये अनुज्ञेय असल्याप्रमाणे सूचक किंवा अनुमोदक यास उत्तर देण्याचा अधिकार वापरण्याची परवानगी दिल्यानंतर, पीठासीन प्राधिकाऱ्यास) अशा प्रस्तावावर आणखी चर्चा न करता तो सभेत मतासाठी मांडता येईल.

[२] मतदान पुढील रीतीने घेण्यात येईल :–

(अ) प्रस्तावावर फक्त एकच सुधारणा सुचविली असेल तेव्हा–

(i) प्रथम अशी सुधारणा मतास टाकण्यात येईल;

(ii) अशी सुधारणा नामंजूर करण्यात आली असेल तर, त्यानंतर असा प्रस्ताव मतास टाकण्यात येईल; किंवा

(iii) ती सुधारणा मंजूर करण्यात आली असेल तर, सुधारलेला प्रस्ताव मतास टाकण्यात येईल.

(ब) एकापेक्षा अधिक सुधारणा असतील तेव्हा–

(i) पीठासीन प्राधिकारी ठरवील त्या क्रमाने एकानंतर एक याप्रमाणे सुधारणा प्रथम मतास टाकण्यात येतील;

(ii) सर्व सुधारणा फेटाळण्यात आल्या तर, त्यानंतर प्रस्तावावर मतदान घेण्यात येईल;

(iii) सर्व सुधारणा किंवा त्यांपैकी कोणतीही सुधारणा मंजूर करण्यात आली तर, सुधारलेल्या प्रस्तावावर मतदान घेण्यात येईल.

३३. मते नोंदविण्याची पद्धत – मतदान हे सामान्यत: हात वर करून घेण्यात येईल. परंतु विशेष प्रसंगी, पीठासीन प्राधिकारी जर तसे ठरवील तर, मतदान हे गुप्त मतदान पद्धतीने घेण्यात येईल. परंतु वित्तीय बांधिलकीच्या रकमांचा अंतर्भाव असणाऱ्या कोणत्याही ठरावाच्या किंवा सूचनेच्या बाबतीतील मते, पीठासीन प्राधिकारी गुप्त मतदान पद्धतीने नोंदविणार नाही. परंतु अशा ठरावाच्या किंवा सूचनेच्या बाजूने किंवा त्याविरुद्ध मत देणाऱ्या पालिका-सदस्यांची नावे, कलम ८१, खंड (१२)मध्ये तरतूद केल्याप्रमाणे नोंदविण्यात येईल.

३४. गुप्त मतदान पद्धतीने मते घेणे – गुप्त मतदान पद्धतीने मते घेण्यात आली असतील तेव्हा प्रत्येक पालिका-सदस्य आपले मत मतपत्रिकेवर नोंदवील. मते घेण्यासाठी वापरलेल्या मतपत्रिका निकाल जाहीर केल्याच्या तारखेपासून एक महिना होईपर्यंत नष्ट करण्यात येणार नाहीत.

३५. मतदान करणे सक्तीचे असणार नाही – सभेत उपस्थित असलेल्या कोणत्याही पालिका-सदस्यास त्याची इच्छा असेल तर, मत देण्यापासून अलिप्त राहता येईल.

३६. समसमान मते पडल्याचा परिणाम – समसमान मते पडली असतील आणि पीठासीन प्राधिकाऱ्याने, आपले निर्णायक किंवा दुसरे मत (दिले नाही तर) असा प्रस्ताव व्यपगत झाल्याचे समजण्यात येईल. आणि तीन महिन्यांची मुदत (संपे) पर्यंत नंतरच्या कोणत्याही सभेपुढे तो मांडण्यात येणार नाही.

३७. निकाल जाहीर करणे – [१] मते मोजण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर पीठासीन प्राधिकारी कलम ८१, (१३)च्या उपबंधांना अधीन राहून, मतांचा निकाल त्या वेळी व त्याच ठिकाणी जाहीर करील आणि तो कार्यवृत्त पुस्तकात योग्य रीतीने नमूद करील.

[२] हात वर करून मतदान घेण्यात आले असेल तेव्हा एखादा ठराव किंवा प्रस्ताव मंजूर झालेला आहे असे पीठासीन प्राधिकाऱ्याने जाहीर करणे आणि त्या बाबतीत कार्यवृत्त पुस्तकात नोंद दाखल करणे या गोष्टी असा ठराव किंवा प्रस्ताव मंजूर झालेला आहे या वस्तुस्थितीविषयीचा निर्णायक पुरावा असेल.

३८. अर्थसंकल्पीय अंदाज, इत्यादींवर मतदान – [१] जेव्हा एखादा अर्थसंकल्पीय अंदाज, पुरवणी अर्थसंकल्पीय अंदाज, निधीच्या पुनर्विनियोजनासाठीचा प्रस्ताव, नियम किंवा उप-विधींची संहिता, विक्रीकरिता किंवा खरेदीकरिता किंवा पट्ट्याने देण्याकरिता किंवा हस्तांतरित करण्याकरिता असलेल्या जमिनींची यादी, निर्लेखित करावयाच्या बाबींची यादी, येणे असलेल्या रकमांच्या यादी, नगरपालिकेचे हिशोब किंवा स्थायी समिती ठरवील असे इतर प्रस्ताव ह्या बाबी, पीठासीन प्राधिकाऱ्यास, त्यास सोयीस्कर असेल अशा गटामध्ये एकत्रित करता येतील आणि लागोपाठ प्रत्येक गटासाठी योग्य प्रस्ताव करून मान्यतेसाठी तो सभेपुढे मांडता येईल. अशा प्रस्तावावर कारवाई करण्यापूर्वी त्यास अनुमोदन देईल:

परंतु, पीठासीन प्राधिकाऱ्यास अशा गटांची उप-विभागणी करता येईल किंवा त्यांची फेररचना करता येईल.

तसेच, पीठासीन प्राधिकाऱ्याने सभेत व्यक्त केलेल्या अभिप्रायावरून कोणत्याही बाबीचा किंवा गटाचा वेगळ्या रीतीने विचार करण्यात येऊ नये असे उपस्थित असलेल्या सर्व पालिका-सदस्यांचे मत असेल तर, त्या सबंध प्रश्नाचा एकच प्रस्ताव म्हणून विचार करण्यात येईल.

[२] पोट-नियम (१)च्या दुसऱ्या परंतुकान्वये सभेचे मत किंवा अभिप्राय घेण्यात आला असेल तेव्हा कोणत्याही वादविवादास किंवा भाषणास परवानगी देण्यात येणार नाही.

३९. कार्यवृत्तांचा नमुना – प्रत्येक सभेचे कार्यवृत्त, कलम ८१ च्या खंड (१२) अनुसार, नमुना क मधील नोंदवहीत लिहिण्यात येईल.

४०. कार्यवृत्ते – [१] कार्यवृत्ते जर नगरपालिकेच्या पुढील सभेपुढे ठेवण्यात आली असतील तर, कोणत्याही पालिका-सदस्याने कार्यवृत्ते चुकीची किंवा अपूर्णरीत्या नमूद करण्यात आली आहेत असा आक्षेप घेतला असेल तर, पीठासीन प्राधिकारी, सभेचे मत घेऊन, सभेला योग्य वाटतील अशा सुधारणा कार्यवृत्तांत करील आणि अशी सुधारलेली कार्यवृत्ते मान्य करील व त्यावर सही करील. पीठासीन प्राधिकारी अशा केलेल्या सुधारणांवर आद्याक्षरे लिहील किंवा सही करील.

[२] ह्या नियमानुसार कार्यवृत्तावर उपस्थित केलेल्या आक्षेपांवर चर्चा किंवा भाषण करण्याची परवानगी देण्यात येणार नाही.

[३] सभेतील प्रस्ताव किंवा ठराव यावर मुख्य अधिकाऱ्याने कोणतीही मते व्यक्त केली असल्यास, त्यांचा सभेच्या कार्यवृत्तांच्या अभिलेखात समावेश करण्यात येईल.

नमुना "अ"

[नियम ३ पहा]

सभेच्या नोटिशीचा नमुना

क्रमांक .....

नगरपालिका कार्यालय

दिनांक .....

याद्वारे, ... नगरपालिकेचे पालिकासदस्य* श्री./श्रीमती .... यांस नोटीस देण्यात येत आहे की, नगरपालिकेची सर्वसाधारण/खास* सभा ..... रोजी ..... वाजता (वेळ .....) ..... येथील नगरपालिकेच्या कार्यालयात, जोडपत्रात नमूद केलेले कामकाज चालविण्यासाठी भरविण्यात येणार आहे.

आपणास सभेस उपस्थित राहण्याची विनंती करण्यात येत आहे.

पालिका-सदस्याने ज्याबद्दल लेखी सूचना दिली असेल अशा* ठरावाची/प्रस्तावाची/* विशेष सभेसाठीच्या लेखी विनंतीमध्ये उल्लेख करण्यात आलेल्या *सभेत जो ठराव/प्रस्ताव मांडण्याचा पालिका-सदस्याचा/पालिकासदस्यांचा हेतू असेल त्या प्रस्तावाची/ठरावाची एक प्रत सोबत जोडण्यात आली आहे.

(सही) .....

(पदनाम) .....

---

*लागू नसलेला मजकूर खोडावा.

नमुना "अ" चे जोडपत्र

..... येथे ..... रोजी नगरपालिकेच्या सभेत चालवावयाचे कामकाज.

१. .....

२. .....

३. .....

४. .....

५. .....

वगैरे.

(सही) .....

(पदनाम) .....

नमुना "ब"

[नियम ४ पहा]

उपस्थिती नोंदवही

सभेची तारीख .....

पालिका-सदस्याचे नाव	योग्यरीत्या अभिप्रमाणित केलेली सही किंवा अंगठ्याचा ठसा
(१)	(२)
१.	
२.	
३.	
४.	
५.	

नमुना "क"

[नियम ५ व ३९ पहा]

कार्यवृत्ताची नोंदवही

भाग १

सभेची तारीख व वेळ	उपस्थित असलेल्या पालिका-सदस्यांची नावे	सभेस उपस्थित असलेल्या इतर व्यक्तींची नावे	संक्षिप्त कार्यवृत्त
(१)	(२)	(३)	(४)

(सही .....

(पीठासीन प्राधिकारी) .....

सभेची तारीख व वेळ	प्रस्तावाचा विषय	प्रस्तावाचा मजकूर	प्रस्ताव सुचविणाऱ्याचे व त्यास अनुमोदन देणाऱ्याचे नाव	सुधारणा, कोणत्याही असल्यास		*दिलेल्या मतांची संख्या		सुधारणांवरील मतदानानंतरचा अंतिम ठराव	
				मजकूर	(१) सुचविणारा (२) अनुमोदक यांची नावे	बाजूनें	विरुद्ध	मजकूर	अनुक्रमांक
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)

*मतपत्रिकेद्वारे मते नोंदविण्यात आली नसतील त्या बाबतीत, प्रस्तावाच्या बाजूने आणि प्रस्तावाविरुद्ध मते दिलेल्या पालिका-सदस्यांची नावेदेखील अनुक्रमे स्तंभ (७) व (८)मध्ये नमूद करावी.

(सही) .....

(पीठासीन प्राधिकारी) .....

भाग ३

[नियम १५, पोट-नियम (१२) पहा]

प्रश्नांची नोंदवही

सभेची तारीख .....

प्रश्न	ज्या पालिका-सदस्याने मांडला त्याचे नाव	परवानगी देण्यात आली किंवा नाही ते	उत्तर कोणतेही दिले असल्यास	उत्तर दिले असेल तर ते कोणी दिले
(१)	(२)	(३)	(४)	(५)

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,
बी. व्ही. लाड
शासनाचे उपसचिव

नगरविकास, आरोग्य व गृहनिर्माण विभाग

सचिवालय, मुंबई, दिनांक ८ जून १९६७

महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५

क्रमांक यूएमआर–११६६–एकीकरण–चार–महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०) याचे कलम ३२१, पोट-कलम (२) आणि कलम ६१, पोट-कलम (१) अन्वये प्रदान केलेल्या शक्तींचा आणि महाराष्ट्र शासनास त्या बाबतीत समर्थ करणाऱ्या इतर सर्व शक्तींचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे पुढील नियम करीत आहे. हे नियम, उक्त कलम ३२१, पोट-कलम (३) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आले आहेत.

१. संक्षिप्त नाव व प्रारंभ – [१] या नियमांना महाराष्ट्र नगरपालिका (अध्यक्षास मानधन किंवा आतिथ्य भत्ता) नियम, १९६७ असे म्हणता येईल.

[२] ते १५ जून १९६६ पासून अमलात आले असल्याचे मानण्यात येईल.

२. व्याख्या – या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर –

(अ) " अधिनियम " म्हणजे, महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५;

(ब) " कलम " म्हणजे अधिनियमाचे कलम.

३. विवक्षित प्रकरणांमध्ये अध्यक्षास मानधनाचा हक्क नसणे – [१] कोणत्याही कारणासाठी नगरपालिका क्षेत्रामध्ये तीस दिवसांपेक्षा अधिक असणाऱ्या कोणत्याही सतत अनुपस्थितीच्या मुदतीमध्ये कोणतेही मानधन मिळण्याचा अध्यक्षास हक्क असणार नाही.

[२] अध्यक्ष त्याच्या पदावधीमध्ये कोणत्याही एका वेळी आजारपणाच्या कारणासाठी एकशेऐंशी दिवसांपेक्षा अधिक नसेल अशा सलग मुदतीपर्यंत अनुपस्थित असेल अशा बाबतीत पोट-नियम (१) मधील काहीही लागू होणार नाही; परंतु अशा अनुपस्थितीस जिल्ह्याच्या, शल्यचिकित्सकाने सही केलेल्या वैद्यकीय प्रमाण-पत्राद्वारे पुष्टी देण्यात आलेली असली पाहिजे.

४. आतिथ्य भत्त्यामधून करावयाच्या खर्चाची मर्यादा – आतिथ्य भत्त्यामधून पाहुणचारासाठी करावयाचा कोणताही खर्च पाहुणचाराच्या प्रत्येक प्रकारासाठी पुढे दर्शविलेल्या मर्यादांपेक्षा अधिक होणार नाही :–

	रु.	
चहा व अल्पोपाहार	१	पाहुणचारास उपस्थित राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीमागे.
मध्यान्ह भोजन	३	
भोजन	५	
सायंकाळचे स्वागत-समारंभ किंवा स्नेहोपाहार	२	

(**टीप** – फुले, सजावट इत्यादीसारख्या खर्चाच्या दुय्यम बाबी, कोणत्याही असल्यास, वर विहित केलेल्या मर्यादांमध्ये बसविण्यात याव्यात.)

५. **आतिथ्य भत्त्यामधील खर्चाचे प्रमाणन** – नगरपालिकेचे कार्यालय, आतिथ्य भत्त्यामधून तरतूद केलेल्या, पाहुणचारावरील खर्चाचा हिशोब यथोचितरीत्या ठेवील आणि नियम ४ चे उपबंध लागू होणाऱ्या प्रत्येक प्रकरणामध्ये अध्यक्ष, लेखापरीक्षेच्या प्रयोजनासाठी, पाहुणचारावर प्रत्यक्ष केलेला खर्च हा त्या नियमामध्ये घालून दिलेल्या कमाल मर्यादेपेक्षा अधिक नाही असे प्रमाणित करील आणि प्रमाणपत्रामध्ये पुढील गोष्टींचा विनिर्देश करील :–

(i) पाहुणचाराचे स्वरूप,

(ii) पाहुणचार दिलेल्या व्यक्तींची संख्या, आणि

(iii) केलेला प्रत्यक्ष खर्च.

६ **मानधन किंवा आतिथ्य भत्ता यावरील खर्च भागविण्याचे साधन** – वित्तीय वर्षामध्ये, मानधन किंवा आतिथ्य भत्ता यावर केलेला खर्च अनुक्रमे "अध्यक्षास मानधन" व "अध्यक्षास आतिथ्य भत्ता" या शप-शीर्षांकडे खर्ची टाकण्यात येईल आणि त्या उप-शीर्षाखालील त्या वर्षाच्या मंजूर अनुदानामधून तो भागविण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

पी. एन. पळणिटकर
शासनाचे उपसचिव

●●

हेही लक्षात असू द्या

म्युनिसिपालिटीच्या वॉर्डाची निवडणूक लढविणाऱ्या सर्व उमेदवारांसाठी एकच मत-पेटी उपस्थित असलेल्या प्रत्येकाला दिसेल अशा रितीने मतदान कक्षाजवळ बसलेल्या मतदान-अधिकाऱ्यापुढे ठेवलेली असेल.

मतदानकेंद्रात, मतदान अधिकारी, उमेदवार, उमेदवाराचा निवडणूक प्रतिनिधी (फक्त एक), सरकारी नोकर, जो निवडणूक-कामासाठी नेमलेला असेल तो, मतदाराच्या कडेवर असू शकेल इतक्या लहान वयाचे मूल, मदतीशिवाय ज्यांना हालचाल करता येत नाही अशा आंधळ्या-अपंग व्यक्तीबरोबर आलेली व्यक्ती, मतदाराची ओळख पटवून घेण्याचा प्रसंग उद्‌भवल्यास ओळख पटवून देऊ शकेल अशी मतदान-अधिकाऱ्याने बोलावलेली व्यक्ती इतक्यांना मतदानकेंद्रात प्रवेश करता येतो. कोणी मतदार मतदान-पत्रिकेवर मत नोंदवीत असताना त्याचा फोटो काढू दिला जात नाही. मात्र पेटीत घडी केलेली मतपत्रिका टाकताना काही अपवादात्मक व्यक्तीचा फोटो काढू दिला जातो, सरसहा नाही.

लोकप्रतिनिधित्व कायद्यातील महत्तम तत्त्वे व तरतुदी म्युनिसिपालिटीच्या निवडणुकीस लागू केलेल्या आहेत. त्यांतील काही महत्वाचा भाग–

५७. आणीबाणीच्या परिस्थितीत मतदान तहकूब करणे – [१] एखाद्या निवडणुकीच्या वेळी कलम २५ अन्वये तरतूद करण्यात आलेल्या कोणत्याही मतदान-केंद्रावरील किंवा मतदानासाठी कलम २९ चे पोट-कलम (१) अन्वये ठरविण्यात आलेल्या जागेवरील कामकाजात कोणत्याही दंग्यामुळे अथवा उघड हिंसात्मक कृत्यामुळे व्यत्यय आल्यास अथवा अडथळा झाल्यास किंवा एखाद्या निवडणुकीच्या वेळी कोणत्याही नैसर्गिक आपत्तीमुळे अथवा अन्य कोणत्याही पुरेशा कारणामुळे कोणत्याही मतदानकेंद्रावर अथवा अशा जागी मतदान चालू ठेवणे शक्य न झाल्यास, अशा मतदानकेंद्रावरील मतदान केंद्राध्यक्ष किंवा अशा केंद्रावर अध्यक्ष म्हणून काम पाहणारा निर्वाचन अधिकारी, यापैकी जो कोणी असेल त्याने, नंतर अधिसूचित करण्यात येईल अशा दिनांकापर्यंत मतदान तहकूब करण्यात आल्याचे जाहीर केले पाहिजे आणि जेव्हा एखादा मतदान केंद्राध्यक्ष अशा प्रकारे मतदान तहकूब करील तेव्हा त्याने संबंधित निर्वाचन अधिकाऱ्यास ताबडतोब तसे कळविले पाहिजे.

[२] पोट-कलम (१) अन्वये जेव्हा जेव्हा मतदान तहकूब करण्यात येईल, तेव्हा तेव्हा निर्वाचन अधिकाऱ्याने ती परिस्थिती योग्य त्या अधिकाऱ्यास व निवडणूक आयोगास ताबडतोब लिहून कळविली पाहिजे आणि निवडणूक आयोगाच्या पूर्वसंमतीने मतदान पुन्हा ज्या दिवशी सुरू होईल तो दिवस शक्य तितक्या लवकर नेमून दिला पाहिजे व मतदान कोणत्या मतदानकेंद्रावर किंवा जागी व कोणत्या

वेळेत घेण्यात येईल ती वेळ निश्चित केली पाहिजे व अशा रीतीने तहकूब करण्यात आलेले मतदान पूर्ण होईपर्यंत त्याने अशा निवडणुकीच्या वेळी दिलेल्या मतांची मोजणी करता कामा नये.

[३] उपरोक्त प्रत्येक बाबतीत पोट-कलम (२) अन्वये निश्चित केलेला मतदानाचा दिनांक, जागा व वेळ, ही निर्वाचन अधिकाऱ्याने निवडणूक आयोग निदेश देईल त्या रीतीने अधिसूचित केली पाहिजे.

५८. मतपेट्यांची मोडतोड वगैरे झाल्यास नव्याने मतदान घेणे – [१] जर एखाद्या निवडणुकीच्या वेळी –

(अ) एखाद्या मतदानकेंद्रावर किंवा मतदानासाठी ठरविण्यात आलेल्या जागेवर उपयोगात आणलेली कोणतीही मतपेटी मतदान केंद्राध्यक्ष किंवा निर्वाचन अधिकारी यांच्या ताब्यातून बेकादेशीरपणे काढून घेण्यात आली किंवा ती अपघाताने किंवा हेतूपूर्वक नष्ट करण्यात आली किंवा गहाळ करण्यात आली किंवा त्या मतदानकेंद्रावर किंवा मतदानाच्या जागेवर केल्या गेलेल्या मतदानाचा निकाल निश्चित ठरविणे अशक्य होईल इतक्या प्रमाणात तिची नासधूस करण्यात आली किंवा तिच्यासंबंधात हस्तक्षेप करण्यात आला किंवा;

(ब) मतदानकेंद्रावर किंवा मतदानासाठी ठरविण्यात आलेल्या जागेवर कार्य-पद्धतीत कोणतीही चूक किंवा नियमबाह्य गोष्ट घडल्यामुळे मतदानावर अनिष्ट परिणाम होण्याची शक्यता असेल;

तर निर्वाचन अधिकाऱ्याने निवडणूक आयोगाला ती गोष्ट ताबडतोब कळविली पाहिजे.

[२] त्यानंतर, सर्व महत्त्वाची परिस्थिती विचारात घेऊन निवडणूक आयोगाने–

(अ) त्या मतदानकेंद्रावर किंवा मतदानाच्या जागेवर झालेले मतदान गैरकायदेशीर असल्याचे जाहीर केले पाहिजे; त्या मतदानकेंद्रावर किंवा मतदानाच्या जागेवर नव्याने मतदान घेण्यासाठी एखादा दिवस व वेळ ठरविली पाहिजे आणि असा ठरविलेला दिवस व वेळ त्यास योग्य वाटेल त्या रीतीने त्याने अधिसूचित केली पाहिजे; किंवा

(ब) त्या मतदानकेंद्रावरील मतदानाच्या जागेवरील मतदानाचा निवडणुकीच्या निकालावर कोणत्याही प्रकारे अनिष्ट परिणाम होणार नाही किंवा कार्य-पद्धतीत घडलेली चूक किंवा नियमबाह्य गोष्ट महत्त्वाची नाही अशी त्याची खात्री झाल्यास, निवडणूक पुढे चालविण्यासाठी व ती पूर्ण करण्यासाठी त्यास योग्य वाटतील त्या सूचना त्याने निर्वाचन अधिकाऱ्या लादिल्या पाहिजेत.


मराठी ग्रंथ... महालय ठाणे
३०३१
दा. क्र. २४१८४
निबंध १७।४।८४


REFBK-0024184